ॐ

मराठामित्र पुस्तकमाला-पुष्प ३ रें.

महाराणा राजसिंह

(ऐतिहासिक कादंबरी).

सत्पुरुष-कथा अद्भुत रसदा म्हणतों इलाचि सुरभी मी ॥

(मोरोपंत).

लेखक

श्रीयुत गोपाळ दाजीबा दळवी,

संपादक-मराठामित्र.

भायखळा, चमेलीची वाडी, पोष्ट जेकब सर्कल, मुंबई.

मुंबई,

'इंदुप्रकाश स्टीम प्रेस' मध्यें छापिली.

सन १९१० इसवी.

किंमत १ रुपया.

प्रस्तावना.

अनुष्टुप्.

कः सूर्यप्रभवो वंशः कचाल्पविषया मतिः ।
तितिर्षुर्दुस्तरं मोहा दुडुपेनास्मि सागरं ॥ १ ॥

(कवि कुलगुरु).

आर्या.

(जनमेजय नृपति पुसे, वैशंपायन कथी) सविस्तरतें–
बहु, मी लेशचि गातों, जग लेशेंही महद्यशें तरतें ॥ १ ॥

(मोरोपंत).

उदेपूरच्या प्रतापशाली **राणा राजसिंहाचें** कथानक अनेक लेखकांनीं अनेक भाषेंत लिहून ठेविलें आहे. महाकारस्थानी बादशहा औरंगजेबाच्या वेळची भारतवर्षांतील बिकट परिस्थिति आणि त्याकालीं राणा राजसिंहानें प्रकट केलेली तेजस्विता हीं अवर्णनीय आहेत. औरंगजेबाच्या समकालीन महाराष्ट्रामध्यें मराठा वीरशिरोमणी श्रीशिवाजी व राजस्थानांत महाराणा राजसिंह अशीं दोन रत्नें निर्माण झाल्यामुळेंच, औरंगजेबाच्या धर्मवेडेपणास आळा घालितां आला. शिवाजीनें महाराष्ट्रामधील त्याची सत्ता निखळून टाकण्यास प्रारंभ केला, त्याच वेळेस राजसिंहानें, राजस्थानांत रजपुतांच्या अप्रतीम शौर्याचा अनुभव औरंगजेबास आणून दिला. एकाच वेळीं, निरनिराळ्या जागीं दोन शत्रूंशीं झगडणें हें कांहीं सामान्य कृत्य नव्हे ! तें औरंगजेबासारख्या दुसऱ्यावर कधींही विश्वास न ठेवणाऱ्या बादशहाकडून झालें नाहीं यांत नवल कसलें ! औरंगजेब ज्याप्रमाणें मुत्सद्दी व धूर्त होता, त्याप्रमाणेंच जर त्यानें, योग्य माणसांवर विश्वास ठेवून साम्राज्यपदाचा उपभोग घेतला असता, महान् अकबर बादशहाच्या वेळचें बंधुत्वाचें नातें अमलांत आणिलें असतें, हिंदूंच्या धार्मिक समजुतींत हात घातला नसता, ‘ जिझिया ’ करांसारखे कर फक्त हिंदूंवरच लादण्याचा उपक्रम केला नसता, तर औरंगजेबाच्या हयातीमध्येंच मोंगल बादशाहतीस कीड लागून ती अवनतीच्या मार्गास लागण्याचा प्रसंग खास आला नसता. असो.

राणा राजसिंहाचा स्वाभिमान, त्याचें शौर्य, त्याची साहसीवृत्ति, धर्मरक्षणाविषयींचा निश्चय आणि तेजस्विता हीं आर्यावर्ताच्या इतिहासांत चिरसंस्मरणीय होऊन राहिलीं आहेत. अशा या नरपुंगवाचें चरित्र लोकरंजनार्थ कादंबरीरूपानें वर्णन करावें ह्या हेतूनें प्रस्तुत कृति 'राजसिंह' हें बंगाली पुस्तक व दुसरीं अनेक पुस्तकें ह्यांच्या आधारानें तयार केली आहे. मराठींत 'राणा राजसिंहाच्या' कथाभागावर 'रूपनगरची राजकन्या' व 'राजसिंह' या नांवाचीं दोन पुस्तकें झालीं आहेत, पण त्यांच्यापेक्षां प्रस्तुत कृतींत कांहींतरी निराळेपणा वाचकांच्या दृष्टीस पडेल.

चित्रकारास आपलें चित्र उठाव दिसण्याकरितां त्याच्या बाजूस ज्याप्रमाणें छाया भरावी लागते त्याप्रमाणेंच कादंबरीकारांस रसोत्पत्तिसाठीं कांहीं कल्पित प्रसंग घालावे लागतात. तसे प्रसंग प्रस्तुत कृतींतहि आहेत. पण होतां होईल तितकें ऐतिहासिक वृत्तांताचें ज्यास्त दिग्दर्शन केलें आहे.

असो. शेवटीं, प्रस्तुत कृति रसिकांस मान्य होऊन प्रिय मातृभाषेची सेवा करण्यास अम्हांस सामर्थ्य प्राप्त होवो, एवढेंच जगच्चालकाजवळ मागणें आहे.

भायखळा,
ता. ३० जुलै १९१०.

सज्जनांचा कृपाभिलाषी,
गो. दा. दळवी.

महाराणा राजसिंह

प्रकरण १ लें.

दरबारांतील गोंधळ.

प्रिय वाचकहो! रूपनगरच्या दरबारामध्यें ही कसली गडबड चालली आहे बरें? पहा तर खरे; हातामध्यें नग्न तरवारी घेऊन, क्रोधानें लाल बुंद झालेले असे दोघे पुरुष, एकमेकांबरोबर लढण्यासाठीं तत्पर झालेले दिसत आहेत. ते असे हातघाईवर कां आले असावे बरें? ते कोण आहेत ते आपण पाहूं. सिंहासनावर राणा विक्रमसिंह विराजमान् झाला असून तोही ह्या प्रकारामुळें, कावऱ्या बावऱ्या दृष्टीनें सभोंवार पहात आहे, असें दिसत आहे. अंहं! आतां आह्मीं या दोघांसही ओळखलें. एकमेकांवर वार करण्यासाठीं तत्पर झालेल्या ह्या दोघां पुरुषांपैकीं, एक तर राणा विक्रमसिंह यांचा पुतण्या वीर प्रतापसिंह, आणि दुसरा औरंगजेब बादशहाचा सेनापति दिलेरखान हा होय.

रूपनगरच्या दरबारीं नियमाप्रमाणें, प्रतापसिंहाचें आसन राण्याच्या सिंहासनाच्या उजव्या बाजूस होतें. परंतु आज बादशहाच्या सेनापतीच्या आगमनानें, राणा विक्रमसिंहानें, त्याचा बहुमान करण्याच्या उद्देशानें, त्यांस प्रतापसिंहाच्या आसनावर बसवून, त्याच्याबरोबर संभाषण चालविलें होतें. पण इक्यांत राजकुमार प्रतापसिंह दरबारामध्येंदाखल होऊन, आपल्या आसनावर मोंगल सरदारास बसलेला पाहतांच त्यानें आपला फारच अपमान झाला, असें मानिलें.

कुमार प्रताप मुसलमान, मोंगल इत्यादि परधर्मीयांचा आणि विशेषतः मोंगल सरदार दिलेरखानाचा तर अतिशयच धिक्कार करीत होता. ह्मणून ह्या वेळीं तो आपल्या आसनावर बसलेला पाहतांच, त्यास अनावर क्रोध उत्पन्न झाला. संतापाच्या ज्वाळेनें त्याचें शरीर कंपायमान झालें! त्यानें राण्यास रीतीपुरस्सर मुजुरा करून तो आवेशानें ह्मणाला “ महाराज, आज ह्या सभेमध्यें नियमाविरुद्ध आचरण कां बरें दिसावें? निर्मळ सूर्यवंशी महाराज विरुपाक्षाचा पुत्र प्रताप याच्या आसनावर आज हा मोंगल कां बसला आहे? आपण ह्या यवनास आज्ञा करा कीं,

माझ्या आसनावरून उठून दुसऱ्या ठिकाणीं बैस. नाहीं तर असा हा अपमान हे माझे बाहु मुळींच सहन करूं शकणार नाहींत ! "

आपल्या पुतण्याची ही गर्वोक्ती ऐकून, राणा विक्रमसिंह फारच भयभीत झाला. त्यानें जास्त न बोलावें एतदर्थ त्यास थांबविण्यास तो पहात होता. इतक्यांत, दिलेरखानास हा आपला अपमान सहन न झाल्यामुळें, तो तावडतोब आसनावरून उठून क्रोधानें म्हणाला, "काय ? एका मूर्ख आणि बिनअकलेच्या अजागळ पोराकडून हा औरंगजेबाचा सेनापति आपला अपमान करून घेईल काय ? नाहीं; कधींही करून घेणार नाहीं. तुझ्या अभिमानाचें फळ तुला मी आतांच दाखवितों ! " असें बोलत आपली तरवार म्यानामधून काढून तो प्रतापाच्या अंगावर धसरला.

"सिंहाचा बच्चा सिंहच असणार. हिंमत असेल तर ये समोर आणि चालव तरवार. पाहूं तर खरें ! हत्यार चालविण्यमध्यें कोण बालक आहे तें ? " असें प्रताप तिरस्कारानें हांसून बोलत व संतापानें आपली तरवार खेंचून सामोरा आला. राणा विक्रमसिंह ही गडबड पाहून फारच घाबरला आणि आपल्या मानकरी व सरदार लोकांस उद्देशून बोलला, "तुम्ही सगळे हें काय पहात राहिलेत ? पोघांनाही शांत करा ! " राण्याची ही आज्ञा ऐकतांच, हांहांहां, हां ! असें बोलत सगळे सरदार प्रताप आणि दिलेरखनाच्या मध्यें येऊन उभे राहिले. "आपण हें काय करतां आहां शांत व्हा ! सरदारसाहेब शांत व्हा ! कुमारजी क्रोधाला आवरा ! " अशा प्रकारें चोहों बाजूनें हाहाकाराचे आवाज ऐकूं येऊं लागले.

वाचकहो ! रूपनगरच्या दरबारामध्यें चाललेल्या गडबडीचें कारण तर आपणांस समजेलच. पण आतां त्याचा परिणाम काय होईल तें पाहूं या.

पण त्यापूर्वी राणा विक्रमसिंह आणि वीर कुमार प्रतापसिंहाची ह्या ठिकाणीं थोडी ओळख करून देण्याची आवश्यकता आहे. राणा विक्रमसिंह दिसण्यांत ऐटबाज व स्वरूपवान पुरुष होता. तो नेहमीं विषयोपभोग व ऐषआराम यांतच सुख मानीत असे. इंद्रियसुखाविरहित त्यास कोणत्याच गोष्टींची अपेक्षा वाटत नव्हती. जरी त्याला आपल्या कुळाचा अभिमान वाटत होता, तरी दिल्लीच्या औरंगजेब बादशहाचा जुल्म भयंकर वाढल्यामुळें बहुतेक रजपूत राजे उदेपुरचा राणा राजसिंह याला मिळाले होते. परंतु राणा विक्रमसिंहानें विचार केला कीं, जर मीही त्यांच्या बरोबर संघट्टण करीन तर आपणासही मोंगलांबरोबर लढाई द्यावी लागेल. लढाईची चिंता रात्रंदिवस लागल्यानें, सहजच आपल्या ऐषआरामध्यें व्यत्यय येणार—ह्या कारणा-साठींच त्यानें प्रथमपासून मोंगल बादशहाबरोबर तह केला होता व बादशहा नेहमी प्रसन्न राहील असें करावयास तो सदासर्वकाळ तत्पर असे.

ह्याच कारणावरून त्यानें दिलेरखानाचा इतका आदर सत्कार करून, त्यास प्रताप कुमाराच्या आसनावर बसाविलें. आणि त्याजबरोबर संभाषण चालविलें होतें.

कुमार प्रताप, उंच काठीचा, गौर वर्णी व बळकट बांध्याचा असा होता. त्याच्या मुखचर्येचा घाट मनोहर होता. विशाळ भाल आणि पाणीदार डोळे यावरून स्पष्ट दिसत होतें कीं, तो सरळ स्वभावाचा पुरुष असावा. त्याच्या हास्यमुद्रेवर परोपकाराचीं चिन्हें स्पष्ट दृष्टिगोचर होत होतीं. बाहू आणि रुंद छाती हीं पाहतांच, त्याच्या अलौकिक बलाची किंमत समजत होती. आणि खरोखर! त्याच्या सारखा हिंमतवान आणि बलवान पुरुष संबध रूपनगरामध्यें मिळणें कठीण होतें. त्या वेळीं त्याचें वय अवघें सतरा वर्षांचें होतें.

आर्यांचें प्राचीन वैभव भरतभूमीमध्यें केव्हां प्रकाशित होईल हीच इच्छा त्याच्या अंतःकरणीं सदैव वास करीत होती.परधर्मीय यवनांचा पराभव करून, आर्यांना स्वतंत्रतेचा उल्हास केव्हां भोगावयास सांपडेल, त्यांचा ह्या आर्य भूमीमधून केव्हां नायनाट होईल, ही चिंता आणि ह्या विचारांत तो निमग्न असें. राणा विक्रमसिंहाची मुलगी चंचलकुमारी इजवर तो आपल्या सख्या बहिणीसारखें प्रेम ठेवीत होता. तिला तो आपल्या प्राणाहूनही अधिक चहात असल्यामुळें, आपल्या बापाची गादी बळकविणाऱ्या आपल्या विक्रमसिंह-चुलत्यालाही तो मान देत असे. आणि ह्याच कारणावरून अयोग्य आचरण पाहिलें असतांही स्तब्ध बसून आपल्या चुलत्याचे कटु शब्द वारंवार सहन करीत असें. ह्यावरून आपल्या आसनावर यवन सेनापती दिलेरखानास बसलेला पाहून प्रतापाला क्रोध यावा यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं.

त्यांना शांत करण्यास उठलेल्या सरदारांनीं प्रतापास महामुष्किलीनें आवरून एका बाजूस उभें ठेविलें. आणि त्यास शांत पाडण्याची खटपट करूं लागले. तेव्हां तो राजाकडे वळून भक्कम आवाजानें ह्मणालाः-" महाराज, आपल्यासमोर आणि माझ्या आसनावर, एक परधर्मी, नीच व हलका नोकर आणि तो पण कोणाचा? ज्या भरतभूमीची स्वतंत्रता लुटणाऱ्या, कपटी, जुलमी व धर्मांध अशा औरंगजेबाचा-येऊन बसावा, आणि तें आपण स्व-खुशीनें पहावें, ह्यावरून आपण आमचा मान किती ठेविला आहे, हें उघड दिसत आहे!"

हा माझा अपमान मी तिळमात्रही सहन करूं शकणार नाहीं. ज्या क्षात्रिय कुलामध्यें माझा जन्म झाला आहे. त्या कुळांतील पुरुषांना आपला अपमान सहन करून घेण्याची मुळींच संवय नाहीं. बस्स, इतःपर येथें रहावयाची माझी इच्छा नाहीं. ह्या जन्मभूमीला हाच माझा शेवटचा प्रमाण!"

इतकें बोलतांच, प्रतापाचें सर्व शरीर क्रोधानें कंपायमान होऊं लागलें. आणि धिःकारयुक्त वाणीनें तो ह्मणाला, " पितातुल्य महाराज! परधर्मीय यवनांच्या संगतीनें, आपण आपल्या उच्च आणि पवित्र अशा कुलधर्माचा त्याग केला कीं काय? अरेरे! आपण आपल्या पवित्र अशा कुलास चिरकाल कलंकित करणार कीं काय?"

भर दरबारामध्यें आपल्या भावाच्या मुलाच्या तोंडून असें अपमानकारक भाषण ऐकतां क्षणींच, राणा विक्रमसिंहाच्या आंगाचा तिळपापड झाला. त्यानें प्रतापास पकडून एकदम कारागृहांत नेण्याचा पहारेकऱ्यांस हुकूम केला. तो हुकूम ऐकतांच वीस पंचवीस पहारेकरी त्यास धरावयास त्याच्या आंगावर गेलें; पण एखाद्या विक्राळ सिंहाप्रमाणें त्यांच्या हातून सुटून तो एकदम दरबाराच्या मध्यभागीं येऊन उभा राहिला. आणि गर्जना करून ह्मणाला:—"खबरदार, दूर उभे रहा. ह्या यवनासमक्ष माझा अपमान करूं नका! जोंपर्यंत माझ्या ह्या बाहूमध्यें समशेर पकडण्याचें सामर्थ्य आहे, तोंपर्यंत मला पकडण्याची कोणाची छाती नाहीं." असें बोलून, तो आपलें रक्षण करण्यासाठीं तरवार फिरवूं लागला. त्यामुळें त्या ठिकाणीं फारच गडबड सुरू झाली. एका बाजूनें राणा त्यास पकडण्याची पहारेकऱ्यांस आज्ञा करीत होता, व दुसऱ्या बाजूनें तरवार फिरवीत फिरवीत प्रताप त्यांस धमकी देत होता. राजाच्या आज्ञेवरून त्यास पकडावयास सरसावलेल्या शिपायांमधून दोन तर हां हां ह्मणतां प्रतापाच्या तरवारीच्या तडाक्यानें जखमी होऊन जमिनीवर पडलें होते. ही कापाकापी पाहतांच, राजाचा क्रोध अनावर झाला आणि तो क्रोधानें संतप्त होऊन ह्मणाला:—"काय? आमच्या दृष्टीसमोरज ह्याप्रमाणें आमच्या शिपायांचे प्राण जातील? दरबारमध्यें सगळ्या बायकाच जमल्या आहेत काय? ह्या उद्धट मुलास पकडण्याची कोणाचीही ताकत नाहीं? बस्स! ताबडतोब ह्यास कैद करा?"

राजाचे ह्या प्रकारचें निकराचें भाषण ऐकतांच, पहारेकरी व शिपाई वगैरे जे बाहेर उभे होते तेही दिवाणखान्यांत धांवत आले. आणि सगळ्यांनीं एकत्र होऊन प्रतापास पकडलें. पण पकडतां पकडतां कित्येक शिपाई त्याच्या तरवारीला बळी पडले. आतां मात्र प्रताप शांत झाला. आपल्या चुलत्याकडून आणि एका यवनी सरदारासमक्ष आपला अशा प्रकारचा अपमान झाला, त्यामुळें त्यास फारच दुःख झालें. त्याचें हृदय शोकमय झालें. त्याच्या नेत्रांतून शुद्ध मोत्याप्रमाणें अश्रू गळूं लागले. थोडा वेळ उभे राहिल्यानंतर, दरबारांत शांतता पसरतांच, तो गर्जना करून राणा विक्रमसिंहास ह्मणाला:—

"महाराज! बापाप्रमाणें पालन करणाऱ्या काकाचें हेंच कर्तव्य काय? माझे परमपूज्य बाबा ह्या परिमाणासाठींच, आपणांस राज्यकारभार अर्पण करून गेले होते काय? अहाहा! प्रतापाचे सूर्य, असे माझे वडील यवनांचे नांव ऐकतांच जागृत होत असत. अरे! ज्यांनीं यवनांबरोबर शेंकडों लढाया मारून रणभूमीमध्यें आपलें तेज प्रकाशित केलें; आणि शेवटीं, भारतमातेच्या संरक्षणासाठीं ज्यांनीं रण-संग्रामामध्यें आपला प्राण अर्पण केला. त्यांचें हें पवित्र सिंहासन, अहो भित्रे

काका! आज तुह्मी कलंकित केलेंत! अहो! त्या मोंगलांस ह्या भरतभूमीमधून हांकून काढून आर्यमातेच्या स्वातंत्र्यरूपी सूर्याच्या आड आलेलें पारतंत्र्यरूपी काळेकुट्ट ढग दूर करण्याचें तर बाजूसच राहिलें. पण काका, आपण स्वतःच त्यांची सेवा करण्यास तयार झालां आहां! धिःकार असो तुह्मांला! आणि आग लागो तुमच्या पुरुषत्वाला! हळदीघाटच्या लढाईमध्यें, आपल्या पूर्वजांनीं अकबराच्या सेनेच्या रक्तानें सांचलेल्या नदीमध्यें, वीरत्वाच्या नौकेवर स्वार होऊन, आपल्या यशाची ध्वजा फडकाविली होती. आणि त्याच रणक्षेत्रामध्यें आपल्या कीर्तीचा स्तंभ चिरकाल उभा करून ते गेले आहेत. त्या स्वयंप्रकाशित कीर्तिस्तंभाचा, अहो काका! आपणासारख्या भित्र्या क्लीबानें, कायमचा नाश करून टाकला आहे! अहो! आमच्या ह्या परमपवित्र कुलास कलंकित करण्यासाठीं आपण जन्म तरी कशाला घेतलांत! अरेरे!! शूर क्षत्रियाच्या नांवाला लांछन लावणाऱ्या आपणांसारख्या कोल्ह्याचा आमच्या कुळामध्यें जन्मच झाला नसता, तर आमच्या शुद्ध आणि निर्मल वंशाला कधींही असा हा काळा डाग लागला नसता."

असे हे तिरस्कारयुक्त शब्द ऐकून, राणा विक्रमसिंहाचा क्रोध अनावर झाला व तो रागाच्या आवेशांत उठून, प्रतापास मारावयास त्याच्या अंगावर तरवार उपसून धांवला. हा भयंकर प्रसंग पाहून, एकंदर मानकऱ्यांनीं व दुसऱ्या समजदार सरदारांनीं मध्यें पडून त्यांस मोठ्या मुष्किलीनें शांत केलें. तेव्हां सिंहासनावर बसतां बसतां विक्रमसिंह ह्मणाले, "ह्याला एकदम माझ्या दृष्टीआड करून, कारागृहांत नेऊन ठेवा. ह्या हुकुमाप्रमाणें शिपाई प्रतापास नेत होते, इतक्यांत प्रतापानें आपली तरवार दिलेरखानाजवळ फेंकून तो आवेशानें ह्मणाला, "अरे! धर्मभ्रष्ट यवना! आज मी तुला कांहींही योग्य शिक्षा करूं शकलों नाहीं. पण पुढें केव्हांही योग्य समय आल्यास, मला झालेल्या अपमानाचा मी योग्य मोबदला घेईन. जर तुझ्या अंगीं कांहीं शूरत्वाचा अभिमान असेल, तर ही माझी तरवार उचल ह्मणजे कोणत्याही वेळीं संधि आल्यास पाहून घेऊं."

प्रतापाचे हे गर्विष्टपणाचे शब्द ऐकतांच, दिलेरखानाच्या अंगाचा तिळपापड झाला. तो रागानें उठून ह्मणाला, "अरे कमअकलेच्या मुला! हा जंगी दिलेरखान महंमदी खानदीय पेहेलवान आहे. तो कधींही लढाईमध्यें भ्याड बनेल काय? माझ्या जीविताची मला किंचितही भीति नाहीं. ज्या दिवशीं तुला अवसर सांपडेल, तेव्हां माझ्याबरोबर दोन हात करून तुझी इच्छा पूर्ण कर. मी तुझ्या इच्छेला पूर्णपणें संतोषित करीन."

असें बोलून त्यानें प्रतापाची तरवार उचलून घेतली. त्याबरोबर शिपायांनीं प्रतापास कारागृहांत नेलें.

प्रकरण १ लें समाप्त.

प्रकरण २ रें.

चित्रें विकणारी.

वाचकहो! वीर्यशाली प्रतापास कारागृहांत नेलेलें आपण पहिल्या प्रकरणीं वाचिलेंच आहे. आतां दिलेरखानास रूपनगरच्या दरबारामध्यें येण्याचें कारण कां पडलें, त्याची हकीकत आपण पाहूं या.

ऐन दोन प्रहरची वेळ! ऊन ह्मणजे कसें रखरख करतें आहे. सूर्याच्या प्रखर उष्णतेमुळें मनुष्य प्राणी तर काय, परंतु पशुपक्षीदेखील, कोणत्याना कोणत्या तरी वृक्षाच्या छायेला आपला उदरपोषणाचा व्यवसाय सोडून स्वस्थ बसले आहेत अशा वेळेला राजस्थानांतील रूपनगरच्या राजरस्त्यावरून, एक मुसलमान जातीची ह्मातारी, काखेमध्यें गाठोडें बांधून घेऊन, फारच तांतडीनें राजमहालाकडे चालली होती. नुक्ताच बाराचा सुमार झाल्याकारणानें, पाय पोळण्याचा सपाटा असावयाचाच; पण आमच्या ह्या पांथस्थ ह्मातारीच्या पायांत सपाता असल्याकारणानें, जरी तिचे पाय पोळत नव्हते, तरी पण सूर्याच्या प्रखर उष्णतेनें ती घामानें भिजून चिंब झाली होती. शिवाय, ती बऱ्याच लांबून आली असल्याकारणानें, तीस विश्रांतीची जरूरी आहे, असें तिच्या मुद्रेवरून भासत होतें. तिच्या सुदैवानें राजवाडाही जवळच दिसूं लागल्याकारणानें, तीस फारच आनंद झाला. तिनें घाईघाईनें पावलें उचलून, ती राजवाड्याच्या मुख्य दरवाजाजवळ येऊन ठेपली.

रूपनगर हें शहर जरी लहान होतें, तरीपण तेथील राणे विक्रमसिंह यांचा तो राजमहाल पहाण्यासारखा होता. अनेक कसबी कारागिरांकडून त्या महालाला उत्तम स्वरूप दिलें होतें. त्याशिवाय आंतील एका दिवाणखान्याचा शृंगार तर अप्रतिमच होता. तेथेंच आपणांस जावयाचें आहे, तेव्हां तो आपण आपल्या डोळ्यांनीं पाहूं या ह्मणजे झालें.

त्या उत्तम प्रकारें सुशोभित केलेल्या दिवाणखान्यांत, एक गालीचा पसरलेला असून, त्यावर दहा पंधरा तरुण स्त्रिया गप्पा गोष्टी करीत बसल्या होत्या. त्यांचा विषय एकच नव्हता. त्यांतही त्या तरुण असल्याकारणानें, त्यांच्यामध्यें हास्यरसाचा प्रभाव बराच असणें साहजिकच आहे. त्या नियमानुसार ती चित्रें विकणारी ह्मातारी द्वाररक्षकांची विनवणी करून, आंत येतांक्षणींच त्यांच्या हंसण्याला तर अतोनातच ऊत आला.

ह्मातारीनें त्यांच्या हंसण्याकडे दुर्लक्ष करून, हस्तिदंताच्या फळ्यावर उत्तम प्रकारें रंगविलेल्या तसबिरी त्यांस दाखविण्यास सुरवात केली. तीं चित्रें लहानच होतीं.

तरी पण फारच उत्कृष्ट चितारलेलीं होतीं. त्यांत चित्रकारानें आपलें संपूर्ण कौशल्य खर्च केलें होतें. विक्री करण्याच्या हेतूनें त्या म्हातारीनें त्यांस एक एक चित्र दाखविण्यास सुरवात केली, त्याबरोबर त्या स्त्रिया तीस ती तसबीर कोणाची? काय? वगैरे प्रश्न करूं लागल्या. बऱ्याच तसबिरी पाहून त्यांवर टीका केल्यावर म्हातारीनें जहांगीर बादशहाची तसबीर दाखविली. त्याबरोबर एका मुलीनें विचारिलें कीं, "हिची किंमत काय आहे? त्यावर म्हातारीनें खूपच मोठी रक्कम ठोकली." ती ऐकून पुनः तीच मुलगी म्हणाली, "बरं आहे. ही तर तूं ह्या तसबिरीची किंमत सांगितलीस. पण अस्सल माणसाला नूरजहान बेगमनें किती किंमतीला खरेदी घेतलें होतें ग?"

म्हातारी पण थट्टा मस्करीच्या कामामध्यें खूपच प्रवीण होती. तिनें जबाब दिला, "पैशाशिवाय," तेव्हां ती मुलगी म्हणाली, "अस्सलाला जर पैसे पडत नाहींत, तर ह्या त्याच्या नकली तसबिरीची एक दोन कवड्या किंमत घेऊन आम्हांस देऊन जा."

सर्व जणी हंसूं लागल्या, हें पाहून म्हातारी फारच घाबरली. तिनें आपल्या तसबिरी झांकल्या आणि म्हणाली, "बाई, तुमच्या हंसण्यानें कांहीं माझ्या तसबिरी खपणार आहेत? राजकन्येला येऊं द्या. मग मी माझा माल दाखवीन. मी त्या सगळ्या तसबिरी त्यांच्यासाठींच आणल्या आहेत. हें ऐकतांच, सर्वजणी चोंहोंकडून बोलूं लागल्या कीं, अहो आजीबाई, "राजकन्या तर मी आहें." अहो बाई, मीच ती राजकन्या." गरीब बिचारी म्हातारी जाळ्यांत सांपडली! ती घाबरी होऊन चाऱ्ही बाजूस पाहूं लागली. तें पाहून पुनः त्या तरुणी हंसूं लागल्या.

पण इतक्यांत, एकाएकीं त्यांच्या हंसण्याचा आवाज कमी झाला. गडबड सडबड बंद झाली. सगळयाजणी एकमेकींकडे पाहूं लागल्या. त्या तसबिरी विकणाऱ्या म्हातारीस ह्या स्तब्धतेचा उमज झाला नाहीं. म्हणून तिनें आपल्या पाठीमागें फिरून पाहिलें. तों जणूं काय एकाद्या देवीची मूर्तीच उभी आहे, असा तिला भास झाला. ती त्या मूर्तीस पायांपासून केसांपर्यंत एकाग्र चित्तानें पाहूं लागली. त्या मूर्तीचा मोहकपणा पाहून तीस फारच आश्चर्य वाटलें. तिची दृष्टि जरा मंद असल्याकारणानें तीस असें वाटलें कीं, ही मूर्ति चांगल्या कुशल कारागिराकडून घडविलेली असली पाहिजे. तें त्या कारागिराचें अप्रतिम कौशल्य पाहून तीस फारच आश्चर्य वाटलें. पुनरपि तिच्या मनांत संशय आला कीं, ही जर एकाद्या दगडापासून बनविलेली असती; तर कोणता कां दगड असेना, पण त्याच्या अंगीं जिवंत मनुष्यांचा रंग कधींही येणार नाहीं. त्याशिवाय त्या मूर्तीच्या मुखावर हास्याची छटा उमटत आहे. हें कसें काय? मूर्ति कधीं तरी हंसत असेल काय? अशा प्रकारचे विचार करितां करितां, शेवटीं म्हातारी ह्या अनुमानावर आली कीं, ही मूर्ति खचित नव्हे. पण ही सजीव पुतळी आहे, यांत

कांहीं संशय नाहीं. ती त्या मूर्तीस अगदीं निरखून बारकाईनें पाहूं लागतांच, एका मुलीचें हंसें आंवरेना; त्याबरोबर तिची हंसण्याची उसळी एकदम बाहेर आली व ती हंसतां हंसतांच पटकन् खालीं बसली. हें पाहून म्हातारीस रडें कोसळलें.

म्हातारीस रडें कोसळलेलें पाहतांच ती पुतळी मधुर अशा आवाजानें म्हणाली, " म्हातारेबाई, रडतां कां ? " हे शब्द ऐकतांच, ती दगडाची मूर्ति नव्हे अशाबद्दल म्हातारीची पूर्ण खात्री झाली. ती राणी अगर राजकन्या असेल असें अनुमान करून म्हातारीनें तीस साष्टांग प्रणिपात घातला.

वाचकहो ! जिला पाहिल्याबरोबर पाहणाराला मोहच पडावा अशी ती सुंदरी रूपनगरच्या राजाची कन्या चंचल कुमारी ही होय. म्हातारीबरोबर थट्टा मस्करी करणाऱ्या मुली त्या तिच्या सख्या व दासी होत. चंचलकुमारी त्या दिवाणखान्यांत दाखल होतांच तेथील रंग पाहून जरा हंसण्याचा अविर्भाव आणून, स्तब्ध उभी राहिली होती. तिनें म्हातारीस विचारिलें, " बाई, तूं कशाला आली आहेस ? " तिच्या सखीनेंच तिच्या प्रश्नाचें उत्तर दिलें. ती म्हणाली, ही इथं चित्रं विकावयास आली आहे !

" मग तुम्हांला इतकं हंसायला काय झालं ? " राजकुमारी रागानें म्हणाली. त्याबरोबर सर्वजणी घाबरल्या, पण त्यांपैकीं एक साधारण धीराची होती ती म्हणाली, " ह्यांत आमचा कांहींही अपराध नाहीं. कारण, हिनं सगळ्या बादशहांच्याच तसबिरी विकावयास आणिल्या आहेत; जसं काय आमच्या राजवाड्यामध्यें त्यांच्या तसबिरीच नसाव्यात. " त्यावर म्हातारी म्हणाली, " मी तुमच्याकडें नसेल असं कुठं म्हणतें, पण एक असली तर दुसरी घेऊं नये कीं काय ? जर आपल्यासारख्यांनीं अशा घेतल्या नाहींत तर आमच्यासारख्या गरिबाचं पोट तरी कसं भरावं ? "

राजकन्येस ह्या तिच्या भाषणाचा कळकळा येऊन तिनें त्या तसबिरी पाहण्याची इच्छा प्रगट केली. त्याबरोबर म्हातारीनें अकबर, जहांगीर, शहाजहान, नूरजहान इत्यादिकांच्या तसबिरी तीस दाखविल्या, त्या पाहतांच राजकन्या म्हणाली, " ही तर सगळी आम्हां रजपुतांची आप्तमंडळी आहे. त्यांचीं चित्रं आमच्या वाड्यामध्यें पुष्कळच आहेत. हिंदु रजवाड्यांच्या कांहीं तसबिरी असल्या तर दाखीव. "

" पाहिजे तितक्या " असें बोलून म्हातारीनें राजा मानसिंह, राजा जगत्सिंह, बिरबल वगैरे मंडळींचीं चित्रें दाखविलीं. तींही राजकन्येनें परत दिलीं आणि म्हणाली, " ही पण मला घ्यावयाची नाहींत. हे कांहीं सर्व हिंदु नव्हत. हे तर यवनांचे सेवक आहेत. "

त्यावर म्हातारी हंसून म्हणाली. " बाई, कोण कोणाचा चाकर तें कांहीं मला माहीत नाहीं. पण माझ्याजवळ जीं आहेत तीं मी तुम्हांस दाखवीत आहें. जीं

आपणांस पसंत पडतील, तीं घ्या." असें बोलून म्हातारीनें पुनः दुसरीं चित्रें दाखविण्यास सुरवात केली. राणा प्रतापसिंह, राणा अमरसिंह, राणा कर्ण, राणा जसवंतसिंह यांचीं चित्रें पाहतांच त्यांपैकीं कांहीं राजकन्येनें पसंत करून घेतलीं. पण म्हातारीनें एक तसबीर न दाखवितां झांकून ठेविली. तें पाहतांच राजकन्या म्हणाली:—"ती तसबीर कां झांकून ठेविलीस?" म्हातारी भीत भीत म्हणाली:—"ती नजरचुकीनें आली आहे, ती तुम्हांस दाखवितां येत नाहीं. कारण, ती तुमच्या वडीलांच्या शत्रूची आहे." राजकन्या विचारांत निमग्न होऊन म्हणाली:—"आमच्या वडीलांच्या शत्रूची? कोणता शत्रू? त्याचं नांव काय?" म्हातारी कांपत कांपत म्हणाली, "महाराणा राजसिंह" हें ऐकतांच राजकुमारीस हंसूं आलें. ती हांसत हांसत म्हणाली, "वीर्यशाली माणसें कधींही स्त्रियांचे शत्रू नसतात. ही तसबीर मी ठेवीन." त्याबरोबर म्हातारीनें, ती राजसिंहाची तसबीर तिच्या हातांत दिली. ती घेऊन राजकन्या बराच वेळ तिजकडे पहात राहिली; त्याबरोबर तिचा चेहरा प्रफुल्लित झाला.

राजकन्या राजसिंहाची तसबीर पाहून खूष होतांच म्हातारीस आनंद झाला. ती म्हणाली, बाईसाहेब, आपलं मन जर वीर पुरुषांच्या तसबिरी खरेदी करण्याकडे आहे तर मला पण असं वाटत आहे कीं, मी आणखी एका वीर पुरुषाची तसबीर तुम्हांस दाखवावी. त्याच्यासारखा ह्या पृथ्वीमध्यें दुसरा बहाद्दर कोण आहे? असें बोलून म्हातारीनें एक तसबीर राजकन्येच्या हातांत दिली. राजकन्येनें विचारलें ही कोणाची तसबीर आहे? म्हातारी म्हणाली, "अलमगीर बादशहाची" "बरं ही पण ठेव." असें म्हणून राजकन्येनें खरेदी केलेल्या एंकंदर तसबिरींचे पैसे चुकते करावयास दासीस सांगितलें. दासी पैसे आणावयास गेली, त्याबरोबर राजकन्या इतर आपल्या सख्यांस म्हणाली, "सख्यांनों, या आपण एक गमतीचा खेळ खेळूं या." त्याबरोबर त्या गम्मतप्रिय सख्या म्हणाल्या, "बोला; बोला कसला खेळ खेळायचा?" राजकन्या म्हणाली, "ह्या औरंजेबाच्या तसबिरीला मी जमिनीवर ठेवितें. त्यावर तुम्ही सगळ्याजणीं आपल्या डाव्या पायाची एक एक लाथ मारून त्याचें नाक चेंचून टाका. पाहूं बरं, कोणाच्या लाथेनें ह्याचं नाक चेंचतं तें!"

हे राजकन्येचे शब्द ऐकतांच सर्व सख्यांच्या तोंडचें पाणी पळालें. तिच्यापुढें बोलण्याची कोणाची छाती चालली नाहीं. पण तिची निर्मळकुमारी नांवाची सखी म्हणाली, "चंचलकुमारी असें बोलूं नये. यदाकदाचित् त्या धूर्ताच्या जर कां हें ऐकण्यांत आलें, तर तो रूपनगरच्या किल्ल्याचा एक दगडही शिल्लक ठेवणार नाहीं."

हें ऐकतांच राजकन्या हंसली आणि ती तसबीर जमिनीवर ठेवून म्हणाली, "चलाग ज्या कोणाला लाथ मारायची असेल त्यांनीं पुढं या." कोणीही पुढं आल्या

नाहींत. मात्र निर्मळकुमारीनें जवळ येऊन राजकन्येच्या तोंडावर हात ठेविला आणि ह्मणाली, "बाई अशा गोष्टी बोलूं नये." पण चंचलकुमारीनें तें कांहींहीं न ऐकतां आपला एक पाय पुढें करून त्या औरंगजेब बादशहाच्या तसबिरीवर ठेविला आणि दाबून रगडून त्या तसबिरीचा गोळा करून टाकिला.

"घात झाला ग बाई, हें काय केलंस ?" असें बोलत निर्मळकुमारीसुद्धां सर्व सख्या भीतीनें थरथर कांपूं लागल्या. त्यावर राजकन्या ह्मणाली, "ज्याप्रमाणें लहान मुलं बाहुल्यांबरोबर खेळ खेळतां खेळतां, संसारांतील गोष्टींचें अनुकरण करून आपली इच्छा पूर्ण करून घेतात, त्याप्रमाणें बादशहाच्या मस्तकावर लाथ मारण्याची माझी इच्छा मी परिपूर्ण केली आहे." नंतर थोडा वेळ निर्मळेच्या मुखाकडे पाहून ह्मणाली, "निर्मळे, मुलांच्या इच्छा परिपूर्ण होत असतात. कारण, वेळ येतांच त्यांस संसाराचा अनुभव मिळतो. पण माझी ही औरंगजेबाच्या मस्तकावर लाथ मारण्याची इच्छा ...."

हें वाक्य पूर्ण व्हावयाच्या अगोदरच निर्मळकुमारीनें राजकुमारीचें मुख दाबून धरिलें. पण त्या वाक्याचा अर्थ तर स्पष्टपणें सर्वांच्या लक्षांत आला. ह्मातारीची तर भयानें कंबरच खचली. ज्या ठिकाणीं अशा प्रकारच्या त्वेषाच्या गोष्टी चालत आहेत, त्याठिकाणाहून आपली सुटका केव्हां होईल ह्याचा तिला विचार पडला. इतक्यांत दासी पैसे घेऊन आली; ते हातांत पडतांच ह्मातारीनें पोबारा केला.

ती दिवाणखान्याच्या बाहेर येतांच, निर्मळकुमारीनें धांवत धांवत बाहेर येऊन तिच्या हातांत एक मोहोर ठेविली आणि ह्मणाली, "ह्मातारे ! सांभाळ बरं, जें कांहीं इथं ऐकलं असेल तें दुसऱ्यास कळतां कामा नये. राजकन्येच्या जिभेला हाड नाहीं; ती पाहिजे त्यास लागेल तें बोलते."

ह्मातारीनें मोहोर खिशांत ठेवतां ठेवतां जबाब दिला. "अग बाई ! अशा गोष्टी का कोणाला सांगायच्या आहेत ! मी तर तुमच्या पायांची दासी आहें. मी नाहींग बाई कुणाला सांगायची."

ह्या तिच्या उत्तरानें निर्मळकुमारी संतोष पावून माघारी परतली.

प्रकरण ३ रें.

अग्नीचा भडका.

तसबिरा विकणारी ह्मातारी रूपनगराहून निघाली, ती थेट आपल्या घरीं, आग्र्यास आली. तिचा चित्रें विकण्याचा धंदाच असल्यामुळें, तीस जेथें वस्तीस रहावें असें वाटत असेल तेथें राहून, दुसऱ्या दिवशीं कांहीं विक्री करून ती निघत असे. पण ह्या

घेतेला ह्मातारी दुसऱ्या ठिकाणीं चित्रें विकण्याच्या भानगडींत न पडतां आपल्या घरीं पोंचण्यापुरतेच दिवस तिनें या प्रवासांत घेतले. ती घरीं आली, त्या वेळीं मुलगा आलेला पाहून तिला फार आनंद झाला. त्या मुलाचें दिल्लीस तसबिरा विकण्याचें दुकान होतें.

ह्मातारीनें रूपनगरच्या राजकन्येचें जें वर्तन पाहिलें होतें; तें तिनें अद्याप कोणास सांगितलें नव्हतें. त्यामुळें तीस कसेंसेंच वाटत होतें. कोठें तरी तें ओकावें अशी तिची फार फार इच्छा होई. पण शेवटीं ती विचार करी कीं, ही गोष्ट जर का कोणास समजली व ती बादशहाच्या कानावर गेली, तर बिचाऱ्या राजकन्येची स्थिति अगदीं केविलवाणी होईल. त्या कारणानें ती आपलें मन आंवरीत असे. पण तीस रात्रौ झोंप येईना! अन्न गोड लागेना! आणि दिवसा सुद्धां तेच विचार तिच्या अंतःकरणांत खेळत असत; त्यामुळें तिची स्थिति अगदीं भांबावल्यासारखी होई. हें तिचें वर्तन मुलाच्या लक्षांत येतांच, त्यानें तीस प्रश्न केला, "अम्मा, आपण अशा घाबऱ्या घाबऱ्या कां रहातां? ह्मातारी ह्मणाली, "बेटा, नाहीं रे, कुछ मी घाबरतें, मी रूपनगरामध्यें एक चमत्कार पाहिला होता." मुलगाः—"कसला चमत्कार?" नाहीं बाबा, कसलाही नाहीं. अशा गोष्टींमध्यें आपल्या सारख्यांनीं मुळींच लक्ष घालूं नये. मोठ्यांच्या गोष्टी आपल्यासारख्या गरीबांनीं बोलूं नयेत." ह्मातारी बोलतां बोलतां सांवरून धरूं लागली. " पण कसली गोष्ट ती तरी सांगशील कीं नाहीं?" मुलगा ह्मणतो. "बाबा दुसरी कसली नाहींरे, रूपनगराच्या राजकन्येची गोष्ट." (आतां आपण त्यांच्याच भाषेमध्यें लिहूं या.)

मुलगा—वो कुंवरी तो बडी खुबसुरत है. ये बात इतनी छूपी और पूशीदा रखते हो.

ह्मातारी—वो नहीं. बांदीकु बडा देमाग है. या अल्ला! मैने क्या बोल दीया.

मुलगा—कहां रूपनगर, कहां वहांकी राजकुंवरीका देमाग? वो बात बोलनेकी आपकु क्या जरूर? और हमारे सुननेकी क्या जरूर?

ह्मातारी—सीर्फ देमाग, बाबाजान! वह लौंडी बादशाहे आलमगीरकोभी नहि मानती.

मुलगा—बादशाहे आलमको गाली दी होगी.

ह्मातारी—गाली बाबा जान! उस्से बी कुच और.

मुलगा—उस्से बी जबर! वो क्या हो सकता है. बादशाहे आलमको कुच औ बांदी मार सकती नहीं.

ह्मातारी—उस्से बी जबर.

मुलगा—मारसे बी जबर ?

म्हातारी—बाबाजान, और पूछीयो मत, मयेने उसका निमक खाया है.

मुलगा—निमक खाया है किस तरेह अम्मा ?

म्हातारी—मूजे अशरफी दी है.

मुलगा—क्युं ?

म्हातारी—उसका गुनाहकी बात कीसकी पास बोलना मुनासेब नही, उस लिये.

मुलगा—अच्छी बात है. मुजकोवी एक अशरफी बक्षीस फरमाइये.

म्हातारी—किस लिये बेटा ?

मुलगा—नहीं तो मुजको बोलदो बात ?

म्हातारी—बात और क्या ? बादशहाकी तसबीर-तोबा, तोबा-बात तो अभि निकली थी.

मुलगा—तसबीर तोड डाला ?

म्हातारी—अरे बेटा, लातसे तोड डाला. तोबा, मैं निमकहरामी करचुकी.

मुलगा—निमकहरामी क्या है इसमें ? तुम मा, मैं बेटा हमकु तुम बोले उसमें निमकहरामी क्या है ?

म्हातारी—देखो, बाबाजान, किसीकु बोलीयो मत.

मुलगा—आप खातरजमा रखो. किसकी पास बी नहि बोलींगे.

नंतर म्हातारीनें पुष्कळ तिखटमीठ लावून, चंचलकुमारीनें ती तसबीर कशी छिन्नभिन्न करून टाकिली, ती हकीकत सांगितली.

म्हातारीच्या मुलाचें नांव खिझरखान असें होतें. तो दोन दिवस राहून, नंतर आपल्या दिल्लीमधील तसबिरीच्या दुकानीं गेला. "कोणतीही-गुह्य गोष्ट, कोणाच्याही कानीं एक वेळ गेली कीं, ती मी दुसऱ्यास केव्हां सांगेन अशी इच्छा प्रत्येक मनुष्यास उत्पन्न होत असते. असा हा मनुष्यस्वभावाचा नियम आहे." त्या नियमाला अपवाद हाच खिझरखान कसा असेल बरें! त्यानें दिल्लीस जातांच, ती हकीगत आपल्या एका बिबीस सांगितली आणि त्या हकीगतीवर पैसे मिळविण्याची युक्ती रचूं लागला.

येथपर्यंत आपण तर आलोंच,-पण आतां आपणाला ज्या ठिकाणीं प्रवेश करावयाचा आहे, त्या मोंगल बादशहातीची व तेथील प्रांताची स्थिति कोणत्या प्रकारची होती, हें आपणांस कळविल्याशिवाय कथानकाचें रहस्य आपल्या हृदयांत पक्कें बिंबणार नाहीं. म्हणून त्या वेळच्या राजसूत्रें चालविणाऱ्या समूहांकडे लक्ष देण्यास आपणांस जरा तसदी देत आहों.

प्राचीन व अर्वाचीन कालीं, आपल्या या भरतखंडामध्यें, राजकार्यधुरंधर अनेक पुरुषरत्नें होऊन गेलीं आहेत; तद्वत् अबला गणिल्या गेलेल्या स्त्रियांनींही आपल्या राज्यकारणपटुत्वानें व अनुपम चातुर्यानें पुरुषवर्गास चकित करून त्या काळच्या इतिहासांत आपलीं नांवें गोंवून ठेविलीं आहेत. अशा स्त्रिया पौर्वात्यांत सांपडतात, तितक्या पाश्चात्य देशाच्या इतिहासांत अवलोकनांत येत नाहींत. आपल्या कथानकाच्या कालीं—(पूर्वीं थोडीं वर्षें) मुसलमानांच्या इतिहासांत, एक प्रख्यात मुत्सद्दी स्त्री होऊन गेली होती, तिचें नांव चांदबिबी होतें. तिच्याचप्रमाणें मोंगल राजघराण्यामध्यें बऱ्याच स्त्रिया राजकारणपटु होत्या. औरंगजेबाच्या दोघी बहिणी होत्या. त्यांचीं नावें जहानआरा, व रौशनआरा. जहानआरेचें, शहाजहानाच्या दरबारांत इतकें वजन होतें कीं, तिच्या सांगण्याप्रमाणें बादशहा बहुधा वागत असे. रौशनआरेचें आपल्या पित्याकडे लक्ष नसे; मात्र तिचा बंधु औरंगजेब याजकडे तिचा फार ओढा होता. तिच्याच साह्यानें औरंगजेबानें शहाजहानास कैदेंत टाकलें व आपण राज्य बळकाविलें; अर्थात् औरंगजेबाच्या दरबारांत रौशनआरा करील ती पूर्वदिशा होऊं लागली. औरंगजेबासारखा धूर्त, महत्वाकांक्षी आणि कोणावरही विश्वास न ठेवणारा बादशहा, फक्त रौशनआरेच्या मात्र मनाप्रमाणें चाले. तथापी तो संशयखोर बादशहा फार जपून वागे. शहाजहान बादशहाच्या दरबारीं, जहानआरा प्रमुखत्वानें कारभार पहात होती, तों आतां औरंगजेब बादशहा झाल्यावर सर्व पारडें उलटें होऊन तिला कोणी जुमानीनासा झाला व रौशनआरेचें प्रस्थ फार माजलें.

अकबर बादशहासंबंधीं अशी एक आख्यायिका सांगतात कीं, त्यानें आपल्या बोटांमधील आंगठीवर "हेही दिवस जातील" हीं अक्षरें लिहिलीं होतीं. सुखाचे दिवस असतांना देखील तो तीं आंगठीवरील अक्षरें नित्य पहात असे व दुःखाच्या वेळींही तींच अक्षरें त्याला उत्तेजन देत. तो त्या अक्षरांपासून एवढा बोध शिकला होता कीं, "कोणाचाही सर्व काळ सुखांत जावयाचा नाहीं व दुःखही चिरकाल रहावयाचें नाहीं."

औरंगजेबाच्या दरबारीं रौशनआरेचें इतकें वजन होतें, तरी तेथेंही तिला एक शत्रू उत्पन्न झाला. बादशहाच्या जनानखान्यामध्यें, खोजाशिवाय इतर पुरुषाचा मुळींच शिरकाव होत नसे. तेथील पहारेकरी तार्तार देशांतील स्त्रिया असत. त्यांजवरील मुख्य स्त्रीस "सेनापती" ह्मणत. हिची जनानखान्यावर पूर्ण सत्ता असे. तिच्या हुकुमावांचून कोणाचाही जनानखान्यांत प्रवेश होत नसे. हिच्याकडे गुप्त हेर पाठवून बातम्या काढण्याचें महत्वाचें काम असे. त्या सेनापतीच्या जागीं रौशनआरेची नेमणूक करण्यांत आली होती.

औरंगजेब बादशहास तीन मुली होत्या. त्यांपैकीं धाकट्या दोन मुलींचीं लग्नें, बादशहानें आपल्या कैदेंत पडलेल्या दोन भावांच्या मुलांशीं करून दिलीं होतीं. वडील मुलगी मात्र अविवाहितच राहिली. तिचें नांव झेब-उन-निसा होतें ही अविवाहित असल्या कारणानें इचें वर्तन गैर असे. या गोष्टीमुळें रौशनआरेचें व तिचें मुळींच पटत नसे. झेब-उन-निसा ही रौशनआरेस नात्याच्या व वडीलपणाच्या योगानें थोडी भीत असे. रौशनआरा ही आपल्या मार्गांत एक मोठी अडचण आहे असें तिला वाटे. हा आपल्या मार्गांतील कांटा कसा काढावा याबद्दल ती नेहमीं विचार करीत असे. पुढें पुढें ती औरंगजेबाजवळ रौशनआरेच्या चहाड्या सांगूं लागली; औरंगजेब प्रथमत: संशयखोर होता, ह्मणून त्याला रौशनआरेच्या ताब्यांत महत्वाचीं कामें आहेत याची भीती वाटत होती; त्यांत ह्या चहाड्यांनीं अधीक भर घातली. बादशहाचें मन रौशनआरेविषयीं फार कलुषित झालें व तोही तिचा द्वेष करूं लागला. झेब-उन-निसा ही पुढें पुढें तर उघडाउघड रौशनआरेस अपशब्द बोलूं लागली. अर्थात् तें तिला सहन झालें नाहीं.

वाचकहो ! पुढील संदर्भ कळण्यास एवढी हकीगत पुरे झाली. आतां आपल्या कथानकाकडे वळूं.

तेजोनिधी भगवान् सूर्यनारायणानें दिवसभर मार्ग आक्रमण करून सृष्टी देवीची सेवा इमानें इतबारें केल्यावर विश्रांति घेण्याकरितां पाताळ लोकीं गमन केलें. त्याबरोबर प्रापंचीक लोकांनींही आपापले उद्योग धंदे आटपून घरची वाट धरली. दरबार बरखास्त होऊन सरदार, दरकदार, मानकरी वगैरे राजकारणी मंडळी घरोघर आली. व्यापारी उदमी यांनीं बराच वेळ रात्र होईपर्यंत आपलीं दुकानें उघडीं ठेविलीं होतीं तींही कांहीं वेळानें बंद केलीं. जेवणें खाणें झाल्यावर ज्या त्या व्यवसायांतील मंडळी त्या त्या व्यवसायांतील गप्पा गोष्टी करूं लागली. बोलून चालून त्या शिळोप्याच्या गप्पा. विषय निघतां निघतां, काय निघेल आणि त्याचा शेवट कशांत होईल हें सांगवत नाहीं.' या गप्पांमध्यें एक मोठी गम्मत असते ती फार महत्वाची आणि फायद्याची असते, त्यांत मोठमोठ्या लोकांच्या लहान लहान गोष्टी निघून त्यांतून त्यांच्या वर्तनाविषयीं अगदीं सत्य परंतु भिंतीच्या कानांनीं ऐकूं नयेत अशा गोष्टी निघत असतात. रात्र अधीक होऊं लागली तसतशी प्रापंचिकांच्या घरांतील गडबड कमी होऊं लागली. मुलांचीं रडणीं वगैरे बंद होऊन, बायकांनीं भांड्याकुंड्यांची आटपा आटप केली. नंतर जिकडे तिकडे बरीच शांतता पसरली ! द्वार रक्षक श्वानांच्या भुंकण्याखेरीज दुसरे कसलेही आवाज स्पष्ट ऐकूं येत नव्हते. पहारेकरी व शिपाई इकडे तिकडे गस्त घालूं लागले. चौकीवर बारा घंटे झाले. तरी अद्यापी कांहीं मंडळींची अगदीं अस्पष्ट अशी कुजबुज चालली होती.

वाचकहो ! चला आपण आतां अगदीं गुप्तपणें जाऊन, त्या मंडळीचा काय विषय आहे तें पाहूं. तुह्मी पहारेकरी वगैरे कोणास भिऊं नका. कोणीही मनुष्य तुमची चौकशी करणार नाहीं; यदाकदाचित् तुह्मांला कोणी विचारिलें तर ही मी तुह्मांला मुद्रिका देतों ती त्यांनां दाखवा ह्मणजे कोठेंही आडकाठी होणार नाहीं. ही घ्या मुद्रिका; इचें नांव "कादंबरी" असें आहे. चला पाहूं; आतां व्हा पुढें, या दिल्ली शहराचें अफाट वैभव पाहून जागचे जागीं घोटाळूं नका. हे आकाश भेदीत गेलेले उंच उंच वाडे, या मशिदी आणि या बाजारपेठा पाहून तुह्मी फार आश्चर्यचकित व्हाल ! परंतु या आश्चर्यांतच गुंग होऊन जाल तर तुह्मांला आज घडत असलेली महत्वाची गोष्ट मुळींच कळणार नाहीं. कदाचित् तुह्मांला शंका आली असेल कीं, अडीचशें तीनशें वर्षांपूर्वीं घडलेल्या गोष्टी तुह्मांला कशा दिसतील. परंतु या कादंबरीकाराचा हात धरून चला ह्मणजे त्या गतगोष्टींचें प्रतिबिंब तुह्मांला स्पष्ट दिसेल. हं ! आतां विलंब नको ! चलाच.

जिकडे तिकडे निशादेवीनें आपलें साम्राज्य पसरलें आहे. दिल्लीसारख्या अफाट शहरीं, त्या दिल्लींद्राच्या राजधानींत आणि नाना व्यवसायिकांच्या त्या बाजार पेठेंत या वेळीं मूर्तिमंत शांतता नांदत होती. सर्वत्र अगदीं निस्तब्ध झालें होतें ! आणि किंचित् नाद देखील स्पष्ट ऐकूं येत होता. दिवसभर मनुष्यांच्या गर्दीनें व्यापलेले रस्ते अगदीं मोकळे आणि स्वच्छ झालेले होते, पहारेकरी किंवा मुद्दाम निद्रा न घेणाऱ्या मंडळींखेरीज कोणीही जागें नव्हतें ! अशा वेळीं दिल्ली शहराच्या गलिच्छ आणि बकाल वस्तीच्या ठिकाणीं एक पडकेंसें आणि कित्येक उन्हाळे पावसाळे पाहिलेल्या एका झोंपडीचें दार हळूच कोणी आंतून उघडलें. उघडणाराच्या मनांतून तें दार मुळींच वाजूं नये असें होतें. त्यानें बरेच सावधपणानें आणि हळूच तें उघडण्याचा प्रयत्न केला. तथापि त्याचा तो प्रयत्न निष्फळ झाला व तें जीर्णद्वार बरेच मोठ्यानें करकरलें. त्याबरोबर त्या व्यक्तीचें अंग थरारलें व ताबडतोब ती व्यक्ती पुन्हा आंत गेली. त्या मूर्तीचें सर्वांग काळ्या झग्यानें आच्छादिलें होतें. ती व्यक्ती स्त्री किंवा पुरुष आहे हें ओळखण्यास भाषणाशिवाय कांहीं दुसरें साधन नाहीं; करितां आपण लक्ष लावून तें ऐकूं या. त्या दोन व्यक्तींमध्यें पुढील अर्थाचें मुसलमानी भाषेंत संभाषण झालें.

१ ली व्यक्ती—दार फार मोठ्यानें करकरलें. मला आतां पुढें जाण्यास भय वाटतें. कदाचित् तें करकरणें कोणी ऐकिलेंही असेल.

२ री व्यक्ती—एवढ्या मोठ्यानें कांहीं दार करकरलें नाहीं. तुह्मी विनाकारण फार भ्यालांत; आतां पुढें निघालांत, तो मागें पाय घेऊं नका.

१ ली व्यक्ती—होय मागें पाय न घेतां पुढें जावें असें मलाही वाटतें, परंतु धीर होत नाहीं. कोणी पहारेकऱ्यानें ऐकिलें असल्यास ते सावध होऊन पाळतीवर असतील.

२ री व्यक्ती—मग असें करा. थोडा वेळ येथें बसा व नंतर बाहेर पडा. कांहीं वेळ गेल्यावर तुमची भीति आपोआप कमी होईल व आपण विना-कारण भ्यालों असें तुह्मांला वाटेल.

१ ली व्यक्ती—बरें तर थोडा वेळ मी येथें बसतों.

२ री व्यक्ती—नंतर तुह्मीं मनाचा निर्धार करून पुढें जाच; अशी वेळ कां पुन्हा येणार आहे. आपल्यासारख्या कंगालांना अशी वेळ ह्मणजे एक भाग्याचाच काळ होय; अशा वेळीं आपण आपलें हित साधून घेतलें नाहीं तर तें कधीं घ्यायचें.

१ ली व्यक्ती—ह्मणूनचना मी एवढें धाडस करावयास सिद्ध झालों आहें.

२ री व्यक्ती—वा! वेळ काय छान आली आहे. आज सकाळपासून रौशनआरा एकाएकीं कोठें नाहींशी झाली! आजच झेब–उन–निसेस तिचा अधिकार दिला! आणि आजच आपणासही एक गुप्त खबर मिळाली.

१ ली व्यक्ती—त्या दयाघन प्रभूचे मनांत आपल्यास कंगाल स्थितींत फार दिवस ठेवावयाचें नाहीं असें वाटतें.

२ री व्यक्ती—पण काय हो! रौशनआरा नाहींशी होण्यास बादशहाच कारण... ....इतक्यांत १ ली व्यक्ती ह्मणाली–अग अगदीं हळू बोल. आपण कोणा संबंधीं आणि कधीं बोलत आहोंत तें तुला ठाऊक नाहींका तूं ह्मणतेस तसेंच मला वाटतें कारण इकडे बादशहा तिच्या शोधार्थ माणसें पाठवितो व तिकडे तावडतोब आजच्याआज तिच्या जागीं झेब-उन–निसेची नेमणूक करितो. जाऊं द्या, आपल्याला काय करावयाचें आहे त्या गोष्टीशीं; परंतु बाहेर दिसतें त्याहून अंतस्थ गोष्टी फार निराळ्या आहेत.

१ ली व्यक्ती—हो! ती जोधपुरी बेगम आहे तिच्यावर बादशहाचें प्रेम नाहीं. ती अस्सल रजपूत वंशांतील असून शिवाय पट्टराणी आहे, तरी बादश-हाची मर्जी तिच्यावर नसून उदेपुरी बेगमेवर आहे. ही उदेपुरी बेगम जातीची ख्रिस्ती. परंतु रजपुतापैकींच कोणी तरी ती आहे असें लोकांनां दिसावें ह्मणून तिला उदेपुरी बेगम असें नांव दिलें. जशी कांहीं उदेपुरच्या रजपूत घराण्यापैकींच ती आहे.

२ री व्यक्ती—परंतु आतां पुरे करा त्या गोष्टी. वेळ नाहींका होत? आपल्या कामा-कडे लक्ष द्या.

" होय बराच वेळ झाला. " असें ह्मणून ती काळा झगा घातलेली मूर्ती जागेवरून उठली, व हळूच तें दार उघडून बाहेर पडली. वाचकहो! त्यांच्या बोलण्यावरून त्यांपैकीं १ ली व्यक्ती पुरुष आहे व २ री स्त्री आहे हें तुह्मीं ताडलेंच असेल. ताबडतोब तें दार आंतून लागलें व जिकडेतिकडे पूर्ववत् शांत झालें. ती झगा घातलेली मूर्ती फारच सावधगिरीनें, कसलाही आवाज न करितां लपत छपत घराच्या वळत्रणीच्या बाजूनें चालूं लागली. चालू लागली असें ह्मणण्यापेक्षां पुढें पुढें सरूं लागली असें ह्मणणें अधीक शोभेल; कारण तो झगा जमीनीवर लोळत होता व पाय वगैरे कांहीं दिसत नव्हते. अशा रीतीनें सरकत सरकत ती मूर्ती बरीच लांब गेल्यावर एका बागेच्या भिंतीजवळ थांबली व खालीं बसून तिनें भिंतीवर हळूच ठोकलें. त्याबरोबर आंतून कोण आहे असा प्रश्न झाला व खुणेचा शब्द कळतांच, जमीनीसरसें असणारें भींतीचें लहान दार उघडलें. आंत गेल्यावर तें दार लागलें. आंतील व्यक्तीनें पुन्हा एकदां खुणेची वस्तू मागितली व खात्री होतांच काय काम आहे तें विचारलें. आतांच्या आतां बेगम साहेबांची भेट घ्यावयाची आहे व कामही तसेंच महत्वाचें आणि खुद्द त्यांचे जवळच आहे असें उत्तर आलें. " माझ्या मागून चल " असें ह्मणून आंतील व्यक्ती चालूं लागली व मागून ही काळ्या झग्याची मूर्ती चालूं लागली. बराच वेळ वळणें घेत घेत ते चालल्यावर एक भव्य इमारत दिसूं लागली. इमारतीच्या दारांत नागव्या संत्र्यांचा पहारा होता. तरी सांकेतीक शब्दाशिवाय अधीक विचारपूस न होतां, दोघांना कोठेंही अडथळा आला नाहीं. किंवा कोणा पहारेकऱ्यास आश्चर्य वाटल्याचें दिसलें नाहीं. या दालनांतुन त्या दालनांत असें करितां करितां दोन्ही व्यक्ती एका भव्य दिवाणखान्यांत आल्या व तेथून एका दासीबरोबर आंत निरोप गेला. थोड्याच वेळांत आंतून एका बेगम साहेबांची स्वारी आली. त्या आंगाला आळेपिळे देत होत्या. डोळे धुंदी चढल्यासारखे दिसत होते. तेथें येऊन बसल्यावर मोठ्या तोऱ्याच्या आणि कर्कश आवाजांत त्यांनीं कोण आहे असें विचारलें. झगा घातलेल्या मूर्तीनें या वेळीं आपला झगा काढला. तेव्हां बेगमसाहेब ह्मणाल्या:— कोण खिजरखान? काय महत्वाची बातमी आणलीस? त्यानें कानाजवळ तोंड नेऊन कांहीं बातमी सांगितली. त्याबरोबर बेगम साहेबांच्या तोंडावर आश्चर्य, संताप, द्वेष इत्यादि मनोविकाराच्या छाया एकसमयावच्छेदेंकरून दिसूं लागल्या; व नंतर दुसऱ्या क्षणीं आनंदाची छटा मुखचर्येवर स्पष्ट उमटली. इत्थंभूत बातमी काढून घेतल्यावर खिजरखानाची रवानगी करण्यांत आली. बेगमसाहेबांच्या आंगांतील आळस साफ उडाला व त्या कांहीं तरी करण्याचा बेत ठरवून महालांत निघून गेल्या.

काय असेल तें असो. आज औरंगजेब बादशहास ह्या वेळ पावेतों मुळींच झोंप आली नव्हती. झोंप येण्यास त्यानें शक्य ते अनेक उपाय केले, परंतु हट्टी

माणसाप्रमाणें आज बादशहाची स्थिती झाली होती. मुळींच करमेना ह्मणून स्वारीनें आज जोधपुरी बेगमेच्या महालाकडे कृपादृष्टी केली. तेथें बरीच रात्र होई-पर्यंत राहून देखील चैन पडेना ह्मणून पुन्हा स्वारी उदेपुरीच्या महालांत यावयास निघाली. वहीं येतांच महालांतून कोणीतरी त्वरित गतीनें निघून गेल्याचें दिसलें, जाणारें माणूस कोण होतें तें कांहीं नीट दिसलें नाहीं;

औरंगजेब बादशहाची स्वारी येऊन थडकली; व त्यानें ती रात्र तेथेंच घालविली; प्रातःकाळीं महालांतून निघतांना बादशहास एक फारच त्वेषजनक बातमी समजली असावी असें दिसतें " यःकश्चित् त्या मांडलिकाच्या पोरीनें माझी तसबीर लाथेनें तुडविली! " ही गोष्ट मी जिवंतपणींच ऐकत आहे काय? हा अमलगीर बादशहा त्या गोष्टीचा सूड उगविल्याखेरीज कदापि राहणार नाहीं." संतापानें बादशहाचें सर्व शरीर थरथर कांपूं लागलें. त्वेषानें त्याच्या मुखांतून शब्द देखील स्पष्ट निघेना. आदल्या दिवसाचे जागरणानें प्रथमतः डोळे लाल झाले होते त्यांत ही हकीगत समजली. संतापाग्नीनें त्याचा देह लालभडक होऊन अगदीं काळा निळा झाला. वाचकहो, तो अग्नी असता तर खरोखरच या वेळीं त्याच्या सर्व शरीरांतून ज्वाळा निघूं लागल्या असत्या व आपल्या शत्रूस त्यानें केव्हांच जाळून राख करून टाकलें असतें. इतका संताप त्याला होता. ती त्याची क्रुद्ध मुद्रा पाहून आणि दांत ओंठ खाणें पाहून, उदेपुरी, बेगम व इतर दासदासी फारच भ्याल्या. बादशहा पुढें आतां काय करील आणि काय नाहीं याची सर्वांना मोठी दहशत पडली.

कांहीं वेळानें निश्चयी मुद्रेनें बादशहाची स्वारी तेथून निघाली. व त्याच वेळीं दरबारीं दाखल झाली. कोणाही कारकुनास न सांगतां त्यानें स्वतः एक खलिता लिहून तयार केला; व तो सहीशिक्यानिशीं मोहोरबंद करून झाल्यावर, पहारेकरी पाठवून सरदार दिल्हेरखानास पाचारण केलें, व दिल्हेरखान दाखल होतांच, त्यास अवश्य तो हुकूम करून तो खलिता बादशहानें त्याजकडे दिला आणि सांगितलें कीं, " एका क्षणाचाही विलंब न करितां त्यास हा खलिता दे. आणि या खलित्यांत लिहिल्याप्रमाणें तावडतोब झालें पाहिजे अशी अलमगीर बादशहाची आज्ञा आहे असें त्यास सांग, त्यानें न ऐकल्यास, तुला सांगितल्याप्रमाणें तूं कर. " इतकें सांगितल्याबरोबर दिल्हेरखान तेथून तावडतोब निघून गेला.

प्रकरण ३ रें समाप्त.

प्रकरण ४ थें.

स्पष्टीकरण.

वाचकहो! आतां आपण पुन्हा पहिल्या प्रकरणाकडे वळूं. रूपनगरच्या दरबारांत गोंधळ होऊन, विक्रमसिंहाच्या आज्ञेवरून कुमार प्रताप यास राजसेवकांनीं पकडून

कारागृहांत नेलें. नंतर त्या दरबारामध्यें अगदीं शांत झालें. एवढा मोठा दरबार भरला होता परंतु श्वासोच्छ्वासाखेरीज तेथें कोठच्याही प्रकारचा ध्वनी ऐकूं येत नव्हता. सर्वांच्या तोंडावर चिंतेची छाया स्पष्टपणें उमटलेली दिसत होती. दिल्ली-पतीकडून आलेल्या खानाचा, आज भरदरबारामध्यें अपमान झाला, याची प्रत्येकास काळजी वाटत होती. पुढें या गोष्टीचा शेवट कसा काय होईल ? व रूपनगरच्या दरबारास या गोष्टीनें किती त्रास पोहोंचेल याचीच प्रत्येकास भीति वाटत होती. त्या निस्तब्ध स्थितींत बराच वेळ गेला तरी राणा विक्रमसिंह किंवा दिल्हेरखान, या पैकीं कोणच्याही तोंडून, अवाक्षरही निघालें नाहीं. राणा विक्रमसिंहाचा चेहरा काळवंडून गेला होता व तो जागच्या जागींच स्तब्ध होता; त्याला या अकस्मात् घडलेल्या गोष्टीची फारच भीति वाटली. दिल्लींद्राकडून खलिता घेऊन आलेल्या खानाचा बहुमान करण्याच्या उद्देशानें त्यास कुमारप्रताप याच्या सिंहासनावर बसविलें व त्यायोगें केवढें रण माजलें, हें पाहून तो फार विस्मयचकित झाला ! खानाची स्वारी दरबारांत येऊन कुमारप्रतापास धरून नेईपर्यंत सर्व गोष्टी इतक्या अल्प काळांत घडल्या कीं त्याचा विचार करण्यासही राण्यास वेळ मिळाला नाहीं. राणा विचारांत गर्क आहे तों इकडे खानानें रुद्रस्वरूप धारण केलें होतें. संतापानें खानाचें सर्व शरीर हालत होतें व डोळे लाल भडक झाले होते; दोन चार वेळ खानानें बोलण्याचा प्रयत्न केला, परंतु अत्यंत संतापाच्या योगानें शब्द न निघतां त्याचे ओंठ फक्त थरथर हालले. शेवटीं दांत ओंठ चावून त्यानें मोठी गर्जना केली. व तो ह्मणालाः—राणाजी, आज भरदरबारामध्यें, तुमच्या पुतण्यानें माझा अपमान केला असें तुह्माला वाटत असेल परंतु मी तसें समजत नाहीं. हा माझा अपमान नसून, त्या आमच्या शहानशहा अलमगीर बादशहाचा अपमान झाला असें मी समजतों. या अपमानाचा सूड मी न उगवितां तो परस्पर शहानशहा अलमगीर बादशहाकडूनच मी उगवून घेईन. तुह्मां सर्व काफरांचा अंतकाळ समीप आला आहे असें या गोष्टीवरून वाटतें. "

" खानाची ती क्रुद्ध व निश्चयी मुद्रा पाहून राणा विक्रमसिंहास फार भय वाटलें. राणा विक्रमसिंह ताबडतोब पुढें झाला व त्यानें खानास हाताला धरून आणून (आपल्या) सिंहासनावर बसविलें; आणि ह्मणाला, "खान साहेब शांत व्हा ! प्रतापासारख्या अज्ञानी आणि अल्लड वृत्तीच्या तरुण मुलाकडे आपण मुळींच लक्ष देऊं नये. माझें स्वतःचे आपल्याजवळ कसें वर्तन आहे हें पहा व आपला क्रोध आवरा. हा आपला अपमान दरबाराकडून झाला नसून एका मुलाकडून झाला आहे हें ध्यानांत आणा. एका व्यक्तीनें केलेला अपमान, तो सर्व दरबारानें केलेला अपमान असें समजूं नका. एका मुलानें केलेल्या अपमानानें चिडून जाऊन सर्व दरबारावर क्रुद्ध होऊं नका. आपण धोरणी आहांत, आपणास अधिक

काय सांगावें ? इतकें भाषण झाल्यावर शांतपणा स्वीकारून खान साहेब ह्मणाले:— " राणाजी! आपणांमध्यें अशीं वितुष्टें पडावींत या हेतूनें मी मुळींच आलों नाहीं. शहानशहा अलमगीर बादशहामध्यें व आपणामध्यें जें सख्य नांदत आहे तें वृद्धिंगत व्हावें आणि आपणामध्यें व त्यांच्यामध्यें जें उच्चनीचपणाचें नातें आहे तें नाहींसे होऊन, चिरकालिक स्नेहवृद्धि व्हावी ह्मणून मी आलों आहें."

हें भाषण ऐकून राणाजीस फार चमत्कारिक वाटलें. आपलें व बादशहाचे नातें आहे तें जाऊन, उच्चनीचपणा नाहींसा होऊन, चिरकालिक स्नेहवृद्धी व्हावी अशा तऱ्हेची कोणती गोष्ट असेल, या विचारांत तो क्षणमात्र गढून गेला. खानसाहेब मधेंच ह्मणाले—" इतक्या खोल विचारांत गढून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. आपल्या ऐषआरामांत व्यत्यय येईल अशी बादशहाची कामगिरी नाहीं किंवा आपणास त्रास पोंहोंचेल अशीही कामगिरी नाहीं. राजप्रकरणीं लढाया, युद्धें अशा पद्धतीची ही कामगिरी नसून अगदीं सहज करतां येण्यासारखी आणि घरगुती नात्याची कामगिरी आहे; नंतर........ मध्येंच राणाजी ह्मणाले—"खान-साहेब अशी काय कामगिरी आहे; ती कळूं तर द्याल ? मग पाहूं."

" हो, एकदां ती कामगिरी केलीत ह्मणजे मग आमच्या सारख्यांस थोडेच तुह्मीं विचारणार आहांत ? नंतर तुमचा अधिकार कोठें, आमचा हुकूम बजावणीवाल्यांचा पेशा कोठें, सर्वच कांहीं पारडें फिरेल; असो, परंतु अशी सुंदर कामगिरी आपण विसरूं.........मध्येंच—राणाजी ह्मणाले—" खान साहेब विनाकारण चाळविण्या दाखवून आपण कामगिरी काय तें सांगण्यास विलंब करीत आहांत असें ह्मणण्यापेक्षां आपण या योगानें गोष्टीचें महत्व कमी करीत आहांत असें ह्मटलें पाहिजे." खानसाहेब गंभीर मुद्रा करून ह्मणाले—" राणाजी अधीर होऊं नका. आपणास फार वेळ तिष्ठत न ठेवतां प्रथमतः मीं तोंडचा निरोप सांगतों व नंतर खलिता आपल्या स्वाधीन करीन. राणाजी, तुमचें दैव थोर यांत कांहीं शंका नाहीं. अलमगीर बादशहाच्या राणीवंशांत जोधपुरी बेगम, उदेपुरी बेगम अशा सुंदर राण्या असून त्यानें आपल्या कन्येच्या स्वरूपाची प्रशंसा कर्णोपकर्णी ऐकून तिजबद्दल मागणें घातलें आहे. " वरील शब्द ऐकत असतां राणाजीस, कानांत कोणी तप्त तैल-बिंदु सोडीत आहे कीं काय असें वाटलें. खानसाहेबांचें भाषण पुरें होतें न होतें तों राणाजी एकदम ओरडून ह्मणाला—काय ? या सोळांखी वंशीं रजपूताचा, त्या परधर्मीय मोंगलाबरोबर शरीरसंबंध ? नाहीं ही गोष्ट मी ऐकणार सुद्धां नाहीं. सिंही-पुत्रीचा जंबुकाशीं संबंध घडेल काय ? खानसाहेब, अलमगिरास सांगा, ही गोष्ट कधींहि कबूल केली जाणार नाहीं. हें ऐकून खानसाहेब भिवया वर चढवून आणि क्रुद्ध मुद्रा करून ह्मणाले-राणाजी—सरळमार्गानें हें कार्य घडत नसेल तर तें तरवारीच्या जोरावर घडवून आणण्यांत येईल, हें पक्कें ध्यानांत ठेवा. बादशहाचा

तोंडचा निरोप झाला. आतां आपणास मी तीन दिवसांची मुदत देत आहें, इतक्या अवधींत नीट विचार करा व मला उत्तर द्या; पूर्ण विचार करावयास तीन दिवस पुष्कळ आहेत, या अवधींत आपणाकडून उत्तर न आलें तर पुढें काय होईल याचा आतांच विचार करा. वेळ टळल्यावर पश्चात्ताप होईल, असें करूं नका. या दिलेल्या कालावधीचा दुरुपयोग करूं नका वेळ टळली ह्मणजे आपला ऐष-आराम, राजवैभव, आप्तस्वकीय वगैरे सर्व ऐश्वर्यावर गदा आलीच ह्मणून समजा. झालें. मला सांगावयाचें तें मीं सांगितलें. हा घ्या बादशहाचा खलिता; व यांत काय लिहीलें आहे तें वाचून पहा. **तीन दिवसांत उत्तर पाहिजे** असें ह्मणत मोठ्या झोंकानें खानसाहेब दरबारांतून चालते झाले.

प्रकरण ४ थें समाप्त.

प्रकरण ५ वें.

ऐषआराम कीं अपत्य प्रेम ?

खानसाहेबांची स्वारी निघून गेल्याबरोबर, दरबार बरखास्त करून, राणा विक्रमसिंहाची स्वारी कोणास बरोबर न घेतां एका दिवाणखान्यांत एकटीच गेली. तेथें बसून तो लखोटा फोडला व वाचून पाहिला; वाचीत असतांच राणाजीचा हात थरथर कापूं लागला व सर्व पत्र वाचून झाल्यावर त्याची मुद्रा फार चमत्कारिक झाली. निरभ्र आकाशांत एकाएकीं ढग यावे तद्वत् त्याच्या त्या स्वच्छ कपाळावर चिंतेची छाया दिसूं लागली. मधेंच तो कांहीं तरी पुटपुटे, पुन्हा त्या पत्रांतील कांहीं भाग वाची, पुन्हा संतापानें लाल होई; पुन्हा दुसरा कांहीं विचार सुचल्यासारखा करी; पुन्हा विचारांत गर्क होऊन जाई. कांहीं वेळानें आनंद झाल्यासारखें दिसे; पुन्हा संताप येई. अशा स्थितींत बराच वेळ गेला नंतर त्याच्या तोंडातून कांहीं वाक्यें बाहेर पडलीं ! ! " अरेरे ! किती चमत्कारिक ही स्थिती ! दोन्ही गोष्टी किती तापदायक दिसतात. प्राणापलीकडेही प्रिय असलेल्या कुमारीकेस मोंगलाच्या हातीं देणें, ही गोष्ट किती भयंकर आहे ! बोलूनचालून तो परधर्मीय मोंगल आणि मी रजपूत. बरें न यावें तर आज मी उपभोगित असलेल्या सर्व राज-वैभवाचा नाश खात्रीनें होईल; शिवाय आप्तस्वकीयांची प्राणहानी होऊन, ही शोभिवंत आणि मुद्दाम तयार केलेली राजविलास मंदिरें देखत देखत जमीनदोस्त होणार ! ! असें पुटपुटत राणाजीची स्वारी त्या दिवाणखान्यांत इकडून तिकडे खेपा घालूं लागली. मधेंच कांहीं शब्द अस्पष्ट उमटत ! ! काय ? क्षत्रिय कुलांत जन्म घेऊन, माझी कन्या त्या मोंगलास देऊं आणि आपल्या कर्तव्यास न जागतां कुळास काळिमा लावूं ? मी किती मूर्ख आहे; प्रतापाचें ह्मणणें मी कां बरें ऐकिलें नाहीं.

अहाहा ! बाळा प्रतापा तूं एक वीर खरा. दरबारांतील तुझें भाषण अद्याप माझ्या कानांत घुमत आहे. बाळा, पूर्वीपासून तुझें न ऐकल्यामुळेंच माझ्यावर हा अनिष्ट प्रसंग आला आहे ! तुझ्या सल्ल्याप्रमाणें वागलों असतों तर हा अनिष्ट प्रसंग कशाला आला असता ?" हें व अशा प्रकारचें कांहीं स्पष्ट व अस्पष्ट पुटपुटणें चाललें होतें आणि विक्रमसिंह भ्रमिष्टासारखा इकडे तिकडे येरझारा घालित होता. आपल्याशींच बोलत असतां कोणाचासा स्पर्श झाला म्हणून त्यानें वळून पाहिलें तों चंचलकुमारी जवळच उभी आहे असें त्यास दिसलें. त्यानें सावध झाल्यासारखें करून म्हटलें, " बाळे, तूं केव्हां इकडे आलीस ?" " बाबा, मी केव्हांपासून तरी येथें येऊन आपली ही चमत्कारिक स्थिती पहात आहें. बाबा आज आपलं चित्त भानावर नाहींसं दिसतं ! आज दरबारामध्यें कांहीं भानगड उपस्थित झाली होती कीं काय ? का आपलं डोकं दुखत आहे ? वैद्यमहाराजांना बोलावून आणू का ?" असें म्हणून ती विक्रमसिंहाचें डोकें चेपूं लागली.

" बाळे ! आपल्यावर फार अनिष्ट प्रसंग आला आहे ! प्रतापास कारागृहांत पाठविणें भाग पडलें "—" काय ? माझ्या दादास आपण कारागृहांत पाठविलेंत ? होय. पाठविलें तर खरेंच, परंतु त्या वेळीं या म्हाताऱ्याची बुद्धी भ्रष्ट झाली होती; आणि प्रतापास कारागृहांत पाठविण्याशिवाय दुसरा उपायच नव्हता. दुसरा एक उपाय होता परंतु,...............राण्यास बोलतांना थांबलेला पाहतांच चंचलकुमारी म्हणाली, "बाबा आपण अडखळलेत का ? दादास कैद करण्याचें कोणतें कारण झालें ? आपण आतांच म्हणालेत कीं त्यास कैद करण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता, आणि दुसरा उपाय होता, असें म्हणून आतां बोलतांना थांबलेत ?" " बाळे ! माझी स्थिती अगदीं भ्रमिष्टासारखी झाली आहे, काय बोललों आणि काय बोलावें हें मला सुचतच नाहीं. मजवर लवकरच एक अति भयंकर प्रसंग येणार आहे ! " " बाबा, असलं कसलं तें संकट ?" " मुली, मला तर असें वाटतें कीं थोड्याच काळानंतर हें रूपनगर नामशेष होण्याची वेळ आली आहे. आपणा सर्वांना यमरायाचें आमंत्रण आलें आहे "—" बाबा ! बाबा ! काय ही आपण अमंगल वाणी उच्चारितां?" " मुली, ही अमंगल वाणी खोटी नव्हे. सर्वस्वी आपला नाश करावा असें औरंगजेब बादशहाचे मनांत आहे; " इतकें बोलून राणा उदास चित्तानें स्तब्ध बसला ! " बाबा ! पाहिलंत, मागें त्या जुलमी औरंगजेबाबरोबर आपण तह केलात तेव्हांच तह न करण्याविषयीं मी तुम्हाला विनविलें होतें. परंतु आतां त्याचं काय ? भवितव्यतेपुढें कोणाचें चालणार आहे ? अदृष्टांत होतं तशी बुद्धी सुचली. बाबा, आतां तरी सावध व्हा आणि त्या यवनांची क्षिती बाळगूं नका. तुम्ही क्षत्रिय कुलांत जन्मला आहांत हें लक्षांत आणा मग आपणास क्षत्रियांचा बाणा कसा असतो हें निराळें सांगायला नकोच. प्रसंग आल्यास यव-

नांबरोबर युद्ध करा आणि त्यांचा पराभव करून आपल्या कुळाचा गौरव करा. ह्मणजे तुमची कीर्ति अचल राहील, हें सर्व म्या मुलीनें आपणास काय सांगावें ?" वरील शब्द उच्चारितांना चंचलकुमारीस मोठा आवेश चढला; व बोलण्याच्या श्रमानें तिच्या मुखावर घर्मबिंदु चमकूं लागले; क्रोधानें तिचे मुखावर लाली चढली. या वेळीं तिचें रूप पाहण्यालायक झालें होतें. चंचलकुमारी अत्यंत कोमलगात्री होती. त्यांत कोपानें तिच्या सहज मनोहर स्वरुपांत उलट भर पडल्यासारखी झाली. किंचित् विखुरलेले केस वाऱ्यानें भुरभुर उडत होते. ओंठ थरथर हालत होते. आणि तिचा मंजुळ स्वर किंचित् चढविल्या कारणानें उलट कर्णमनोहर झाला होता. एखाद्या उत्तम चिताऱ्यानें तिचें चित्र रेखाटून घेतलें असतें तर तें निसर्गसुंदर चित्र फारच लोकप्रिय झालें असतें. राणा कांहींएक न बोलतां स्तब्ध होता. कांहीं वेळानें चंचलकुमारी ह्मणाली, "बाबा, आपलें नांव विक्रमसिंह आहे. आपण मोंगलांचे हें कपट उदेपुराधिपास कळवा आणि तुह्मी व ते मिळून युद्धाची तयारी करा. आपल्या कुळाची नसली तरी नांवाची चाड ठेवा व शत्रूला तुमचा विक्रम काय आहे तो कळवा. मला तर असं वाटतं कीं श्री भगवती चितोडची देवी या कामीं तुह्माला खात्रीनं यश देईल; आणि त्या दुष्ट मोंगलांस त्यांच्या कपटकृत्याचें फळ मिळेल!" राणा चमत्कारिक मुद्रा करून ह्मणाला, "चंचले, मोंगल सैन्याबरोबर लढाई देणें ही गोष्ट हलकी नाहीं. आणि तूं मला उदेपुरच्या राण्याची मदत घ्यायला सांगतेस ती गोष्ट तर कालत्रयीं घडणार नाहीं. उदेपुरवाले आमचे पिढीजाद शत्रू आहेत. त्यांना शरण जाऊन त्यांच्या आश्रयानें माझें वैभव सुरक्षित करूं? नाहीं, नाहीं मी पाहिजे तें संकट सहन करीन परंतु उदेपूरकरांजवळ मान वांकविणार नाहीं." इतकें बोलून विक्रमसिंहानें एक दीर्घ निश्वास सोडला!

पित्याची ही शोकजनक स्थिती पाहून कोमल हृदयाच्या चंचलकुमारीस गहिंवर आला. ती ह्मणाली, "बाबा! नाहींतर असं करा कीं, प्रतापदादास बंधमुक्त करून युद्धाची तयारी करा. प्रतापासारख्या वीराच्या तरवारीवर विश्वास ठेवा, त्याची तरवार कधींही दगा देणार नाहीं. यदाकदाचित् आपणास अपजय आला आणि युद्धांत पडलां तर क्षत्रोचित् कर्म केलीं ह्मणून आपला नांवलौकिक होईल व स्वर्गीत आपल्याला उत्तम गति मिळेल. बाबा, मोंगलाबरोबर तह करून आपली स्वतंत्रता इतःपर विकूं नका, पुढें अदृष्टांत असेल तसें होईल." "चंचले, तूं अद्याप लहान आहेस, तुला अद्याप जगांतील कित्येक गोष्टी शिकावयाच्या आहेत. राजकारणें तुला काय समजणार?" "मग बाबा, आपण मघाशीं बोलतांना थांबलेत तो उपाय काय आहे?" "बाळ, तो उपाय फार भयंकर आहे तरी त्या उपायास अनुमोदन दिल्यावांचून गत्त्यंतर नाहीं." "बाबा, काय बरें तो उपाय?" "मुली, तो उपाय अमलांत आला तर राजवैभव नष्ट न होतां उलट

वृद्धी पावेल. कोणाही प्राण्याची हानी होणार नाहीं. आणि हें आलेलें संकट टळेल. परंतु तें सर्व तुझ्यावर अवलंबून आहे." "काय! बाबा! माझ्यावर सर्व अवलंबून आहे? राजवैभवाची वृद्धी होऊन प्राणीवधाशिवाय सर्व संकट टळत असेल आणि ह्या सर्व गोष्टी मजवर अवलंबून असतील तर बाबा मी मोठ्या खुशीनें ती गोष्ट कबूल करीन; परंतु तो उपाय काय आहे तें तर मला कळूं द्या." "चंचले, माझी आज्ञा तूं मान्य करशील कीं नाहीं याची मला शंका वाटते." "बाबा, आपणास कां बरें शंका येते? धर्मानुकूल आणि क्षात्रोचित् उपाय नसला तर मात्र मी मुळींच मान्य करणार नाहीं." "चंचले, या तुझ्या वृद्धपित्याचे शब्द लक्षांत घे, आणि माझ्या आयुष्याच्या शेवटच्या काळांत माझी आज्ञा मान्य कर. वृद्धापकाळीं राजवैभवाची धूळधाण होऊं नये ह्मणून मी तुला आज्ञा करीत आहें. तुझी पितृभक्ति कसास लावून पाहण्याची वेळ आली आहे." नंतर विक्रमसिंह नम्रपणा स्वीकारून ह्मणाला, "चंचले, आज बादशहाचें जें पत्र आलें आहे त्यांत तुजबद्दल .... मधेंच—चंचलकुमारी घाबरून ह्मणाली, "माझा काय बाई त्या पत्राशीं संबंध?" चंचलकुमारी फारच भयभीत झाली. बराच वेळ विक्रमसिंह स्तब्ध होता नंतर निश्चयाच्या मुद्रेनें राणा ह्मणाला— "चंचले, तूं वाटेल तें ह्मण, पण तुला माझी गोष्ट मान्य केलीच पाहिजे पुष्कळ वेळ विचार करून हें मी तुला सांगत आहें. विचाराअंतीं माझें करणेंच बरोबर आहे अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे. जोधपुर, अंबर वगैरे मोठमोठ्या रजपूत कुलतिलकांच्या कृती आणि स्थिती डोळ्यापुढें आणल्या ह्मणजे मी जें काय करण्याचें ठरविलें आहे तें शहाणपणाचें आहे असें मला वाटतें. राजवैभवाची वृद्धी करणारा हा योग जुळून प्राणीवधाचें पातक तरी मला लागणार नाहीं. चंचले मी रूपनगराधिपती आणि तुझा जन्मदाता तुला निक्षून सांगतों कीं, तूं माझ्या ह्मणण्या-प्रमाणें वागलेंच पाहिजे, औरंगजेब बादशहानें तुझी मागणी केली आहे ह्मणून माझ्या आज्ञेप्रमाणें तुला तिकडे गेलेंच पाहिजे." हे शब्द कानीं पडल्याबरोबर चंचल-कुमारीस विजेचा धक्का बसल्यासारखें झालें. तिचा चेहरा एकदम काळवंडून गेला. आपण स्वप्नांत आहों कीं जागृतावस्थेंत हेंही तिला कळेना. विक्रमसिंह पुढें बोलूं लागला, "तुला औरंगजेब नाटकशाळा करणार आहे असें समजूं नको. तो तुझ्या स्वरुपावर फार लुब्ध झाला आहे आणि तुजबरोबर विधिपूर्वक विवाह करून आपली पट्टराणी करणार आहे. यासाठींच त्याजकडून त्याचा सेनापती दिल्हेरखान पत्र घेऊन सर्व लवाजम्यानिशीं आला आहे. मी ही गोष्ट कबूल न केली तर काय अनर्थ होईल हें तुला सांगितलें आहे. आतां अधीक बोलण्याची माझी इच्छा नाहीं. तुझी पसंती अगर सम्मती इकडे लक्ष न देतां मी तुला आठ दिवसांची मुदत देतों. इतक्या अवधींत तूं आपल्या जाण्याची तयारी कर." चंचलकुमारी ह्मणाली,

"बाबा! हें तुह्मीच का मला सांगत आहांत. अस्सल क्षत्रियकुलांत जन्म पावलेले आणि मला जन्म-देते, बाबा, तुमचीच ना ही आज्ञा. बाबा, आजपर्यंत मला मोठ्या ममतेनें पाळलेंत; कधीं रागाचा शब्दही उच्चारिलात नाहीं, आणि तेच बाबा आज मला परधर्मीय मोंगलाकडे जा अशी आज्ञा करित आहेत ना!" "चंचले आतां मी तुझें ह्मणणें ऐकावयाचें नाहीं असा निश्चय केला आहे. तुला पाहिजे असल्यास वाटेल तितकें बोल. मी मुळींच तिकडे लक्ष देणार नाहीं." चंचलकुमारी एकदम नागिणीसारखी चवताळून बोलली, "बाबा! लक्षांत ठेवा! ही अस्सल क्षत्रियाची कन्या कालत्रयींहि आपलें नखाग्र त्या दुष्ट मोंगलाच्या दृष्टीस पडूं देणार नाहीं. स्वकुळाचा अभिमान सोडून परधर्मीयाची पट्टराणी होण्यापेक्षां मरण काय वाईट? छे! छे! माझ्याकडून कधींही या गोष्टीस सम्मति मिळावयाची नाहीं."

"काय? सम्मति मिळावयाची नाहीं? माझें ह्मणणें तुला कबूल केलेंच पाहिजे. मी आतांच दिल्हेरखानास सांगतों कीं, आह्मी आपल्या तयारीस लागलों, आठ दिवसांनीं चंचलकुमारीस घेऊन येथून कूच करावें." असें बोलून विक्रमसिंह तेथून चालता झाला.

विक्रमसिंह गेल्यावर चंचलकुमारी खिन्नवदनानें आपल्याशींच कांहीं गुणगुणली व शेवटीं कसलासा विचार मनांत येऊन मोठ्या निश्चयीमुद्रेनें तेथून निघून गेली.

प्रकरण ५ वें समाप्त.

प्रकरण ६ वें.

राजोपाध्याय.

सायंकाळचे पांच वाजण्याचा सुमार झाला होता. लवकरच पतिभेट होईल ह्मणून पश्चिम दिग्वधू आनंदातिशयानें, एखाद्या पतिपरायण स्त्री प्रमाणें उल्हसित झाली होती. तीव्रपणा जाऊन मंद किरणांचा **रक्त वर्ण** पाहून पश्चिम दिग्वधूचे मुखावर सलज्जांतःकरणानें आरक्तपणाच आला आहे कीं काय असें वाटे! ती तांबूस तांबूस छटा पाहून कोणाला बरें आनंद होणार नाही? मंद अशा त्या रक्तबर्ण किरणांचा प्रकाश रूपनगरच्या किल्ल्यावर पडला होता; आणि तें ही स्थळ अत्यंत रमणीय दिसत होतें.

अशा समयीं त्या किल्ल्याच्या अंतःपुरामधें एक तरुण युवती चित्रें पाहण्यांत गुंग झाली होती. कांहीं चित्रें पाहून झाल्यावर तिनें एक चित्र उचललें, व त्याकडे एकाग्रचित्तानें पाहूं लागली. बराच वेळ तें चित्र पाहिलें तरी तिची तृप्ती झाली नाहींसें दिसतें. कारण पुनः पुन्हा ती तें चित्र पाही व असें पाहतां पाहतां चित्र

४–६२७–१०००

पाहण्यांत ती अगदीं गुंग झाली. इतक्यांत तिच्या पाठीमागून एक समवयस्क तरुणी आली आणि ती काय करीत आहे तें लक्षपूर्वक पाहूं लागली. आपल्या येण्याच्या चाहुलीनें ती सावध होईल असें दुसऱ्या तरुणीस वाटलें होतें परंतु पहिली खरोखरच अगदीं देहभान विसरून गेली होती. कांहीं वेळ गेला तरी ती भानावर येत नाहींसें पाहून दुसरी तरुणी तिच्या पुढें आली व ह्मणाली, " बाईसाहेब ! ह्याच मूर्तीचें कां ध्यान चाललें आहे ? तरीच मी ह्मणतें कीं, तीं चित्रें खरेदी केल्यापासून आपली स्वारी एकांत कां शोधीत असते ? आतां बरीक माझ्या सर्व कांहीं लक्षांत आलं. "

"सखे ! ही थट्टा करण्याची कां वेळ आहे ? माझं चित्त मुळींच ठिकाणावर नाहीं. बाबानीं ती हकीकत सांगितल्यापासून मला मेलं कससंच वाटूं लागलं आहे. गडे या गोष्टीला कांहीं उपाय आहे का ?"

"अग ! उपाय आहे कां ह्मणून काय विचारितेस ? तुला औरंगजेब बादशहाची पट्टराणी होणं पसंत नसलं तरी राणाजींची काय मगदूर लागली आहे कीं, बादशहाच्या मागणीचा अव्हेर होईल ? राणाजीनां बादशहाची मागणी कबूल करणेंच भाग आहे; आणि तूंहि गडे कबूल झालीस ह्मणजे आमच्या भाग्यास सीमाच नाहीं. जोधपूर, अंबर येथील राणे यांच्या कन्यांना सुद्धां दिल्लीच्या राज्ञीपदावर बसण्याची इच्छा नाहीं का ? मग तुझाच एवढा हट्ट कां ?"

ह्या दोन तरुणी कोण आहेत हें वाचकांनीं ओळखलेंच असेल. एक चंचलकुमारी असून दुसरी तिची सखी निर्मळकुमारी ही होती.

निर्मळकुमारीचें वरील वाक्य ऐकून चंचलकुमारीस तिचा फार राग आला व ती ह्मणाली, ' चल येथून तूं उठून जा. मला अशा ह्या चहाटळपणाचा अतिशय कंटाळा आहे. '

" अगबाई ! माझ्या सांगण्याचा तुला अतिशय वीट येत असेल परंतु तूं दिल्लीला गेली नाहींस तर तुझ्या पित्याची काय दशा होईल याचा कांहीं तूं विचार केला आहेस का ?" निर्मळकुमारी ह्मणाली.

"तर विचार करायचा अद्याप ठेविला आहे का ? मला एवढं पक्कं माहित आहे कीं, मी जर गेलें नाहीं तर ह्या रूपनगरच्या किल्ल्याचा एक दगडही दृष्टीस पडावयाचा नाहीं. ह्मणून मी पित्याच्या नाशास कारण न होतां दिलेरखान निघेल त्याच्या बरोबर निघावं असा विचार केला आहे. "

निर्मळकुमारी आनंदानें ह्मणाली ' मी हि पण तुला हेंच सांगणार होतें. '

राजकन्या रागानें ह्मणाली. "वाग वा! बरीच कि ग आहेस! तुझ्यामतें मी दिल्लीस जाऊन त्या यवनाची दासी होऊन रहावें? अग हंसी कधीं बकाला माळ घालील का?"

निर्मळकुमारी गोंधळांत पडून ह्मणाली "मग तूं करणार तरी काय?"

हातांतील आंगठी दाखवून चंचलकुमारी ह्मणाली "ही माझं रक्षण करील."

"काय? तूं अशा तऱ्हेनें आत्महत्या करणार? सखे! चंचले ह्या भयंकर मार्गाशिवाय तुला दुसरा मार्गच नाहीं का?"

"निर्मळे! याशिवाय दुसरा कोणता बरें मार्ग आहे? आज ह्या राजस्थानांत असा कोणता वीर आहे कीं, जो माझ्या हितासाठीं दिल्लीश्वराशीं वैर संपादन करील? सांप्रत राजस्थानांतील रजपूत कुलांगार केवळ मोगलांचे दास होऊन स्वस्थ घोरत पडले आहेत. राणा संग्राम आणि राणा प्रताप कुठं बरं आहेत?

"अग, राणा संग्रांम आणि प्रताप असते तरी तुझ्यासाठीं आपलं सर्वस्व गम-विण्यास ते तयार झाले असते का? बरं पण ते नसले तरी "राजसिंह" तरी आहेत ना? ते तुझ्यासाठीं कांहींच कां करणार नाहींत?"

"निर्मळ, काय ह्मटलेंस? आंगांत शक्ती असून अस्सल रजपुत शरणागताचें रक्षण करणार नाहीं? अहाहा! सखे! माझातर निश्चयच झाला आहे कीं, ह्या संकटापासून माझं रक्षण करण्यास मी त्याच राणा संग्राम आणि प्रतापाच्या कुलदीप-काचा आश्रय करीन. ते माझं रक्षण करणार नाहींत काय?" असें ह्मणून तिनें आपल्या जवळचे 'राजसिंहाचें' चित्र बाहेर काढलें व त्याकडे पहात पहात ह्मणाली, "सखे ह्या मूर्तींचें तेज तरी पहा! मला तर बाई पूर्ण विश्वास आहे कीं, ह्या संकटांतून माझी सुटका करणार कोणी असेल तर हीच मूर्ती होय."

राजकन्येच्या सर्व सख्यांमध्यें निर्मळकुमारी ही प्रमूख असून बुद्धिवान् होती. चंचलकुमारी तिजवर आपल्या सख्ख्या बहिणीप्रमाणें प्रेम करीत असे. थोडावेळ विचार करून निर्मळकुमारीनें ह्मटलें. "सखे! जो वीर पुरुष तुला ह्या संकटांतून सोडवील त्याला तूं काय देशील?"

तिच्या खोंचून बोलण्याचा अर्थ राजकन्येच्या लक्षांत आला, तरीही न समज-ल्याचा बहाणा करून ती ह्मणाली. "सखे! काय बरं देणार? मजजवळ देण्या-सारखं माझ्या मालकीचं काय आहे? मी बोलून चालून अबला आहें; आणि अबलांकडूनही वीरपुरुष उपकाराचा मोबदला मागत असतात का?"

"अग सखे! तूं अबला असलीस ह्मणून काय झालें. तुझ्या देहावर तर तुझी पूर्ण सत्ता आहेना? तूं रुक्मिणी हो, ह्मणजे कृष्ण महाराज येऊन, तुला संकटांतून मुक्त करितील."

लज्जितांतःकरणानें चंचलकुमारी खालीं पाहूं लागली. तिच्या सुंदर मुखकमलावर आशा आणि निराशा, आनंद आणि दुःख इत्यादी मनोविकाराच्या छाया क्षणार्धामध्यें येऊन पुन्हां नाहींशा झाल्या. ती ह्मणाली, "सखे निर्मळे! माझं नशीब कुठं बरं इतकं बलवत्तर आहे! माझं पूर्व पुण्य कांहीं शिल्लक असेल तरच मात्र तसा योगायोग येईल."

"अग तसा योगायोग न यायला काय झालं? राजसिंहाचं बळच अद्वितीय आहे. त्यांच्याकडे आपण निरोप पाठविल्यास हें कार्य सहज घडेल." निर्मळ ह्मणाली.

"होय बाई, जासूद पाठविल्यावांचून हें कार्य होणं दुर्घटच आहे. गडे तूं आतां असं कर. उपाध्यायानां जाऊन बोलाव. त्यांचें मजवर अत्यंत प्रेम आहे. त्यांनीं मनावर घेतल्यास हें कार्य सहज करितील; पण त्यांना इकडे आणण्यापूर्वीं ही सर्व हकीगत सांगूनच घेऊन ये हो, नाहीं तर मला सांगायला शरम वाटेल बाई!" चंचलकुमारीनें खालीं पहातच हें सांगितलें.

राजोपाध्यायांचें नांव अनंतमिश्र असें होतें. ते चंचलकुमारीस आपल्या पोटच्या मुलीप्रमाणें मानीत होते. धर्मशास्त्रादिकांमध्यें अनंतमिश्र वाटेल त्या पंडिताबरोबर वादविवाद करीत असत; आणि कधींही हार जात नसत. त्यांचें अध्ययन बरेंच झालेलें होतें. त्या विद्वान व शास्त्रविद्याविभूषित उपाध्यायांचा दरबारांतील सर्व लोक फारच आदर सत्कार करीत.

चंचलकुमारी आपणांस बोलावित आहे असें ऐकतांच ते तावडतोब अंतःपुरामध्यें आले. त्यांना कोठेंही जाण्यास मुळींच अटकाव नसे. अनंतमिश्र चंचलकुमारीकडे येण्यापूर्वीं त्यांना सर्व हकीगत निर्मळकुमारीनें सांगितली होती.

उपाध्यायांची मुद्रा मोठी भव्य होती; आणि चेहरा पाणीदार असून पाहिल्याबरोबर आदर भाव उत्पन्न होत असे. विशाळ भाल प्रदेशावर चंदनाचा त्रिपुंड्र लाविला होता. सर्वांगास भस्म चर्चिलें होतें. गळ्यामध्यें रुद्राक्षाच्या माळा घातलेल्या होत्या. अशी ही दर्शनीय मूर्ती, आपल्या बोलाविण्याबरोबर आली हें पाहून चंचलकुमारीचें अंतःकरण सद्गदित झालें आणि नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले. अनंतमिश्रांनीं तिला विचारिलें "कुमारी, आज मला कां बरें बोलाविणें पाठविलेंस? तुझ्या चर्येवरून तूं संकटांत आहेस असें वाटतें."

"महाराज! आपण ह्मटल्याप्रमाणें मी खरोखरच मोठ्या संकटांत आहें. त्या संकटांतून आपण माझें रक्षण करावं ह्मणून आपणास बोलाविलें आहे. आपल्याशिवाय कोण बरें माझें संकट दूर करील? महाराज! कदाचित् माझ्या मुखांतून स्त्रीजातीच्या नैसर्गिक मर्यादेबाहेर शब्द जातील, त्याबद्दल आपण क्षमा करावी."

"मुली, चंचलकुमारी, ह्या अनंत मिश्रास आपल्या पित्याप्रमाणें मानून संकुचितवृत्ति न धरितां तुजवरील संकटाचें निवेदन कर. त्या संकटाचा परिहार करावयाकरितां मी मनापासून प्रयत्न करीन, याबद्दल तुझी खात्री असूं दे."

"महाराज! आपल्या अमृतशब्दतुल्य आश्वासनानें मला बराच धीर आला आहे. पुराणामध्यें अशी गोष्ट आहे कीं, रुक्मिणीला शिशुपाळास द्यावी असा तिच्या जन्मदात्या पित्यानें निश्चय केला, त्या वेळीं रुक्मिणीच्या विनंतीवरून तिचे कुळगुरु द्वारकेस श्रीकृष्णाकडे गेले होते........" "तद्वत् आमचीही उदेपुरास जाण्याची तयारी आहे" मध्येंच अनंतमिश्र हंसत हंसत ह्मणाले. "माझ्या वाटखर्चाची मात्र तयारी करा."

चंचलकुमारीनें तावडतोब एक मोहरांनीं भरलेली थैली समोर ठेविली, त्यांतून जरुरीपुरत्या घेऊन बाकीच्या परत करून उपाध्याय ह्मणाले, "मुली मजजवळ एखादें पत्र देशील तर बरें होईल. राणा राजसिंहास तुझ्या हातचें पत्र दिल्यानें प्रोत्साहन येऊन तो हें कार्य हातांत घेईल, तितकें माझ्या केवळ सांगण्यानें करावयाचा नाहीं."

चंचलकुमारी विचारांत पडली; आणि तिच्या कुलीनपणास शोभेसा विचार तिच्या मनांत आला. मी अविवाहित असून परपुरुषास पत्र लिहिण्याचें कसें बरें धाडस करावें. या विचारानें ती थोडा वेळ गोंधळली परंतु थोड्याच वेळांत तिनें पूर्ण विचार करून पत्र लिहिण्याशिवाय मुळींच गत्यंतर नाहीं असें ठरविलें; व ती पत्र लिहावयास बसली.

'तुझें पत्र लिहून तयार होतें आहे तों मी महाराजांची आज्ञा घेऊन येतों' असें ह्मणून अनंतमिश्रांची स्वारी राजदरबारीं आली. व ह्मटलें कीं, 'थोडे दिवस प्रवासास जाण्याचा मनोदय आहे ह्मणून आशीर्वाद देऊन जाण्याकरितां आलों आहें,' कोठपर्यंत जाणार आहां? असा राणाजीनीं प्रश्न केला त्यावर उदेपुरापर्यंत जाईन ह्मणतों परंतु नक्की कांहीं सांगतां येत नाहीं असें उत्तर दिलें. जरूर पडल्यास ओळखीसाठीं राजशिक्क्याचें पत्र घेतलें.

अनंतमिश्रांचीं स्वारी पुनरपि चंचलकुमारीकडे आली. त्या दोघी मैत्रिणींनीं एक पत्र लिहिलें होतें तें बरोबर घेतलें, इतक्यांत चंचलकुमारीनें एक अमोलिक मुक्तमाला काढून त्यांच्या जवळ दिली व ह्मटलें, "राण्यांनीं पत्र वाचल्यानंतर, तुह्मी माझ्या तर्फेचे वकील ह्मणून ही माळा त्यांच्या गळ्यांत घाला. रजपुत कुळांतील नरवीरमणी, रजपूत कन्येनें पाठविलेली माळ स्वीकारणार नाहींत असें कधींही होणार नाहीं."

अनंतमिश्रांनीं रुकार दिल्यावर ते तेथून तिचा निरोप घेऊन निघाले.

"आतां बाई मनाला अम्मळ बरें वाटलें. पण आतां दादाला कारागृहांतून सोडविण्याची कांहींतरी युक्ती केली पाहिजे. तो मला ह्या कामांत बरंच साह्य करील," चंचल निर्मळेस ह्मणाली.

"अग मी तोही घाट जमवून आणला आहे. सगळ्या पहारेकऱ्यांस वश करून घेतलं आहे. आतां आपण जायचीच खोटी कीं मुक्तता झालीच ह्मणून समज."

चंचलकुमारी आनंदानें ह्मणाली, "सखे तूं तरी बाई बरीच कारस्थानी आहेस! ह्या गोष्टीचा मला मागमूस देखील लागूं दिला नाहींस. चल तर बाई प्रथम तेंच काम हातांत घेऊं." असें ह्मणून त्या दोघी मैत्रिणी चालत्या झाल्या.

प्रकरण ६ वें समाप्त.

प्रकरण ७ वें.

परमहंस.

पावसाळ्याचे दिवस. रात्रीचा समय. दिल्ली येथील "शाहाबाग" नांवाचा बादशाही बगीचा. पण या अत्यंत रमणीय, मनोहर आणि नानाविध रंगीबेरंगी पुष्पलतायुक्त बागेचें अतुल सौंदर्य व अफाट वैभव रात्रीच्या घोर अंधःकारामुळें नाहींसें झालें होतें. नुकत्याच उगवलेल्या चंद्राच्या अंधुक प्रकाशांत मात्र ठिकठिकाणीं विलक्षण कौशल्यानें घडविलेल्या पुतळ्यांमधून कारंजाचे उंच उंच उडत असलेले हजारों तुषार दृष्टीस पडून ते मनाला आनंदवीत होते. समोरच कालिन्दीचा नीलवर्ण प्रवाह मन्द मन्द वाहत होता. इतक्यांत गगनमंडल पुनः मेघाच्छादित झालें. कृष्णवर्ण मेघसमूह इतस्ततः संचार करूं लागले. प्रचंड वायू वाहूं लागला. तेणेंकरून वृक्षांचें आन्दोलन सुरू झालें. जिकडे तिकडे अंधःकार पसरला व पावसाची झोड सुरू झाली. वेळ मध्यरात्रीचा असल्यामुळें कोणीहि मनुष्य दिसण्याचा संभव नव्हता. फक्त पहारेकरी दिसायचे पण ते सुद्धां पावसाच्या त्रासानें निरनिराळ्या ठिकाणीं आश्रयस्थान पाहून संरक्षणार्थ बसून राहिले. अल्पावकाशांत दिल्लीचा तो बाग, घाट व रस्ता यांना भयंकर शून्यता आली. पण ही शून्यता फार वेळ टिकली नाहीं. त्या शाहाबागेंत कोणाचासा चालण्याचा आवाज ऐकूं आला. इतक्या भयंकर वेळेला—साक्षात् प्रळयकालचा वेळ हा. दशदिशा भयाण झाल्या होत्या. मेघ आरडा ओरड करीत होते. मधूनमधून वीज चमकत होती. प्रचंड वायू भावी विपत्तीच्या शंकेमुळेंच कीं काय घों घों आवाज करीत होता! अरेरे! प्रकृती रूपी सतीनें हा असा भयानक देखावा धारण केला असतां कुणाला बरें इकडे यावेसें वाटलें! वाचकहो, ती पहा एक तापसी स्त्री लपत छपत जात आहे. पण हें आश्चर्य नव्हे का? मोंगल बादशाहाच्या बागेमध्यें ही तापसी स्त्री कां

आली असावी बरें! ती पहा आपल्या कापऱ्या कापऱ्या आवाजांत आपणाशींच कांहीं उद्गार काढूं लागली:—अरे पण हें काय? मी इकडे कशी आलें? पुनः सुद्धां मी याच जागीं येऊन पोंहोंचलें ना? इतकें बोलून तिनें एक दीर्घ निश्वास टाकला व डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या. संसारांतील मायापाशांतून मुक्त झालेल्या तपस्विनीच्या मुखांतून अशाप्रकारचे शब्द निघावे हें एक नवलच ह्मणावयाचें! तिच्या नेत्रांतून अश्रुपात होऊं लागला त्याअर्थी तिची अशी स्थिती होण्याचें कांहींतरी कारण असलें पाहिजे. तिच्या अंतःकरणीं वास करीत असलेल्या गुप्त दुःखाचा उमाळा बाहेर पडला असावा असें वाटतें. तिच्या दुःखाचें कारण समजण्यास आपणांस थोडा वेळ थांबलें पाहिजे. वादळाच्या गर्जनेनें आणि विजेच्या चमकण्यानें ती बाग अत्यंत भयानक दिसत होती. तरी त्या तपस्विनीस त्याचें यत्किंचितही भय वाटलेंसें दिसत नाहीं. ती एका वृक्षाच्या बुंधास टेकून बसून ईश्वर चिंतनांत निमग्न झाली. ती आपल्या आत्म्याचा परमात्म्याच्या रूपाशीं जणूं काय संयोग करीत होती. मुसळधार पर्जन्य सुरू होऊन तिचीं वस्त्रें भिजून चिंब झालीं. तरी तिनें आपले डोळे उघडले व आकाशाकडे पाहून ह्मटलें "प्रभो ही सर्व तुझी लीला आहे. आजच्या ह्या भयंकर तुफानामुळेंच मला त्या दुष्टांचें मुखावलोकन करण्याचा प्रसंग आला नाहीं! परमेश्वरा! मला नेहमीं ह्याच वेशामध्यें भ्रमण करणें भाग पडणार काय?" तोंच एकाएकीं एक करुणाजनक रोदनध्वनी कानीं पडतांच ती तपस्विनी बोलतां बोलतां थांबली; आणि चारी बाजूस चकीत होऊन पाहूं लागली. ती कान देऊन ऐकूं लागली तों येणाऱ्या आवाजावरून कोणी तरी स्त्री विलाप करीत आहे असें तिला वाटलें. तिनें असें ऐकिलें. "ईश्वरा! माझ्या भाग्यामध्यें हेंच लिहिलें होतें काय? हे प्रभो! मला अशी भाग्यहीन कां बरें उत्पन्न केलीस?" आतां मात्र तपस्विनी उभी राहिली आणि चारी बाजूस पाहून, यमुनानदीच्या तिरावरून तो ध्वनी आला असावा असें अनुमान करून तिकडे ती निघाली. इतक्यांत पुन्हा तो ध्वनी ऐकूं आला "मला एकवेळ दर्शन द्या. आपल्या शोधास्तव मी पहाडचे पहाड उल्लंघिले. छी छी! आतां मला हे कष्ट सहन नाहीं होत. मी आतां ह्या पापहारिणी कालिंदी मधें उडी घेऊन ह्या सर्व कष्टांतून एकदम मुक्त होत्यें." हें ऐकतांच हां, हां, नको, नको, ह्मणत तपस्विनी यमुना नदीच्या तीरावर धांवली.

तपस्विनीनें धांवत येऊन पाहिलें तों एक लावण्य संपन्न सुकोमलगात्री रमणी नदीच्या वाळवंटावर बसून आपलें कपाळ व छाती बडवीत रुदन करीत आहे. त्या युवतीचें तें अलौकिक सौंदर्य पाहून तपस्विनीस आश्चर्य वाटलें. ही सुकुमार कोमलांगी सौंदर्याची पुतळी यमुना तीरावर कां बरें रोदन करीत असावी? तिच्या चर्येवरून तर असें वाटतें कीं, ती उच्च कुलोत्पन्न असावी. ह्या स्थितीस पोंहोंचण्यास तिजवर कांहींतरी भयंकर

प्रसंग गुदरला असला पाहिजे. तिला धीर देणें हें माझें पहिलें काम आहे. असे विचार तपस्विनीच्या मनांत आले व ती त्या दुःखी स्त्रीजवळ गेली. जवळ जाऊन पहाते तों ती हिंदु रमणी असून तिचें वय अजमासें १६।१७ वर्षांचें असावें असें तिला वाटलें. अतिशय कष्टानें तिचें शरीर कृश झालें होतें. तिच्या शरीराचा गौरवर्ण धुळीनें मलीन झाला होता.

तपस्विनी एकाएकीं पुढें होऊन त्या स्त्रीस हृदयाशीं कवटाळून ह्मणाली:—मुली, अशा ह्या यौवनावस्थेमध्यें तूं मृत्यूची इच्छा कां बरें करतेस ?

त्या युवतीस फार आश्चर्य वाटलें. तपस्विनीचा वेष आणि ममतेचें भाषण ऐकून तिला आपल्या गतगोष्टींची स्मृती झाली. त्यामुळें तिला दुःखाचे उमाळे आले. ती स्फुंदत स्फुंदत ह्मणाली. "माताजी, ह्या दुर्भागिनीला क्षमा करा आपण कोण आहां ? माझ्या दुःखानें दुःखी होणारा प्राणी आतां ह्या जगतामध्यें तरी मला कोणी दिसत नाहीं."

"मुली, मी एक भटकणारी तपस्विनी आहे. ह्या शिवाय, ह्या वेळेस मी तुला माझी ओळख देऊं इच्छित नाहीं."

"माताजी क्षमा करा मी तरी ह्या वेळेला आपली ओळख करून काय करूं ? आपणाला पाहतांच माझ्या प्रियकर मातोश्रीची मला आठवण झाली. हाय ! हाय ! कोणत्या अपराधासाठीं माझ्या प्रियकर आईनें माझा त्याग केला असेल ? आईग ! तूं कुठं बरं आहेस ? ह्या पृथ्वीमध्यें मला तुजवांचून कोणी नाहीं."

'मुली धैर्य धर, रडूं नको. तुझी आई तुला अवश्य भेटेल' तपस्विनी अश्रुपूर्ण नयनांनीं ह्मणाली.

"माताजी, एवढं माझं भाग्य कुठून असेल; हा माझा देह विटंबनेस मात्र कारणीभूत आहे." इतकें बोलतां बोलतां ती स्त्री रुदन करूं लागली, तिचें मुख निस्तेज झालें, ओष्ट कंपीत होऊं लागले, ती कावरीबावरी होऊन चोहींकडे पाहूं लागली. यमुना नदीकडे दृष्टी जातांच ती टक लावून तिकडे पाहूं लागली आणि कांहीं मनाशीं पुटपुटली. नंतर तपस्विनीकडे वळून ह्मणाली "बस, माताजी ! ह्या देहास ह्या पवित्र यमुनानदीमध्यें कायमची विश्रांति दिल्याशिवाय माझ्या मागचीं संकटें नाहींशीं होणार नाहींत. इतकें बोलून ती यमुनेंत उडी मारावयास धांवली, पण तपस्विनीनें धांवत जाऊन तिला धरलें आणि धमकाऊन ह्मणाली "ह्या तुझ्या मूर्खपणाला काय ह्मणावें मुली ? बाईगे, हजारों माणसं मला "माताजी" या नांवानें हांक मारितात, परंतु तुझ्या मुखांतील "माताजी" हा शब्द ऐकतांच मला प्रेम उत्पन्न झालें आहे तसं आजपर्यंत कधीं झालं नाहीं. मी देवमार्गाला लागलेली बैरागीण आहें. मला गृहस्थाश्रमाशीं आतां काय कर्तव्य आहे ? परंतु तुला पाहतांच गृह

स्थाश्रमी मनुष्यासारखी माझी स्थिति झाली आहे. तुला मांडीवर घेऊन तुझं चुंबन घ्यावं अशी मला अनावर इच्छा उत्पन्न झाली आहे."

"माताजी, आपले हे दयापूर्ण शब्द मी कधींहि विसरणार नाहीं. मला ह्या खेपेस सोडा. असह्य संकटाचा अंत करून टाकून मला सुखी होऊं द्या. इतकें बोलते न बोलतें तोंच तपस्विनीच्या हातांतून निसटून जाऊन तिनें एकदम यमुना नदींत उडी घेतली. तपस्विनीनेही तिच्या मागोमाग उडी घेतली व तिला बुडतां बुडतां धरून ओढीत ओढीत कांठावर आणिली; आणि ह्मणाली—" छे ! छे ! तूं असा मूर्खपणा काय करतेस ? इतक्यांत मागील बाजूनें "अरे ! हें काय करीत आहे ! हें काय करीत आहे ?" असा धीर गंभीर ध्वनी ऐकूं आला. त्याबरोबर दोघींनीही दचकून मागें पाहिलें तों एक जटाधारी महापुरुष दोन्ही हात वर करून त्यांच्याकडे धांवत येत आहे. असें त्यास दिसलें.

त्या महापुरुषाला पाहतांच ती तरुण युवती हात जोडून गद्गदीत स्वरानें ह्मणाली "पिताजी, क्षमा करा ! आतां पुन्हा कधींहीं मी असा मूर्खपणा करणार नाहीं."

असें बोलून ती धांवत जाऊन त्या महापुरुषाच्या चरणावर पडली. हें पाहून तपस्विनीस फारच आश्चर्य वाटलें ! ती मनांत ह्मणाली हें काय ? आतांच ही स्त्री प्राणघात करावयास तत्पर झाली होती, आणि ह्या परमहंसजीस पाहतांच ती त्यांची क्षमा कां मागत आहे ? हें गूढ काय आहे ? याचं कारण काय बरं असेल ? इत्यादी नानाप्रकारचे तर्क वितर्क काढून ती परहंसजीकडे आश्चर्यचकित मुद्रेनें पाहूं लागली. आल्पावकाशांत ती पाषाणमूर्तिवत् स्तब्ध उभी राहिली.

इकडे परमहंसजींनी आपल्या चरणावर पडलेल्या त्या रमणीस उठवून ममताळू-पणानें ह्मटलें—" मुली तूं आतां कांहीं चिंता करूं नको. माझ्या सहवासाला इतके दिवस असून देखील तुला अद्याप कांहीं ज्ञान होऊं नये ही मोठी आश्चर्याची गोष्ट होय. पण त्यांत तुझा कांहीं अपराध नाहीं. तो माझाच अपराध आहे. चल तूं ज्या पित्यासाठीं प्राणहत्या करावयास तत्पर झालीस त्याची व तुझी गांठ घालून देतो."

"काय ह्मटलंत ? माझ्या पित्याची आपण गांठ घालून देणार ? अहाहा ? पिताजी आपणाला ते माहित होते तर प्रथमच कां बरं नाहीं सांगितलंत ?" युवती हर्षयुक्त होऊन ह्मणाली.

"मुली तें सर्व मी तुला मागाहून सांगेन." परमहंसजी ह्मणाले, आणि त्या दूर उभ्या राहिलेल्या तपस्विनीकडे पाहूं लागले. कुठें तरी तिला पाहिलें असावें असा भास झाला. एकवेळ पाहिलेल्या चेहऱ्याकडे पुन्हा पाहतांच ज्या प्रमाणें आपण आश्चर्यानें पहातो त्याप्रमाणें परमहंसजी तिजकडे पाहूं लागले. तपस्विनीची पण तशीच

स्थिती झाली. थोडावेळ गेल्यावर ती एकाएकी ह्मणाली "प्रभो! अहाहा!! आपली भेट पुनरपि होईल अशी स्वप्नांतही आशा नव्हती. ह्या दुर्भागिणीला आपल्या चरण-दर्शनाचा अक्षय्य वास प्राप्त झाला ह्मणून मी माझं मोठं भाग्य समजतें." इतकें बोलून ती तिच्या हृदयांतील कांहीं गुप्त दुःखाच्या वेदनेने विव्हल झाली. दुःखभार सहन न झाल्यामुळें त्या महापुरुषाच्या चरणाजवळ तपस्विनी मुर्च्छा येऊन पडली ह्या प्रकारामुळें, दुसरी युवती अत्यंत विस्मय पावली आणि तिनें जवळ जाऊन तपस्विनीचें मस्तक आपल्या मांडीवर घेऊन तिला सावध करूं लागली व परमहंसजीकडे पाहून ह्मणाली—" पिताजी ह्या तपस्विनीला मुर्च्छा कां आली? ही कोण आहे तें आपणास माहीत आहे कां?"

"मुली हें सर्व तुला आपोआपच कळेल," परमहंसजीनें कष्टानें जबाब दिला "आतां इला आश्रमांत नेऊन शुद्धी आणण्याची तजवीज केली पाहिजे."

असें बोलून त्यांनीं तपस्विनीस आपल्या पाठीवर घेतली आणि तीं दोघेही शाहबागेच्या बाहेर चालती झाली. पाऊस बंद झाला. ती भयानक रात्र, हळू हळू स्वच्छ होऊं लागली आणि चोहोंबाजूस सूर्योदयाचा प्रकाश पडूं लागला.

प्रकरण ७ वें समाप्त.

प्रकरण ८ वें.

तपस्विनी आणि जयसिंह.

मध्यान काळचा वेळ होता. सूर्याची प्रखरकिरणें असह्य ताप देत होतीं. अनेक पशुपक्षी पाण्याच्या शोधासाठीं जंगलामध्यें जिकडेतिकडे फिरत होते, आणि कित्येक खाडे, डबकीं, ओहोळ, नदी, नाळे तलाव इत्यादि जलाशयामध्यें उतरून आपली तहान भागवितानां दृष्टीस पडत होते. अशा वेळेला दिल्ली जवळच्या एका अरण्यामध्यें एक घोंडेस्वार आपला घोडा दौडत चालला होता. जंगलांतील एका वृक्षाच्या छायेस आपला अश्व उभा करून इकडे तिकडे नजर फिरवून तो मनांत ह्मणाला "मृगाचा पत्ताच नाहीं! सगळे साथीदारही मागें राहिले. शिकारीच्या आवेशामध्यें त्यांचेही भान नाहीं. तहानेनें कंठ तर सुकून गेला आहे. कोठें तरी पाण्याचा शोध केला पाहिजे." असें ह्मणून तो इकडेतिकडे पाहूं लागला तों त्याच्या नजरेस एक पर्णकुटिका पडली. तिच्या द्वारावर एक तपस्विनी बसली होती. तेथें पाणी मिळण्याच्या आशेनें त्यानें आपल्या घोड्याला त्या बाजूस चालविलें आणि त्या कुटिकेच्या जवळ जाऊन उभा राहिला. घोड्याचा खिंकाळण्याचा आवाज ऐकतांच त्या विचारसागरांत गढून गेलेल्या तपस्विनीनें वर मुख करून त्या स्वाराकडे आश्चर्ययुक्त नजरेनें

पाहिलें ! हा स्वार सुमारें पंचवीस वर्षांच्या उमरीचा होता. शरीरानें पातळ परंतु बराच उंच होता. त्याचें मुख तेजस्वी होतें, पण मुखावर अहंकाराची छाया स्पष्ट दिसत होती. त्याच्या पाणादार डोळ्यावरून असें दिसत होतें कीं तो चंचल असला पाहिजे. त्याचा पोशाख मौल्यवान होता. त्यावरून तो राजवंशी असावा असें अनुमान होत होतें. तपस्विनीनें स्वाराला पाहतांच ताबडतोब आपलें मुख दुसऱ्या बाजूस फिरविलें. ह्या तपस्विनीची आपणांस ओळख देण्याची आवश्यकता नाहीं. मध्यरात्रीच्या वेळीं, शहाबागेच्या मागील बाजूस यमुनेच्या तीरावर परमहंसजीच्या चरणावर मुर्च्छा पावलेली तपस्विनी ती हीच होय. ह्याच कुटिकेमध्यें परमहंसजीचा आश्रम होता. परमहंसजी आणि ती आत्मघात करावयास तत्पर झालेली कन्या मात्र ह्या वेळीं कोठेंही दिसत नव्हती. तपस्विनी एकटीच तेथें बसली होती. घोडा उभा करून त्या स्वारानें तपस्विनीस विचारिलें " तपस्विनी एक मृगाला येथून पळत असतां आपण पाहिलें काय ?" तपस्विनीनें मुळींच जबाब दिला नाहीं किंवा त्याच्या मुखाकडे पाहिलेंही नाहीं. ह्यामुळें थोड्या क्रोधानें तो बोलला. "मी काय ह्मणतों तें ऐकायला येत नाहीं का? तपस्विनी आमच्या समोरून मुख फिरवून तुह्मीं आमचा अपमान करतां काय? जरा आमच्या कडे पाहून आमच्या प्रश्नाचा जबाब द्या."

" कशासाठीं ? मुख वळविल्याशिवाय तपस्विनी म्हणाली.

" कदाचित् आह्मी कोण आहों हें आपणांस माहित नसेल." स्वार ह्मणाला.

" नाहीं ! मी तुला पूर्णपणें ओळखतें. कारण तूं यवनांचा दास, दुरात्म्या औरंगजेबाचा एक नीच गुलाम आहेस !" धिक्कारयुक्त शब्दानें तपस्विनी ह्मणाली.

" हं ! एक साधारण तापसी असून सूर्यवंशी अंबराधिपती जयसिंहाला तूं असे कठोर शब्द बोलण्याचें धाडस करतेस ! " तो स्वार राजा जयसिंह क्रोधानें गर्जना करून ह्मणाला.

" कां ह्मणून धाडस करूं नये ? तपस्विनी तिरस्कारयुक्त वाणीनें ह्मणाली. " अरे सूर्यवंशी कुलांगारा ! तूं आतां अंबराधिपती कशाचा ? पापी औरंगजेबाचीं खेटरें उचलणारा गुलाम कधींही अंबरचा राजाधिराज होऊं शकेल काय ?

आतां मात्र जयसिंहाच्या अंगाचा तिळपापड झाला, तो मोठ्यानें ओरडून ह्मणाला

" काय ? तूं एक साधारण भिकारीण असून, आर्यकुलतिलक जयसिंह आणि त्याचे परम पूज्य शहेनशहा औरंगजेब यांचा असा अपमान करण्याचा अहंकार धारण करतेस काय ? जीभ सांभाळ नाहींतर तिचे तुकडे तुकडे उडतील."

"अरे आर्यकुलकलंका! अरे दुरात्म्या! यवन औरंगजेब हा कोणाचा बादशाहा आहे?" तपस्विनीही रागानेंच बोलूं लागली. "अरे तो नराधम यवनाधिपती आमचा बादशाहा असणारच नाहीं!"

"सगळ्या भरतखंडाच्या बादशाहाबद्दल अशा प्रकारचे राजद्रोही शब्द उच्चारिण्याचें धाडस!" जयसिंह रागानें दांत ओंठ चावून ह्मणाला—"काय करूं तूं एक तपस्विनी पडलीस, नाहीं तर ह्या तरवारीनें तुझ्या अहंकाराचें फळ तुला आतांच दाखविलें असतें!" असें बोलून त्यानें आपली रत्नजाडित समशेर सुवर्णाच्या म्यानामधून बाहेर काढली. तपस्विनीनें हें पाहून लेशमात्रही न भितां तिरस्कारयुक्त मंदहास्यानें जबाब दिला. "वस्स वस्स! तूं आपली तरवार खेंचून तुझ्या वीरत्वाचा जो कांहीं प्रकाश दाखविलास त्यावरून तुझ्यामध्यें क्षत्रियत्व कितपत आहे तें समजलें! अरे! तूं ह्या तरवारीला सुद्धां शरम उत्पन्न केलीस! अरे षंढा! माझ्यासारख्या तपस्विनीवर तरवार उगारताना तुला लेशमात्रही शरम कशी उत्पन्न झाली नाहीं? हिंदु कुलकलंका! तूं आपल्या आर्यधर्मावर समूळ पाणी फिरविलेंस काय? अरे, एका तपस्विनीची हत्या करावयास तयार होतांना तुला ईश्वराची लेशमात्रही भीती कशी बरें उत्पन्न झाली नाहीं!" दूर हो नीचा! पापिष्टा, माझ्या नजरेसमोरून दूर हो!"

असें बोलून ती झटक्यासरशीं उठून कुटिकेमध्यें गेली, आणि तिनें दरवाजास आंतून कडी लाविली. हें पाहून जयसिंहास फारच आश्चर्य वाटलें! तो विचारामध्यें निमग्न झाला. आतां त्याचा राग बराच शांत होऊन त्याला आपल्या वर्तनाबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला होता. तो स्वतःशींच स्वतःला धिःकारून ह्मणूं लागला—"खरोखर! धिःकार असो मला. एका साधारण तपस्विनीइतकीही स्वतंत्रता भोगण्याचें माझ्या नशिबांत नाहींना? अरेरे! माझें भाग्यतरी किती हीन हें! तपस्विनी देवी! आपण योग्य बोललांत! मी खरोखरींच सूर्यकुलांगार आर्यकंटक आहे! देवते महामाये! धन्य आहे तुमची! माझी मदांध दृष्टी तुमच्या अंजनानें दिव्य झाली. शुद्ध सूर्यवंशामध्यें जन्म घेऊन, आपल्या स्वातंत्र्याला तिलांजुली देऊन यवनांचें दास्य स्वीकारण्यास मला शरम कां वाटूं नये बरें? किती तरी मी मूर्ख! धिःकार असो मला, एका तपस्विनीची हत्या—स्त्रिहत्या करण्यास तयार झालेल्या माझ्या सारख्या मूर्खाला काय ह्मणावें? बस् आतां माझ्या ह्या पापाचें प्रायश्चित्त, तपस्विनीमातेची प्रार्थना करूनच मी घेणार; मला त्यांची क्षमा मागितलीच पाहिजे! मज सारख्या हतभाग्याचें सुख पाहूं नये ह्मणूनच त्या कुटिकेमध्यें गेल्या आहेत!" जयसिंहानें आपल्या मनामध्यें ह्या प्रकारचा बेत करून, तो घोड्यावरून खालीं उतरला, आणि त्या कुटिकेच्या द्वाराजवळ येऊन दार आस्ते आस्ते ठोकून दीनवाणीनें ह्मणालाः—"

माता, मला क्षमा करा. द्वार उघडून एक वेळ मजपाप्याला आपलें दर्शन द्या!" ह्या प्रमाणें पुष्कळ वेळपर्यंत दरवाजा ठोकीत उभा राहिला, पण आंतून कांहींही जबाब मिळेना तेव्हां त्यानें दाराच्या फटींमधून आंत पाहिलें तों कोणीही दिसेना, त्यामुळें त्यास फारच आश्चर्य वाटलें. तो विचारांत पडला. तपस्विनीदेवी कशी बरें अदृश्य झाली! कुटिकेमध्यें तर कोणीही दिसत नाहीं! मला स्वप्न तर पडलें नाहींना? छे! छे! हें स्वप्न कसचें! आतांच तपस्विनी माता मजबरोबर संभाषण करीत होत्या! जयसिंहानें कुटिकेच्या दाराला जोरानें धक्का दिला त्याबरोबर तें उघडलें. आंत जाऊन तो इकडे तिकडे पाहूं लागला.

कुटिकेमध्यें एका बाजूला धुनी पेटत होती. त्यांत नुक्तीच शुष्क काष्टें घातलेलीं दिसत होतीं. त्या धुनीजवळ एक कमंडलू, एक रुद्राक्षमाळा, आणि इकडे तिकडे विखरलेलीं फुलें पडलेलीं होतीं. पण तपस्विनी मात्र तेथें नव्हती. आतां मात्र जयसिंह चकित् झाला. तो विचारतरंगामध्यें गोंधळूं लागला. "मला उपदेशामृत पाजण्यासाठीं, साक्षात् वनदेवतेनेंच आगमन केलें होतें काय?" अशा प्रकारचा विचार करीत तो कुटिकेच्या बाहेर आला. तोंच आकाशांतील मध्य भागावर आलेल्या सूर्याकडे त्याची नजर गेली, दोन प्रहर उलटून जाण्याच्या पंथास लागलेली होती. तो मनांत ह्मणाला, "खरोखर! सूर्य नारायण पण माझ्यावर क्रोधदृष्टी करीत आहे. पहा, तेही आपल्या लाल रसरसीत नेत्रांनीं मजकडे पहात आहेत! हे वृक्ष पण आपले पल्लवरूपीं हात हालवून मला येथून दूर होण्यासाठीं सांगत आहेत!" ह्याप्रमाणें उद्गार काढीत तो आपल्या घोड्याजवळ आला. अद्याप त्याच्या अंतःकरणामध्यें तपस्विनीचेंच दृश्य स्वरूप घोळत होतें. ती कोण आहे हें समजण्याची त्यास अतोनात उत्कंठा प्राप्त झाली होती.

"होय, हाच आवाज! आतां जरासी ओळख पटूं लागली. तीच असली पाहिजे नाहीं तर मला ओळखून अशा प्रकारें माझा तिरस्कार करून जाती ना! हिचा अवश्य तलास लाविला पाहिजे." अशा प्रकारें जयसिंह आपल्या मनाशींच विचार करीत आहे इतक्यांत लांबून घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं येऊं लागला, ह्मणून त्यानें त्या बाजूस पाहिलें, तों चार घोडेस्वार आपल्याकडेच घोडे दौडीत येत आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. ते स्वारही हां हां ह्मणतां त्या ठिकाणीं येऊन पोहोंचले. कुटिके जवळ जयसिंहास उभा राहिलेला पाहतांच आश्चर्यचकित होऊन ते आपआपसामध्यें बोलूं लागले. 'अरे हे तर महाराज जयसिंहजी! हे येथें कसे बरें आले असावे?' ह्याप्रमाणें बोलत ते घोड्यावरून खालीं उतरून जयसिंहास नमन करून उभे राहिले यांस जयसिंहानें विचारिलें. "आमच्या सेवकांना तुह्मीं पाहिलेत का?"

'नहीं हुजूर!' चारी जणांनीं हात जोडून एकदम जबाब दिला.

" बरें तुह्मी कोठें जातां आहां ?"

" कोठेंच नाहीं खावंद. आपणाला येथें उभे राहिलेले पाहून कोण आहे तें पाहण्यासाठीं आलों तों खावंदच दृष्टीस पडले." त्यांपैकीं एकानें जवाब दिला.

" जहांपन्हा! आतां ह्या गुलामांना कांहीं हुकूम आहे का ?" दुसऱ्यानें विचारिलें. जयसिंह थोडा वेळ विचारांतच उभा राहून नंतर ह्मणाला: " आतां असें करा कीं, तुमच्या मधून दोघेजण ह्या पर्णकुटिकेच्या दारावर पहारा करीत बसा. आंतून कोणीही बाहेर पडल्यास त्यास एकदम कैद करून मजकडे घेऊन या! नगरामध्यें जाऊन मी तुमच्या मदतीस आणखी शिपाई पाठवून देतो. रमजान आणि समशेर तुह्मी दोघे येथें पहारा करा! पहा, याद ठेवा, सावधगिरीनें रहा!" ह्याप्रमाणें हुकूम देऊन जयसिंहानें घोड्यावर आरोहण केलें व त्या दोघा स्वारांसहीत दिल्लीस प्रयाण केलें.

जयसिंह बराच दूर गेल्यानंतर रमजान समशेरखांस ह्मणतो, " अरे कोठचा आपल्या कर्माचा भोग लागला तों या सैतानाच्या ताब्यांत सांपडलों. ह्या बाजूस येतांचना तर एव्हां घरीं पोंचून खाना खाऊन झोंपलों असतो." त्यावर समशेरखां ह्मणतो, "मला तर गड्या अतीच भूक लागली आहे. ह्या झोंपडींत खाण्यासारखें कांहीं आहे का पहा!" रमजान आंत जाऊन परत आला आणि समशेरखांस ह्मणाला. " अरे आंत तर कोणीच नाहीं. आणखी आह्मीं पहारा कसला करणार?" " काय ह्मणतोस काय ? आंत कोणीच नाहीं! पाहूं चल." असें ह्मणून समशेर, रमजानास घेऊन आंत गेला. रमजान कांहीं बोलूं पहात होता इतक्यांत समशेरखानानें त्यास थांबविलें. आणि ते दोघेही अग्निकुंडांतील धुनीकडे पाहूं लागले. समशेर रमजानाच्या तोंडाकडे पाहूं लागला. रमजानानें त्यास ओठावर बोट ठेवून गप्प बसण्यासाठीं इशारत केली.

अग्निकुंडाच्या खालीं सुस्वर गाण्याचे आलाप ऐकूं येत होते. अग्निकुंडाच्या खालून गायन! मोठाच चमत्कार! ते दोघेही घाबरून गेले. प्रथम त्यांच्या मनांत सैतानासंबंधानें विचार घोळूं लागले; परंतु ते दोघेही धाडशी असल्यामुळें खात्री करण्याच्या इच्छेनें अग्निकुंडाजवळ जाऊन तेथील जमीन तपासूं लागले. रमजाननें इशान्येकडील जमनीमधील एका चौरस दगडावर जोरानें लाथ मारली त्या बरोबर कुंडाच्या चारी बाजूची एक एक हात जमीन कांहीं आवाज झाल्यावांचून जमिनीमध्यें चवदा पंधरा हात खालीं उतरली, त्या बरोबर रमजान व समशेर आंत पडले.

प्रकरण ८ वें समाप्त.

प्रकरण ९ वें.

आर्य बालेवरील अत्याचार !

प्रातःकाळची वेळ ! सूर्योदय होण्याची पूर्व तयारी ! सूर्याच्या आगमनकालाची मार्गप्रतिक्षा करीत स्वस्थ निद्रासुखाचा आस्वाद घेत असलेले पक्षीगण, दिशा प्रकाशमान दिसतांच प्रभूच्या गुणानुवादरूपीं गायनानें, मनुष्यांस निद्रेचा त्याग करून आपआपल्या उद्योगधंद्यास लागण्याची सूचना करीत आहेत अशा वेळीं, दिल्ली शहरामध्यें सर्वत्र शून्यकार दिसत आहे; मार्गावर कोणाही मनुष्याची वर्दळ दृष्टीस पडत नाहीं, बहुतेक घरांचीं द्वारें अद्याप बंद आहेत, अशा वेळेला एक हिंदुबाला हातामध्यें पूजेचें साहित्य घेऊन त्वरेनें उत्तर दिशेकडे चालली होती. एका पडीत देवळाजवळ येतांच ती उभी राहिली. ह्या देवालयाची आजची जीर्णअवस्था पाहतां, पूर्वकाळीं तें एक भव्य देऊळ असलें पाहिजे असें त्याच्या भव्य देखाव्यावरून सहज अनुमान निघत होतें. ठिकठिकाणीं छताचा भाग पडून जिकडेतिकडे आसपासच्या दगडांचे लहान मोठे ढीग पडले होते. शिखर पडून छिन्नविछिन्न झालें होतें. पण शुभ्र अशा चौऱ्याशीं स्तंभामध्यें एक मोठी घंटा अद्याप टांगलेली दृष्टीस पडत होती. देवालयाच्या समोरील भागीं एक बगीचा होता. तो मात्र साधारण अवस्थेंत होता, हें देवालय योगमायेचें होतें. शेहेनशहा औरंगजेबाचे सेनापती राजे जयसिंह हे ह्या देवालयांत पूजनाकरितां येत असल्यामुळें मोंगलांनीं अद्याप त्याचा नाश केला नव्हता. नाहींपेक्षां मोंगलांनीं आपल्या धर्मवेडेपणानें त्या देवालयाची केव्हांच राखरांगोळी केली असती.

पूजेचें साहित्य घेऊन आलेल्या कुमारिकेनें देवालयांत अगर आजुबाजूस कोणी आहे कीं काय तें प्रथम निरखून पाहिलें. कोणीही नाहीं अशी खात्री करून घेतल्यावर, देवालयांत जाऊन योगमायेची भक्तिपुरस्सर पूजा चालविली. सरासरी अर्धा तास पूजा आटोपल्यावर, एकांत जागा पाहून ती आपल्या सुस्वर व कोमल स्वरानें, भक्तियुक्त अंतःकरणानें ईशस्तवनपर पद्यें ह्मणूं लागली. अहाहा ! काय तिच्या त्या कंठमाधुर्याचें वर्णन करावें ! पुराणांतरीं यक्ष, गंधर्व व किन्नर यांच्या गायनवादन पटुत्वाविषयीं फारच स्तुतीपर वर्णन केलें आहे. पण आह्मांला असें वाटतें कीं, ती कांहीं तरी अतिशयोक्ती असली पाहिजे. धडधडीत जें दृष्टीपुढें आहे जें आपण प्रत्यक्ष आपल्या कानांनीं ऐकत आहों, त्या चित्तवृत्ती तल्लीन करून टाकणाऱ्या गायनापेक्षां, यक्ष अगर गंधर्व काय गायन करीत असतील बरें ! स्वर्गांतील रंभा, उर्वशी, तिलोत्तमा ह्यांच्या स्वरूप वर्णनानें ग्रंथाचे रकानेच्या रकाने भरले आहेत, पण तें ह्या मृत्युलोकच्या तिलोत्तमेच्या पासंगालाही पुरणार नाहींत, अशी आमची मनोदेवता आह्मांस सांगते.

आधींच निर्जन अरण्यासारखें स्थल, तशांत एकांत, तो देवालयाचा गाभारा आणि त्यांतून घुमत निघणारे गायनाचे सुस्वर आलाप ! मग काय विचारावयास पाहिजे ! त्या गायनाच्या नादानें पक्षी आपलें किलबिलणें सोडून तटस्थ वृत्तीरूप झाले. इतक्यांत बाहेर एक चमत्कार झाला. लांबून एक पुरुषाकृती येतांना दृष्टीस पडूं लागली. तो तीस वर्षांचा मुसलमान होता. तो मदिरापानानें धुंद होऊन मुखानें इषक्बाजीचीं गाणीं पुटपुटत स्वतःच्या शरिरास सांवरीत येत होता. त्याच्या विद्रुप चेहऱ्यावरूनच त्याच्या दुष्ट स्वभावाची खात्री पटत होती. आपल्याच तंद्रीमध्यें लीन होऊन येत असतां देवालयामधून ऐकूं येणाऱ्या गायनानें तटस्थ होऊन तो क्षणभर उभा राहिला. गाणारी व्यक्ती कोण आहे हें पाहण्याची त्यास साहजिकच इच्छा उत्पन्न झाली. ह्मणून तो देवालयाच्या दारावर जाऊन आंत डोकावून पाहूं लागला. गाणाऱ्या कुमारिकेची पाठ ह्याच्या बाजूस असल्यामुळें त्या स्त्रीच्या स्वरूपाची त्यास तुलना करितां येईना. इतक्यांत गाणें संपलें. कुमारिकेनें पुजेचें साहित्य आणिलेलें रिकामें ताट बरोबर घेतलें व घराकडे जाण्यासाठीं बाहेर पडूं लागली. ती कुमारीका उठतांच तिचें सौंदर्य पाहून त्या बेरडास कामेच्छा उत्पन्न झाली. अशी सौंदर्यकलिका एकांत स्थळीं दिसतांच त्याच्या बुद्धिस भ्रष्टता उत्पन्न झालीं. तो तिची नजर चुकवून देवळाजवळच परंतु ज्या ठिकाणीं जास्त झुडपें होतीं अशा ठिकाणीं, तिची मार्गप्रतिक्षा करीत उभा राहिला. योगमायेस भक्तियुक्त अंतःकरणानें प्रणाम करून ती कुमारिका आपल्या निवासस्थळीं जाण्यासाठीं त्याच मार्गावरून जाऊं लागली. झाडांचीं पानें हाललीं तेव्हां कोणी तरी जनावर असेल ह्या भावनेनें ती तिकडे पाहूं लागली, तोंच त्या मुसलमानाची स्वारी दत्त ह्मणून पुढें उभी राहिली.

काळासारख्या त्या यवनास पाहतांच त्या कुमारिकेची त्रेधा उडाली. तिला भयाचें कापरें सुटलें. ह्या अरिष्टापासून वचावण्यासाठीं पुनः देवळांत जावें ह्मणून ती मागें फिरूं लागली, तोंच तो यवन तिला आडवा जाऊन ह्मणालाः—"खबरदार ! येथून एक पाऊलही मागें टाकूं नको. तुला माझ्या पासून मुळींच भीति बाळगण्याचें कारण नाहीं. सुंदरी—तुझ्या सुस्वर गायनानें व ह्या अलौकिक सौंदर्यानें हा दास तुजवर आषक्त झाला आहे. तूं जरी कॉफर जातीची आहेस, तरीपण तुजबरोबर निका लावण्यास मजला कांहींही दिक्कत वाटणार नाहीं. तुझ्या सारख्या सुंदर पुष्पकलिकेचा स्वाद माझ्या सारख्याच फक्कडानीं घ्यावा." कुमारिका एक पाऊलही मागें टाकूं शकली नाहीं. तिच्या मुखावरील गलाबी छटा एकदम नाहींशी झाली. क्षणमात्र चेहरा पांढरा फटफटीत होऊन नंतर ताबडतोब त्याजवर रक्त छटा स्पष्ट दिसूं लागली. क्रोधानें तिच्या शरिरांत पूर्णपणें संचार केला. प्रसंगाच्या वेळीं,

आर्य स्त्रियांच्या आंगीं आपल्या पातिव्रत्याचें रक्षण करण्याची जी अवर्णनीय शक्ती उत्पन्न होत असते, ती तिच्या ठिकाणीं भासमान् होऊं लागली. तितक्या वेळांत तो मुसलमान तिच्या अगदीं जवळ जाऊन हंसत हंसत ह्मणालाः—प्यारी, तुझ्या स्तब्धपणावरून माझ्या ह्मणण्यास तूं रुकार दिलास असेंच मी समजावें नां? इतकें बोलून त्यानें तिचा एक हात आपल्या हातांत धरिला. एक यवन आपल्या आंगास स्पर्श करीत आहे असें पाहतांच, त्या कुमारिकेच्या क्रोधाचा स्फोट झाला व तिनें आपल्या शक्य त्या बळानें त्यास असा एक हिसडा दिला कीं, त्यासरसा तो मुसलमान खालीं पडून त्यानें दोन तीन गोलांट्याही खाल्या. आतां मात्र त्याचा राग अनावर झाला. तो रागानें उठून तिजजवळ आला, व ह्मणाला "काय? एका काफराच्या पोरीनें माझा असा अपमान करावा? आणि तो मी ह्या हुसेनखानानें निमूटपणें सहन करावा! ठीक आहे. आतां तूं माझ्या तडाक्यांतून कोठें जातेस तें मी पाहतों. येथें तुला कोण सोडवायला येतो तेंही मी पाहतों. असें ह्मणून तो पुनः तीस धरावयास जवळ येऊं लागला. इतक्यांत "दुष्टा! दूरहो! दूरहो! जर कां मला स्पर्श केलास तर पुढें तुझी गती फार वाईट होईल. तुझ्या ह्या पातकी कृत्याचें फळ ईश्वर तुला लवकरच देईल."

"बरें आहे, बरें आहे, जेव्हां आह्मांला ईश्वर शिक्षा करील तेव्हां करील, पण सध्या तुला तर मी शिक्षा करतों ती ग्रहण कर." असें ह्मणून त्यानें एकदम येऊन तिला विळखा घातला व उचलून घेऊन चालूं लागला. आतां मात्र ती कुमारिका भ्याली खरी. तिनें आपल्या अंगीं होतें नव्हतें तितक्या बळानें हिसकाहिसकी करून सुटण्याचा खूप प्रयत्न केला व "कोणीतरी ह्या दुष्टाच्या हातून सोडवाहो! कोणी तरी ह्या दुष्टाच्या हातून सोडवा!" ह्मणून मोठ्यानें आरोळ्या ठोकूं लागली. इतक्यांत समोरच्या बाजूनें एकामागून एक असे दोघे पुरुष धांवत आले. ते जवळ येतांच त्यांपैकीं एक मोठ्यानें ओरडून ह्मणाला," अरे नीचा! शिखानष्टा! तूं ह्या स्त्रीस कोणाच्या हुकमानें घेऊन जात आहेस! दुष्टा तुझीं शंभर वर्षें भरलीं असें वाटतें. खबरदार एक पाऊलही पुढें टाकलेंस तर! सोड त्या स्त्रीला."

आपला बोजा खालीं ठेवून हुसेनखान रागानें ह्मणाला, " तूंरे कोण काफर मला विचारणार? तूं सरळ आपल्या रस्त्यानें चलता हो! तुमचें इकडे काय काम आहे? माझ्या बिबीला मी आपल्या घरीं नेऊं नये वाटतें?"

"काय? दुष्टा ही तुझी बिबी! अरे! तुमच्या जातीचा काळ समीप आला आहे! दुष्टानों! तुमच्या ह्या क्रूर कृत्यानें ही पृथ्वी कंपायमान होत आहे. गोब्राह्मण ह्यांच्या हननानें तुम्हीं आपल्या पापाचे घडे पूर्ण भरीत आहां. गरीब बिचारी प्रजा तीसही सुखानें मीठभाकर खाऊं न देतां त्यांच्या स्त्रियांवर बलात्कार करण्यास,

त्यांच्या कन्या बळजबरीनें पळवून नेण्यास, तुम्हीं धजत आहां! पण आठवण ठेवा! ईश्वर दूर नाहीं. तुला मी सामोपचारानें सांगत आहे कीं, तिला सोड. न ऐकल्यास परिणाम बिकट होईल."

"अरे जारे! तुझांसारख्या मर्कटांच्या वल्गनांस भीक घालणारा हा हुसेनखान नव्हे, समजलास. ताकद असली तर ये पाहूं समरांगणीं होऊं दे तुझे व माझे दोन हात." असें ह्मणून त्यानें त्या पुरुषास एक लाथ मारली. लाथ मारताच, त्या मनुष्याचा क्रोध त्याच्या आटोक्यांत राहिला नाहीं. त्यानें ताबडतोब कंबरपट्या-मधील खंजीर काढून त्याच्या छातीमध्यें आरपार भोंसकला, त्याबरोबर त्याच्या छातीमधून रक्ताचा स्राव सुरू झाला; व तो मूर्च्छना येऊन जमिनीवर पडला. पडतां पडतां, मदतीसाठीं, मोठमोठ्यानें ओरडूं लागला. "दोहाई बादशहा सलामतकी। दोहाई, दोहाई! ह्या काफरानें मौलवी पीरअल्ली साहेबाच्या खानदानचा अंत आणला!" हुसेनखानाची ही आरोळी ऐकतांच, आणि मौलवी पीर अल्लीचें नांव एकतांच, हा वेळपर्यंत निर्मनुष्य असलेला तो रस्ता एकदम मुसलमान आणि मोंगलांनीं भरून गेला. प्रत्येक जण आपआपल्या हातामध्यें, सुरी, सोटा, वगैरे जें कांहीं हत्यार मिळालें तें घेऊन धांवत आला. हुसेनखानास रक्तबंबाळ स्थितीमध्यें पाहून व त्याच्याजवळ त्या निराश्रीत कुमारिकेचा बचाव करणारा व त्याचा सोबती ह्या दोघांस नग्न तरवारी सहीत उभे राहिलेले पाहून, कोणाचीही त्यांच्या आंगावर जाण्याची ताकद झाली नाहीं. ते लांबूनच त्यांस शिव्या देऊं लागले. मुसलमानांची संख्या वाढतच चालली. तें पाहून त्या कुमारिकेचा बचाव कसा करावा, ह्याबद्दल त्या दोघांसही चिंता उत्पन्न झाली. पण क्षणांत त्यास एक युक्ती सुचली. त्या जागेपासून थोड्या दूर एक वडाचें खूपच मोठें भलेंभक्कम झाड होतें, त्याबाजूला ते दोघेहीजण आपल्या तरवारी फिरवीत धांवले. तोंच हुसेनखानाच्या मदतीस आलेले सगळे मोंगल "मारो मारो!" ह्मणून ओरडत त्यांच्यामागें धांवले. पण ते दोघेहीजण ईश्वराचें स्मरण करीत त्यांच्या हत्याराचे मारे चुकवीत त्याजागीं गेले. आतां मात्र त्या मारामारीला खूपच रंग आला. कित्येकांस जखमा झाल्या. रक्ताची एकसारखी नदी वाहूं लागली. कुमारिकेस आपल्या बचाव करणारांचें शौर्य पाहून अत्यानंद झाला. त्या तशा स्थितीमध्येंही, इतक्या मुसलमानांबरोबर ते दोघे केवळ आपल्या बचावासाठीं लढत आहेत हें पाहून क्षणमात्र त्यांचें कांहीं बरें वाईट झाल्यास आपल्या माथीं दोष येईल ह्या भीतीनें काळजी वाटली, पण ती तितक्यापुरतीच—कारण ती त्यांचें वीरत्व पाहून फारच आनंदी झाली, त्यांतूनही ज्यानें प्रथम हुसेनखानास कट्यारीच्या घावानें पहिल्याच फटक्यासरशीं जमीनदोस्त केलें, त्या वीराचें युद्धकौशल्य पाहून तर ती दंगच झाली. "ईश्वरा ह्या माझ्या रक्षणकर्त्यांस सुरक्षित ठेव" अशी तिनें

आपल्या मनांत हजारों वेळ जगदीश्वराची प्रार्थना केली. इतक्यांत "पकडो, पकडो"! ह्याप्रमाणें ओरडत मागील बाजूनें शिपायांची तुकडी आली. त्याबरोबर प्रत्येक वाट सांपडेल तिकडे पळत सुटले. त्या संधीचा लाभ घेऊन, कुमारिकेनें आपल्या बचावासाठीं झगडणाऱ्यांस देवळाच्या आंतील एका गुप्त भागीं तांतडीनें नेऊन थोडा वेळ विश्रांती घेण्यास विनंती केली. थोडक्याच अवधींत जखमी होऊन विव्हळत पडलेल्या हुसेनखानाशिवाय त्या ठिकाणीं कोणीही दृष्टीस पडलें नाहीं. जिकडे तिकडे शुक्र झालें.

इकडे शिपायांनीं त्या मरणस्थितीमध्यें पडलेल्या हुसेनखानास पट्टी वगैरे बांधिली व आजूबाजूस पुष्कळ तपास केला, पण कोणीच हातीं लागत नाहीं, असें पाहून त्यांची स्वारी हुसेनास घेऊन हकीमाकडे रवाना झाली.

शिपायांची स्वारी तेथून जातांच कुमारिकेनें त्या आपल्या रक्षणकर्त्यांसहीत घोर अरण्याचा मार्ग धरिला, व ती थोडक्याच वेळांत एका पर्णकुटीकेशीं दाखल झाली. पर्णकुटिकेचें दार उघडून तिघेही आंत गेलीं.

प्रकरण ९ वें समाप्त.

प्रकरण १० वें.

पर्णकुटिकेचा गुप्तपणा.

वाचक हो! आतां आपण पर्णकुटिकेच्या द्वारामध्यें जयसिंगानें पहाऱ्यास ठेविलेल्या रमजान व समशेरखानाची पर्णकुटिकेंतील भुयारांत पडल्यानंतर काय स्थिति झाली ती पाहूं.

रमजाननें अग्निकुंडाजवळील चौरस दगडावर जोरानें लत्ताप्रहार करतांच सभोंवतील चारी बाजूची जमीन कांहींही आवाज झाल्यावांचून चौदा पंधरा हात खालीं गेली व रमजान आणि समशेरखान हे आंत पडले. पडतांच घाबरून ते दोघेही मोठमोठ्यानें ओरडूं लागले. ज्या ठिकाणीं ते पडले त्याच ठिकाणीं दोन शिपाई पहारा करीत होते. ह्या दोघांनांही पडत असलेले पाहून ते दोघेही त्यांच्याजवळ आले व त्यांच्या छातीवर बसून क्रोधानें ह्मणाले. "गप्प रहा! एक शब्दही तोंडावाटें काढूं नका." त्या काळ्या पोशाखाच्या आणि जाड्या बुरख्यानें आपलें मुख आच्छादन केलेल्या बळकट पुरुषास आपल्या छातीवर बसलेला पाहतांच समशेरखानानें आपले डोळे बंद केले आणि श्वासोश्वासाचा अवरोध करून बेशुद्ध झाल्याचें चिन्ह दर्शवूं लागला. रमजानास ह्या भयंकर प्रसंगीं स्वस्थ पडून राहणेंच इष्ट वाटलें. संगिताचे स्पष्ट ध्वनी उमटत होते ते रमजान सावधान चित्तानें ऐकूं लागला. त्यानें काय ऐकिलें?

पद.

(चाल—आज शामा मोहेलिनो बांसरी बजायके.)

क्षत्रिय–हो ! वीर सकल या चला करा त्वरा, ।
भारत–भू–मोचनार्थ त्वदरि सर्व संहरा, ॥ धृ० ॥
दिल्ली–नृवर–दत्त–क्लेश,–पीडित भयग्रस्त देश, ।
ऐक्यमतें ह्मणुनि उठा; करुं सुघोर संगरा. ॥ १ ॥
आर्य–सौख्य–कारणार्थ स्वासु बलिस घा चला, ।
प्राण तृणासम गणुनी शत्रु काळ व्हा चला, ॥
" हरहर " रव करुनि थोर, चरचर रिपु चिरुनि रुधिर– ।
–पूर जवें वाहवुनी, **वरुं स्वतंत्रता** चला ॥ २ ॥

ह्या गायनाचे शेवटचे चरण ऐकतांच रमजानाची शुद्ध नाहींसी झाली. तो भ्रमिष्ट झाला. भीतीनें कावरा बावरा होऊन तो आपल्या छातीवर बसलेल्या त्या पुरुषाकडे पाहूं लागला.

बुरखेवाल्या पुरुषापैकीं एक दुसऱ्यास ह्मणाला:—" भीम आतां वेळ करून उपयोग नाहीं यांना दरबारांत पाठवून दिलें पाहिजे". त्याबरोबर दुसऱ्यानें एक शिटी वाजविली. ती ऐकतांच दुसरे दोन बुरखेवाले त्या ठिकाणीं हजर झाले. त्यांना त्या दोघांनींही इषारतीनें कांहीं समजाविलें. त्याबरोबर त्या दोघांनींही रमजान व समशेर यांस आपल्या ताब्यांत घेतलें व त्यांपैकीं एकजण रमजानास ह्मणाला. " पहा! जर तुह्मांला तुमचा प्राण वांचवावयाचा असेल तर निमुटपणें आमच्याबरोबर चालूं लागा ! "

हें ऐकतांच रमजान व समशेर निमुटपणें ते जिकडे नेतील तिकडे जाऊं लागले. तेथपासून थोड्याच अंतरावर एक दरवाजा होता. तो उघडून त्या दुसऱ्या बुरखेवाल्या गृहस्थांनीं रमजान व त्याचा सोबती यांस आंत घेतलें. ते आंत जातांच त्यांच्यामागें तावडतोब दरवाजा बंद झाला.

ते जाऊन बराच वेळ झाल्यानंतर भीम, शिव यास ह्मणाला, " तूं अग्निकुंडामध्यें लांकडें घालावयास गेला होतास तेव्हां गुप्तद्वार उघडें ठेवलें होतेंस काय ?"

" माझी चूक झाली खरी. द्वार बंद करण्याचें मला मुळींच भान राहिलें नाहीं." शिव भयचकीत होऊन ह्मणाला.

" ह्या चुकीबद्दल कोणती शिक्षा भोगावी लागेल तें तुला माहीत आहेना ?" भीम जरा कडक शब्दानें ह्मणाला.

" माहीत आहे, पण चूक झाली त्यास इलाज नाहीं. जें नशिबीं असेल तें होईल. "

" अरे पण तुझ्या गफलतीमुळें मलाही ठपका सहन करावा लागेल. ह्यासाठीं आपण आपल्या बचावाचा कांहीं तरी मार्ग शोधून काढला पाहिजे." भीम गंभीर स्वरानें ह्मणाला.

" दुसरा कोणता उपाय ? फक्त आपल्या नव्या राणीसाहेबांची दया. दुसरें कांहीं नाहीं ".

" अरेहो ! बरी आठवण झाली. ह्या आपल्या नव्या राणीसाहेब कोण आहेत हें तुला माहीत आहे का ?" भीमानें विचारलें.

" छे ! मला ह्यापैकीं कांहींच माहीत नाहीं. ह्या येथें येण्याच्या पूर्वीं मी कोठेंही त्यांस पाहिलें नाहीं. पण त्या कांहीं साधारण कुलोत्पन्न नसाव्यात; त्यांच्या मुखावर उच्च कुलाचें तेज दृष्टीस पडत आहे. त्यांचें दर्शन घेतेवेळीं आपलें हृदय विलक्षण भक्तीनें उचंबळून जातें."

" आपल्या राणीसाहेब नेहमीं उदास असतात त्याचें कारण हेंच असलें पाहिजे कीं, आपल्या मातृभूमीस यवनापासून पीडा होते, आर्यांचा धर्मच्छल होऊन हिंदुधर्म नामशेष व्हावयाची वेळ आली आहे. हें त्यांच्यानें सहन होत नाहीं. याशिवाय दुसरें कोणतें कारण असेल असें मला वाटत नाहीं. आपल्या ह्या नव्या राणीसाहेबांच्या इच्छा फलद्रूप होण्यासाठीं, जरी आपणांस आपल्या प्राणाचा बळी देण्याचा वेळ आला तरी चिंता नाहीं."

" अरे ह्यांत काय संशय पण "–इतकें बोलून शिव थांबला. त्याची नजर भीमाच्या चेहेऱ्याकडे गेली. त्यावेळीं वीरश्रीनें आरक्त झालेले त्याचे नयन, स्फुरण पावलेले बाहू पाहतांच तो थांबला. शिव बोलतां बोलतां थांबला हें पाहतांच, भीम, शिवास हालवून ह्मणाला. " अरे पण–ह्मणून थांबलास कां ? आपण ह्या मर्त्यलोकामध्यें जन्म घेतला आहे तेव्हां एक दिवस मरण हें आहेच. आपल्या मातृभूमीस ह्या दुष्ट मोंगलांच्या हातून सोडविण्यासाठीं, आपल्या परमप्रतापी राणी साहेबांची इच्छा पूर्ण करण्याकरितां मोंगलांसमोर समशेर घेऊन लढण्याचा प्रसंग येईल त्या खेरीज आमच्या सुभाग्याचा व हर्षातिरेकाचा आणखी कोणता चांगला दिवस येणार ? अशा समयीं जो कोणी मागें हटेल तो भित्रा मूर्ख असें मी समजतों " त्यावर शिव ह्मणाला. तुझ्या सारखा स्वदेशभक्त मिळणें कठीण आहे. ईश्वर ! तुला दीर्घायू करो ! बरें पण उदईक आपल्या राणीसाहेब व दुसरे कित्येक आपले साह्यकारी शेवटची प्रतिज्ञा करणार आहेतना ?

" होय मी असें ऐकिलें आहे खरें. पण आपण, आपली वेळ येईपर्यंत तो महोत्सव पाहूं शकणार नाहीं. दरवाजा वगैरे बरोबर बंद कर ह्मणजे आपण ज्या जागीं उद्यांच्या तयारीस्तव, आपले सन्माननीय गुरुवर्य परमहंसजी वीररसयुक्त पद्यें संगीताच्या चालीवर बसवीत आहेत. त्या भागामध्यें जाऊन तीं पद्यें ऐकूं या.

प्रकरण १० वें समाप्त.

प्रकरण ११ वें.

देशोद्धारक गुप्तवीर संघ.

दरवाजाच्या आंतील ह्या भागास कांहींही ह्मणा. तो भाग दीपप्रकाशानें चकाकीत दिसत होता. मध्यभागीं एक सुंदर सिंहासन मांडिलें होतें. सिंहासनाच्या बाजूस एक आसन रिकामें होतें. समोर एका संगमरवरी उच्चासनावर योगीराज बसले होते. आणि त्याच्या खालीं चारी बाजूस सात आठशें वीरपुरुष आपलीं मुखें बुरख्यानें आच्छादून वीरासन मांडून बसले होते. हा दिवाणखाना इतका मोठा होता कीं, त्यांत आणखीही सात आठशें पुरुष वसूं शकले असते.

ह्या भव्य दिवाणखान्यांत राणीसाहेबांच्या आगमनाची वाट पहात बसलेल्या मंडळीपैकीं दोघेजण आपआपसांत कांहीं कुजबुजत आहेत. ते काय ह्मणतात तें आपण ऐकूं या. एकजण दुसऱ्यास ह्मणतो. " वीरसिंह माझ्या आयुष्यामधील चमत्कारिक प्रसंगाची आठवण झाली ह्मणजे माझी मनोदेवता विलक्षण स्थिती धारण करीते. आपण चंचलेस साह्य करून काकांच्या बंदीवासांतून माझी सुटका करविलीत हे आपले मजपामरावर अगणीत उपकार आहेत. त्यांची फेड केव्हां होईल ती होवो. पहारेकऱ्यांस अनेक भुलथापा देऊन आपण माझी मुक्तता केलीत पण पुढें मी नाहींसा झालों असें पाहून त्या बिचाऱ्या पहारेकऱ्यांस काकांच्या रोषास बळी पडावें लागलें असेल त्याचें मला स्मरण झालें ह्मणजे कसेंसेंच होतें. जरी चंचलेनें त्यांचा बचाव करण्याचा पतकर घेतला आहे तरी पण माझें मन संशयांतच आहे. शिव ! शिव ! कायही काकांची दुर्वासना ! आपल्या भारतमातेचें संरक्षण करण्याचें उच्चतम कार्य सोडून ते फक्त आपल्या **ऐषआरामांत व्यत्यय येऊं नये ह्मणून** स्वधर्माचा अभिमान सोडून यवनांस आपली मुलगी द्यावयास तयार झाले. कायही नीच बुद्धि !"

" कुमार प्रतापसिंहजी असे संतप्त होऊं नका. " विनाशकाले विपरीतबुद्धिः" मनुष्याचा सर्वस्व नाश होण्याचा काल आला असतां त्यास विपरीत बुद्धि ही होणारच. त्याचप्रमाणें आपल्या काकांस ही विपरीतबुद्धि झाली आहे. तरी पण तिचे परिमार्जन

करण्यास झटणें हें आपलें कर्तव्य होय. आपण आपल्या काकांच्या क्रोधास बळी पडला. महाराज विक्रमसिंहानीं दिलेरखानाला भिऊन आपणांला विनाकारण कैदेंत टाकलें ही हकीकत, मी कार्यपरत्वें रूपनगरास आलों असतां मला समजली. त्याबरोबर माझें मस्तक भणाणून गेलें. आणि अशा वेळीं अस्सल क्षत्रियाचें पित्त खवळणें साहजिकच आहे. आपणाला सोडविण्याची मी खटपट करूं लागलों. इतक्यांत चंचलकुमारीही आपली सुटका करण्यास आपल्या सखी समवेत खटपट करीत आहे हें ऐकून मी त्यांस जाऊन मिळालों. व आह्मीं दोघांनीं पहारेकऱ्यांस वश करून आपली सुटका केली. ह्या सर्व गोष्टी ईश्वरेच्छेनेंच घडल्या आहेत यांत कांहीं संशय नाहीं. मी आपणांवर मुळींच उपकार केले नाहींत उलट आपल्यासारख्या वीरपुरुषाकडून भारतमातेला स्वतंत्रता मिळविण्याच्या कामीं मदत मिळेल हें जाणूनच मी हा प्रयत्न केला आहे." वीरसिंह ह्मणाला.

"वीरसिंहजी आपण वीरपुरुषाला योग्य असेंच उत्तर दिलेंत. असो. पण अद्याप आपल्या राणीसाहेब कां बरें येत नाहींत?" प्रतापानें विचारिलें.

"प्रतापसिंहजी बरी आठवण झाली. मी तुह्मांस हेंच विचारणार होतों कीं ह्या राणीसाहेब कोणाच्या कोण? ह्यासंबंधानें आपणाला कांहीं माहिती आहे का?"

"वीरसिंहजी, यासंबंधानें जितकें तुह्माला माहीत आहे तितकेंच मला माहीत आहे. आज आपण ज्या संकटांत सांपडलेल्या कुमारिकेस बचाविलें तिनें, आज सर्वत्र वीरांची सभा आहे त्याठिकाणीं आपणही, (ज्याच्या स्वाधीन आपणांस केलें होतें त्याजबरोबर) या ह्मणून सांगितलें होतें. त्याप्रमाणें हे आपण आलों आहों. आतां पुढें काय परिणाम होतों तें पाहूं." प्रतापसिंह ह्मणाला.

"आजचा हा समूह पाहून मला फार हर्ष होत आहे. देशसेवेप्रीत्यर्थ झटणारे इतके तरी वीर आज येथें हजर आहेत हें ह्या भरतभूमीचें भाग्यच होय. ईश्वर करो! व ही गुप्त मंडळी देशाच्या उपयोगीं पडो!"

"वीरसिंहजी, ह्या मंडळीचे गुप्त प्रयत्न पाहून मला अत्यानंद होत आहे. येथीलच एका वीरानें मला ह्या मंडळीच्या प्रयत्नाचे जे प्रकार व फायदे सांगितले तें ऐकून ह्या मंडळीत सामील होण्याची माझी फार इच्छा आहे. ह्या मंडळीत सामील झाल्यानें मला आमच्या काकांच्या जुलमी कृत्यास आळा घालण्यासाठीं प्रयत्न करावयास जास्त सवलत मिळेल. शिवाय तिकडे महाराणा राजसिंह हेही चंचलेस सोडविण्यासाठीं खटपट करीत आहेत त्यांस मदत करण्यास एक सोइस्कर मार्ग होईल. ती पहा राणीसाहेबांची स्वारी आली." प्रतापसिंह ह्मणाला.

राणीसाहेबांनींही तोंडावर बुरखा घेतला होता. त्यामुळें त्यांच्या विषयीं अनुमान काढणें मुष्किलीचें होतें परंतु इतर कांहीं अवयवांच्या ठेवणीवरून साधारण अनुमा-

नानें पाहतां त्या तरूण असून स्वरूपवान असाव्यात असें ठरविण्यास मुळींच दिक्कत वाटत नव्हती. त्यांच्याबरोबर हस्तामध्यें विणा घेतलेली तपस्विनीचीही स्वारी होती. राणीसाहेब आपल्या आसनावर बसतांच तपस्विनी त्यांच्या शेजारच्या रिकाम्या आसनावर विराजमान झाल्या. सर्वत्र वीरांचे लक्ष राणीसाहेबांकडे वेधलेलें होतें इतक्यांत तपस्विनीनें विणा वाजविण्यास सुरवात केली व प्रकरण दहा मधील पद्य ह्मणण्यास सुरवात केली. तपस्विनीचें जरी उतार वय झालें होतें तरी त्यांच्या कंठामध्यें माधुर्य व अधिकारयुक्तवाणी अपरंपार भरली होती. सर्व संघ चित्रासारखा तटस्थ होऊन तें गाणें लक्षपूर्वक ऐकूं लागला. प्रत्येकाच्या आंगावर रोमांच उभे राहिले. वीरांनीं आपल्या समशेरींस हात घातला व जो तो पूर्ण वीरश्रीनेंयुक्त असा बनला. गाणें संपल्यावर परमहंसजी उठून उभे राहिले आणि राणी साहेबांकडे वळून ह्मणाले "मुली ज्या व्रताचें परिग्रहण करण्यासाठीं जो हा व्यूह रचिला आहे तो सुरळीतपणें शेवटास जाण्यासाठीं आपण दृढतेनें प्रयत्न करणें अवश्य आहे. हे पहा. (दिवाणखान्यांतील सर्व योद्धयाकडे हात करून) आज ह्या वीरांसारखे एक लाख वीर फक्त तुमची आज्ञा होतांच तरवार उपसून शत्रूंवर तुटून पाडण्यास तयार आहेत. मग भय कसलें! ज्या बाजूस धर्म आहे त्याच बाजूस खात्रीनें जय आहे! ईश्वर! सनातन हिंदुधर्मीयांस नीतीनें चालल्यास खात्रीनें जय देईल.

हें ऐकताच राणीसाहेब ह्मणाल्याः—पिताजी, देशसेवेप्रीत्यर्थ अंगिकारलेल्या कार्यांत, प्रसंगीं प्राण जाण्यापर्यंत वेळ आली तरी माघार घेण्याचें आमच्या क्षत्रियांचें ब्रीद आहे का? देशावरील जुलूम! धर्माची पायमल्ली! पतिव्रतांवरील अत्याचार! इत्यादी जुलूम पाहून ज्यांचीं मनें संतापाग्निनें भडकत नाहींत त्यांचीं क्षत्रियांमध्यें गणना करितां येईल का? जें व्रत एक वेळ पतकरिलें तें शेवटपर्यंत तडीस नेण्यासाठीं झटणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. माझे शूर बांधवहो! मी ह्मणते ह्याला तुमची अनुमती आहे का?

"राणीसाहेब आह्मीं सर्व तयार आहों. देशोद्धाराच्या पवित्र कृत्यास प्राण देण्यास आमची तयारी आहे." सर्व वीर आवेशानें ह्मणाले.

"शाबास माझ्या वीरांनों! असाच नेट धरा. कालांतरानें ईश्वर आपल्या इच्छा परिपूर्ण करील."

नंतर परमहंसजी आपल्या आसनावरून उठले आणि सिंहासनासमीप येऊन वीरासन घालून बसले व त्यांनीं राणीसाहेबांचा हात आपल्या हातांत घेऊन बसलेल्या सर्व सैनिकांकडे पाहून भाषणास सुरवात केली. ते ह्मणालेः—

"वीर बांधवहो! जगदंबा कालीकरालीच्या कृपेनें आज आपणांस ह्या राणीसाहेब मिळाल्या आहेत; त्यांचें शौर्य धैर्य व वीरत्व अवर्णनीय आहे. त्यांस कशाचाही

मोह नाहीं. देशसेवेप्रीत्यर्थ त्यांनीं आपल्या सर्व सुखांस तिलांजली दिली आहे. मोंगलांचा जुलूम पाहून त्यांस अनिवार क्रोध उत्पन्न झाला आहे. त्यांस सुखकारक ऐषआरामाची स्वप्नें न पडतां, निव्वळ मोंगलांच्या जुलमाची पडत आहेत. स्वतः त्यांजवरही आज अशाच प्रकारचा प्रसंग ओढवला होता पण त्यांतून (वीरसिंह व प्रताप यांजकडे बोट करून) ह्या समोर बसलेल्या तरुणांच्या अलौकिक शौर्यानें त्यांची मुक्तता झाली. त्या जात्या स्त्री असूनही त्यांस आपण पतकरिलेलें व्रत शेवटास कसें जाईल ह्याबद्दल रात्रंदिवस काळजी लागलेली आहे. अबला-भिरू-असें ह्मणतात पण यांचें धैर्य पाहून आह्मीं पुरुषांनीं खालींच माना घातल्या पाहिजेत. माझे बांधव हो ! मी आपणां सर्वांचा गुरु आहे. आपण मला पूज्य मानीत आहां. आणि मी आपल्या ह्या भरतभूच्या अधिष्ठात्री महाराणी जो हुकूम करितील तो मान्य करण्यास तत्पर आहे. मला पूर्ण विश्वास आहे कीं, आपणांपैकीं कोणीही त्यांच्या विरुद्ध नसेल ! ” परमहंसजीचें हें वाक्य पूर्ण होतांच पुनः सगळे बुरखेवाले वीर एकदम म्हणाले. “ नाहीं कोणीही विरुद्ध नाहीं ” हें ऐकून परमहंसजी पुनः उत्साहपूर्वक म्हणाले. “ वीर हो ! आपणां सर्वांचें मत ऐकून मला फार आनंद होत आहे. मला आतां पूर्ण आशा आहे कीं, कृपामयी कालिकेच्या कृपाकटाक्षें करून आपली मनोभिलाषा अवश्य पूर्ण होईल; आणि आर्यांची विजयपताका पुनरपी भारतामध्यें फडकेल ! माझी पूर्ण खात्री आहे कीं, तुमच्या सारख्या वीरांच्या साह्यानें आपली मातृभूमी, दुरात्म्या, दुराचारी व दुष्ट मोंगलांच्या हातून लवकरच मुक्तता पावेल ! ” ताबडतोब सर्वजण आवेशानें म्हणाले. “ गुरुजी असुर मर्दिनीदेवी यवनांच्या हातून लवकरच ह्या आपल्या मातृभूमीस मुक्त करील. ”

नंतर परमहंसजी महाराणीकडे वळून म्हणाले. “महाराणी साहेब आतां आपली आह्मांस काय आज्ञा आहे ती सांगा ह्मणजे ती बजाविण्यास तयार होऊं. ”

“ पिताजी आतां दुसरें कांहींहीं कार्य नाहीं. पण एकवेळ व्रतनियम संपूर्ण पाळण्याबद्दल प्रत्येकानें शपथ घ्यावी. ” ताबडतोब परमहंसजीनें चार बुरखेवाल्यांस इशारत केली. त्याबरोबर त्यांनीं थोडक्याच वेळामध्यें दोन मोठमोठ्या पेट्या उचलून आणिल्या. त्या सिंहासनाजवळ ठेविल्यानंतर उघडून, परमहंस सर्व वीरांकडे वळून ह्मणाले. “ देशोद्धाराचें पवित्र कार्य करण्यास कंबर बांधण्यापूर्वी महाराणी साहेबांच्या आज्ञेप्रमाणें आपण सर्वांनीं शपथ घेतली पाहिजे यास तुमची कबूली आहे का ? ”

“ आह्मीं सर्व कबूल आहों. पाहिजे ती शपथ घ्यावयास सांगा आमची तयारी आहे. ” ह्याप्रमाणें धीरोदात्त गंभीर ध्वनीनें तो दिवाणखाना दुमदुमला.

ह्मणातर “आज ह्या ठिकाणीं कालिकामातेच्या कार्यसाधनानिमित्त”, “आर्यांच्या विजयासाठीं”, “मोंगलांच्या नाशार्थ ” “ मी प्रतिज्ञा करीत आहे कीं, मी कधींही

माघार घेणार नाहीं. माझे आप्त संबंधी, सोयरे स्नेही, जे कोणी ह्या माझ्या प्रतिज्ञेच्या विरुद्ध असतील त्यांचा मी त्याग करीन; आणि त्यांसही शत्रूप्रमाणें लेखीन. देशाचा शत्रू मग तो कोणीही असो त्याचा निःपात करण्यास झटेन. जर मी ह्या माझ्या प्रतिज्ञेचा भंग करीन तर मी ह्या स्पर्श केलेल्या शवांप्रमाणें माझी दशा होओ!" ह्याप्रमाणें सर्व वीरांनीं त्या शवांवर हात ठेवून शपथा घेतल्या. सर्वांनीं शपथा-घेतांच राणी साहेबांनीं आपला बुरखा काढला. त्याबरोबर एकंदर वीरांनीं आप-आपल्या मुखावरील बुरखे काढून टाकिले.

बुरखा काढतांच कुमारिकेच्या अवर्णनीय सुंदर मुखकमलाचें सर्वांस दर्शन झालें. तिच्या सौंदर्याच्या प्रकाशानें सर्वांचीं अंतःकरणें प्रफुल्लित झालीं. वीरसिंह व प्रताप यांनीं महाराणीस पाहतांच त्यांस फार आनंद झाला. अशा अलौकिक रत्नाचा आपल्या हातून बचाव झाला ह्याबद्दल त्यांस अभिमान वाटूं लागला. वाचकांस ह्या कुमारिकेची ओळख देण्याची जरूरी नाहीं. यमुनेमध्यें उडी मारून प्राणनाश करूं इच्छिणारी व नंतर हुसेनखानाच्या कामवासनेस बळी पडावयाच्या संधीस वीर-प्रताप व वीरसिंह यांच्या अचानक येण्यानें जिचा बचाव झाला तीच ती कुमारिका सध्यांची महाराज्ञी होय.

राणीसाहेबांनीं आपल्या तोंडावरील बुरखा काढल्यानंतर परमहंसजी ह्मणाले:-- "वीर बांधवहो! आपण सर्वांनीं आतां आपल्या राणीसाहेबांचें दर्शन केलेंच आहे. तुह्मांपैकीं कित्येक आश्चर्यांत निमग्न झाले आहेत. बहादूर हो! श्री कालिकादेवीच्या कृपा प्रसादानें कोणतीही गोष्ट असंभाव्य आहे असे आपणांस वाटतां कामां नये.

बंधूनों! तुह्मीं सर्वजण आपल्या आर्यधर्माच्या उन्नतीसाठीं झटा, हेंच माझें आपणांस आग्रहाचें सांगणें आहे." इतक्यांत भीमानें येऊन परमहंसजीस मुजरा केला व ह्मणाला:—"गुरुजी गुप्तद्वाराजवळ काल रात्रौ दोन मुसलमान पकडले असून त्यांना कालिकादेवीच्या समोरील कारागृहांत ठेवण्यांत आलें आहे."

"काय? गुप्तद्वाराजवळ आणखी मुसलमान! ते तेथें आले कसे?" परमहंसजी आश्चर्यचकीत होऊन ह्मणाले. ते कोण आहेत तें मला अवश्य पाहिलें पाहिजे. असें ह्मणून परमहंसजी भीमाबरोबर चालते झाले. परमहंसजी गेल्यानंतर महाराणी साहेब उठून ह्मणाल्या:—"वीरहो! आपण आपल्या देशाला मोंगलांच्या जुलमा-मधून मुक्त करण्याप्रीत्यर्थ शपथा घेतल्या आहेतच. आपल्या आंगचें पाणी दाख-विण्याचा काल समीप येत चालला आहे. मोंगलांची राज्यतृष्णा भयंकर वाढली आहे. जिझियाकरासारखे डोइपट्टीचे कर जे न्यायी अकबरानें काढून टाकले होते ते ह्या औरंगजेबानें पूर्ववत् सुरू केले आहेत आणि तो 'करही' फक्त हिंदुकडूनच घ्यावा, काय हा जुलूम! ह्या अशा जुलमानें प्रजा त्रस्त कां होणार नाहीं? देवळांचा

उच्छेद तर भयंकरच चालला आहे. देवळें मोडणें व त्या जागीं मशीदी बांधणें हें तर पावलों पावलीं अनुभवास येत आहे. पतिव्रतांचा छल कसा होत आहे हें आपणांस नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. स्वतः मजवरच आज तसा प्रसंग आला होता त्यांतून वीर प्रतापरायानें व त्यांच्या स्नेह्यांनीं माझी मुक्तता केली. अशा प्रकारची स्थिती पाहून आपण स्वस्थ बसणार काय? कधींही नाहीं. मोंगलांच्या ह्या जुलमांतून मुक्त होण्यासाठीं आपण त्यांच्याशीं **न्यायानें लढणें** हेंच आपलें कर्तव्य होय! **सत्यानें चालल्यास ईश्वर आपणांस खात्रीनें यश देईल.**" ह्मणा हरहर महादेव!" हे शब्द उच्चारतांच तें दालन "हरहर महादेव" ह्या वीरश्रीस प्रोत्साहन देणाऱ्या नादानें दुमदुमून गेलें.

प्रकरण ११ वें समाप्त.

प्रकरण १२ वें.

मध्यंतरीं काय झालें !

रूपनगर सोडल्यानंतर उदेपुरास जाण्यास जो रस्ता आहे तो इतका कांहीं त्रासदायक आहे कीं, त्या रस्त्यानें नवख्या मनुष्यास जाणें फारच मुष्किलीचें असे. सरळ मार्ग कोणत्या बाजूस आहे त्याचा उमज न पडतां तो त्या डोंगरावरील लहान लहान पायवाटांनीं अरवलीच्या पर्वताची रांग वर्षानुवर्षें शोधीतच रहावयाचा! डोंगराच्या माथ्यावर चढतांच त्यास त्या ठिकाणीं निरनिराळ्या चार वाटा दृष्टीस पडत त्या चार वाटांपैकीं कोणत्या मार्गानें जावें हा प्रश्न नवख्या मनुष्याच्या पुढें उभा राही. विशेषें करून ह्या पर्वतांवरून मुशाफरी करणारे एकटे दुकटे मुशाफरी करण्यास कधींही धजत नसत. अफाट अरण्य, मनुष्याची वस्ती नाहीं, हिंस्र श्वापदांची व चोर लुटारूंची भीती! हीं संकटें एकट्या दुकट्या प्रवाशास जाचक होत असत.

सकाळचा दहावाजण्याचा सुमार झाला आहे अशा वेळेला ह्या पर्वत श्रेणींमधून उदेपुराच्या मार्गानें पांच प्रवासी चालले होते. ते आपआपसांमध्यें कोणत्यातरी विषयावर संभाषण करीत मार्ग आक्रमीत होते. डोंगरावर चढणें जितकें कठीण त्यापेक्षांही कांहीं ठिकाणीं उतरणें भीतीप्रद असे, अशा त्या बिकट वाटा संपवून ते दुसऱ्या एका पर्वतावरील सपाट भूमीवर दाखल झाले. त्या सपाट जागेच्या आजूबाजूस दोन मोठे डोंगर होते. जरी दोनप्रहर होण्याची वेळ समीप आली होती तरी त्या डोंगरावरील वृक्षछायेनें आसमंतांत भाग शीतल राहत असे त्या दोन्ही डोंगरामधून एक लहानशी नदी वृक्ष श्रेणीमधून झुळझुळ वहात होती. ह्या सपाट जागीं उभें राहणाऱ्या इसमांस फक्त पर्वतावर उभा राहणारा मनुष्यच पाहूं शकेल

अशी ती जागा होती. ह्या जागीं ते चार रजपूत व एक वृद्ध ब्राह्मण असे पांच प्रवासी येतांच, त्या रजपुतां पैकीं, एकजण ब्राह्मणास ह्मणाला:—

" अनंत मिश्र महाराज, आतां उदेपुर तर जवळच आहे पण एवढा हा निर्मनुष्य भाग ओलांडला कीं आपणांस फारशी भीती नाहीं. ह्याच ठिकाणीं लुटारूनीं कैक जणांचें प्राण हरण केले आहे. "

" खरेंच कीं काय? पण आपणांला येवढी भीती बाळगण्याचें कांहींही कारण नाहीं. आपण चौघे आहों. शिवाय आपणांजवळ लुटीस अनुकूल असा माल नाहीं तेव्हां भिण्याचें कांहीं कारण नाहीं. "

" नाहींहो मी आपणांस सहज विचारिलें. कारण आपण पडलां वृद्ध, जर एखादे वेळीं तसाच प्रसंग आला तर विनाकारण आपण लुटले जाल. तें आह्मांला पाहवणार नाहीं. लुटारुंची संख्या जास्त असल्यास प्रसंगीं पोबारा करण्याची ही वेळ येईल त्या वेळेस आपल्यानें पळवणार नाहीं ह्मणून ही सूचना केली; कांहीं जवळ असलेंच तर तें मजजवळ द्या. ह्मणजे आमच्या सोबतीचा आपणांस उपयोग होऊन शिवाय आह्मांस, पूज्य अशा ब्रह्मवृंदाचा प्राण वांचविल्याचें व त्यांच्या उपयोगीं पडल्याचें पुण्य मिळेल. "

हा प्रकार पाहतांच अनंतमिश्रांचें मन साशंक झालें. त्यांना एक वेळ वाटे कीं, आपल्याजवळ असलेल्या मोहरा, मौक्तिक हार, वगैरे ह्यांच्या स्वाधीन करावा परंतु पुनः असे वाटे कीं, यांची आपली फक्त प्रवासांतील ओळख, हेच लुटारु नसतील कशावरून? यांचा भरंवसा काय? अशी द्विधा वृत्ती झाल्यामुळें सहजच त्यांच्या चेहऱ्यावर चलबिचलता उत्पन्न झाली. मिश्र देवांची ही स्थिती पाहतांच ह्यांच्याजवळ खरोखरींच कांहींतरी ऐवज आहे अशी त्या चौघा रजपुतांची खात्री झाली. त्यावरोबर त्यापैकीं एकानें एकाएकीं मिश्र देवांच्या मागें जाऊन त्यांस खालीं पाडलें व त्यांच्या छातीवर बसून तोंड दावून धरलें. मिश्रदेवांनीं त्या मांगाच्या हातून सुटण्यासाठीं, आपली होती नव्हती तेवढी शक्ती एकवटून प्रयत्न केला पण त्या बेरडाच्या बळापुढें त्यांची कांहींच मात्रा चालली नाहीं. मिश्रदेव पडतांच दुसऱ्यानें त्यांचा बटवा उघडून त्यांतून विक्रमसिंहानें राजसिंहास दिलेलें पत्र, चंचलकुमारिकेची पत्रिका एक मौक्तिक माळ व पांच मोहरा इतके जिन्नस काढून घेतले व तो आपल्या सोबत्यांकडे वळून ह्मणाला, " चला आतां आपणांला ह्यांच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं यांजजवळ जें कांहीं होतें तें आपण घेतलें. आतां मात्र एवढें करा कीं, यांना मोकळे न सोडतां त्या झाडाच्या बुंधाला बांधून टाका. " ताबडतोब इतर सोबत्यानीं मिश्रदेवांस झाडाच्या बुंधास बांधिलें. इतका कार्यभाग आटोपतांच ते त्या दोन डोंगरामधील खिंडीमधून चालते झाले. त्याच वेळेस

त्यांचें हें कृत्य पर्वताच्या शिखरावरून एक घोडेस्वार पहात होता तो हें कृष्णकृत्य पाहून वेगानें खालीं उतरला.

अनंतमिश्रांस झाडाच्या बुंधास बांधून ते चौघेही रजपूत खिंडींत शिरले. बरेंच पुढें गेल्यावर त्यांनीं एका गर्द झाडींतील गुंफेंत प्रवेश केला. गुंफेच्या आंतील भागीं मनुष्यास लागणाऱ्या सर्व साहित्याची तयारी होती. त्यांनीं गुंफेंत प्रवेश करितांच प्रथम एकानें हुका भरण्याची तयारी चालविली. दुसऱ्यानें स्वयंपाकास आरंभ केला. तिसरा लुटीच्या मालाची तपासणी करूं लागला. त्याबरोबर सर्वजण एके ठिकाणीं जमा झाले. लुटीच्या मालापैकीं, पांच मोहरांतून प्रत्येकानें एक एक घेतली व जी शिल्लक राहिली तिचे चार तुकडे करून ते घेतले. हार विकल्यावांचून गत्यंतर नाहीं ह्मणून तो जयसिंहाजवळच ठेवण्यांत आला. आतां दोन पत्रें शिल्लक राहिलीं त्यांची व्यवस्था काय करावी याचा त्यांस विचार पडला. लुटारूंच्या मुख्यानें सांगितलें कीं, जयसिंह हीं पत्रें जाळून टाका. त्यांचा आपणांस काय उपयोग! जयसिंहानें तीं दोन्हीं पत्रें हातांत घेऊन तीं कोणास लिहीलीं आहेत तें तो पाहूं लागला. त्या मंडळीपैकीं फक्त त्यासच लिहीतां वाचतां येत होतें. त्यानें तीं दोन्हीं पत्रें समग्र वाचलीं; व आनंदीत होऊन ह्मणाला. हीं पत्रें जाळण्याच्या योग्यतेचीं नाहींत ह्यापासून आपला बराच फायदा होण्याचा संभव आहे.

असें ऐकतांच सर्वांनीं त्याला वेढलें व पत्रांतील मजकूर समजून घेण्याची उत्सुकता दाखवूं लागले. जयसिंहानें चंचलकुमारीची सर्व हकीकत त्यांस सांगितली; व ह्मणाला आपण हीं पत्रें जर राण्याला दिलीं तर आपणांला चांगलाच द्रव्यलाभ होईल. यावर त्यांचा मुख्य ह्मणाला. अरे मूर्खा! हें पत्र राण्याला देऊन आपणांला काय फायदा होणार आहे? उलट हीं पत्रें तुह्मांला कोठें मिळालीं कशीं मिळालीं ह्यासंबंधानें खडानूखडा माहिती विचारून तो आपली चोरी उघडकीस आणील. ह्मणून ही खबर राण्याला देण्यापेक्षां बादशहास दिल्यानें विशेष फायदा होईल. जे कोणी औरंगजेब बादशहाकडे अशा बातम्या घेऊन जातात त्यांस चांगलेंच बक्षीस मिळतें ह्याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. आणखी—

हे त्याचे शब्द पूर्ण होण्यापूर्वींच त्याचें माथें धडापासून वेगळें होऊन खालीं पडलें.

प्रकरण १२ वें समाप्त.

प्रकरण १३ वें.

जयसिंह.

पर्वताच्या शिखरावरून जो घोडेस्वार, ह्या चौघांचा पराक्रम पहात होता तो ते चोर कोठें जातात तें पहात बराच वेळ उभा राहिला. नंतर घोड्यावरून खालीं उतरला आणि घोड्याची पाठ थोपटून ह्मणालाः—विजय, येथेंच उभा रहा. खेंकाळूं नको. मी आतांच परत येतो. ह्या त्याच्या हुकुमाप्रमाणें घोडा स्तब्ध उभा राहिला व तो स्वार खालीं उतरला. खालीं येतांच प्रथम त्यानें मिश्रदेवाचे बंद तोडून त्यांस मोकळें केलें; आणि विचारिलें. काय झालें तें थोडक्यांत सांगा. मिश्रः—मी आतांच मला लुटलेल्या त्या चार जणां बरोबर उदेपुरास जात होतों. मी त्यांस मुळींच ओळखीत नाहीं. मार्गांतच त्यांची व माझी गांठ पडली. त्यांनीं मला सांगितलें होतें कीं, आह्मीं रजपूत आहों, ते रजपूत आहेत तेव्हां त्यांच्याकडून आपणांस दगा होणार नाहीं अशा समजुतीनें मी त्यांची सोबत पतकरली पण येथें येतांच, त्यांनीं मला पकडून माझ्याजवळ जें कांहीं होतें नव्हतें तें बुचाडून घेतलें.

" ते तुमच्या जवळून काय काय घेऊन गेले ? "

" एक मोत्याची माळ, पांच मोहरा आणि दोन पत्रें. "

" ठीक आहे. आपण येथेंच उभे रहा. ते कोठें आहेत तें मला माहीत आहे. मी परत येईपर्यंत आपण येथून हलूं नका. "

" पण आपण एकटेच आहां. त्या चौघांपुढें आपला टिकाव कसा लागेल ! "

" महाराज ! मी रजपूत योद्धा आहे हें आपणांस दिसत नाहीं का ? "

तो रजपूत स्वार लढवय्या दिसत होता, त्याच्या कंबरपट्ट्यांत तरवार, पिस्तोल होतें; आणि हातांत भाला होता तें पाहात मिश्रदेव स्तब्ध झाले.

ज्या मार्गानें त्या लुटारूंनां जातांना त्या स्वारानें पाहिलें होतें त्या मार्गानें तो निघाला: पण झाडीमध्यें गेल्यावर कोठेंच रस्ता सांपडेना ह्मणून तो पुनः त्या शिखरावर चढला आणि आजूबाजूस नजर करून पाहिलें तों ते चौघेही लपत छपत जात असलेले त्यास दिसले. ते शेवट कोठें जातात तें पहात तो तेथेंच स्तब्ध उभा राहिला. शेवटीं त्यांनीं गुंफेंत प्रवेश करतांच त्यानें आस्ते आस्ते खालीं उतरून, ध्यानांत ठेविलेल्या निशाणीनें रस्ता शोधून काढिला. गुंफेच्या द्वारीं येतांच आंत ते बोलत असल्याचें त्यास ऐकूं येऊं लागलें.

येथपर्यंत तो स्वार आला खरा पण आतां मात्र त्यास विचार पडला कीं, ते आहेत चौघे आणि मी आहे एकटा. तेव्हां हा प्रसंग कसा काय निभावणार ! गुंफेंत प्रवेश करणें जरा धोक्याचेंच होईल ! अशा प्रकारचा विचार त्यानें क्षणमात्रच केला. नंतर तो आपणाशींच ह्मणतो, "रजपूताला मरणाचें भय असावें काय ? मर-

णाच्या भीतीनें कोणताही रजपूत हातीं घेतलेलें काम शेवटास नेल्याशिवाय माघार घेईल काय ? " असें म्हणून तो आस्ते आस्ते गुंफेच्या द्वाराजवळ आला; आणि हे लुटारू नसले तर विनाकारण हत्या होईल म्हणून खात्री करण्यासाठीं तो त्यांचें संभाषण ऐकूं लागला. लुटलेल्या मालाची वांटणी चाललेलें संभाषण ऐकतांच, हेच ते लुटारू अशाबद्दल त्याची खात्री झाली; व तो ताबडतोब गुंफेंत प्रवेश करिता झाला.

मुळींच आवाज होऊं न देतां त्यानें आपला भाला जवळच्या झाडींत छपविला. नंतर म्यानांतून तरवार बाहेर काढून उजव्या हातांत घेतली आणि डाव्या हातांत पिस्तोल पकडलें.

आंतील लुटारू, चंचल कुमरीचें पत्र मिळतांच त्या पत्राच्या योगानें पैसा मिळवूं पाहण्याच्या नादांत होते. त्यांची पाठ गुंफेच्या द्वाराकडे असल्यामुळें तो स्वार आंत आल्याची त्यांस मुळींच चाहूल लागली नाहीं. उलट ते आपल्याच नादांत गुंग होते. लुटारूंचा मुख्य गुंफेच्या जवळच पाठ करून उभा होता. रजपुतानें तेथें जातांच तरवारीच्या एकाच घायासरसें त्याचें मस्तक धडापासून वेगळें केलें; आणि ताबडतोब त्याच्याच जवळ जो दुसरा लुटारू उभा होता त्याच्या बाजूस वळून, त्याला अशी एक लाथ मारिली कीं, त्यासरसा तो जमिनीवर पडून मूर्छित झाला. आतां शिल्लक राहिले दोघेजण. त्यांतून एक गुंफेच्या आंतील बाजूस होता, तो एक मोठा दगड त्या रजपूत स्वारास मारण्यास उचलीत होता तें पाहून त्यानें ताबडतोब आपलें पिस्तोल त्याच्यावर झाडलें. त्याबरोबर तो जखमी होऊन खालीं पडला. शेवटीं राहिला जयसिंह. बचावाचा मार्ग नाहीं असें पाहून तो दरवाजाबाहेर पळूं लागला. रजपूत स्वार त्याला पकडण्यास त्याच्या मागोमाग धांवला. इतक्यांत धांवतांना जयसिंहाचा धक्का लागून रजपूत स्वारानें ठेविलेला भाला खालीं पडला तो ताबडतोब उचलून घेऊन जयसिंह रजपूत स्वाराबरोबर लढण्यास सिद्ध झाला; परंतु त्या स्वाराकडे पाहतांच, म्हणाला:-महाराज, मी आपणाला ओळखितों. आपण जरा शांत व्हा, नाहींतर ह्याच भाल्यानें आपला निकाल लावीन. त्यावर रजपूत स्वार हांसून म्हणाला, " तुला ज्या वेळेस माझ्यावर भाला फेंकावयाची शक्ति येईल त्यावेळीं मला उजव्या हाता ऐवजीं डाव्या हातीं भाला धरणें भाग पडेल. तुला हा भाला फेंकण्याची शक्तीच कुठें आहे ? " असें बोलत बोलत त्यानें आपल्या हातांतील रिकामें पिस्तोल त्याच्या उजव्या हाताच्या दंडावर बरोबर नेम धरून फेंकलें. तें त्याला इतक्या जोरानें लागलें कीं, त्याबरोबर त्याच्या हातामधील भाला खालीं पडला. तो ताबडतोब रजपूत स्वारानें उचलून घेतला; आणि जयसिंहास मारण्याचा अविर्भाव दर्शवूं लागला.

आतां मात्र आपण खास मरतों. हें पाहून जयसिंह म्हणाला:—" महाराजाधिराज मला जीवदान द्या, माझें रक्षण करा, मी आपणांला शरण आलों आहें. "

रजपूतस्वारानें रोंखलेल्या भाल्यास खालीं केलें व त्यास ह्मणालाः—"तूं मरणाला एवढा कां ह्मणून भितोस ?"

"महाराज आपणाला काय सांगूं. माझें वय अद्याप कांहीं फारसें झालें नाहीं त्याशिवाय मला कीर्ती करून मरावयाचें आहे. चोरांच्या संगतीनें मी चोर ह्मणून ठरला गेलों. एरव्हीं मी अस्सल रजपूत आहे. वाईट मनुष्यांच्या संगतीनें चांगला मनुष्यही बिघडतो; त्याच प्रकारचें माझें आजपर्यंतचें चरित्र आहे. महाराज! मी ह्या नीच धंद्यांत स्वतःच्या अकलेनें मुळींच सामील झालों नाहीं पण लोकांच्या जुलमानें मला हा धंदा करणें भाग पडलें. महाराज, मी आपल्या चरणाची शपथ घेऊन सांगतों कीं, मी आजपासून—ह्या घटकेपासून लुटारूंचा धंदा सोडला. ह्या शरीरामध्यें प्राण असेपर्यंत मी आपलें दास्यत्व करीन. मला दिलेल्या ह्या प्राणदानाचा केव्हांतरी मोबदला आपणांस मिळेल."

"तूं मला ओखतोस काय ?"

"महाराणा राजसिंहाला कोण ओळखणार नाहीं."

"जा तर, मी तुला जिवदान देतों. परंतु तूं ब्राह्मणाला दुःख दिलें आहेस त्याबद्दल तुला कांहीं तरी शिक्षा होणें अवश्य आहे; तुला जर मी कांहींच शिक्षा केली नाहीं तर मी राजधर्माप्रमाणें वर्तन ठेविलें नाहीं असें होईल."

"महाराजाधिराज, ह्या पापकर्मांत मी नुक्ताच पडलों आहे, करितां मेहेरबानीकरून मला फारच थोडी शिक्षा करा, पण तसें कशाला; आपल्या समक्षच मी माझी शिक्षा भोगतो." असें ह्मणून त्यानें आपल्या कमरेची लहानशी सुरी काढून जसा कांहीं खेळ खेळतात त्याप्रमाणें आपल्या हाताच्या आंगठ्याजवळच्या बोटावर सुरी ठेवून तें बोट कापण्यास सुरवात केली! सुरीनें बोटाचें मांस कांपलें पण हाड जशाचें तसें राहिलें!! म्हणून जयसिंहानें आपला हात एका दगडावर ठेविला व बोटावर सुरी ठेविली, ती दांतानें धरून एक दगड घेतला व सुरीवर मारला त्याबरोबर बोटाचा भाग तुटून जमिनीवर पडला!!! तदनंतर जयसिंह म्हणाला, "महाराज एवढीच शिक्षा मंजूर करा."

हा प्रकार पाहून राजसिंहास अचंबा वाटला! कारण जयसिंहानें बोट तुटेपर्यंत अगर तुटल्यावरही किंचित् दुःख झाल्याचें चिन्ह मुळींच दाखविलें नाहीं; किंवा तशा प्रकारचा कांहींही प्रकार त्याच्या मुद्रेवर घडला नाहीं.

"बस एवढी शिक्षा पुरे झाली, तुझें नांव काय ?"

"महाराज, ह्या अधमाधमाला जयसिंह असें ह्मणतात. मी रजपूतांच्या कुळाला कलंक लावणारा आहे."

"जयसिंह, आजपासून तुला मी नोकरीस ठेविलें आहे. घोडेस्वाराच्या पागेमध्यें नेमिलें आहे. चल तर मजबरोबर."

हें ऐकतांच जयसिहानें महाराण्याच्या चरणाजवळची धूळ मस्तकीं धारण केली आणि महाराण्यास थोडा वेळ उभें राहण्यास सांगून आपण गुंफेत गेला व ब्राह्मणाकडून लुटलेली मौक्तिकमाला, मोहरा व पत्रें आणून राजसिंहाजवळ दिलीं आणि ह्मणाला; "ब्राह्मणाजवळून आह्मीं जें लुटलें तें चरणाजवळ सादर केलें आहे. सेवकानें हीं पत्रें वाचलीं आहेत याबद्दल महाराज क्षमा करितील"—

राण्यानें तीं पत्रें हातांत घेऊन पाहिलीं. त्यांवर आपलेंच नांव आहे असें दिसलें. परंतु त्या ठिकाणीं न वाचतां तो ह्मणाला, " आतां हीं पत्रें वाचण्यास वेळ नाहीं. तुला रस्ता माहीत आहे. चल रस्ता दाखव पाहूं. "

जयसिंह रस्ता दाखवीत दाखवीत पुढें चालला. राण्यानें पाहिलें तों तो एक वेळही आपल्या बोटाकडे नजर टाकीत नाहीं किंवा किंचित् वेदनासुद्धां झाल्याचें दर्शवीत नसून एकसारखा चालला आहे. थोड्याच वेळांत ते त्या पर्वताच्या एका रमणीय व निवांत स्थळीं येऊन पोहोंचले. तेथील एका शिळेवर बसून राण्यानें पत्रें वाचण्यास सुरवात केली.

प्रकरण १३ वें समाप्त.

प्रकरण १४ वें.

पत्रिका वाचन.

प्रथमतःच विक्रमसिंहाचें पत्र हातीं आलें तें थोडेसें वाचून, राण्यानें फाडून फेंकून दिलें. त्यानें मनांत आणिलें कीं, ब्राह्मणाला कांहीं तरी इनाम दिल्यानें ह्या पत्राचा आशय संपूर्ण होईल. तदनंतर चंचलकुमारिकेचें पत्र वाचण्यास प्रारंभ केला.

अहो राजन् !

"आपण रजपूत कुलदीपक आहां. हिंदूंचें शिरोभूषण आहां. मी आपल्यास अनोळखी, अज्ञ अशी एक अबला आहे. मी खरोखरीच ह्या संकटांत पडलें नसतें तर आपणांस हें पत्र लिहिलें नसतें. संकटांत रुतल्यामुळेंच हें पत्र लिहिणें भाग पडलें आहे त्याबद्दल क्षमा मागतें.

हें पत्र घेऊन येणारे आमचे कुलगुरु आहेत. त्यांजकडून माझ्या कुलाची आपणांस संपूर्ण माहिती होईल. कौमार्यावस्थेमध्यें मी आपणांस हें पत्र लिहून आपल्या कुलाची मर्यादा उल्लंघन करीत आहे पण मी ज्या संकटांत गुंतलें आहे, त्या संकटाच्या परिणामाकडे पाहतां मर्यादा उल्लंघिल्याशिवाय माझी त्यांतून सुटका होणार नाहीं असें मला वाटल्यावरूनच हें पत्र लिहिण्याचें धाडस करीत आहे.

महाराजाधिराज! आपण रजपूत आहां! रजपूत कुलटिळक आहां! म्हणूनच मी ही आपणांस विनंति करीत आहे. दुष्ट, दुरात्म्या औरंगजेबानें मजबरोबर लग्न करण्याची इच्छा दर्शविली आहे! मजला दिल्लीस नेण्यासाठीं, त्याचें लष्कर आलें आहे, माझा जन्म रजपूत कुलामध्यें झाला आहे, मी क्षत्रियबाला आहे, सोळंखी वंशातील कुमारिका आहे, राजहंसी कधींतरी बगळ्याची सहचारिणी होईल का?

मी त्या तुर्काबरोबर संलग्न व्हावें अशी आपली इच्छा आहे का? त्या दुष्ट यवनाची दासी होण्यापेक्षां मी मरण्याचाच निश्चय केला आहे.

महाराज! मी भाटांच्या तोंडून आपल्या कुलांतील वीर पुरुषांचे पराक्रम ऐकिले आहेत. आपलीही कीर्ति दिगंतभर पसरली आहे. माझ्या पित्यासंबंधाची गोष्टच बोलण्यासारखी नाहीं. जर आपल्या रजपूत कुलांतील बालिकेचें संरक्षण कोणी करणारे असतील तर ते आपणच नरपुंगव आहां इतर सर्व रजपूत मोंगलांचे मिंधे बनले आहेत. ते सर्व बादशहाच्या दराऱ्यानें कांपत आहेत. आपण एकटेच स्वतंत्र असून रजपूत कुलांतील बालिकेच्या अब्रूसाठीं औरंगजेबाबरोबर लढण्यास समर्थ आहां. मी आपणांस शरण आल्यें आहे. आपण माझें रक्षण करणार नाहीं कां?

महाराज! महाराणा संग्रामसिंहानेंच बाबराला गादीवरून पिटाळून लाविलें होतें, असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. महाराणा प्रतापानेंच मध्यदेशामधून–राजपुतान्यांतून अकबर बादशहास हांकून काढलें होतें. आपणही त्याच सिंहासनावर विराजमान जाहलां आहां. आपण त्या वीरश्रेष्ठ-संग्राम-प्रतापाचे वंशज आहां. त्यांच्यापेक्षां आपलें बल यत्किंचित्‌ही कमी नाहीं. आपण असें ऐकिलें असेल कीं, महाराष्ट्रामधील डोंगरांमध्यें वास्तव्य करणाऱ्या एका शिवाजी नांवाच्या मराठ्या–वीरानें बादशहा अलमगीरास त्राही त्राही करून सोडलें आहे! असे आहे तर त्या अलमगीराची राजस्थानच्या राण्यापुढें काय गणति!

महाराज! आपलें सर्वस्व जरी गेलें तरी शरणागताचें रक्षण करणें हा राजाचा धर्म नाहीं का? शिवाय, आपलें सर्वस्व गमावून एका स्वज्ञातीय स्त्रीचें रक्षण करणें हा रजपुताचा धर्म नाहीं का?

महाराज! एक दुसरी गोष्ट मला कळवावयाची आहे, पण ती लिहितांना मला लज्जा उत्पन्न होत आहे. परंतु ती लिहिल्यावांचून समजावयाची नाहीं. ह्या संकटामधून जो कोणी रजपूत वीरपुरुष मोंगलांच्या हातून माझी मुक्तता करील त्याची मी शास्त्रोक्त विधीप्रमाणें धर्मपत्नी होऊन राहीन. अहो वीरश्रेष्ठ! युद्ध करून स्त्री मिळविणें हा तर क्षत्रियांचा धर्मच आहे. काशीमध्यें जमा झालेल्या सर्व राजमंडळाच्या समक्ष

आपल्या वीरत्वाच्या प्रतापानें भीष्माचार्यांनीं राजकन्या आणिल्या. रुक्मिणीची कथा आपणांस अवगत आहेच. ह्या संकटांतून मला सोडविणारे आपण नरपुंगव अहां ह्या दृष्टीनें मी आपणांस मनानें वरिलें आहे. त्याची स्मृति रहावी ह्या हेतूनें उपाध्याजवळ एक मौक्तिकमाला आपल्या कंठांत घालण्यासाठीं पाठविली आहे तिचें ग्रहण करावें. याउपर आपला राजधर्म पाळणें आपल्या हातीं आहे. माझा प्राण माझ्या हातीं आहे, दिल्लीस जाणें भागच पडलें तर मी मार्गांतच विष घेऊन प्राणत्याग करीन."

पत्र वाचून झाल्यावर राणा थोडा वेळ विचारांत गर्क झाला. नंतर जयसिंहाकडे बघून ह्मणाला. हें पत्र घेऊन येणारे उपाध्याय कोठें आहेत तें पहा. जयसिंहानें पुष्कळ शोध केला, पण उपाध्यांचा शोध लागला नाहीं. मात्र पूर्वीच्या जागीं राण्याचा "विजय" नांवाचा घोडा उभा होता. उपाध्यायांचा पत्ता मिळत नाहीं असें ऐकतांच, राणा घोड्याकडे आला इतक्यांत राण्याचे नोकर त्याचा शोध करीत त्याठिकाणीं आले.

राजसिंह त्या चोरट्यांच्या शोधास जातांच हाही त्यांच्यापैकीं कोणीतरी असेल असें समजून मिश्रदेव राण्याची पाठ फिरतांच एका गुहेमध्यें लपून बसले होते.

राण्याचे रक्तानें भिजलेले कपडे पाहतांच, कांहींतरी चमत्कारिक प्रसंग झाला असल्याचें सैनिकांच्या नजरेस आलें. पण विचारण्यास कोणाचीही हिम्मत झाली नाहीं. घोड्यावर स्वार झाल्यावर राण्यानें, त्या स्वारांपैकीं, प्रधान, सेनापती व सरदार मंडळीस एकांतीं घेऊन संभाषण केलें; व पुनः सर्वत्रांस एके ठिकाणीं जमवून सांगितलें.

"मित्रहो! आज आपणाला बराच अवधि झाला आहे. तुह्मां सर्वांना भूक लागली असेल हें मला समजतें. परंतु आज आपल्या घरीं भोजन करण्यास जाणें आपल्या नशिबीं नाहीं. आज आपणास ह्याच डोंगराळ प्रदेशामध्यें मार्गे जावयाचें आहे. कारण, मी एका लहानशा लढाईचें जोखीम शिरावर घेतलें आहे; ह्यासाठीं ह्या लढाईमध्यें मजबरोबर येण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं मजबरोबर यावें. बाकीच्यानीं उदेपूरचा रस्ता धरावा."

असें बोलून राणा पर्वत चढावयास लागला. तें पाहताच "जय महाराणाजीकी जय" "जय एकलिंगजीकी जय" असा जयघोष करीत ते शंभरही स्वार त्याच्या मागून पर्वत चढून जाऊं लागले. पर्वताच्या शिखरावर पोंहोंचतांच "हर हर महादेव" ह्या वीरोत्पादक गर्जनेनें एकमेकांस प्रोत्साहन देत त्या स्वारांनीं रूपनगरच्या मार्गास घोडे पिटाळले.

प्रकरण १४ वें समाप्त.

प्रकरण १९ वें.

इमानी नोकर.

राणा राजसिंह आवेशासरसा निघून गेला. त्यास जयसिंहाचें भान मुळींच राहिलें नाहीं. आतां आपण पुढें काय करावें त्याच विवंचनेंत जयसिंह पडला. राण्याच्या बरोबर जाण्यास त्याजजवळ घोडा नव्हता. त्यानें आजपर्यंत आपले दिवस चौर्यकर्मांतच घालविले होते, तेच दिवस जर एखाद्या दरबारीं घालविले असते तर त्याचें एव्हांशीं अवर्णनीय चीज झालें असतें.

त्यानें राण्याच्या मागून पायीं जाण्याचा बेत कायम केला व तसाच तो निघालाही. त्यानें मध्यंतरीं कोठेंही मुळींच विश्रांति घेतली नाहीं. त्यास राणा व त्याचा नोकर ह्याशिवाय कसलाच बोध होईना. सेवकाचें धन्याशीं सेवाधर्माचें जें नातें तें उत्कृष्ट बजाविण्याचा त्यानें निश्चय केला. त्यानें भुकेकडे किंवा तहानेकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. अखेरीस तो रूपनगरच्या रस्त्याला जे पहाड आहेत तेथपर्यंत आला. त्यानें विचार केला कीं, प्रथम रूपनगरास जाऊन तेथील स्थिति पहावी मग राणा कोठें आहे तें शोधून काढावें. राण्याच्या सैनिकाजवळ भाषण करण्याच्या शैलीवरून तो रूपनगराकडेच आला असला पाहिजे, यांत कांहीं संशय नाहीं. कारण, रूपनगरच्या राजकन्येचें पत्र वाचून तो स्वस्थ बसणारा वीर पुरुष नाहीं; असा आपल्या मनाशीं निश्चय करून तो रूपनगरास आला. तेथील बातमी त्यानें मिळविली, तों त्यास असें आढळलें कीं, मोंगलांचें दोन हजार लष्कर आहे. विरुद्ध पक्षाच्या सैन्याच्या मानानें रजपुतांचें सैन्य कांहींच नव्हतें असें ह्मणावयास हरकत नाहीं. त्याखेरीज उदईक राजकन्येस मोंगल स्वार नेणार आहेत ही खबर मिळाली.

त्याप्रमाणें बातमी मिळवून तो तेथून दिल्लीस जाण्याच्या रस्त्याकडे वळला. त्या रस्त्यानें येतां येतां तो फारच बारकाईनें आजूबाजूस निरीक्षण करूं लागला. कारण त्याची खात्री होती कीं, रजपूत स्वार दिल्लीच्या रस्त्यावरच कोठें तरी योग्य जागा पाहून पाळत राखीत बसलेले असलेच पाहिजेत. प्रथम प्रथम त्याची निराशाच झाली, पण पुढें चालतां चालतां, अशी एक जागा त्याच्या नजरेस पडली कीं, ज्या ठिकाणीं रस्ता फारच आकुंचित होता. त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस दोन उंच डोंगर होते. त्या डोंगराच्या मध्यंतरीं लांबवर गेलेला हा असा आकुंचित रस्ता होता. उजव्या हाताचा पर्वत उंच होता. त्याच्यावर चढण्याजोगी व्यवस्था नव्हती. त्याच्या शिखराचा भाग अशा रीतीनें आला होता कीं, जणूं काय त्या आकुंचित रस्त्यावर तो झुलता पूलच होय असें दिसत होतें. डाव्या बाजूचा डोंगर

कांहीं इतका उंच नव्हता. त्याचा आकार थोडथोडा वर चढत गेला होता. ह्मणून त्याच्यावर चढणें मुष्किलीचें नव्हतें. ह्या डाव्या बाजूच्या पर्वताला एका जागीं एक लहानसें भगदाड असून त्या भगदाडांतून एक लहानशी पायवाट पलीकडच्या बाजूस जात होती.

नेपोलियन बोनापार्टासारखे महान् लुटारूही फारच कुशल सेनापती होते. पण ते राजे होते ह्मणून राष्ट्रें त्यांस लुटारू असें ह्मणत नव्हतीं. जयसिंह बिचारा राजा नव्हता, ह्मणूनच त्यास आह्मीं लुटारूची उपमा दिली. पण मोठमोठ्या राज-लुटारूपेक्षांही ह्या छोट्या लुटारूची दृष्टि एका कसलेल्या सेनापतीसारखी होती. ह्या दोन पर्वतांमधील तो अरुंद रस्ता पाहतांच त्यास वाटलें कीं, राणा इकडे आला असल्यास तो येथेंच असला पाहिजे यांत कांहीं संशय नाहीं.

येथें राण्यास राहण्याचें कारण हेंच आहे कीं, ज्या वेळीं मोंगल लष्कर ह्या अरुंद रस्त्यानें जाऊं लागेल त्या वेळीं डोंगराच्या मथळ्यावरून रजपूत घोडेस्वार त्यांजवर वज्रासारखे तुटून पडून मोंगलांच्या लष्कराचा पार धुव्वा उडवून देतील. उजव्या बाजूनें पर्वतावर चढण्याचा मार्ग नाहीं. त्यामुळें घोडेस्वारांस चढण्या उतरण्या लायक ती जागा मुळींच नव्हती. त्यासाठीं रजपूतसेना त्या बाजूस नसणारच असा जयसिंहानें आपला निश्चय ठरविला. व डाव्या बाजूकडील पर्वतामध्यें वळून आंत जाणें जरा सोपें होतें, ह्मणून तो त्याच बाजूस चढला. त्या वेळी संध्याकाळचा सुमार झाला होता.

वर चढून पाहिलें असतांही त्यास कोठेंच कोणीही दिसलें नाहीं. त्यानें मनामध्यें निश्चय तर ठरविलाच कीं, यांस शोधून काढलें तर पाहिजेच; पुनः मनामध्यें शंका उद्भवली कीं, राण्याशिवाय मला कोणीही ओळखीत नाहीं; यासाठीं मला मोंगलांचा जासूद असें ठरवून कोणीही सैनिक ठार करण्यास चुकणार नाहींत; ह्मणून तो पुढें न जातां तेथूनच 'महाराणाजीकी जय' ह्मणून मोठ्यानें ओरडला.

जयसिंहाच्या तोंडून हे शब्द निघतात न निघतात तोंच चार पांच हत्यारबंद रजपूत विवक्षित गुप्त ठिकाणाहून निघून बाहेर आले. आणि हातांत हत्यारें घेऊन जयसिंहाचें डोकें उडविण्याची तयारी करूं लागले.

इतक्यांत त्यांपैकीं एकजण ह्मणाला, "खबरदार! यास मारूं नका." जयसिंहानें पाहिलें तों तो बोलणारा राणाच होता. राण्यानें सैनिकांस सांगितलें, यास मारूं नका. हा आपल्यापैकींच एक आहे. हें ऐकून बाकीचे सर्व रजपूत पुनः आपआपल्या जागीं गुप्त झाले.

राण्यानें जयसिंहास जवळ बोलावून एका गुप्त जागीं नेलें व तेथें आपण बसून त्यासही बसण्यास सांगितलें व विचारिलें, "तूं इकडे कसा आलास? जयसिंह

म्हणाला:–" महाराज, ज्या ठिकाणीं धनी तेथें नोकर असणें साहजिक आहे. शिवाय आपण संकटांत सांपडलेल्या अबलेस सोडविण्याचा प्रयत्न चालविला आहे अशा वेळेला माझ्यासारख्या निमकहलाल सेवकानें स्वस्थ बसावें हें मला मुळींच उचित दिसेना. म्हणून मी आपल्या थोडाबहून तरी उपयोगी पडावें यासाठीं इकडे आलों आहे. मोंगलांची संख्या आहे दोन हजार आणखी आपणांबरोबर आहेत अवघे शंभर वीर. हें पाहून माझ्यानें स्वस्थ कसें बरें बसवेल ? मला आपण जिवदान दिलें आहे तें मी कधींही विसरणार नाहीं." " आम्हीं येथेंच आलों असून ह्याच ठिकाणीं छपून आहों हें तुला कोणी सांगितलें ?" राण्यानें प्रश्न केला. ह्या प्रश्नाचा जबाब जयसिंहानें आपल्या मनांत कसकसे तर्क आले व त्यावरून आपण कसें अनुमान केलें तें सर्व राण्यास सांगितलें. तें ऐकून राणा फारच आनंदित झाला. तो म्हणाला. "शाबास ! तुझ्याच सारख्या हुशार मनुष्याची मला जरुरी होती. मी जसें सांगेन तसें तूं करूं शकशील ?"

जयसिंह–" माणसाच्यानें जें म्हणून होण्यासारखें असेल तें मी करूं शकेन."

"आपल्याजवळ अवघे शंभर स्वार आहेत. मोंगलांचे दोनहजार आहेत. रणांगणामध्यें प्राण जाईपर्यंत लढणें हें आपलें ब्रीद आहे. तरीपण अशानें यश येईलच असा संभव नाहीं. समक्ष लढून राजकन्येस सोडविणें अशक्यच. म्हणून प्रथम राजकन्येस फरारी करून नंतर लढाई करणें हें मला इष्ट वाटतें. आतां लढाईच्या मैदानामध्येंच जर राजकन्या असेल तर तिला इजा होण्याचा संभव विशेष; म्हणून प्रथम तिचें संरक्षण केलें पाहिजे. कसें काय ? हें तुझ्यानें होईल का ?"

"महाराज, मी अल्प बुद्धीचा एक पामर आहे. त्यासाठीं काय काय करावयाचें त्या संबंधानें आपला हुकूम झाल्यास तो मी माझ्या प्राणापलीकडेही विशेष प्रकारें बजावीन." जयसिंह म्हणाला.

"तूं मोंगल घोडेस्वाराचा वेष घेऊन उदईक मुसलमान लष्कराबरोबर यावेंस. आणि राजकुमारीच्या पालखीबरोबरच रहावें व पुढें जें काय करावयाचें तें मी तुला सांगतो." असें म्हणून राण्यानें पुढील एकंदर व्यूह त्यास सांगितला. तें ऐकून जयसिंह म्हणाला,–"महाराज आपल्या आज्ञेप्रमाणें हा सेवक एकंदर काम योग्य प्रकारें बजावील याबद्दल मुळींच संशय बाळगूं नका.पण मला मेहेरबानी करून एक घोडा द्या."

"आम्हीं सर्वजण १०० स्वार आहों. आमच्याजवळ एकही घोडा ज्यास्ती नाहीं. म्हणून तूं माझाच घेऊन जा." राणा म्हणाला.

"महाराज, माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तरी मी तुमचें वाहन घेणार नाहीं. पण कांहीं हत्यारें किंवा कपडे तरी मिळतील का ?"

"तेंही मिळणार नाहींत. कारण, आम्ही जे कपडे किंवा हत्यारें आमच्या अंगावर होतीं तींच घेऊन येथें परभारें आलों हें तुला माहीत नाहीं का ?"

"महाराज, क्षमा करा. मग मला योग्य वाटेल त्या मार्गानें मी ते मिळवीन"

"चोरी करणार कीं काय ?"

"महाराज, चोरी न करण्याबद्दल तर मी शपथ घेतली आहे. आतां प्राण असे-पर्यंत चोरी अशी करणार नाहीं. पण कोणास तरी फसवून घेईन खास."

राणा हंसून ह्मणाला, "लढाईत जय येई पर्यंत सर्वच चोर व ठक असतात. मीही-पण बादशहा बेगम करूं इच्छिणाऱ्या स्त्रीस पळवून नेण्यासाठीं आलों असून चोरा-सारखा छपून बसलों आहे. जा तर. ज्या मार्गानें हें सर्व तुला मिळेल त्या मार्गाचें अवलंबन कर.

जयसिंहानें राण्यास मुजरा करून रूपनगरचा मार्ग धरिला.

प्रकरण १५ वें समाप्त.

प्रकरण १६ वें.

जयसिंहाचें कौशल्य.

जयसिंह राण्याजवळून निघाला, तो थेट रूपनगरास आला. त्या वेळेस रात्र पडली होती. अर्थात् बत्तीची वेळ होऊन गेली होती. तो परभारें शहरच्या बाजारांत गेला. दिव्याच्या चकचकाटानें बाजार फारच सुशोभित दिसत होता. ठिकठिकाणीं निरनिराळ्या जिनसांचीं दुकानें मांडलेली होती. जयसिंहास भूक फारच लागलेली होती, ह्मणून तो प्रथम एका मिठाईवाल्याच्या दुकानावर गेला व त्यानें तेथून मिठाई खरेदी केली. ती एका जागीं बसून, खाऊन, तिच्यावर एक दोन लोटे पाणी पिऊन आपल्या मुख्य वस्तूच्या शोधास निघाला.

आपल्या कार्यास योग्य असें स्थळ शोधीत शोधीत तो एका पानें विकणाऱ्या स्त्रीच्या दुकानावर आला. त्या दुकानामध्यें दिव्यांची रांगच्या रांग लावून चकचकाट केला होता. दुकानावरील एका बाजूस सुशोभित गालीचा आंथरून त्यावर पानवाली स्वतः विराजमान झाली होती. तिची अंगकांति गौरवर्ण असून वयानें पसतीसच्या सुमारें होती. ती बोलण्या चालण्यामध्यें विशेष रंगेल स्वभावाची होती. उदईक रूपनगर सोडणार, ह्मणून शहरामध्यें मोंगल लष्कराचे शिपाईही चैनबाजी करावयास फिरत होते. त्यांची विशेष गर्दी त्या पानवालीच्या दुकानावर दिसत होती. जयसिंहानें हा सर्व प्रकार दुरून पाहिला व थोडा वेळ विचार करून तो तेथें आला

आणि त्यानें एक दोन पट्ट्या घेऊन खाल्या. व पानवालीस त्याबद्दल दुप्पट पैसे दिले. पान खातांखातां त्यानें पानवालीच्या सौंदर्याचें व तिच्या दागदागिन्यांचें वर्णन करण्याचा क्रम सुरू केला व तीस जरा विशेष कांहीं सांगावयाचें आहे, असें बोलून बाजूस बैठक ठोकली आणि संभाषणास सुरुवात केली. तो ह्मणाला:— "बाईसाहेब तुमचें चातूर्य अवर्णनीय आहे. मीही पण तुमच्याच सारख्या एका स्त्रीच्या शोधांत होतों. माझा एक शत्रू आहे, त्यास कैद करण्याचा माझा इरादा आहे. त्यासंबंधें काय करावयाचें तें मी तुह्मांस सांगतों. हें माझें काम झालें तर मी तुह्मांस एक मोहोर बक्षीस देईन.

"पण मी करायचं काय? तें तरी पहिल्यानं कळूं द्या!"

ह्या प्रश्नाचा जबाब जयसिंहानें तीस नीट रीतीनें समजावून दिला. पानवाली खूष झाली. तिनें रुकार दिला. आणि ह्मणाली:—"मला कीं नाहीं तुमच्या मोहरेची जरूरी नाहीं. ह्या तुमच्या युक्तीनें माझीही घटकाभर करमणूक होईल."

पानवालीकडून होकार मिळतांच जयसिंहानें 'महमदखां' ह्या नांवानें एक प्रीतिपत्र लिहिलें. त्यांत "मी आपला मुखडा पाहून आपणांवर आषक्त झालें आहे. आपण तर उदईक कूच करणार आहां. तेव्हां आज रात्रौ ९ वाजतां आमच्या बिऱ्हाडीं येऊन आपल्या दर्शनाचा लाभ ह्या चातकीस द्यावा. आपण आल्यानें दोन घटका करमणूक होईल." ह्याप्रमाणें पत्र तयार करून पुढें काय करावयाचें त्याचा खल पानवालीबरोबर करून तो मुसलमानांच्या छावणींत आला. आणि महमदखां ह्या नावाच्या इसमाचा शोध करूं लागला. मुसलमानांमध्यें बहुतेक "खां"च असतात. तेव्हां हा कोणीतरी उल्लू महमदखां आपणांस सांपडेलच ह्या हेतूनें जयसिंहानें तें पत्र लिहिलें होतें. त्याचा परिणामही उत्कृष्ट झाला. छावणीमध्यें तपास करतां करतां एक महमदखां आढळले. त्यांनीं ती चिट्ठी घेतली व वाचून पाहिली. त्याबरोबर स्वारी रंगांत येऊन खूष झाली. त्यानें जयसिंहास सांगितलें, जरा उभा रहा मी कपडे घालून येतों. असें ह्मणून स्वारी तंबूमध्यें गेली व फक्कड पोषाख करून मिशांचे आंकडे वगैरे चढवून बाहेर आली. जयसिंहास विचारिलें, "किती लांब जावयाचें आहे? त्यानें हात जोडून जबाब दिला," हुजूर मुक्काम नजीक आहे पण घोड्यावरून निघाल्यास व हत्यारबंद झाल्यास बरें. कारण, आपल्याला मोठ्या ठिकाणीं जावयाचें आहे. शिपायानेंही विचार केला कीं, हा ह्मणतो तेंही खरेंच आहे. कारण, आपण शिपाई बच्चे; हत्याराशिवाय जाणें लांछनास्पद होय. ह्मणून त्यानें आपलीं सर्व हत्यारें बांधून घोडेस्वार होऊन जयसिंहाबरोबर चालता झाला.

इकडे जयसिंह गेल्यावर पानवालीनें एकांत असा जागीं भाड्याची जागा घेऊन

त्या ठिकाणीं ती त्याची वाट पहात उभी राहिली होती. इतक्यांत जयसिंहाबरोबर खानसाहेबांची स्वारी आली. संकेताच्या जागीं पानवालीस उभी राहिलेली पाहतांच, जयसिंहानें खानसाहेबास हात देऊन खालीं उतरलें व म्हणाला—" हुजूर, मी आपला घोडा धरून उभा राहतों. आपण खुशाल वर जावें. " खानसाहेब तसाच जिना चढूं लागला. तोंच जयसिंह त्यास म्हणाला—" खानसाहेब, कोणाही स्त्रीस भेटावयास जातेवेळीं, हत्यारासहीत जाणें गैरशिस्त आहे. तीं सोडून मजकडे द्या. " खानसाहेबानीं सर्व हत्यारें जयसिंहाजवळ दिलीं.

खानसाहेब वर चढून जातांच पलंगावर एक सौंदर्यवान् स्त्री बसली असल्याचें त्याच्या दृष्टीस पडलें. मियासाहेबांनीं दरवाजाबाहेर जोडे वगैरे काढून बिछायतीवर आसन ठोकलें. पानवालीही पलंगावरून उठून येऊन त्यांचें स्वागत करूं लागली, व इकडच्या तिकडच्या गोष्टी काढून खानसाहेबांस गारेगार करून सोडूं लागली. शेवटीं फार उष्मा होतो म्हणून मियासाहेबांनीं आपले कपडे काढून ठेविले. इतक्यांत दरवाज्यावर थाप बसली. पानवालीनें विचारिलें, " कोण आहे ? " " मी आहें दार उघड. " असा बाहेरून जबाब आला. तो जबाब ऐकून पानवाली घाबरली. ती म्हणाली, " अरे हे तर माझे खाविंद आले, आतां काय करूं ? खानसाहेब माझें वाटोळं होईल. आपण ते जाईपर्यंत जरा ह्या पलंगाखालीं बसून रहा. ते जातांच आपण घटकाभर करमणूक करूं. " हो ना करतां करतां शेवटीं खानसाहेब पलंगाखालीं गेले. तो पलंगाखालीं गेल्यावर पानवालीनें किंचित् स्मित करून दरवाजा उघडला, व बाहेर तिचा नवरा म्हणून उभा असलेल्या जयसिंहास विचारिलें.

" आपण गेल्याला अजून पाव तासही झाला नाहीं. इतक्यांत परत कसे आलां ? " जयसिंह आवाज बदलून म्हणाला. " मी इकडून निघालों तों अर्ध्या रस्त्यावर जातों न जातों तों मला किल्यांची आठवण झाली. पेढीवर जाऊन विनाकारण परत मात्र आलों असतों. पहा बरें; येथेंच कोठें तरी मी त्या किल्या विसरलों." जयसिंहानें किल्या शोधण्याचें निमित्त करून, महंमदखानानें आंगांतील काढून ठेविलेला पोशाख गोळा केला, व " किल्या मिळाल्या. आतां मी जातों. तूं नीट दार बंद करून नीज. आज जिकडे तिकडे मुसलमान फिरत आहेत, एखादे वेळीं येथेंही एखाद्याची स्वारी येईल सांभाळून ऐस. " असें बोलून तो बाहेर पडला. कडी घालण्याचें निमित्त करून पानवालीही त्याच्याचबरोबर बाहेर आली व दारास बाहेरून कडी—कुलूप लावून दोघेंही निरनिराळ्या ठिकाणीं चालतीं झालीं. जाते वेळीं जयसिंहानें पानवालीच्या हातांत कांहींसें ठेविलें पण पानवालीनें त्याचा स्वीकार केला नाहीं तिला फार हंसूं येत होतें. खानसाहेबांस कोंडलेली जागा एका बाजूस असून तेथें सांप्रतच्या घराप्रमाणें

खिडक्या वगैरे नव्हत्या, पण हवा खेळण्यासाठीं लहान लहान भोकें जागजागीं पाडलेलीं होतीं. खानसाहेबास कैद केल्यावर त्याचा पोशाख चढवून व हत्यारें वगैरे बांधून जयसिंहांची स्वारी प्रती खानच बनली. आणि घोड्यावर बसून मुसलमानी छावणींत गेली व खानसाहेबाच्या राहुटींत जाऊन निजली.

प्रकरण १६ वें समाप्त.

प्रकरण १७ वें.

मार्गांतील युद्ध.

प्रातःकाळींच मोंगलसैन्य कूच करण्याची तयारी करूं लागलें. रूपनगरच्या दरवाजामधून सुंदर फेंटे घातलेल्या आणि चिलखतवाल्या, फक्कड मिशा व दाढीवाल्या अशा हत्यारबंद घोडेस्वारांची एकामागून एक रांग बाहेर पडूं लागली. एकएका रांगेमध्यें पांच पांच स्वार होते. त्या स्वारांचे घोडेही किंमतवान् होते. स्वारांनीं लगामा खेंचून त्यांच्या गतीस अवरोध केला होता त्या कारणानें त्या स्वारांची सबंध रांग आस्ते आस्ते सरकत असतां डुलत चालल्यासारखी दृष्टीस पडत होती..

सकाळींच चंचलकुमारीनें उठून स्नान वगैरे नित्यनैमित्तिक कृत्यें आटोपलीं व ती शृंगार करूं लागली. दागिने चढविण्याचें काम निर्मळ कुमारीनें आपल्याकडे घेतलें. दागिने चढवितां चढवितां, चंचल म्हणाली. " सखे माझ्या गळ्यामध्यें एक फुलाची माळ घालण्यास विसरूं नको हो! सती जाणाऱ्या स्त्रीच्या गळ्यामध्यें अवश्य माळ पाहिजे."

हे शब्द ऐकून निर्मळेच्या नेत्रांत अश्रु आले. ती म्हणाली. " सखे! असं काय बरं अभद्र बोलतेस. मी तर तुझ्या आंगावर जडजवाहीर घालणार आहें. माझी सखी उदेपूरची राणी व्हावयास जात नाहीं का ? "

" बाई तुला वाटेल तें घाल. माझं व तुझं आतां मुळींच दर्शन व्हायचं नाहीं. उदेपूरचीही कांहीं बातमी समजत नाहीं. आतां शेवटीं ठरला तोच निश्चय. मी दिल्लीच्या रस्त्यालाच प्राणत्याग करीन पण त्या यवनाची दासी म्हणून होणार नाहीं."

" सखे ! अशी अधीर होऊं नको. कोणतंहि काम पूर्ण विचारानं केलेलं बरं. एखादे वेळीं मार्गांतूनच तुला सोडविण्याचा प्रयत्न कशावरून बरं होणार नाहीं ? धैर्य सोडूं नको, मीही तुझ्या मागोमागच येईन." असें म्हणून त्या दोघीही एकमेकीस कडकडून भेटल्या.

चंचलकुमारीनें शृंगार केल्यावर ती महादेवाचें दर्शन घेण्यास मंदिरांत गेली. ती नित्यनियमानें श्रीशंकराची पूजा करीत असे. त्याप्रमाणें ती आजही दर्शनास गेली,

व एकाग्र चित्तानें श्रीशंकराचें स्तवन करून ह्या संकटांतून सोडविण्यासाठीं त्याची तिनें मनोभावें प्रार्थना केली. महादेवाची पूजा झाल्यानंतर चंचलेनें आईबापांचा निरोप घेतला. त्यांच्या चरणावर मस्तक ठेविलें, व मनसोक्त रडली. तेव्हां विक्रमसिंह म्हणाला:—" मुली, तुला मी जो हा मार्ग स्वीकारण्यास सांगत आहे त्याबद्दल माझी मला शरम वाटत आहे. पण काय करूं? आपली शक्ती पाहून त्याप्रमाणें आपण वागलें पाहिजे. आज मोंगलांबरोबर झगडण्याची आमच्या आंगांत ताकद नाहीं. सर्वच गोष्टी प्रतिकूल झाल्या आहेत. ह्यावेळीं बाळ प्रताप जर असता तर मला कांहीं तरी मदत झाली असती; पण तोही कोठें नाहींसा झाला त्याचा पत्ता नाहीं. आतां मी म्हातारपणीं काय करावें? जा, बाळ, भिऊं नको. परमेश्वर तुझें संकट दूर करील." ह्याप्रमाणें सर्वांचा निरोप घेऊन चंचल मेण्यांत येऊन बसली. एक हजार स्वारांना मेण्यापुढें चालण्याचा हुकूम झाला; व दुसऱ्या एक हजारांस मागें राहण्याचा हुकूम झाला. कूच करण्याचा हुकूम मिळतांच लष्कर चालूं लागलें.

सकाळच्या शीतल वायूच्या लहरींमध्यें कोणा कोणा घोडस्वारास गाण्याची लहर येई. मेण्याच्या मागें जे स्वार होते त्यांपैकीं, सर्वांच्या पुढें जो स्वार चालत होता त्यानें एक गाणें उच्च सुरांत ह्मटलें.

शरम, भरमसे पियारी, सोमरत बंसी धारी,
झुरत लोचनसे बारी, न समझे गोप कुमारी,
जे हिन् बैठत मूरारी, बिहारत राह तुमारी,

हें गाणें राजकन्येनें ऐकलें. त्याचा अर्थ समजून ती मनांत ह्मणाली. 'प्रभो! हें सकाळचेंच गायन जर खरें होईल तर माझ्या आनंदास सीमाच नाहीं.' ह्यावेळीं राजकन्येच्या अंतःकरणांत राजसिंहाचाच विचार आला होता. पण त्या बिचारीस काय माहीत कीं, जयसिंह हें गाणें ह्मणत मेण्याच्या मागें मागेंच चालला होता त्यानें महामुष्किलीनें मेण्याच्या मागें राहण्याची जागा मिळविली होती.

मोठ्या थोरल्या अजगराच्या शरिराप्रमाणें वळसे खात तें मोंगल सैन्य त्या दोन डोंगरांमधील अरुंद वाटेनें, ज्या ठिकाणीं, जयसिंहानें, राजसिंहाबरोबर संभाषण केलें होतें त्या रस्त्याच्या जवळ आलें. त्या सैन्या पैकीं, अर्धें त्या मार्गानें पुढें गेलें इतक्यांत "धम् धम्" असा मोठा आवाज झाला. त्याबरोबर पुढील शिपाई चमकून उभे राहिले. पहातात तों पर्वतशिखरावरून डोंगराचा एक मोठा भाग तुटून लष्करामध्यें पडला असल्याचें त्यांस दिसलें. त्यामुळें एकस्वार मेला व एक जखमी झाला.

सर्व आश्चर्यचकीत होऊन पाहूं लागले तोंच जिकडून तिकडून दगडांची वृष्टि होऊं लागली. त्यामुळें कित्येक घोडेस्वार कोणी घायाळ होऊन, कोणी मरून पडूं लागले.

व तो रस्ता सरासरी बंदच होण्याचा रंग दिसूं लागला. घोडेही आपल्या पाठीवरील स्वारांस घेऊन पळ काढूं लागले. पण पुढें व मागें दोन्ही रस्ते भरलेले असल्यामुळें, घोड्यांसही पळतां येईना. तेव्हां घोड्यावर घोडा व स्वारावर स्वार अशी धांदल होऊन तो रस्ता अजिबात बंदच झाला. स्वारांनीं रस्ता काढण्यासाठीं आपआपसांतच हत्यारें चालविलीं. अंमलदारांचा हुकूम अमान्य होऊं लागला, सैन्यामध्यें पळापळ सुरू झाली.

ज्या ठिकाणीं राजकन्येचा मेणा होता त्या बाजूनें व पुढील बाजूनेंही दगडांच्या वृष्टीस सुरुवात झाली होती. पुढील स्वार मागें येण्यास पहात व मागील पुढें जाण्यास पहात. ह्यामुळें मेणा उचलणाऱ्या भोयांस आपले प्राण वांचविण्याची फिकीर पडली. वाचकांस आठवत असेल कीं, ह्याच बाजूनें एक पायवाट होती तींतून पलीकडच्या बाजूस जाण्यास रस्ता होता. त्या वाटेनें मात्र एका वेळीं एकच घोडेस्वार जाईल अशी जागा होती. त्या जागेजवळ येतांच जयसिंह भोयांस ह्मणालाः—"लोक कैसे हुशियार है. व्हां रस्ता है व्होवी देखते नहीं." असें ह्मणून त्यानें त्या वाटेकडे भोयांचें लक्ष वेधलें. त्याबरोबर भोई आपला व राजकन्येचा जीव वांचविण्यासाठीं ताबडतोब त्या मार्गानें चालले. त्यांच्या बरोबर जयसिंहही चालला. मेणा ह्या बाजूनें चालला आहे असें पाहतांच दुसराही एक स्वार जयसिंहाच्या मागून येऊं लागला. इतक्यांत पर्वताच्या शिखरावरून दुसरा एक दगड सरपटत आला, तो एकदम त्या दुसऱ्या स्वारावर पडून त्याचा व त्याच्या घोड्याचा चुराचुरा करून त्यानें त्या पायवाटेच्या भगदाडाचा दरवाजाही बंद केला. त्यामुळें दुसरा एकही स्वार आंत दाखल झाला नाहीं. फक्त एकटा जयसिंहच मेण्याबरोबर चालत होता.

ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं सेनापती दिल्हेरखान सर्वांच्या मागें होता. कारण तो त्या अरुंद रस्त्याच्या बाजूस उभा राहून एकंदर सैन्य व्यवस्थित रीतीनें आंत दाखल होण्याची व्यवस्था करीत होता. एकंदर सैन्य आंत दाखल होतांच तो आस्ते आस्ते मागून येत होता; इतक्यांत आपल्या लष्कराच्या शिस्तीमध्यें घोटाळा होऊन सैन्य पिछेहाट करूं लागलें आहे व त्या सैन्याचा ओघ आपल्याच बाजूस येत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. कारण विचारितां कोणीही बरोबर जबाब देईना. तेव्हां शिपायांस धाक दपटशा देऊन त्यांनीं पुढें चाल करावी ह्मणून तो प्रयत्न करूं लागला, आणि हा काय प्रकार आहे तें पाहण्यास तो स्वतः पुढें झाला. परंतु तिलका वेळहि सैन्य एका जागीं राहूं शकलें नाहीं.

पूर्वीं वर्णन केल्याप्रमाणें रस्त्याच्या उजव्या बाजूचा पर्वत बराच उंच होता त्यावर चढण्याची मुळींच सोय नव्हती. त्याचें शिखर जणूं काय रस्त्यावर छप्पराप्रमाणें झुकलेलें होतें. तेणेंकरून त्या मार्गावर चोहोंकडे अंधःकाराचें साम्राज्य पसरलें होतें. पण

त्या शिखराच्या पलीकडील बाजूनें रजपुतांनीं एक रस्ता शोधून काढून पन्नास स्वारांस बसण्या पुरती जागा केली होती. ही जागा अशा प्रकारची होती कीं, त्या जागीं कोणी बसलें आहे असें खालून पहाणाराच्या दृष्टीस पडूं नये; पण त्यांना मात्र इतरांस पहातां यावें. ते एकमेकांपासून पन्नास हातांच्या अंतरानें उभे राहिले होते. त्यांनीं सबंध रात्र जाग्रण करून मोठमोठे दगड एकत्र करून आपआपल्याजवळ एक एक जबरदस्त ढीग करून ठेविला होता. खालीं यवन सैनिक येतांच एक एक मिनिटाच्या अंतरानें ते पन्नासही जण खालच्या रस्त्यावरील स्वारांवर दगडांचा वर्षाव करीत होते. त्याबरोबर प्रत्येक खेपेस कोणीना कोणी तरी स्वार अगर घोडा घायाळ होऊं लागला व मरण पावूं लागला ! आपणांवर दगडांचा वर्षाव कोठून होतो तें कोणाच्याही दृष्टीस पडत नव्हतें. डोंगरावरील शिखरावर तर चढण्यास रस्ता नाहीं, मग शत्रूवर हल्ला करावयाचा कसा, हा प्रश्न सर्वत्रांपुढें उभा राही ! शेवटीं प्राण वांचविण्यास पलायन करणें हाच शेवटचा उपाय आहे असें ठरलें ! त्याचेंच सर्वांनीं अवलंबन केलें. मेण्याच्या पुढें जे हजार स्वार होते त्यांतून मरण पावून व घायाळ होऊन जे शिल्लक राहिले ते पर्वताच्या निरनिराळ्या वाटांनीं पळून प्राण वांचवूं लागले.

ज्यावेळीं उजव्या हाताकडील पर्वतशिखरावर पन्नास रजपूत दगडांच्या वर्षावाचें काम करीत होते, त्यावेळीं राणा राजसिंह दुसऱ्या पन्नास रजपूतांसह डाव्या हातावरील बैठ्या पर्वतावर छपून बसला होता. त्यानें व त्याच्या हाताखालच्या रजपुतांनीं अद्याप मुळींच श्रम केले नव्हते, परंतु आतां मात्र त्यांजवर काम करण्याची वेळ आली. ज्या ठिकाणीं दगडांची भयंकर वृष्टी होऊन कल्लोळ झाला होता त्या ठिकाणीं आतां दिल्हेरखान उभा होता. त्यानें त्या भयंकर जागीं येतांच, सैनिकांस त्या अडचणीच्या जागेंतून व्यवस्थितपणें बाहेर काढण्यासाठीं प्रयत्न केला, पण त्यास यश आलें नाहीं. राजकन्येचा मेणा एका भगदाडांतून एका स्वारासहित आंत जाऊन एका मोठ्या दगडाच्या पडण्यानें तें भगदाड बंद झालेलें जेव्हां त्यानें पाहिलें तेव्हां या भयंकर तुफानाच्या मुळाशीं राजकन्येचें हरण हेंच कारस्थान आहे असें त्यानें पक्कें अनुमान केलें. त्याबरोबर तो जवळच्या शिपायांकडे वळून मोठ्यानें ओरडून ह्मणाला,—"प्राण गेला तरी बेहेत्तर, पण तुमच्यापैकीं शंभर स्वार माझ्याबरोबर मेण्याच्या मागोमाग या. घोड्यावरून उतरा. पायानें चाला व हा दगड ओलांडा. मी पण तुमच्या बरोबर येत आहें." असें बोलून दिल्हेरखानानें घोड्यावरून खालीं उडी मारिली. आणि ती खिंड बंद करणाऱ्या दगडावर त्यानें चढण्यास प्रारंभ केला व दगड चढून त्यानें आंतील बाजूस उडी मारिली. त्याचें अनुकरण करून दुसरे शंभर स्वार आंत दाखल झाले. वरून राजसिंह हें सर्व पहात होता. मेण्याबरोबर एकच स्वार आंत आला होता तोंपर्यंत त्यानें कांहींच हालचाल केली नाहीं. पण आतां उपेक्षा

करण्याचा समय नाहीं असें जाणून त्यानें दिल्हेरखानास अटकाव करण्याचा प्रयत्न चालविला. व ज्याप्रमाणें ऊंच ठिकाणाहून सोडलेला दगड अचानक येऊन पडतो त्याप्रमाणें त्या पन्नासही रजपूतांनीं एकाएकीं मोंगलांवर पडून कापाकापीस सुरवात केली. ध्यानींमनीं नसतां हा एकाएकीं हल्ला आलेला पाहतांच मोंगलांची शिस्त मोडली. आणि त्यांच्यापैकीं बरेच स्वार प्राणास मुकले. ह्याप्रमाणें घोड्यावरून उतरून जे स्वार दिल्हेरखानाबरोबर आले होते ते रजपूत स्वारांच्या हातून मरण पावले, जे खालीं होते ते दगडाखालीं चेंगरून मेले, शिल्लक उरलेले पांच सात जण मात्र वांचले, त्यांस घेऊन दिल्हेरखान मागें फिरला. रजपुतांनीं त्यांचा पाठलाग केला नाहीं, त्यांनीं त्यांस बाहेर जाऊं दिलें.

बैठ्या पर्वताची ती खिंड ओलांडून दिल्हेरखान बाहेर आला व त्यानें सैनिकांस हुकूम केला कीं, "ह्या डाव्या हाताच्या पहाडावर चढणें विशेष मुष्किलीचें नाहीं, म्हणून सर्व शिपायांनीं आपापल्या घोड्यावर स्वार होऊन ह्या पहाडावर चढावें. लुटारूंची संख्या ह्मणण्यासारखी नाहीं, यासाठीं अशा अडचणीच्या जागींही आपण त्यांजबरोबर दोन हात करून त्यांचा समूळ नाश करूं." हें ऐकतांच पांचशें मोंगल स्वार "दीन दीन" करीत डाव्या बाजूच्या पर्वतावर चढूं लागले. सर्वांच्यापुढें दिल्हेरखान होता. मोंगलांजवळ दोन तोफा होत्या. त्यांतून एक उचलून पहाडावर घेऊन जाण्याचा त्यानें हुकूम दिला. आणि दुसरी जी लहान तोफ होती तिला थोडा-वेळ मुसलमानांनींच ओढून आणिली. नंतर साखळ बांधून हत्तीकडून खेंचली. व ज्या मोठ्या दगडानें पहाडाच्या खिंडीचा भाग बंद केला होता त्या दगडावर उचलून ठेविली. तिचें तोंड आंतील बाजूस केलेलें होतें.

प्रकरण १७ वें समाप्त.

प्रकरण १८ वें.

जय कीं अपजय ?

विक्राळ व भयंकर काळासारखे ते पांचशें स्वार "दीन दीन" करीत पर्वत चढूं लागले. तो पर्वत कांहीं फारसा उंच नव्हता हें पूर्वीच सांगितलें आहे. त्याच्या शिखरा-वर चढण्यास फार वेळ लागेल असेंही नव्हतें. तें सर्व सैन्य पर्वतावर चढून गेलें पण तेथें कोणीही दृष्टीस पडलें नाहीं. तपासाअंतीं दिल्हेरखानास असें समजलें कीं, ज्या पर्वताच्या अरुंद खिंडीमधून आपण पराजित होऊन मागें फिरलों त्या ठिकाणीं लुटारूंची टोळी जमा झालेली आहे. ही बातमी मिळतांच त्यानें त्या खिंडीचा दुसरा दरवाजा बंद करण्यासाठीं तत्परतेनें निघण्याचा हुकूम केला. पूर्वींचा खिंडीचा दरवाजा हसनअल्ली नां-

वाच्या दुय्यम सेनापतीनें तोफ लावून अडकवून ठेविला आहे हें त्यास माहीत होतें. तेव्हां ह्या लुटारूंस जर्जर करण्याचा सोइस्कर मार्ग त्याच खिंडीचा दुसरा दरवाजा बंद करणें हाच होता, म्हणून तो त्वरेनें पुढें जाऊं लागला. पुढें आल्यानंतर त्या खिंडीचा मार्ग रुंद होत चाललेला त्याच्या दृष्टीस पडला. रस्ता अनोळखी असल्या कारणानें रजपूतांस कोंडण्याच्या ऐवजीं आपणच कोंडलें जाऊं अशी दिल्हेरखानास भीति उत्पन्न झाली. म्हणून त्यानें पर्वताच्या धारेवर येऊन खिंडीचा दरवाजा किती लांब आहे तें पाहिलें तों त्याच रस्त्यानें रक्तानें माखलेले सरासरी चाळीस रजपूत मेण्याबरोबर चालत असलेले त्याच्या दृष्टीस पडले. मार्ग सांपडण्यास आयतीच सोय झाली. हे रजपूत खिंडीतून बाहेर पडण्या-साठींच चालले होते. त्यांजबरोबर राजकन्येचा मेणा होता. यांच्यामागून गेल्यास आपणांस लवकरच खिंडीचें द्वार सांपडेल ह्या हेतूनें मुळींच आवाज न होऊं देतां दिल्हेरखानाचें लष्कर चाललें. थोडावेळ ह्याप्रमाणें कूच केल्यानंतर पहाडाचा उंच भाग ओलांडतांच त्याच्यासमोर बाहेर निघण्याचा मार्ग आहे असें दिल्हेरखानाच्या नजरेस आलें त्याबरोबर त्यानें हुशारी करून घोडे दौडण्यास हुकूम केला व ते मेणा घेऊन येणारे रजपूत तेथें येऊन पोहोंचण्यापूर्वीं त्यानें खिंडीचा दरवाजा बंद करून टाकला. रजपूत ज्या रस्त्यानें येत होते तो भाग जरा अडचणीचा होता. त्यामुळें ते मोंग-लांच्या अगोदर येऊन पोहोंचले नाहींत. मोंगलांनीं नाकें वेढलें, त्या ठिकाणीं आंतील बाजूस तोंड करून एक तोफ रोंखिली, आणि रजपूतांस भिवविण्याकरितां एक तोफेचा गोळा सोडला व त्याबरोबरच "दीन दीन" हा शब्दोच्चार केला. त्या खिंडीच्या दुसऱ्या नाक्यावरील हसनअल्लीनेंही ह्या तोफेचा आवाज ऐकून तोफ डागली व तिला प्रत्युत्तरादाखल एक गोळा सोडला.

तोफेची भयंकर गर्जना व त्यांत "दीन दीन" ह्या भयंकर शब्दाचे प्रतिध्वनी पर्वत शिखरामधून घुमत असलेले ऐकून रजपुतांची त्रेधा उडाली. त्यांचीं मनें भीतीग्रस्त झालीं व आंगास कंप सुटला कारण त्यांजवळ तोफा किंवा बंदुका ह्यापैकीं कांहींहीं हत्यार नव्हतें. फक्त तरवारीवरच मदार होती.

राजसिंहापुढें हा प्रसंग मोठ्या धोक्याचा उभा राहिला. त्यास बचावाचा एकही मार्ग दिसेना. शत्रूचें सैन्य आपल्यापेक्षां संख्येनें वीसपट अधीक, शिवाय दोन्हीं मार्ग रोंखून धरलेले, तेव्हां बाहेर निघावें कसें? इतक्या जरी अडचणी होत्या तरी तो वीर मुळींच डगमगला नाहीं. त्यानें कृतनिश्चय केला कीं, परिणाम कांहींहीं होवो! विजय अगर यमपुरी. असा निर्धार करून त्यानें आपल्या सैनिकांस एकेजागीं जमा केलें आणि म्हणालाः—

"मित्रहो! आज मी अंतःकरणपूर्वक आपणांजवळ क्षमा मागत आहे. माझ्या अदूरदर्शित्वामुळेंच आपण ह्या संकटांत सांपडलों आहों. पर्वतावरून खालीं उतर-

ण्यामध्यें, आपण चुकी केली आहे. आतां ह्या रस्त्याची दोन्हीं नाकीं बंद झालीं आहेत, आणि तेथून तोफांचे आवाज ऐकूं येत आहेत. आपणांपेक्षां वीसपट अधीक माणसें तेथें जिवावर उदार होऊन आपणाबरोबर सामना देण्यास तयार होऊन उभीं आहेत. आतां आपणांस आपल्या प्राणसंरक्षणाची आशा नाहीं असें जरी स्पष्ट दिसत आहे तरी पण त्यांत काय आहे ? आपण रजपूत म्हणवून मरणाला भ्यावें काय ? नाहीं. नाहीं. बंधुहो ! आपण प्रस्तुत प्रसंगास तोंड दिलें पाहिजे. पराभवानें आपलें काळें ठिक्कर झालेलें तोंड जिवंत राहून परत जाऊन दाखविण्याची इच्छा एकही रजपूत करणार नाहीं. पण मरायचें केव्हां ? मारून मरायचें ! मरणापूर्वीं निदान दोन मोंगलांचा प्राण घेणार नाहीं तो रजपूतच नव्हे, असें समजा. ह्या रस्त्यानें घोडे चालतील असें नाहीं, ह्मणून घोडे सोडून द्या. चला ! हातात समशेर पकडा. व आपण बाणासारखे जाऊन त्या तोफेवर तुटून पडूं. व ती जिंकून घेऊं. आणि मग आपण किती मोंगलांस धारातिर्थी पाठवून आपले देह समारांगणावर ठेवतों तें त्यांस समजेल."

ताबडतोब रजपूतांनीं घोड्यावरून उड्या मारल्या. ते म्यानांमधून समशेरी खेंचून उभे राहिले. त्यांचे दृढनिश्चयी चेहेरे पाहतांच राण्यास समाधान वाटलें. आज प्रत्येक रजपूत मरेपर्यंत लढेल, मागें ह्मणून हटणार नाहीं, अशी त्याची खात्री झाली. हा त्यांचा उत्साह पाहून राण्यानें हुकूम केला कीं, 'दोघां दोघांची हार लावा.' ते ज्या वेळेस घोड्यावर होते त्यावेळेस त्या अरुंद रस्त्यानें एकामागें एक स्वार अशा प्रकारें चालूं शकत. आतां पायीं चालूं लागल्यामुळें, दोघे दोघे रजपूत एकामागें एक चालण्यास अडचण झाली नाहीं. सर्वांच्या पुढें राणा राजसिंह चालत होता. आज आपण पराक्रम करून मरणार. ह्या भावनेनें त्याचें मुख प्रफुल्लित झालेलें दृष्टीस पडत होतें. ती तुकडी ताबडतोब कूच करून सामन्यास तयार झाली. ज्या प्रमाणें आकाशामध्यें ढग अचल राहतात त्याप्रमाणें तीं दोन्हीं लष्करें स्तब्ध उभीं राहिलीं होतीं. जो तो वरिष्ठांच्या हुकमाची मार्गप्रतिक्षा करीत होता. इतक्यांत राणाजीनें मोंगल लष्करावर हल्ला करण्यास हुकूम केला. त्या बरोबर "हरहर महादेव" "माताजीकीजय" असे वीरोत्पादक शब्द उच्चारून पाण्याच्या ओघाप्रमाणें ते अवघे शंभर रजपूत त्या हजार मोंगलांवर तुटून पडले. त्यांनीं मोंगलांस तोफ डागण्यासही अवधी दिला नाहीं. इकडून दिल्हेरखानानेंही आपल्या सैनिकांस तयार रहाण्यास हुकूम दिला. त्याबरोबर त्यांनींही "अल्लाहो अकबर" ह्या शब्दध्वनीनें तो डोंगराळप्रदेश दणाणून सोडला. ते रजपूतांच्या हल्याचा प्रतिकार करण्यास तत्पर झाले. ताबडतोब हातघाईच्या लढाईस सुरवात झाली. रजपूत वीर जिवावर उदार झालेले होते. मारीन

किंवा मरेन ह्या दृढ निश्चयानें ते लढत असल्यामुळें, एक एक रजपूत दोघां दोघां मोंगलांसहि दाद देईना. मोगलांचीं शिरें सपासप उडूं लागलीं. रजपूतांची संख्याही कमी होऊं लागली. विशेष नुकसान मोंगलांचेंच होऊं लागलें. प्रत्येक रजपूत प्राणाची पर्वा करीनासा झाला. मोंगलांस रजपूत काळासारखे वाटूं लागले. त्यांच्या हृदयांत धडकी भरली. पण काय ? शंभर रजपूत हजार मोंगलांबरोबर कितीवेळ टिकाव धरणार ? त्यांची हिंमत खचली; ते नामोहरम झाले. राजसिंहाची खात्री झाली कीं, आतां अपयश आपल्याच माथीं खास. त्यानें रजपूतांस चेव आणण्याचा अटोकाट प्रयत्न केला, पण व्यर्थ; मूठभर रजपूत त्या अवाढव्य मोंगलसेनेचा गराडा फोडून कसे बाहेर पडणार ! इतक्यांत, मोंगलांच्या पिछाडीच्या बाजूस हजार बंदुका उडाल्याचा आवाज त्यांच्या कानीं पडला. आणि त्याबरोबर शंभरएक मोंगल धूळ खात जमीनीवर पडले ! दिल्हेरखान आश्चर्यचकित होऊन मागें वळून पाहूं लागला. त्यानें काय पाहिलें ?

प्रकरण १८ वें समाप्त.

प्रकरण १९ वें.

विजय.

दिल्हेरखानानें मागें फिरून पाहिलें, तों हजार एक घोडेस्वार बारीक व झिरझिरीत काळ्या वस्त्रांनीं मुख आच्छादन केलेले आपणांवर पिछाडीच्या बाजूनें हल्ला करीत आहेत असें त्यास दिसलें. दोहोंबाजूनें मारा सुरू झाला. रजपूतांच्या ध्यानींमनींही नसलेली ही अकल्पित मदत मिळतांच त्यांस उमेद आली. ते द्विगुणित उत्साहानें लढूं लागले, मोंगल घाबरले. त्यांचा त्या नवीन दमाच्या स्वारांबरोबर टिकाव लागेना. ते वाट फुटेल तिकडे पळूं लागले. दिल्हेरखानाच्यानेंहि त्यांस अटकाव करवेना. ही संधी पाहून ते बुरखेवाले स्वार " जय कालीमाताकी जय " असा जयघोष करीत त्यांच्या मागें लागले.

दिल्हेरखानानें आपल्या छिन्नविछिन्न झालेल्या सैन्यास हुरूप आणण्यासाठीं, हर प्रयत्न केले पण एकवेळ बिघडलेली घडी पुनः सुरळीत झाली नाहीं.

हा वेळपर्यंत राजसिंह आश्चर्यमग्न होत्साता स्तब्ध उभा होता. ही मदत कोणाकडून आली, ह्याचें त्यास मुळींच अनुमान करितां येईना. इतक्यांत एक काळ्या बुरख्याचा स्वार राण्याजवळ येऊन " महाराणाजीचा विजय असो." असें ह्मणून जवळ येऊन उभा राहिला. राण्यानें त्या स्वारास कांहीं अडचण नसल्यास बुरखा दूर करण्यास सांगितलें, त्याबरोबर स्वारानें बुरखा दूर केला. बुरखा दूर करतांच

राणा ह्मणालाः—" कोण प्रतापसिंह ? ऐन प्रसंगीं धांवत येऊन मदत करणारा वीर प्रतापच काय ? "

" होय महाराज. हाच तो प्रताप. जो स्वाभिमानासाठीं झगडत असतां आपल्या काकांच्या इतराजीस कारणीभूत झाला. तोच हा. "

" आज आपण ऐनप्रसंगीं येऊन आमच्या यशाचें रक्षण केलें. जर वेळेवर आपली मदत मिळाली नसती तर खचित सांगतों कीं, हे सर्व माझे पाठिराखे मजसुद्धां एव्हांशीं यमाच्या दरबारीं दाखल होऊनसुद्धां चुकले असते. आपले ह्या राष्यावर फार फार उपकार झाले आहेत ह्याची फेड केव्हां होईल तेव्हां खरी. "

" राणाजी, हे माझे आपणांवर मुळींच उपकार नाहींत. पण उलट माझ्या प्रिय-भगिनीस दुष्ट मोंगलांच्या हातून सोडविण्यासाठीं आपण हें एवढें मोठें धाडस केलें. प्राणाचीही पर्वा न करितां, एका रजपूत स्त्रीस दुष्टाच्या हातून सोडविण्याचें जें मनोधैर्य आपण दाखविलें आहे, तशाप्रकारचें धैर्य आज आपल्या ह्या राजस्थानामध्यें कोणता रजपूत दाखवील ? अहाहा ! राणाजी, आपल्या प्रताप सूर्यापुढें मोंगल कस्पटाप्रमाणें आहेत. केवढें आपलें मनोधैर्य ! जो रजपूत निव्वळ शंभर सैनिकांनिशीं दोन हजार मोंगल स्वारांबरोबर सामना करण्यास मुळींच कचरला नाहीं, त्याच्या धैर्याचें माझ्यासारख्या पामरानें काय वर्णन करावें ! वीरप्रसू अशा ह्या राजस्थानास आपण धन्य केलें. आपल्या निशाणाखालीं जमा होऊन मातृभूमीसाठीं लढण्यास, देशसेवेसाठीं देह वाहिलेले पन्नासहजार वीर आमच्या मंडळीजवळ आज तयार आहेत. आमचे गुरुवर्य परमहंसजी ह्यांच्या अवर्णनीय उत्कटेच्छेनें आज प्रत्येक रजपूत मरावयास तयार झाला आहे. त्यांच्या उत्तेजक वाणीनें प्रत्येकाच्या हृदयांत देशासाठीं लढणें हें माझें परम पवित्र कर्तव्य आहे, तें मी बजाविलेंच पाहिजे अशी अंतःस्फूर्ति उत्पन्न झाली आहे. आमच्या स्वामिनीची आज्ञा ह्मणजे ती कोणतीही असो, ती बजाविण्यास तत्पर होणारे आज पन्नासहजार वीर तयार आहेत. असें हें देशोद्धारक गुप्त वीर मंडळ, आज अशा ह्या बिकटप्रसंगीं माझ्या वहिणीची अब्रु बचाविण्यास, आमच्या सोळंखी वंशांतील कुमारिकेची लज्जा संरक्षण करण्यास, आमच्यां कुलास निष्कलंक राखण्यास कारणीभूत होण्यापूर्वी, राणाजी, आपण स्वतः जो मान मिळविला आहे त्याची मी किती प्रशंसा करूं !"

" प्रतापसिंह, आपण कितीहि स्तुति करा. जोंपर्यंत माझ्या शरीरांत प्राण आहे तोंपर्यंत माझ्या मातृभूमीस ह्या दुष्टांच्या हातून सोडविण्यासाठीं मी विश्रांति घेणार नाहीं. आपण ह्या देशाचे खरे राजे असतां, ह्या चोरांनीं आह्मांस गचांडी मारून दूर ढकलणें ! हा न्याय आहे का ? नाहीं. तर मग आपण ह्या आपल्या देशासाठीं लढून मरण्यास तयार कां होऊं नये ! आपल्या देशोद्धारक गुप्त वीरमंडळांचे प्रयत्न अवर्णनीय

आहेत. तें पन्नास हजार वीर स्तुतीस पात्र आहेत. ज्यांनीं मातृभूमीसाठीं आपला देह समर्पण करण्याचा संकेत केला त्यास सद्गतीच मिळेल. प्रतापसिंह! आज ह्या मंडळीचेंच आपणांवर उपकार झाले आहेत. पुढेंही प्रसंग बिकट आहे. तरीहि हा राजसिंह, आपल्यासारख्या वीरांची मदत मिळाल्यास, मोंगलांबरोबर दोन हात करण्यास तयार आहे."

"महाराणाजींची इच्छा परमेश्वर पूर्ण करील. महाराज आपणांस आतां हीच विनंती आहे कीं, आपण चंचलकुमारीस घेऊन उदेपुरीं प्रयाण करावें. सामोरील रस्ता मोकळा झाला आहे. उरलेल्या मोंगलांस शासन करून आह्मी परभारें उदेपुरास येऊं."

हा विचार पसंत पडतांच, राण्यानें आपले लोक जमा केले. व चंचलेचा मेणा मध्यंतरीं घालून, उदेपुराचा मार्ग धरिला.

हा वेळपयत जयसिंह काय करीत होता तेंही आपणांस पाहिलें पाहिजे. राणा व प्रतापसिंह संभाषणाच्या नादांत आहेत असें पाहून, त्यानें एकट्यानेंच त्या खिंडीच्या बाहेर प्रयाण केलें. तो बाहेर जाऊन तेथील जागेचें निरीक्षण करूं लागला. इतक्यांत त्यास एका झाडाखालीं एक स्त्री बसलेली दिसली. त्या बरोबर तो तेथ आला. त्या स्त्रीचें सौंदर्य पाहून त्यास मोह उत्पन्न झाला. ज्या ठिकाणीं लढाई होत आहे अशा भयंकर स्थळीं, स्त्रीनें येणें हें त्यास जरा चमत्कारिकच वाटलें. तरी पण तिच्या दुःखित मुद्रेवरून त्याच्या अंतःकरणांत निरनिराळे विकार उत्पन्न होऊं लागले. तो जवळ जाऊन तीस ह्मणाला. "बाई आपण कोठें जातां?"

"रस्ता मिळेल तिकडे?"

"ह्मणजे, आपण घर सोडते वेळीं तें पण निश्चित केलें नाहीं कीं काय?"

"निश्चित केल्यावांचून कां कोणी घराबाहेर पडत असतं!"

"मग सांगा तर, ह्मणजे मी आपणांस त्या ठिकाणीं पोहोंचतें करीन."

"मला कीं नाहीं, आतां चालायची शक्ति नाहीं. मी तुमच्या बरोबर कशी येणार?"

"हा पहा माझा घोडा आहे. आपण दोघेंहि याच्यावर बसून जाऊं."

"मग दिल्लीस पोहोंचायला किती वेळ लागेल?"

"तुह्मांला दिल्लीस का जावयाचें आहे? तिकडे तुमचें काय काम आहे?"

"माझी सखी चंचलकुमारी तिकडे गेली आहे. तिच्या बरोबर जावें ह्मणून मी निघालें तों इथं लढाईच जुंपली. कायहो! हें लष्कर तरी कोणाचं?"

"हें लष्कर महाराणा राजसिंहांच्या मदतीस आलें आहे. त्यांचा जय झाला आहे. चंचलकुमारीची सुटका होऊन, त्या आतां आमच्या महाराणीसाहेब होणार आहेत.

मी त्यांच्या पागेवरील एक अंमलदार आहे. तुमची इच्छा अम्मलदारीण व्हावयाची असल्यास हा दास तुह्मांला आपल्याबरोबर नेण्यास तयार आहे."

जयसिंहाच्या तोंडचे चंचलकुमारीच्या सुटकेबद्दलचे शब्द ऐकतांच, निर्मलकुमारीस अत्यानंद झाला. ती कोणत्याहि भावनेनें असो, पण जयसिंहाबरोबर जाण्यास तयार झाली. त्यानें तीस हात देऊन घोड्यावर घेतलें व घोडा पिटाळला. हें जोडपें राणा बाहेर पडण्याच्या संधीसच तेथें आलें. राण्यानें जयसिंहाच्या तोंडून निर्मळकुमारीची हकीकत ऐकिली व निर्मळेस चंचलकुमारीच्या शेजारीं मेण्यांत जागा करून दिली. त्यामुळें जयसिंहाचा मात्र विरस झाला, प्रसंगाकडे नजर देऊन त्यानें तीही वेळ टाळली, पण त्यानें आपली पूर्वीची मेण्याजवळची जागा मात्र सोडली नाहीं.

प्रकरण १९ वें समाप्त.

प्रकरण २० वें.

रूपनगर कीं उदेपूर ?

राजसिंहाचा पराभव होण्याच्या ऐन संधीस, प्रतापसिंहाच्या येण्यानें फांसा उलटून राणा विजयी झालेला आपण पाहिलेंच आहे. चंचलकुमारीच्या शुद्ध प्रेमामुळें, ईश्वरानें तिची सुटका केली व तिच्या इच्छेनुरूप राजसिंहाचें व तिचें मिलन केलें. चंचलेच्या आनंदास भरतीच आली होती, असें ह्मणावयास हरकत नाहीं. तशांत निर्मला मेण्यांत येऊन बसतांच ती हर्षातिरेकानें जवळ जवळ बेफामच झाली. निर्मलेस गाढालिंगन देऊन तिनें नको नकोसें केलें. शेवटीं एकदांची राजसिंहाची स्वारी उदेपुरीं येऊन पोहोंचली. त्यानें तूर्त चंचल कुमारीस आपल्या राणीवसांत ठेविलें. आपण ज्या कार्यासाठीं गेलों होतों तें कार्य तर झालेंच. व त्या प्रमाणें चंचलेसही तिच्या विनंती वरून मुक्त केली पण आतां पुढें तिचें काय करावयाचें ह्याचा त्यास विचार पडला. तिला ह्यापुढें उदेपुरीं ठेवावें कीं, तिच्या बापाकडे रूपनगरास पाठवावें ह्याचा निश्चय करणें त्यास विकट वाटलें. जोंपर्यंत ह्या बाबतीचा त्याचा निश्चय कायम झाला नाहीं, तोंपर्यंत त्यानें चंचल कुमारीची मुळींच भेट घेतली नाहीं.

इकडे चंचलकुमारीचेंही मन द्विधा झालें. तिलाहि राजाच्या ह्या वर्तणुकीचा विस्मय वाटूं लागला. राण्याची इच्छा मजबरोबर लग्न करण्याची असती, तर त्यानें असें मौन धरलें नसतें असें तीस वाटूं लागलें. जर त्याची तशी इच्छा नसेल तर त्याच्या अंतःपुरामध्यें पडून राहणें हें लाजिरवाणें आहे. माझ्या मनाला वाटेल तिकडे मी निघून जाईन ह्या प्रमाणें तिचे विचार चालले होते.

राण्याचा कोणत्याहि बाबती संबंधानें निश्चय होईना, ह्मणून चंचलकुमारीचें मत कसें काय आहे तें ऐकण्याच्या जिज्ञासेनें तो तिकडे गेला आणि जातेवेळीं चंचलकुमारीनें पाठविलेलें पत्र जें अनंतमिश्राजवळून जयसिंहानें घेतलें होतें, तें नंतर राजसिंहास जयसिंहानें दिलें होतें तें घेऊन तो चंचलकुमारीकडे आला.

राणा येऊन आसनावर बसला. त्याबरोबर चंचलकुमारीनें त्यास नमन केलें व लज्जेनें खालीं मान घालून राण्याजवळच उभी राहिली. चंचलकुमारीचें सौंदर्य अवलोकन करतांच राण्याचें मन चलबिचल झालें. पण आत्मसंयमनानें मनाचें आकलन करून राणा ह्मणाला, "यापुढें तुमचा विचार रूपनगरास जाण्याचा आहे कीं येथें राहण्याचा आहे? तें ऐकण्यासाठींच आज मी येथें आलों आहें."

हा प्रश्न ऐकतांच चंचलेच्या अंतःकरणांत वेदना उत्पन्न झाल्या. तिला मुळींच बोलवेना. ती स्तब्धच राहिली.

हें पाहून राण्यानें पत्र बाहेर काढून तिला दाखविलें व ह्मणालाः—हें पत्र तुह्मींच पाठविलें होतें काय?

"होय."

"मग हा सर्व मजकूर खरा आहे एकूण?"

"खरा न असायला काय झालं! जर कृतीच त्याप्रमाणं घडली आहे तर मग तो मजकूर तरी खोटा कसा असेल? महाराज! जे क्षत्रियराजे ज्या कन्यांचं हरण करितात, ते त्यांच्याशीं विवाह करण्यासाठींच नव्हे का? दुसऱ्या कोणत्याही कारणानं स्त्रीचं हरण केलं असतां तें महापापच गणलं जातं!"

"मी कांहीं तुमचें हरण केलें नाहीं परंतु तुमच्या कुलाचा बचाव करण्यासाठींच मुसलमानांच्या हातून तुमची मुक्तता केली आहे. म्हणून आतां तुम्हांस तुमच्या पित्याकडे परत पाठवावें हाच खरा राजधर्म मला पसंत पडतो आहे."

हा वेळपर्यंत चंचलकुमारी स्त्रियांच्या नैसर्गिक लज्जेस अनुरूप अशाच रीतीनें खालीं मान करून जबाब देत होती. पण यापुढें तिच्यानें राहवेना. तिनें आपलें मुख एकदम वर केलें व राण्याच्या मुखाकडे पाहून म्हणाली, "महाराज तुमचा राजधर्म तुम्हीं पाळा. माझ्या धर्माची मलाहि स्मृती आहे. मी ज्या दिवशीं आपल्या चरणकमळीं माझा आत्मा समर्पण केला, त्या दिवसापासूनच मी आपली स्त्री होऊन चुकलें आहे. आपली इच्छा असली तर आपण माझा अंगिकार करा. इच्छा नसली तर अंगिकार करूं नका. पण माझ्या धर्माप्रमाणें मी आपली झालेलीच आहे. यापुढें मला दुसऱ्याची होणें कधींही शक्य नाहीं. आपण माझे स्वामी आहां, असें माझी मनोदेवता मला सांगत आहे, तेव्हां आपण जो हुकूम कराल तो मानणं हें माझं

कर्तव्य आहे, आपण रूपनगरास जाण्यास सांगितल्यास मी रूपनगरास जाईन. पण पुढें माझी स्थिती कोणती होईल ह्याचा कांहीं आपण विचार केला आहे काय ?"

" असें जर आहे तर मग आपण येथेंच रहा."

"मी राहीन खरी. पण तुमच्या दारीं अतिथीसारखी किंवा तुमच्या घरच्या दासीसारखी मुळींच राहणार नाहीं ! कारण रूपनगरची राजकन्या ह्या ठिकाणीं राणीप्रमाणेंच राहूं शकेल ! "

" असलें सुंदर रत्न ज्याच्या भाग्यांत असेल तो नशिबवान्च समजावयाचा ! पण माझें मन अद्यापही असल्या सुंदर रत्नाचा स्वीकार करण्यास धजत नाहीं. " शास्त्रांत म्हटलें आहे कीं, " वृद्धस्य तरुणी विषम् "

" आपण असंच म्हणता का कीं, तुम्हीं वृद्ध आहां ?"

राजसिंह—मी तरुण तर नाहींच.

चंचल—महाराज ज्याच्या मनगटांत शक्ति आहे, तोच, रजपूत स्त्रीच्या मतें तरुण होय. तरुण असून दुर्बळ असल्यास त्यास रजपूताची मुलगी म्हाताराच म्हणेल.

राज—शिवाय मी स्वरूपवान्हि नाहीं.

चंचल—कीर्ति हेंच राजांचें स्वरूप आहे.

राज०—पण माझ्याहून पुष्कळ तरूण, स्वरूपवान्, बलवान् अशा रजपूतांची वाण आहे असें नाहीं.

चंचल—मी माझा आत्मा आपल्या चरणीं अर्पण केला आहे. ह्याउप्पर मी दुसऱ्याची पत्नी होऊं शकणार नाहीं. आपण जर माझा त्याग केला, तर मी राज सरोवरामध्यें पडून अपघात करीन.

राज०—शाबास ! माझ्या योग्य राणी तूंच आहेस. तूं पूर्वी संकटांत सांपडल्यामुळें पत्रिका पाठविण्याचें धाडस केलें असशील, अशा समजुतीवर मीं अद्याप तुजशीं निराळ्याच प्रकारचें संभाषण केलें, पण तुझा तो निश्चय कायम आहे हें पाहून मला संतोष वाटत आहे. पण तुजबरोबर विवाह करण्यापूर्वी राणा विक्रमसिंहाचें मत घेणें भाग आहे. त्याची खुशी नसल्यास विपरीत परिणाम होईल. विक्रमसिंहाजवळ जरी सैन्य थोडें असलें, तरी तो सोळंखी वंशांतील वीर आहे ! तो बहादूर सेनानायक आहे. त्यानें मजशीं निष्कारण वैरभाव धरून मोंगलांस साह्य झाल्यास, पुढें मोंगलांबरोबर जी मोठी लढाई होणार आहे त्यावेळीं माझें नुकसान होईल. त्याच्या संमतीवांचून लग्न केल्यास तो माझ्या मदतीस कधींहीं येणार नाहीं. म्हणून प्रथम त्यास पत्र लिहून त्याची संमती मिळवावी असें मला वाटतें. तुझा कसा काय विचार ?

चंचलः—आपल्या मर्जीबाहेर मी तिळमात्रही जाणार नाहीं. वडिलांचा आशीर्वाद घेऊन नंतरच आपली राणी व्हावें अशी माझीहि इच्छा आहे.

तदनंतर राणा राजसिंहानें एक खुलासेवार पत्र लिहून सोळंखीकडे पाठविलें व त्याच दूतावरोबर चंचलकुमारीनेंहि एक पत्र आपल्या आईस लिहिलें. थोडक्याच दिवसांत पत्राचा जबाब आला. विक्रमसिंह आपल्या पत्रांत काय म्हणतो ?

प्रकरण २० वें समाप्त.

प्रकरण २१ व.

राजसिंहाचें पत्र.

रूपनरच्या राण्याचा जबाब लवकरच आला, पण तो फारच भयंकर होता. तो आपल्या पत्रांत ह्मणतो--" आपण (राजसिंह) राजपुतान्यांतील सर्व घराण्यांपेक्षां ऊच्च कुळांतील आहां, रजपूतांचें शिरोभूषण आहां, पण ह्यासमयीं आपण रजपूतांच्या नावांस कलंक लावूं पहात आहां. आपण माझ्या मुलीचें हरण केलें. तिला दिल्लीस जाण्यास अटकाव केला ह्मणूनच आपणांबरोबर वैर संपादन करणें हा माझा धर्म मी समजतों आहें. आपण तिजबरोबर लग्न करणें सर्वस्वी माझ्या इच्छेविरुद्ध आहे.

आपण ह्मणाल कीं, पूर्वीच्या काळीं क्षत्रियवीर कन्यांचें हरण करून नंतरच त्यांच्याशीं विवाह करीत होते. भीष्म, अर्जुन, श्रीकृष्ण ह्यांनीं कन्यांचें हरण करून विवाह केले होते ही गोष्ट खरी आहे, पण त्यांच्याप्रमाणें आपल्या आंगीं शक्ति आहे काय ? जर आपण येवढे बलवान् आहां तर हिंदुस्थानावर मोंगलांस राज्य करूं कां देतां ? स्वभावतःच कोल्हा असून सिंहासारखें वर्तन केल्यास मूर्खपणा होणार नाहीं काय ? मीही रजपूत आहे. मुसलमानास कन्या अर्पण केल्यानें माझ्या कुलास कलंक लागणार आहे हें मला कळत आहे. आपल्या आंगीं मोंगलांबरोबर झगडण्याचें सामर्थ्य आहे असें मला माहीत असतें तर मी मोंगलांच्या मागणीस तुच्छ करून आपणांस माझ्या मुलीचें कन्यादान केलें असतें.

पण काय ? जोंपर्यंत आपण माझ्या कन्येस–योग्य–वर आहां, असें मला आढळून येणार नाहीं तों पर्यंत आपण तिजबरोबर विवाह केल्यास मी आपणांस श्राप देईन. पण पुढें आपण योग्य व लायक वर आहां असें समजल्यास मी अंतःकरणपूर्वक तिचें आपणांस कन्यादान करीन." ह्या प्रमाणें पत्राचा सारांश होता. राण्यानें चंचलकुमारीस तें पत्र वाचून दाखविलें व त्यांतील गर्भितार्थ समजावून तो ह्मणाला ." आतां पुढें कसें काय करावयाचें ?

चंचलेच्या नेत्रांतून अश्रूश्राव होऊं लागला ती स्फुंदत स्फुंदत ह्मणाली, " आपल्या बापाचा श्राप घेऊन कोणती मुलगी लग्न करण्याची हिम्मत करील ती करो !"

राज०—तर मग आतां आपली रवानगी रूपनगरास करावी कीं काय ?

चंच०—रूपनगरास जाण्यापेक्षां वीष खाऊन प्राण त्याग करणं अधीक सोइस्कर होईल असं मला वाटतं.

राज०—ठीक आहे तर मग मी ह्या प्रमाणें ठराव करीत आहे कीं, तुझ्या वडिलांच्या संमत्तीवांचून लग्न तर करावयाचें नाहींच पण त्यापूर्वी मोंगलांबरोबर लढून त्यांचा पराभव तरी करीन, किंवा समरांगणामध्यें देह तरी ठेवीन. विक्रमसिंहाच्या ह्मणण्याप्रमाणें मी जंबुक आहे कीं सिंह आहे ह्याची तुलना तरी करावयास सांपडेल. कसा काय आपला विचार ?

चंचल०—ईश्वर आपणांस मोंगलाबरोबरील संग्रामात जयच देईल.

राज—पाहुं या काय होतें तें, जर ह्या युद्धामध्यें जय मिळाला तर तुझे वडील तुला जरूर आशिर्वाद देतील.

चंचलः—पण तोंपर्यंत मी कुठं रहावं ?

राज०—माझ्या राणीवसांत दुसऱ्या राण्यांप्रमाणें तुझीहि निराळी व्यवस्था ठेवण्यांत येईल. दासदासींचा बंदोबस्त करण्यांत येईल. व मी अशीही बातमी उठवीन कीं, थोडक्याच दिवसांत तुझें व माझें लग्न होणार आहे; त्यावरून सर्व लोक तुला महाराणी म्हणूनच मान देतील. मात्र जोंपर्यंत तुझें व माझें लग्न झालें नाहीं तोंपर्यंत तुझी व माझी भेट होणार नाहीं.

ह्याप्रमाणें नक्की विचार ठरल्यावरोवर राण्यानें एकंदर बंदोबस्त केला. व तो आपल्या पुढील तयारीस लागला.

इकडे रूपनगरच्या राजकन्येस रजपुतांनीं रस्त्यामधून पळवून नेल्याची बातमी दिल्लीस पोहोंचली. ती ऐकल्यावरोबर औरंगजेबाच्या आंगाचा तिळपापड झाला, त्यानें त्या क्रोधाच्या आवेशामध्यें, लष्करामधील कित्येक अम्मलदारांस बरतर्फ केलं, व कित्येकांनां ठार मारविलें. खऱ्या गुन्हेगारांस शिक्षा करणें हें काम लहान—सहान नव्हतें. राजसिंहाची राजधानी उदेपूर व त्या बाजूचा प्रांत इतका अडचणीचा व भयंकर होता कीं, त्याच्या बरोबर टक्कर देणें म्हणजे तें काम कांहीं सोपें नव्हतें, राणा प्रतापसिंहाबरोबर टक्कर मारतांनां अकबराची कशी त्रेधा उडाली तें इतिहासज्ञांस अवगत आहेच. औरंगजेबाचा स्वभाव फारच उतावळा होता. त्यास, कोणावरही क्रोध उत्पन्न झाला असतां तो तो सहन करीत नसे, तो आपल्या मनांत असेंच समजत असें कीं, मी हिंदुंचा नाश करण्यासाठींच जन्मलों आहे. राजसिंहाच्या अपराधासाठीं एकंदर हिंदु प्रजेस गुन्हेगार ठरवून त्यांजकडून जिझियाकर सक्तीनें वसूल करण्याचा त्यानें ठराव केला. हा कर वसूल करण्यासाठीं प्रथमच हुकूम गेले होते पण या पुढें त्यास भयंकरच रूप प्राप्त झालें. ह्या हुकुमाच्या अमलबजावणीमुळें,

महाराणा राजसिंह कादंबरीच्या अगाऊ आश्रयदात्यांचीं नांवें.

श्रीयुत वसंतराव माधवराव छापवाले, मुंबई
„ महादेव लक्ष्मणशेट कोळगे, „
„ नागुजी संभाजी गंगला, „
„ दिनकरराव रामराव देशमुख, (माने) माढा
„ रामचंद्र दत्तात्रय फाटक, कोल्हापूर
„ K. M. Singne, मुंबई
„ आब्राहाम इसराळ, „
„ रामचंद्र महादेव कुंभार, „
„ बाळकृष्ण यशवंत सावंत मसुरेकर, „
„ यशवंत रामचंद्र सावंत मसुरेकर, „
„ दत्तात्रय भिकाजी नेवगे, „
„ अनाजी विठोजीराव कदम, „
„ मल्हार गोविंद पवार, „
„ गणपतराव भिकाजी पाठोळे, „
„ सखाराम शिवराम लोटलीकर, उमेळा
„ हरिश्चंद्र लक्ष्मणशेट सलांखे, मुंबई
„ दुर्गानाथ गौरीनाथ दवे, पेटलाद
„ मोरेश्वर लक्षुमण क्लार्क, नाशीक
„ सिताराम अनाजी मळेकर, शिरगांव
„ शं. ग. आपटे, „
„ T. L. Naidu, बेळगांव
„ S. D. Rajadhyax, मुंबई
„ दामोदर जगन्नाथ क्लार्क, „
„ रामचंद्र बळवंत एकतारे, सनावद
„ Bramhanand Kanayalal, मुंबई

श्रीयुत Amritrao Purushottam Bhat, बुलढाणा
„ सिताराम गणोजी आंबकर, मुंबई
„ रामचंद्र नारायण काटकर, „
„ रामकृष्ण हरी चव्हाण, श्रीवर्धन
„ केशव कृष्ण खेर, नागपूर
„ दामोदर आंबाजी जोशी मास्तर, मुंबई
„ माधवराव खंडेराव कदम, कर्जत
„ विष्णु खंडूजी राणे, मुंबई
„ धोंडू रामचंद्र सावंत देसाई, „
„ देविदास पत्की, वर्धा
„ P. S. Deshmukh, अकोट
„ B. B. Mundkar, बेळगांव
„ शंकर नारायण, शिंव
„ अमृतराव शिवरामजी, शिराळा
श्रीमंत धोंडिबा राजे शिर्के डेरपणकर इनामदार, नागपूर
श्रीयुत कृष्णाजी विश्राम नेवरेकर, दापोली
„ सखाराम बालकोजी पाटील टयुटर, कोल्हापूर
„ P. B. Kavatkar Tutor, „
„ हिरामण हरिश्चंद्र म्हात्रे, मुंबई
„ मारुतीराव जोतीराव रावण, निपाणी
„ D. M. Dange, मुंबई
„ बापू नारायणशेट भिसे, सावंतवाडी
„ आत्माराम नारायणशेट थरवल, मुंबई
„ नारायण जयराम बागवे, „
„ सदाशिव बाळाजी, नागपूर

श्रीयुत रामकृष्ण दामोदर तारमास्तर, गोरेगांव
,, प्रल्हाद अनंत कावळे, नाशिक
,, गणेश परशराम कोल्हाटकर, ,,
,, शिवराम हरी बापट, बडोदें
,, S. K. Thatay, खानदेश
,, दीनानाथ आत्मारामजी, मुंबई
,, हरी विष्णु पटवारी, नेमाड
,, गणेश शिवा मेथर, अ. मास्तर, कराची
,, मधुसुदन पांडुरंग पुरव, मुंबई
,, रामकृष्ण जैराम मोरे, वर्धा
,, गोविंद विठ्ठल डांगे, हेडमास्तर, दाताळा
,, चनमलप्पा भावेप्पा मूगी, बेळगांव
,, बापूराव सदाशिव शिरसाठे, यादगिरी
,, K. B. Bidwai, Indor
,, Gunpat Narayen Wagh, मद्रास
,, शंकर सदोबा वाडके, मुंबई
,, दादा महादू शेलार, वाशाळें
,, श्रीधर जनार्दन शेपळेकर, इंदापूर
,, तुकाराम गोविंद चिले, मुंबई
,, अमृतराव वामनराव हर्षे, चाणसमा
श्रीमंत मातोश्री कमळाबाईसाहेब धायबर, बडोदें
श्रीयुत Danial Shalom, मुंबई
,, नारायण मोरेश्वर घांगुर्डे, रत्नागिरी
,, पांडुरंगराव सदाशिवराव आठवले, वकील, धारवाड
,, दत्ताराम शिवा सावंत देसाई, मुंबई
,, लक्ष्मण कृष्णाजी डेंगळे, इंजिनियर, मुंबई
श्रीयुत गोविंद कृष्णाजी पाटील ढोले, मुंबई
,, सदाशिव यादव सोनटके, बोदवड
डॉ. संताजी रामजी लाड, ठाणा
श्रीयुत विष्णू ठमाजी नाडकर्णी, येरंडव
,, हणमंतराव भुजंगराव जामगांवकर, टोका
श्रीमती नोनाबाई बिडिण, गोंवा
श्रीयुत बापूजी नारायण जोशी भडगांवकर, फत्तेखेडी
,, तुळसीराम गोविंद औचरे, बडोदें
,, विश्वनाथ हरी नाईक, कोल्हार
,, विठ्ठल केशव नरवणे, हुबळी
,, शिवा देवळी मळगांवकर, मळगांव
,, दामोदर पांडुरंग सुर्वे, मुंबई
,, बाजीराव गोपाळ करकरे, नागपूर
,, D. K. Gadgie, सानखेडा
,, भगवान नारायण मयेकर, मुंबई
,, भिमाजी हणमंत, अ. मास्तर, बळगानुर
,, दादोबा मुकुंदराव साहानी, मुंबई
,, लक्ष्मण आत्माराम गौड ब्राह्मण, वडगांव
,, Daniel S. Hiwale, मुंबई
श्रीयुत नागेशराव बाळकृष्ण धर्माधिकारी, कोल्हा[illegible]
,, Shanker Rao N. कर[illegible]
,, अमृत गोविंद केमकर, बडो[illegible]
,, चिंतामण महादेव लावंड, पुणें
,, कृष्णराव गोविंद साने, मंडलेश्वर
,, गोविंद दाजीशेट सोनार, ममुराबाद
,, दत्तात्रय गोपाळ खांडेकर, हातखांबा
,, सुदाम पांडुरंग मोरे, मुंबई
श्रीमंत नारायण गोविंद दिक्षित, इनामदार, गडहिंग्लज

हिंदु लोक फारच घाबरले, ते मनामध्यें शिव्या श्राप देऊं लागले. शेवटीं बादशहाज-वळ दाद मागूं लागले पण ज्याच्या अंतःकरणीं क्षमेची वृत्तीच नव्हती; तो दाद कशी घेणार ? शुक्रवारच्या दिवशीं, ज्या वेळीं बादशहा जुम्मामशिदीमध्यें ईश्वर प्रार्थना करावयास जात असे, त्या वेळीं लाखो हिंदु लोक एके जागीं जमून त्याची विनंती करूं लागले, पण 'ह्या सर्वांस हत्तीच्या पायाखालीं चिरडून टाका' ह्मणून औरंगजेबानें हुकूम सोडला. बादशाहाचाच हुकूम तो! मग काय विचारतां! त्या हुकमाची अंमल-बजावणी तावडतोब करण्यांत येऊन त्या लाखों मनुष्यांस हत्तीच्या पायाखालीं तुडवून ठार मारिलें!

औरंगजेबाच्या हुकुमाप्रमाणें, सबंध हिंदुस्थानांतून 'जिझिया' कर वसूल करण्यांत येऊं लागला. ब्रह्मपुत्रा नदीपासून सिंधु नदीपर्यंत सर्व हिंदु देवळांचा नाश करण्याचा त्यानें आरंभ केला. हजारों वर्षांचीं पुरातन देवळें जीं उंच अशा पर्वत शिखरांवर होतीं त्यांचाही नाश केला आणि त्याजागीं मशिदी बांधल्या. काशीमधील विश्वेश्वराचें देऊळ फोडलें. मथुरेंतील कृष्ण–केशवाचें देऊळ फोडलें. बंगाल्यामध्येंही तीच स्थिती!

यापुढें औरंगजेबानें राजपुतान्यांतील रजपूतांकडून 'जिझिया' वसूल करण्याचा हुकूम काढला. रजपूतांनीं प्रथम कांकूं केलें पण राजस्थानामध्यें एकट्या उदेपुराशिवाय इतर राज्यें, समुद्रांतील सुकाणाशिवाय ढकललेल्या वाहनासारखीं होतीं. खरी सल्ला देणारा कोणीही रजपूत मोगलदरबारीं नव्हता; जयपुरचा राणा जयसिंह ह्याच वेळीं स्वर्गस्थ झाला होता. विश्वासघातकी, औरंगजेबानें त्यास हरएक युक्तीनें विष देववून त्याचा अंत करविला होता. त्याचा मोठा मुलगा दिल्लीमध्यें कैदेंत पडलेला होता. त्यामुळें जयपुरामधूनही जिझिया कर वसूल झाला. व दुसऱ्या राजांनींही तो दिला. जोधपु-रच्या राण्याचीही अशीच स्थिती झाली होती. त्याच्या विधवा राणीनें प्रथम कर वसूल करणारांस हांकून काढिलें, पण ती स्त्री, पुढें काय करणार? तिनें जिझीया कर देणें कबूल केलें नाहीं, तरी पण त्याच्या ऐवजीं आपल्या ताब्यांतील बराच मुलूख मोंगलांस दिला.

राजसिंहानें हा कर देणें मुळींच कबूल केलें नाहीं. त्यानें शपथ वाहिली कीं, मुसलमानास एक पैही देणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर ह्यासंबंधानें त्यानें औरंगजेबास एक पत्र लिहिलें. त्यापत्रासंबंधानें राजस्थानाचा इतिहास लिहिणारे कर्नल टॉड ह्मणतात कीं, "तो ज्या जातीचा वरिष्ट होता त्या जातीच्या तर्फे त्यानें पत्र लिहून बादशाहास पुष्कळच समजाविलें. त्या पत्रांतील शैली अशी होती कीं, आपल्या मोठे-पणास धोका न पोहोंचतां, बादशाहासही कमीपणा येऊं नये, त्यांत दर्शविलेला निश्चय रीतसर शब्दामध्येंच होता. त्यांतील बादशहास दिलेला दोष भयंकर होता तो वाचून

त्याचें मस्तक भणाणूनच जावें, असें लिहूनही सर्व प्रजेचें हित करणें, प्रत्येकास आपआपला धर्म पाळूं देणें, ह्या प्रकारची बादशहाची वृत्ती पाहिजे असें त्यांत फारच मार्मिकतेनें ग्रथित केलें होतें." अशा प्रकारचें मार्मिक, बाणेदारपणा दाखविणारें, मतस्वातंत्र्याचें दर्शक, व दिसण्यांत गोड असें पत्र पृथ्वीतील कोणत्याही देशांत कदाचित्च लिहिलें गेलें असेल. ह्या पत्राचा जबाब राजसिंहास भिळाला. कीं, आपण आह्मांस जिझीया कर दिलाच पाहिजे. इतकेंच नव्हे, तर आमच्या राज्यामध्यें गोहत्या करावयास पण बाध येणार नाहीं. ती करूं देणें भागच आहे. आणि तुमच्या राज्यांतील सर्व देवळांचा नाश झाला पाहिजे. अशा आशयाचें पत्र होतें. तें पत्र वाचून राजसिंहानें युद्धाची तयारी आरंभिली.

औरंगजेबही युद्धाची तयारी करूं लागला; ही युद्धाची तयारी इतकी जबरदस्त होती कीं, पूर्वीं कोणत्याही युद्धासाठीं त्यानें इतकी तयारी केलेली नव्हती. चीनचा शहानशहा, किंवा इराणचा शहा, हा आपल्यावर चाल करून येत असतां त्याच्या बरोबर झगडण्यास जेवढ्या तयारीची जरूरी असावी त्या पेक्षांही ह्या लहानशा राज्याबरोबर लढाई करण्याची तयारी पुष्कळच पटीनें भयंकर होती.

पूर्वींच्या वेळीं अर्ध्या आशियाखंडांच्या अधिपतीनें–झरक्सेस (XERXES) यानें लहानशा ग्रीस देशावर चढाई करण्यासाठीं, ज्या प्रकारचा भीषण उद्योग आरंभिला होता, त्याचप्रकारचा उद्योग ह्या सतराव्या शतकांतील झरक्सेसानें–औरंगजेबानें–राणा राजसिंहाचा पराभव करण्यासाठीं चालविला होता.

एकंदर इतिहासामध्यें ह्या दोघांचें साम्य जसें दिसून येतें, तसें कोणाचेंही दिसून येत नाहीं. ग्रीस देशाच्या इतिहासामधील ज्यानें वरील प्रकार वाचला आहे त्यास सहजच कळून येईल कीं, राजसिंहाचीही गोष्ट त्याच प्रकारची होती. तीमध्यें व हीमध्यें मुळींच फरक नव्हता.

प्रकरण २१ वें समाप्त.

प्रकरण २२ वें.

मदनोत्सवाच्या ऐवजीं रणोत्सव.

आज वसंत ऋतूचा शेवटचा दिवस आहे. ग्रीष्म ऋतूचा ऊष्णवायू कोमल पुष्पास कोमेजून टाकीत आहे. अशा वेळीं, उदेपुरामध्यें मदनोत्सवाची मोठी धामधूम चालली आहे. ह्या उत्सवामध्यें गर्क झालेले असंख्य स्त्रीपुरुष रस्त्यामध्यें, घांटावर, उद्यानांत जमा झालेले आहेत. रजपूत स्त्रिया नानाप्रकारचीं भूषणें लेऊन डोक्यामध्यें

गुलाबाच्या कळ्या खोंचून जिकडे तिकडे उल्हासांतःकरणानें फिरत आहेत. कोणी कोणी ' हे पुष्पधन्वा ' हे अनंगा ! तुझें हेंच काम काय ? सुकोमल तरुणींना कष्ट देण्याची तुझी ही रीत बरी आहे काय ? धिःकार असो तुला ! ' ह्याप्रमाणें विरही स्त्रियांच्या तोंडांतून शब्द बाहेर पडत आहेत. अशा वेळेला, एका उद्यानाच्या ठिकाणीं आस्ते आस्ते रजपूत लोक जमूं लागले. थोडक्याच वेळांत तें उद्यान संपूर्ण भरलें; इतकी त्या ठिकाणीं गर्दी झाली. ते लोक जमून कांहींही न बोलतां स्तब्ध राहून कोणाची तरी वाट पहात होते असें दिसत होतें. इतक्यांत त्या ठिकाणीं महाराणा राजसिंह व वीरसिंह ह्यांच्या स्वाऱ्या आल्या. त्या दाखल होतांच रजपूत योध्यांनीं एकच हलकल्लोळ केला. ते एकदम ह्मणाले ! महाराणाजी, भारत मातेला मोगलांच्या पंजामधून मुक्त केल्याशिवाय आज आह्मीं मदनोत्सव करणार नाहीं ! आमच्या आंगीं शक्ती नसेल तरच आह्मीं जिझिआ कर देऊं. आमच्या परमपूज्य गोमातांचा संहार आह्मीं हयात असतां आमच्या नजरेसमोर कधींही होऊं देणार नाहीं ! आपण लढाईची तयारी करा ! आह्मीं मारूं किंवा मरूं पण यवनांस शासन केल्याशिवाय मदनोत्सव करणार नाहीं ! हीच आमची प्रतिज्ञा !

राजसिंहानें त्या रजपूत प्रजाजनांस शांत राहण्यास इशारत केली व ते शांत होतांच तो ह्मणालाः—माझे प्रजाजनहो ! आपल्या इच्छेप्रमाणेंच सर्व घडेल. आपण मुळींच काळजी बाळगूं नका. श्री एकलिंगजीच्या कृपेनें ह्या बहादुर प्रतापसिंहासारखे एक लाख वीर आपल्या मदतीस येणार आहेत. त्यांच्या मदतीनें आपण मोंगल बादशहास चांगलाच हात दाखवूं. त्याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. आपल्या परमपूज्य प्रतापसिंहाच्याच कृतीची आपण मला आठवण दिली आहे. आपलें ध्येय साध्य झाल्याविना ऐषआराम हे तुच्छ होत. हें आजच्या मदनोत्सवाचा त्याग करून आपणच मला शिकविलें आहे. मीही माझी तरवार औरंगजेबाचें पारिपत्य करीपर्यंत मुळींच म्यान करणार नाहीं. ही आपणासमोर प्रतिज्ञा करीत आहे. चला तर प्रत्येकानें आपआपल्या तयारीस लागा. इतक्यांत औरंगजेबाची सेनाही येऊन थडकेल. कंबर बांधा ! व धर्माच्या रक्षणासाठीं लढा !

ताबडतोब सर्व सैनिकांनीं श्री एकलिंगजीकी जय ! हरहर महादेव ! म्हणून जयघोष केला व सर्व आपआपल्या स्थानीं परत गेले, व मदनोत्सवाच्या जागीं रणोत्सवाची तयारी सुरू झाली.

प्रकरण २२ वें समाप्त.

प्रकरण २३ वें.

लढाईची पहिली चकमक.

राणा राजसिंहाचें पारिपत्य करण्यासाठीं ससैन्य येण्यास औरंगजेबास जो विलंब लागला, त्याचें कारण लष्कर जमा करणें हेंच होतें. दुर्योधन आणि युधिष्ठिरानें ज्या प्रमाणें ब्रह्मपुत्रेपासून आसमंतातील भागांतून, व काश्मिरापासून केरळ देशापर्यंतच्या भागामधून आपआपल्या साह्यास लष्कर बोलाविलें होतें; त्याप्रमाणें औरंगजेबानें केलें. दक्षिणेमध्यें लढत असलेलें सैन्य जें गोवळकोंडा, विजापूर, महाराष्ट्र वगैरे जागीं लढून अनुभविलेलें होतें,त्या लष्करास बरोबर घेऊन बादशहाचा वडील चिरंजीव शाहआलम, दक्षिणेमधून उदेपुराकडे येण्यास निघाला होता. बादशहाचा दुसरा पुत्र आजिमशहा, बंगालचा सुभा, पूर्व हिंदुस्थानांतील आपलें सैन्य घेऊन मेवाडच्या पर्वतावलीच्या द्वारापाशीं येऊन उभा राहिला. बादशहाचा तृतीय चिरंजीव अकबरशहा, पश्चिमेंतील मुलतानमधून पंजाब, काबूल आणि काश्मिरचे लढवय्ये घेऊन दिल्लीस येऊन पोहोंचला होता. उत्तरेकडून स्वतः बादशहा, दिल्लीचें बादशाही सैन्य घेऊन उदेपुराचें नांवहि जगामध्यें राहूं द्यावयाचें नाहीं ह्या हेतूनें निघाला. ह्याप्रमाणें चोहों दिशांनीं उदेपूर, बादशाही लष्करानें घेरलें गेलें.

असंख्य सर्पांच्या सेनेनें वेढलेल्या गरुडपक्षास जेवढी भीति उत्पन्न व्हावी तेवढीच राजसिंहास उत्पन्न झाली. कौरवपांडवांच्या युद्धानंतर भरतखंडामध्यें एवढ्या मोठ्या सैन्याचा जमाव दुसऱ्या कोणत्याही प्रसंगीं झाला होता कीं, काय ह्याबद्दल संशयच आहे.

युद्धविद्या–सैन्यास लढाईच्यावेळीं नियमसर व हुकुमाबरहुकूम चालविणें–ज्यास इंग्रजीमध्यें Military Tactics ह्मणतात. ही युरोप देशची विद्या आहे. आपल्या पुराणामध्यें अगर जुन्या इतिहासामध्यें आर्यांनीं–बहादुर लढवय्ये ह्मणून जी कीर्ति मिळविली आहे ती त्यांच्या तिरंदाजीमुळें व समशेरबाजीमध्यें प्राविण्य संपादिल्यामुळेंच होय. गतकालीन इतिहासलेखक युद्धविद्या–tactis समजत नव्हते; किंवा ही विद्या पूर्वकाळीं हिंदुस्थानामध्यें नव्हतीच असें ह्मणतात. रामचंद्र, अर्जुन यांस युद्ध विद्येची किती माहिती होती हें आपणांस मुळींच अवगत नाहीं. अशोक, चंद्रगुप्त, शिलादित्य यांच्या कोणत्याही सेनाधिपतित्वाविषयीं आपणांस मुळींच माहिती नाहीं. त्याचप्रमाणें ज्यांनीं हिंदुस्थान जिंकलें ते योद्धे–महम्मदकासम, महंमदगझनी, शहाबुद्दीन, अल्लाउद्दीन, बाबर, तैमूरलंग, नादिरशहा, यानांहि या विद्येचें ज्ञान होतें कीं नाहीं तें समजत नाहीं. ह्या विद्येचा उगम अकबराच्या वेळेनंतरच सुरू झाला. ज्या कौशल्यानें, अकबर, शिवाजी, अहमदअबदल्ली, हैदरअल्ली, हरिसिंह वगैरे सेनापतींनी

व राजांनीं लढाया मारल्या, त्यावेळचें त्यांचें कौशल्य पाहतां असें दिसून येतें कीं, सेनापतीच्या आंगीं जें विद्येचें मुख्य ज्ञान असलें पाहिजे तें त्यांच्या आंगीं होतें. लढाईच्या मैदानामध्यें मस्तक शांत ठेवून एक एक युक्ति लढविण्याची त्यांच्या मेंदुमध्यें शक्ती होती. आपल्या देशांतील इतिहासामध्यें अशाप्रकारच्या रणधुरंधरांचीं जीं थोडीबहुत नांवें आहेत, त्यांत राजसिंह हा कोणाहूनही कमी योग्यतेचा नव्हता. त्याच्यासारखे रणधुरंधर सेनापती युद्धविद्येचें मूळस्थान जें युरोप तेथेंही फारच थोडे होऊन गेले आहेत, असें ह्मटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. मूठभर सैन्याच्या मदतीनें राणा राजसिंहा येवढें भयंकर साहस हॉलंडचा वीरपुरुष विलियम याखेरीज ह्या पृथ्वीवर कोणीही आजपर्यंत केलेलें नाहीं. राजसिंहाची लढण्याची कुशलता पूर्णपणें देण्यास सवड नसल्यामुळें फक्त ह्याखालीं तिचें थोडक्यांत वर्णन केलें आहे.

चार भाग पडलेली औरंगजेबाची भयंकर सेना ज्यावेळीं एकेजागीं झाली त्यावेळीं युद्धकलाविशारद रणपंडितानें जें पहिलें कर्तव्य करावयाचे तें राजसिंहानें केलें. मेवाडच्या आसपास जी पर्वतांची हार आहे, तिच्या पलीकडील बराच सपाट मुलूख जो उदेपुरच्या ताब्यांत होता तो सोडून देऊन त्यानें पर्वतावरच लष्कराच्या एका भागाची छावणी ठोकिली, आणि आपल्या सेनेस तीन भागांत विभागिली. आपल्या मोठ्या पुत्रास (जयसिंहास) सैन्याचा एक भाग देऊन त्यास पर्वतशिखरांवरच मुक्काम करण्याचा हुकूम केला. दुसरा भाग दुसरा राजपुत्र भीमसिंग याच्या स्वाधीन करून त्यास खालीं पश्चिम दिशेकडे रवाना केलें. कारण त्या बाजूकडील रस्ता मोकळा राहून मदत करावयास तयार असणाऱ्या इतर रजपूतांना त्यादिशेनें येण्यास अडचण पडूं नये. तिसरी तुकडी त्यानें आपल्या स्वाधीन ठेविली. आणि तिला घेऊन तो पूर्वदिशेकडे जी 'नयन' नांवाची एक पर्वताची अरुंद खिंड होती, तिथें आपली छावणी करून राहिला.

आजिमशहा ज्या बाजूनें आपलें लष्कर घेऊन येत होता त्या बाजूनें त्यास प्रथम डोंगरांच्या रांगेनेंच अटकाव केला, कारण त्यांवर चढणें दुष्कर होतें; परंतु वरून खालील सैन्यावर दारूगोळा किंवा दगड यांचा मारा करण्यास सोईचें होतें. आजिमशहा पलीकडील बाजूस जाऊं शकला नाहीं.

अजमिराजवळ औरंगजेब आणि अकबरशहा यांची भेट झाली. त्यांनीं आपलीं सैन्यें एकत्र करून डोंगराच्या बाजूस ज्या जागीं आंत दाखल होण्याचे तीन रस्ते होते, त्याजागीं ते येऊन पोहोंचले. हे तिन्ही रस्ते पर्वतामधील अरुंद खिंडीचे होते. एकीचें नांव दुबारी; दुसरीचें नांव देलवाडी; आणि तिसरीचें नांव नयन पूर्वेकडील

मार्गावरील–वर सांगितलेंच आहे. ज्या वेळीं दुबारीजवळ लष्कर आलें त्या वेळीं औरंगजेबानें अकबरशहास पन्नास हजार माणसें देऊन त्या रस्त्यानें पुढें जाण्याची आज्ञा केली. आणि स्वतः त्यानें उदयसागर नामक सरोवराच्या किनारी बाकीच्या सैन्यासहीत मुक्काम करून थोडी विश्रांती घेण्याचा विचार केला.

त्या अरुंद खिंडीच्या रस्त्यानें उदेपुरास जावयासाठीं शहाजादा अकबर पुढें चालला त्याच्या लष्करास पुढें जात असलेलें अडविण्यासाठीं एक माणुसही दृष्टीस पडलें नाहीं. आजूबाजूस पर्वतांची उंचच उंच रांग, त्यावर उगवलेलीं जंगली झाडें मध्यंतरी सरोवरें, सरोवराच्या पाण्याच्या मध्यंतरीं कोठें कोठें लहान लहान बेटें–ह्या प्रकारचें मनुष्यहीन सृष्टीसौंदर्य–लष्कराच्या दृष्टीस पडत होतें, पण कोणाही माणसाचा मात्र त्यास पत्ता लागत नव्हता. जिकडे तिकडे शांत ह्या प्रकारची स्थिती पाहून अकबरानें एके जागीं छावणी केली, त्याच्या मनांत असें आलें कीं, मला भिऊन इकडील लोक पळून गेले असावेत. छावणी पडतांच नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें मोगल शिपाई मौजमजा करण्याच्या मार्गास लागले. कोणी जेवणाच्या तयारींत, तर कोणी ख्यालीखुशालींत खेळण्यासवरण्यांत तर कोणी निमाझ पढण्यांत गुंतून गेले. त्यावेळीं ज्याप्रमाणें निजलेल्या मुशाफरावर उडीमारून वाघ तुटून पडतो त्याप्रमाणें कुमार जयसिंह शाहाजादा अकबराच्या फौजेवर तुटून पडला. ह्या शूर वाघानें सबंध मोगल सेनेस आपल्या तरवारीचा सपाटा दाखविला. पन्नास हजार मुसलमानां-मधून फारच थोड्यांचा बचाव झाला, आणि शहाजादा स्वतः गुजराथच्या बाजूस पळून गेला.

शहाआलम उर्फ माजुमशहा दक्षिणेहून मोठें सैन्य घेऊन अहमदाबादच्या रस्त्यानें मेवाडच्या डोंगराच्या पश्चिम दिशेस येऊन पोहोंचला होता. तेथून पुढें जाण्याचा रस्ता डोंगरामधूनच होता. त्या रस्त्याचें नांव 'गणराव' शहाजादा तो रस्ता ओलांडून काकरोळी जवळील सरोवराजवळ येऊन पोहोंचला, तेथून पुढें जाण्याचें त्यास मुळीच समजेना. बरें रस्ता करून जाणें हेंही अवघडच. कारण जर तो त्या प्रमाणें करूं लागला, तर त्याच्या मागील 'गणराव' रस्ता रजपुतांनीं बंद केला कीं, घास किंवा दाणा मिळण्याचा एकही रस्ता राहणार नाहीं व लष्कर उपाशीच मरणार. जो खरा सेनापती असतो तो प्रथम पोटभरण्याची व्यवस्था आहे कीं, नाहीं तें पाहतो.

आपल्या सैन्यास जरूरीच्या जागीं एकवट करणें—नेमणें हेंच सेनापतीचें उत्तम सेनापतित्व आहे. राजसिंहानें आपल्या लष्कराची योजना फारच उत्तम रीतीनें केल्यामुळें मुसलमानांच्या बंगाल आणि दक्षिणच्या लष्करास, मुळींच हालचाल न करितां निकामी बसून रहावें लागलें मुलतानच्या लष्कराचा तर सफ्फाच उडाला. आतां फक्त बादशहा स्वतः राहिला.

प्रकरण २३ वें समाप्त.

प्रकरण २४ वें.

प्रताप मी तुमचीच आहे.

दिल्लीपती औरंगजेबास तसेंच ठेवून आपण आतां खुद्द दिल्लीमध्यें गमन करूं व आपल्या पूर्व परिचित कुटिकेमधिल परमहंस व तपस्विनीं यांची काय स्थिती झाली आहे, तें पाहूं.

रात्रीचा वेळ, काळोख भिन्न पडला आहे मनुष्यास मनुष्य दिसण्याची मारामार अशा रात्रीं कुटिकेमध्यें तपस्विनी अग्निकुंडाजवळ जप करीत बसली आहे जप करतां करतां डाव्या हातानें अग्निकुंडांतील काष्टें सारीत आहे, व एका बाजूस अंधुक असा दिवा जळत आहे. पण आज तपस्विनीचें चित्त स्वस्थ कां दिसत नाहीं बरें ? जपामध्यें निमग्न होण्यासारखी तिची आज मनस्थिती नव्हती खास. ती थोड-थोड्या वेळानें रस्त्याकडे लक्ष लावून कोणाची तरी मार्गप्रतिक्षा करीत आहे असें दिसत होतें. बारा वाजण्याचा सुमार झाला त्या बरोबर तिच्या चर्येमध्यें बरीच चलबिचल सुरू झाली. जसजसा वेळ होत चालला तसतसें तिचें चित्त अस्वस्थ होऊं लागलें. त्या बरोबर तशा त्या स्थितींत तिच्या तोंडून कांहीं उद्गार निघूं लागले ती म्हणाली, जय कालिकामाते सर्व भरंवसा तुझ्यावर बाई ! यश देणारी तूंच आहेस. आर्यांच्या कल्याणासाठींच आमची ही खटपट आहे. आमच्या सर्व आशा ह्या प्रथमच्याच प्रयत्नावर अवलंबून आहेत ह्या प्रयत्नात यश मिळाल्यास आमच्या साह्यकर्त्यांस स्फुरण येईल. पण अद्याप यांची कांहींच खबर कळूं नये हें आश्चर्य नाहीं का ? आज सहा दिवस झाले मी प्रतापसिंहाच्या आगमनाची एकसारखी वाट पहात आहे. तें कोण बरें येत आहे ? घोड्यांच्या टापाचा आवाज ऐकूं येत आहेसें वाटतें. होय ते आपलेच स्वार आहेत खास. आई भवानी, मला शुभ समाचारच ऐकिव. अशुभ वार्ता ऐकून ऐकून माझे कान किटले आहेत. असें ह्मणून ती थोडा वेळ स्तब्ध राहिली. इतक्यांत दोन स्वार त्या ठिकाणीं येऊन दाखल झाले. ते तेथें येतांच त्यांनीं घोड्यांवरून उड्या मारिल्या व तपस्विनीस प्रणाम केला.

त्यांचे विजयमदानें धुंद झालेले प्रफुल्लित असे नेत्र व मुख पाहतांच शुभसमाचारा-बद्दल तपस्विनीची खात्री झाली ती म्हणाली—"बाळ प्रताप ! यश कीं अपयश ?" "माताजी, आपल्या तालिमेंतील वीर कधीं तरी अपयशाचें खापर माथीं घेऊन आपलें कलंकित झालेलें मुख दाखविण्यास ह्या ठिकाणीं परत येतील का ?"

'बाळानों माझे कान हेंच ऐकण्यासाठीं अधीर झाले होते. चला आंत चला तुह्मी फार दमलां अहां असें दिसतें. क्षणभर विश्रांति घ्या व नंतर महाराणींचीं भेट घ्या. त्या तुमचीच मार्गप्रतिक्षा करीत आहेत.

महाराणीचें नांव ऐकतांच प्रतापाच्या मुखावर आरक्तवर्ण प्रदर्शित होऊं लागला. त्यानें आपल्या घोड्यांची व्यवस्था करून तो आपल्या सोबत्यासह निमूटपणें गुंफेचें गुप्त द्वार उघडून आंत गेला. तीं तिघेंही त्या गुप्त मार्गानें दिवाण-खान्यांमधून एका सुशोभित अशा दालनामध्यें येऊन दाखल झालीं. त्या दालनांत दाखल होण्यापूर्वी प्रतापास विश्रांति घेण्यासंबंधानें तपस्विनीनें सांगितलें परंतु प्रतापास धीर कोठचा! तो ह्मणाला, 'प्रथम महाराणीस हो आनंददायक बातमी कळवून नंतर विश्रांति घेऊं' हा त्याचा उतावीळपणा तपस्विनीस पसंत पडला नाहीं. ती ते आल्याबद्दल महाराणीस कळविण्यास आंत दाखल झाली. प्रातापास फारवेळ त्या ठिकाणीं तिष्ठत रहावें लागलें नाहीं. त्यास आंत पाठविण्याचा हुकूम झाला. प्रताप आंत गेला. तपस्विनी व प्रतापाचा सोबती बाहेरच राहिलीं. प्रताप आंत जातांच 'आमचे श्रेष्ठ नरवीर अपयशाचा वांटा घेऊन यायचे नाहींत अशी माझी खात्री होतीच.' अशाप्रकारचे मंजुळ कंठातून निघालेले शब्द बाहेर पडले. त्यास प्रत्युत्तरादाखल प्रताप ह्मणाला-आमच्या महाराणीसाहेबांच्याच पुण्याईचें हें फळ आहे. यश अगर अपयश येणें हें सर्वस्वीं प्राक्तनावर अवलंबून असतें.'

'आपल्यासारखे वीर ज्यांच्या संग्रहीं आहेत त्यांचें तेंच पूर्ण पुण्य आहे. बरं आतां लढाईची सर्व हकीकत सांगा पाहूं. या इकडे कोचावर बसा.'

राणीसाहेबांच्या समोरच्या कोचावर वीर प्रताप बसला; व त्यानें रूपनगरच्या राजकन्येस सोडविण्यापर्यंतची हकीकत सांगितली. नंतर तो ह्मणाला, आह्मी तेथून उदेपुरीं गेलों. उदेपुरीं गेल्यानंतर बातमी समजली कीं, औरंगजेब मोठें लष्कर घेऊन उदेपूरचा नाश करण्यास स्वतः चाल करून येत आहे. आमच्या चंचलेस सोडविल्याचाच हा परिणाम होय. महाराण्यानींही त्याच्याशीं दोन हात करण्याची तयारी चालविली आहे.'

'तुह्माला कसं काय वाटतं? ह्या लढाईमध्यें कोणास जय येईल?

'सरकार ज्या बाजूस धर्म त्या बाजूस जय हा ठेवलेलाच.'

'विशेषें करून ज्या बाजूस प्रतापासारखे वीर आहेत त्या बाजूस खात्रीनें जय मिळेल.'

'सरकार ही माझी स्तुति व्यर्थ आहे! आपल्याच चरणाचा हा प्रताप आहे.'

'बरं पण प्रतापराय आपलें साह्य मागितलें आहे का राजसिंहानीं?'

'होय सरकार. आणखी मीही त्याच उद्देशानें इतक्या जलदीनें तेथून निघालों.'

'बरं पण ह्या स्वारीमध्यें मीही स्वतः येणार ह्मणतें!'

'आपण! आणखी लढाईंत? छे! आपण येवढी तसदी न घेतल्यास बरें?

'कां बरं ? मी कां म्हणून येऊं नये ? आपण कसे काय लढतां तें पाहण्याची माझी इच्छा आहे.' असें म्हणून ती प्रतापाच्या तोंडाकडे निरखून पाहूं लागली.

राणीसाहेबांचे हे शब्द ऐकतांच प्रतापाचें मुख प्रफुल्लित झालें. तो म्हणाला, 'सरकार, आपणांस माझें युद्ध-कौशल्य पाहण्याचा सुयोग आल्यास मी आपणांस धन्य मानून घेईन. पण......'

'पण-काय प्रतापराय ! आपल्या जोडीस उभें राहून युद्ध करण्याची मला फारच हौस आहे.'

'सरकारचें मजवर एवढें प्रेम पाहून मी आपणांस धन्य मानून घेतों.'

'पण जसें माझें तुह्मांवर आहे, तसें आपलें मजवर प्रेम आहे काय?'

'माझ्या प्राणापलीकडेही मी आपणास जास्त चाहतों.'

क्षणभर दोघेंही स्तब्ध राहिलीं. उभयतांची मुखचर्या पाहण्यासारखी होती. महाराणीच्या मुखावरील लाली व प्रतापाचें त्यावेळचें प्रफुल्लितवदन पाहतांच उभयतांच्या अंतःकरणाची स्थिति दृष्टिगोचर होत होती.

प्रताप ताबडतोब पुढें झाला. त्यानें महाराणीचा हस्त स्वकरामध्यें धरिला, आपले गुडघे टेंकिले व गंभीर स्वरानें ह्मणाला, 'सरकार ! ह्या दासास पदरांत घ्या. क्षणभर मजकडे पाहून मी तुमचीच आहे असें ह्मणा.'

महाराणी हास्ययुक्त स्वरानें ह्मणाली, 'प्रताप ! मी तुमचीच आहे.

ताबडतोब प्रताप उठला व तें प्रणयी जोडपें गाढालिंगनानें बद्ध झालें. प्रतापाचें मुख महाराणीच्या मुखाशीं गेलें व तेथून चुंबनाचा प्रतिध्वनि उमटला.

प्रकरण २४ वें समाप्त.

प्रकरण २५ वें.

उदेपुरी बेगम-राण्याच्या ताव्यांत.

वाचकांस आठवत असेलच कीं, अकबरशहास पुढें पाठवून खुद्द बादशहा उदयसागराच्या कांठीं छावणी देऊन राहिला होता. मोंगल लष्कराची छावणी एका आवाढव्य शहरायेवढी दिसत होती. ठिकठिकाणीं तंबू ठोकिलेले होते त्यांची संख्या अतोनात होती. ज्याप्रमाणें बादशहा दिल्ली शहरामध्यें ऐषआरामाच्या पद्धतीनें रहात असे, त्याचप्रमाणें तो येथेंही रहात होता. त्याच्या तंबूचा शृंगार बहुमोल होता. तो सर्व तंबू जरी कापडाचाच होता तरी त्याला आंतून लोखंड आणि पितळ यांचा उपयोग

केलेला नजरेस पडत होता आंतील भागीं ज्या भिंती होत्या त्या सुऱ्यांनीं मढवून टाकिल्या होत्या. त्याचा आकारही विस्तृत असून त्यांस निरनिराळीं दालनें होतीं. दरबार भरण्याच्या मुख्य जागीं एक रत्नजडित सिंहासन शोभत होतें. तंबूच्या समोरच दिल्लीच्या किल्याच्या दरवाजाएवढा एक विस्तृत दरवाजा होता. चारी बाजूस हत्यारबंद तार्तार स्त्रियांचा पहारा होता.

बादशाही तंबूच्या मागें अमीरउमरावांच्या तंबूंची हार लागली होती. तो देखावा फारच उत्कृष्ट दिसत होता. तंबूच्या सभोंवार दिल्लीच्या चौकांतील दुकानांप्रमाणें, दुकानें मांडण्यांत आलेलीं होतीं. बादशहाच्या आगमनानें उदयसागराच्या तीरावर एक नवीन शहर वसलें आहे असें दृष्टीस पडत होतें.

ज्या ज्या वेळीं बादशहा दिल्लीहून स्वारीस निघत असे, त्या त्या वेळीं, त्याचा जनानखाना त्याच्या बरोबरच निघत असे. ह्या वेळींही त्याच्या सर्व बेगमा बरोबरच होत्या. दिल्लीच्या रंगमहालामध्यें ज्याप्रमाणें त्यांस निरनिराळ्या जागा नेमून दिल्या होत्या; त्याप्रमाणेंच ह्या ठिकाणींहीं निरनिराळीं दालनें होतीं.

प्रातःकाळ झाल्याबरोबर बादशहाच्या फौजेनें पुढें कूच केलें. सर्वांच्या पुढें, रस्तें वगैरे साफ करणारी–जंगली झाडें वगैरे तोडून रस्ता साफ करणारी–हत्यारबंद माणसांची एक तुकडी (Sappers & Miners) चालत होती; त्यांच्या हत्यारांमध्यें पावडीं, कुदळीं, करवती, कुऱ्हाडी वगैरे प्रकारचीं शस्त्रें होतीं. ते आपल्या हत्यारानें झाडें कापून दूर फेकून देत; व खड्डे वगैरे मातीनें भरून टाकीत. मागाहून येणाऱ्या विस्तृत सैन्याला पुरेसा रस्ता तयार करण्याचें काम किती भयंकर, त्रासाचें व दगदगीचें होतें, ह्याचा आपण अवश्य विचार केला पाहिजे. त्या मोठ्या रस्त्यावर गाड्यांवर चढविलेल्या तोफांची रांग चालूं लागे, त्यांच्याबरोबरच तोफखान्याचे अंमलदार व गोलंदाज यांची तुकडी, तिच्या मागोमाग बादशाही खजिन्याचा सांभाळ करणारी तुकडी चालत होती; कारण औरंगजेबास कोणाचाही विश्वास पटत नसे. ह्मणून तो आपल्या स्वारीबरोबर खजिना बाळगण्याचें विशेष अगत्य बाळगी. त्या खजिन्यांनीं लादलेल्या हत्तीच्या रांगेच्या मागें बादशहाचा दफ्तरखाना होता. त्याच्यामागें गंगेच्या पाण्यानें लादलेली उंटांची रांग होती. पाण्यामागून खाण्याच्या वस्तू पीठ, तूप, तांदूळ, साखर, वगैरे होतें. त्या सामानाबरोबरच हजारों बबरजी-स्वैंपाक्यांची तुकडी चाललेली होती. त्यांच्यामागून बादशहाचे कपडेलत्ते वगैरे. त्यांच्या मागून मोंगल घोडेस्वारांची फौज चाललेली होती. हा दर्शनी भाग होता.

ह्या भागाच्या मागें हजारों उंटांवर धूपदाण्या लादण्यांत आल्या होत्या. त्यांत कस्तुरी, लोबान वगैरे जाळून सर्व प्रदेश सुगंधमय करण्याचें सामान होतें त्यांच्या मागें बादशहाच्या शरीर-संरक्षकांची (Body Guards) तुकडी दोन रांगांनीं

चालली होती. त्यांच्या मध्यंतरीं बादशहा एका जवाहिरानें मढविलेल्या घोड्यावर स्वार झाला होता. त्याच्या डोक्यावर नोकरांनीं सफेत छत्र धरिलें होतें. त्याच्या मागोमाग खास औरंगजेबाची मेहेरबानी मिळविलेल्या स्त्रिया, कोणी हत्तीवरील अंबारींत, कोणी घोड्यावर ह्याप्रमाणें आरूढ होऊन चालल्या होत्या; कित्येक मेण्यांमध्येंही विराजमान झाल्या होत्या. ह्या तुकडीच्या मागें दासींच्या तुकड्या घोड्यांवर बसून चाललेल्या होत्या. त्यांच्या मागें गोलंदाजांची एक तुकडी होती. त्यांजवळ ज्या तोफा होत्या त्या फार लहान होत्या.

तिसरा भाग पायदळाचा होता. पायदळाच्या मागें नोकरचाकर मजूरहेलकरी, नाचणारणी, गाणारणी, वगैरे असून निकामी घोडे, तंबूंच्या गाड्या वगैरे असबाब होता.

ज्या रस्त्यानें शहाजादा अकबर आपली फौज घेऊन गेला होता, त्याच रस्त्यानें औरंगजेब जात होता. दोघांनीं मिळून कुमार जयसिंहाच्या लष्कराचा नाश करावा हा अंतर्यामीचा हेतू. पण पर्वताच्या आंतील भागीं दाखल होतांच ती खिंड ज्या जागीं होती, त्या पर्वताच्या वरील जागीं राजसिंह आपलें लष्कर घेऊन छावणी ठोकून बसलेला आहे असें त्यांच्या समजण्यांत आलें.

प्रथम 'नयन' नांवाच्या खिंडीजवळ राजसिंह बसला होता, पण तेथें त्यास जासुदाकडून अकबराच्या लष्कराची काय स्थिति झाली तें समजलें. ह्मणूनच आपल्या रणकौशल्याचा दुसरा एक सपाटा औरंगजेबास दाखवावा ह्मणून पर्वतावरील मार्गाचें उल्लंघन करून तो एकदम वरील खिंडीमध्यें येऊन थडकला.

राजसिंहाच्या ह्या अपूर्व रणकौशल्यानें मोंगलांची गात्रें ढिलीं पडलीं. कारण ते ज्या रस्त्यानें जाणार होते, त्या रस्त्याच्या बाजूस राजसिंहाचें लष्कर होतें. जर ते पुढें गेले तर एक बाजू शत्रूच्या हल्ल्यासाठीं मोकळी करून दिल्याप्रमाणें होणारें आहे. लष्कराचें तोंड फिरवून बाजूस असलेल्या शत्रूबरोबर लढाई करणें हेंही असंभवनीय. कारण एवढ्या मोठ्या अफाट सैन्याचें तोंड सारखें करण्यास त्या अरुंद खिंडीमध्यें मुळींच जागा नव्हती. आणि तोंड फिरवितां फिरवितां राजसिंह पर्वतावरून खालीं आल्यास मोंगल लष्करावर हल्ला करून त्याचे दोन भाग सहज करूं शकता व एका भागाचा पराभव करून सामानसुमान लुटून नेता हें नक्कीच होतें. ह्याप्रमाणें मोंगल लष्कराची स्थिति भयंकर झाली. पुढील बाजूस कुमार जयसिंह व मागें राणा राजसिंह यांच्या कैचीमध्यें बादशहाचें लष्कर क्षणांत सांपडलें.

आतां बादशहास एक मार्ग मात्र मोकळा होता तो हाच कीं, मागें कूच करणें. पण तेंही थोडा वेळ विचार केल्यानंतर असंभवनीय ठरलें. उदेपुरास पोहोंचण्यास दुसरा मार्ग नाहीं का? ह्मणून तपास सुरू झाला. बादशहानें जिकडे तिकडे घोडेस्वार पाठविले. थोड्याच वेळांत असा एक मार्ग दाखविण्याचें एका मोंगल सौदागरानें

कबूल केल्याचें एक मनसबदार सांगूं लागला. तो मनसबदार तो मार्गही पाहून आला होता. पण तो मार्ग दोन पर्वतांच्या मधील एक अरुंद खिंडीसारखा असून लवकरच पुढील मार्गास पोहोंचूं शकेल असा होता; त्या ठिकाणीं कोणीही रजपूत दिसत नव्हता.

औरंगजेब थोडा वेळ विचारांत पडला. नंतर म्हणाला, 'लष्कर दिसत नसेल, पण छपून बसलें असेल तर.'

बखतारखां ह्या नांवाचा मनसबदार तो रस्ता पाहून आला होता तो म्हणाला, 'ज्या मोंगलानें मला तो रस्ता दाखविला आहे, त्याला मी प्रथमच तिकडे पाठविलें आहे. रजपुतांचें लष्कर त्या बाजूस असल्यास तो आपणांस तावडतोब कळवील.'

औरंग०—हा कोण मनुष्य आहे? आपल्या शिपायांपैकींच आहे कीं काय?

बखतारखां०—नाहीं हुजूर. तो एक व्यापारी आहे. उदेपूर मुक्कामीं शाली विकण्यास गेला होता. तेथून परत येत असतां आपल्या छावणींत माल विकण्यास आला होता.

औरंग०—ठीक आहे. ह्या रस्त्यानें फौज चालवा.

सैन्यास मागें फिरण्याचा हुकूम झाला; कारण मागें फिरून थोडा रस्ता चालल्यानंतर त्या पर्वताच्या खिंडीकडे जाण्याचा मार्ग होता. इतका रस्ता चालल्यानंतर पुनः मागें फिरणें सोपें नव्हतें. लष्कराच्या नियमबद्ध रचनेंत फरक पडला. मागील भाग पुढें व पुढील भाग मागें अशी रचना झाली. तंबूच्या गाड्या, मजूर वगैरे भाग पुढें झाला. बादशहानें आज्ञा केली कीं, तंबूच्या गाड्या, मजूर वगैरे किरकोळ लोकांनीं उदयसागरच्या रस्त्यावर उभें राहणें. आणि सर्व लष्कर कूच करून गेल्यानंतर त्यांनीं मागून येणें. आज्ञेनुसार तिसऱ्याभागापैकीं नोकर चाकर, हेलकरी वगैरे एके जागीं उभे राहिले. नंतर औरंगजेब, पायदळ, धाकट्या तोफांची तुकडी आणि गोलंदाजांची फौज त्या खिंडीच्या मार्गानें चालली. मार्ग दाखविण्याकरितां बखतारखां सर्वांच्या पुढें चालला होता.

ही सर्व गडबड राजसिंह पहात होता. त्यानें बरोबर अवसर सांपडतांच सिंहासारखी उडी मारिली व पर्वतावरून ससैन्य खालीं उतरला. मोंगल सैन्याच्या मध्यभागीं तुटून पडला व मोंगल सैन्याचे दोन भाग केले. एक भाग औरंगजेबाबरोबर खिंडीच्या रस्त्यानें चालता झाला. आणि दुसरा भाग राजसिंहाच्या हातीं सांपडला. ह्या भागामध्यें बादशहाचा जनानखाना होता. त्या जनानखान्यासमोर राजसिंहाचें लष्कर येऊन पोहोंचतांच कोलाहल सुरू झाला. ह्या ठिकाणीं राण्यास मुळींच लढाई करावी लागली नाहीं. स्त्रियांच्या रक्षणार्थ जीं मनुष्यें होतीं

त्यांच्यानें हत्यारें उचलवेनात. कारण शत्रूंस मारावयास जातां मागील स्त्रियांसच मार खावा लागेल अशी ती गर्दी होती. म्हणून मुळींच लढाई न करितां राजसिंहानें त्या सर्व माणसांस कैद केलें. आणि सबंध स्त्रिया दासदासीसुद्धां राजसिंहाच्या कैदी झाल्या.

जयसिंहावर राजसिंहाची फारच मेहेरबानी होती; म्हणून तो लढाईमध्यें राजसिंहाच्या बरोबरच असे. त्यानें हात जोडून राण्यास सांगितलें, महाराजाधिराज ! ह्या टोळीस घेऊन आपण काय करण्याचें योजिलें आहे ? विनाकारण ' खायला काळ आणि भूमीला भार ' तशांतलींच हीं सुकुमार रत्नें आहेत. आज्ञा होत असल्यास उदेपुरीं पाठवितों.

राजसिंहः—ह्या सर्वांस उदेपुरीं पाठविण्याची जरूरी नाहीं. यांना खावयास घालण्यास उदेपुरीं आहे काय ? फक्त चंचलकुमारीकडे मात्र उदेपुरीस पाठवून दे. कारण तिच्यासाठींच चंचलेनें आग्रहानें सांगितलें आहे. एरव्हीं सर्व औरंगजेबाचें धन त्याचें त्यास परत द्या.

जयसिंहः—तरीही लुटीपैकीं कांहीं भाग शिपायांस देणें भाग आहे.

राजसिंहः—(हंसत) ज्यांस जरूर असेल तो घेईल, पण ह्या मुसलमाननींस तर तुह्मीं हिंदु लोक स्पर्श करणार नाहींना ?

जयसिंहः—त्यांत काय झालें ? त्यांस नाचतां व गातां तर येतें ना ?

राजसिंहः—नाचण्यागाण्यामध्यें चित्त ठेविल्यानें रजपुतांच्यानें शौर्याचीं कामें होतील का ? ऐषआरामाची इच्छा कधींही बाळगूं नका. मोंगलांप्रमाणें ऐषआराम भोगिल्यास तुमच्यानें त्यांच्याबरोबर लढवणार नाहीं. जा. उदेपुरीस तिकडे रवाना करा.

जयसिंहानें उदेपुरी बेगमेचा तावडतोब तपास केला; व तीस हत्तीवरून खालीं उतरविलें तिच्याबरोबरच झेब-उन-निसेसही उतरवून सोबत कांहीं स्वार देऊन त्यांची उदेपुरास रवानगी केली.

प्रकरण २५ वें समाप्त.

प्रकरण २६ वें.

औरंगजेब जाळ्यांत सांपडला.

उदेपुरी व झेब-उन-निसा यांस उदेपुरास पाठविल्यानंतर राण्यानें त्या बाकीच्या सर्व स्त्रियांस औरंगजेबाच्या मागून त्या खिंडीच्या रस्त्यानें जाऊं दिलें. स्त्रियांच्या

मागून मोंगल लष्कर आलें. त्यामागून अन्नसामुग्री आली. तीवर रजपुतांनीं हात मारला. तिच्या रक्षणार्थ फार मनुष्यें नव्हतीं. जी आपल्या खपाजोगी वस्तु होती ती त्यानें आपल्या सैन्यांत पाठविली. इतर मांस वगैरे पदार्थ जंगलामध्यें फेंकून दिले. नंतर खजिना आला व त्याच्या मागोमाग तोफखाना आला. खजिना पाहतांच रजपुतांस लोभ उत्पन्न झाला. पण राजसिंहानें त्यांस आपल्या ताब्यांत ठेविलें. तो म्हणाला, 'तुमचें चित्त ठिकाणावर ठेवा. हें सर्व जें कांहीं आहे तें तुम्हालांच मिळेल. पण आज त्यांस जाऊं द्या. आज ह्या गोलंदाजांबरोबर लढण्याची ही वेळ नाहीं.' असें बोलून तो सर्वांच्या पुढें जाऊन उभा राहिला. ह्याप्रमाणें औरंगजेबाचें सबंध लष्कर त्या खिंडीमध्यें प्रवेश करितें झालें.

नंतर राजसिंहानें जयसिंहास बाजूस नेलें आणि म्हणाला, ह्या मोंगलांवर मी फारच खूष झालों आहे. मला असें वाटत होतें कीं, तुला मोंगल्याचें वेषांतर करून पाठविण्याच्या युक्तीनेंही न वळतां मोंगलांबरोबर लढाई केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. पण आतां लढाई केल्याशिवायही आपण त्यांस हरवूं शकूं.

इकडे बादशहाची स्थिति चमत्कारिक झाली होती. त्या खिंडीमध्यें त्याची सर्व फौज दाखल झाली. त्यानंतर लवकरच रात्र पडली; खिंडीच्या दुसऱ्या बाजूस अद्याप कोणीही बाहेर पडलें नव्हतें. ती खिंड किती लांब आहे हेंही कोणास माहीत नव्हतें. रात्र पडल्यानंतर काळोखाचें साम्राज्य माजलें. सबंध लष्कराच्या रस्त्यावर उजेड करण्याचें साहित्य त्याच्या जवळ नव्हतें. फक्त बादशहा आणि मोठमोठ्या बेगमा यांच्याजवळच उजेडाची व्यवस्था करण्यांत आली. बाकीची सगळी फौज अंधारामध्यें ठेंचा खाऊं लागली. लष्करी माणसें घाबरलीं व घोडे बिथरले. कित्येक स्वारांस घोड्यांनीं आपल्या पाठीवरून उलथून टाकिलें. अशाप्रकारचा गोंधळ दृष्टीस पडतांच ह्याच ठिकाणीं छावणी ठोकण्या संबंधानें बादशहाचा हुकूम झाला. पण तंबू मारण्यापूर्तीं सपाट जागा त्या खिंडींत मुळींच नव्हती. महामुष्किलीनें बादशहा व बेगमा यांचे तंबू ठोकण्यांत आले. लष्कराची मुळींच व्यवस्था झाली नाहीं. ते जागचे जाग्यावरच थबकले. घोड्यावरील स्वार घोड्यावर व हत्तीवरील हत्तीवर अशी व्यवस्था झाली.

दुसरें एक मोठें संकट उद्भवलें. लष्कराच्या खाण्याचे पदार्थ रजपूतांनीं लुटल्यामुळें त्रेधा उडाली. खिंडीमध्यें घोड्यास घास मिळण्याचीही पंचाईत. मग लष्करानें काय करावें? बादशहा आणि बेगमां यांचीही हीच स्थिती झाली. सबंध रात्रीचे जागरणानें व भुकेनें त्यांस अर्धमेल्याप्रमाणें झालें.

दुसऱ्या बाजूनें झेबउननिसा व उदेपुरी यांचें रजपूतांनीं हरण केल्याची खबर बादशहाच्या कानीं आली. ती ऐकतांच बादशहाच्या आंगाचा भडका झाला.

क्रोधानें त्याचें शरीर कंपायमान होऊं लागलें. जर त्यावेळीं त्याचें चलन असतें व तसा प्रकारचा अवसर मिळाला असता, तर त्यानें सगळ्या रजपूतांस सळोकीपळो केलें असतें. पण लाचार!

मध्यरात्रीस सैन्यामध्यें शांतता पसरली. त्यावेळीं पर्वतावरील हजारों झाडें कोणी तोडीत असल्याचें ऐकूं येऊं लागलें. पण कोणीही त्याचें कारण समजूं शकलें नाहीं. भूतपिशाचाचे हे खेळ असतील असें समजून सर्व आपआपल्या जागीं स्तब्ध राहिले.

प्रकरण २६ वें समाप्त.

प्रकरण २७ वें.

मार्गावरील स्वार.

सायंकाळची आल्हादकारक वेळ! वारा झुळझुळ वहात आहे. उम्याचे दिवस असल्यामुळें तो प्रकृतीस सुखदायक वाटत आहे. सूर्य अस्तास जावयाच्या वेळचें सृष्टी सौंदर्य; वनश्रीवरील सुवर्णाप्रमाणें चकाकणारी सूर्यप्रभा पाहून दुःखी मनुष्यासही आनंद वाटल्यावांचून राहिला नसता. अशा रमणीय वेळीं दोघां स्वारांच्या मागून कांहीं अंतरानें काळ्या वस्त्रानें मुख आच्छादन केलेले सुमारें वीस एक हजार स्वार निमूटपणें चालले होते. ते दोघे स्वारही वस्त्रानें मुख आच्छादन केलेले होते. ती स्वारांची संख्या एवढी मोठी होती तरी त्यांच्यामध्यें एकमेकांशीं बोलल्याचाही आवाज ऐकूं येत नव्हता. फक्त घोड्यांच्या टापांनीं झाडांचीं गळून पडलेलीं सुकीपानें च चर वाजत होतीं, हीच त्या घोडेस्वारांच्या अस्तित्वाची खूण ऐकूं येत होती. हे सर्व स्वार दिल्लीच्या बाजूनें उदेपुरच्या मार्गास चालले होते. बराच वेळ शांतपणें चालल्यानंतर त्या मुख्य दोन स्वारांपैकीं एक ह्मणालाः—प्रतापराय ह्यावेळचें सृष्टी-सौंदर्य किती मनोहर आहे! अशा वेळीं घटका घटका तेंच पहात रहावें असें कोणास बरें वाटणार नाहीं.

प्रतापः—होय गोष्ट खरी आहे. पण आह्मांवीरांना ह्या सृष्टीसौंदर्याच्या अवलोकनानें मुळींच समाधान व्हावयाचें नाहीं. आमची मनें असले प्रकार आपल्या हृदयांत सांठावेत अशी इच्छाच करीत नाहींत. सृष्टी सौंदर्याचें अवलोकन करणें हें काम नाजूक प्रकृतीच्याच गृहस्थांचे अगर स्त्रियांचे होय. शत्रूवर हल्ला करून त्याचा कंठ चिरावयास सांपडणारे जें धैर्य व त्या वेळची जी शोभा अवलोकनांत येते तेंच सृष्टीसौंदर्य आह्मांस अद्भुत ईश्वरीकरणीनें भरलेलें आहे असें वाटतें.

राणीसाहेबांची ह्या सौंदर्याकडे दृष्टी गेली असल्यास नवल नाहीं. कारण स्त्रिया स्वभावतःच सृष्टीसौंदर्याच्या भोक्त्या असतात.

"हा सिद्धांत सर्वथैव लागू पडेल असें मला कांहीं वाटत नाहीं. फक्त स्त्रियाच सौंदर्याच्या भोक्त्या असतात आणखी पुरुषांस त्याची जरूरीच नसते कीं काय ?"

प्रताप०—तसें नव्हे. स्त्रियांचा स्वभावतःच ओढा त्या बाजूकडे असतो तसें पुरुषांचें नसतें.

'बरें तसें कां होईना. पण हें असलें मनोहर सृष्टीसौंदर्य पाहून उभयतांच्याही मनाची चलविचल झाल्यास नवल नाहीं.'

प्रताप०—होय, तसें होणें शक्य आहे. पण कार्याच्या महत्वाकडे पाहून मनावर दाब ठेवण्याचें सामर्थ्य जेवढें पुरुषांत असतें तेवढें स्त्रियांत नसतें असें मला वाटतें, कारण मनाच्या वृत्तीमध्यें चंचलता येण्याजोगें सृष्टीसौंदर्य जरी अपूर्व असलें तरी पुरुष रिकाम्या वेळींच त्याचा उपयोग करून घेतात. तसें तुह्मां स्त्रियांचें नसतें.

"शर्थ झाली बाई ह्या बोलण्याची. माझ्या मनाचा भाव असा मुळींच नव्हता मी सर्वसाधारण नियम कसा असतो ह्यासंबंधानें बोलत होतें. त्याचा आपण भलताच अर्थ करणें योग्य नाहीं.

प्रताप०–राणीसरकार! माफी असावी, मला तसें वाटलें ह्मणून मी ह्मणालों.

हे दोन प्रवासी स्वार कोण आहेत हें वाचकानीं ताडलेंच असेल. प्रताप व कूटिके-मधील गुप्त वीरसंघाच्या महाराणी, महाराणा राजसिंहाच्या मदतीस वीस हजार स्वारानिशीं जात आहेत. परमहंस व तपस्विनी हीं यांच्या मागून निघणार आहेत. प्रताप व महाराणी यांच्यातील चाललेलें संभाषण आपण ऐकिलेंच आहे आणखीही तीं काय बोलत आहेत तें आपण ऐकूंया.

थोडावेळ थांबून महाराणी ह्मणाल्या–'प्रताप आज माझ्यासारखी भाग्यवान् कोणीच नाहीं असें मला वाटूं लागलें आहे. ईशकृपेनें ह्या युद्धांत आपणांस जय मिळाल्यास मी आपली अर्धा... पुढील शब्द तिच्या तोडांतच राहिले. ती खालीं पाहूं लागली. त्यावर प्रताप ह्मणाला–अर्धांगी होईन असेंच कीं नाहीं. मग माझ्या भाग्यास सीमाच नाहीं. सांपडलेलें रत्न कोंदणावर बसविल्याशिवाय फेंकून देणारा मूर्खच नाहींका? आज मी स्पष्टपणें आपणांस सांगत आहे कीं, ज्यावेळीं देवीच्या दर्शनाहून परत येत असतां आपणांवर त्या नोडग्यानें हल्ला केला होता त्यावेळीं प्रथमच मी आपणांस पाहिलें. त्यावेळींच माझ्यामनामध्यें आपणांविषयीं एकप्रकारची नवीनच प्रकारची प्रीति उत्पन्न झाली. प्रेमाचें प्रथम दर्शन ह्मणतात तें तेंच होतें. त्या प्रिय दर्शनाच्या वेळींच माझ्या मनामध्यें एकप्रकारची गूढ भावना उत्पन्न झाली. त्याचें चीज झालेलें पाहून मला पराकाष्टेचा अत्यानंद झाला आहे. नाहींतर मी निश्चयच केला होता कीं, मरेपर्यंत अवि......

“ काय? अविवाहित रहायचें? खरेंच कीं काय? मग आपलीं दोघांचीही मनें एक झालीं यांत कांहीं नवल नाहीं. माझ्या मनाचीही स्थिति तशीच झाली होती. पण स्वीकृत कार्य तडीस गेल्यावांचून ऐषआरामासंबंधीं उद्गार काढणं हें केवळ पाप होय असं मला वाटतं म्हणूनच मी आजपर्यंत आपल्या विरहाचं दुःख सहन करीत आहे. आतां गडे मला किनई आपण राणीसाहेब! राणीसाहेब! असं म्हणतां त्याची लाज वाटूं लागली आहे. कांहींतरी गोडसं नांव घेणं.”

प्रताप०—पण जोंपर्यंत आपण उभयतां विवाहरज्जूनीं बद्ध झालों नाहीं तोंपर्यंत मला माझ्या धर्माप्रमाणें वागलेंच पाहिजे. लौकिकामध्यें महाराणी ह्या नांवानें संबोधणं अधिक श्रेयस्कर होय. एकांतामध्यें पाहिजे तर गोड व मधुर अशा ‘प्रिये’ ह्या शब्दानें संबोधीन मग तर झालें ना?

महाराणी—(हंसत) आतां मला बरीक आनंद झाला. पण महाराज, आपण उदेपुरास केव्हां पोहोंचूं याचा कांहीं अदमास केला आहे का?

प्रताप०—बहुतकरून सकाळीं आपण पोहोंचलेंच पाहिजे असें मला वाटतें. राणीसरकारास फार श्रम झाले असल्यास ह्या ठिकाणीं थोडा वेळ विश्रांति घेण्याची व्यवस्था करितों.

‘ होय तसेंच करा. थोडा वेळ विश्रांति घेऊन मग जाण्याचें करूं.’ ताबडतोब विश्रांतीसाठीं थांबण्याची व्यवस्था करण्यांत आली. स्वारांनीं घोड्यावरून उड्या मारिल्या, जो तो आपआपले गाशे पसरून उपाहाराची तजवीज पाहूं लागला. इतक्यांत चार घोडेस्वार भरधांव घोडे फेकीत त्या ठिकाणीं आले. त्यांस राणीसाहेबांच्या राहुटींत दाखल करण्यांत आलें.

प्रकरण २७ वें समाप्त.

प्रकरण २८ वें.

सांपळ्यांतील सिंह.

रात्र संपली. सूर्याचा प्रकाश दृष्टिगोचर होतांच सैन्यास पुढें कूच करण्याचा हुकूम झाला. खिंडीच्या पुढील टोंकास पोहोंचण्याच्या इराद्यानें सैन्यानेंही कूच करण्यास विलंब केला नाहीं. भूकेनें व तहानेनें त्यानां व्याकुळ केलें होतें. बाहेर पडतांच कांहीं तरी खावयास मिळेल अशी त्यांस आशा वाटत होती, म्हणून लष्करांची रांग तोडूनही जो तो बाहेर पडण्याची धांदल करूं लागला. उदेपुरी व झेबउन-निसा यांस सोडवून उदेपूर जमीनदोस्त करून टाकण्याच्या विचारांत बादशहा निमग्न होता. एका क्षणा-

चाही विलंब त्यास तासाप्रमाणें वाटत होता. शेवटीं खिंडीच्या दुसऱ्या नाक्यावर मोंगल सैन्य येऊन तर थडकलेंच, पण येऊन पाहतात तों काय ? मुसलमानांच्या सर्वस्व-नाशाचें एक साधन पुढें उभें आहे असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. रात्रीच्या वेळेचा लाभ घेऊन रजपुतांनीं मोठमोठीं झाडें कापून, तीं वरून खालीं लोटून, त्या खिंडीचें द्वार बंद केलें आहे असें त्यांच्या नजरेस आलें. मोठमोठ्या झाडांचीं खोडें, खांद्या, पानें ह्यांनीं तो रस्ता अजिबात बंद केला होता; ती भिंत इतकी मोठी व दाट झालेली होती कीं, तीतून लहानसें कुत्रेंही बाहेर पडण्याची मुष्किल मग हत्ती किंवा घोडे यांस मार्ग कसा मिळावा ?

ही वस्तुस्थिति दृष्टीस पडतांच मुसलमानी फौजेंत एकच कोलाहल झाला, स्त्रिया आक्रोश करूं लागल्या. आणि त्यांचा आकांत पाहून औरंगजेबाच्या कठोर हृदयाचें पाणी झालें.

Sappers and miners रस्ता साफ करणारी तुकडी जी नेहमीं पुढें असावयाची ती ह्या वेळीं सैन्याच्या अव्यवस्थित हालचालीनें मागें राहिली होती तीस पुढें येईपर्यंत बराच वेळ लागून हाही दिवस भुकेनें तळमळत काढावा लागेल असें अनुमान करून औरंगजेबानें ती तुकडी येईपर्यंत पायदळ व इतर कांहीं लोकांनीं ती झाडें काढून रस्ता मोकळा करावा असा हुकूम सोडला. हुकमाप्रमाणें हजारों लोक त्या उद्योगास लागले. त्यांच्या मदतीस हत्तीही देण्यांत आले. पण हे लोक त्या ठिकाणीं पोहोंचतांच, ज्याप्रमाणें फाल्गुन महिन्यामध्यें तुफानी वाऱ्याच्या योगानें डोंगरावरील दगडांचा खालीं वर्षाव व्हावा त्याप्रमाणें पर्वताच्या शिखरावरून मोठमोठ्या दगडांचा वर्षाव होऊं लागला. पायदळामधून कोणाचे हात, कोणाचे पाय, कोणाचें डोकें, कोणाचें सबंध शरीरही चूर्ण होऊन जाऊं लागलें. मोठमोठ्या आरोळ्या मारीत हत्ती पळूं लागले. त्यांच्या पायाखालींहि कित्येक लोकांचा चेंदा झाला. पर्वतावर रजपुतांची संख्या मुंग्यासारखी दिसूं लागली. ते हारबंद उभे राहून जे जखमी झाले नव्हते अशांवर बंदुकींतून गोळ्या सोडूं लागले. ह्यामुळें औरंगजेबाच्या माणसांपैकीं एकही माणूस त्या झाडांच्या भिंतीजवळ टिकाव धरूं शकलें नाहीं.

ही स्थिति पाहतांच बादशहाच्या आंगाची लाही झाली. त्यानें पुनः प्रयत्न कर-ण्याबद्दल हुकूम सोडला. पण त्याचा तादृशही उपयोग झाला नाहीं.

झाडांची भिंत काढून टाकण्याचा प्रयत्न विफल होत आहे, असें पाहून औरंगजेबानें सैन्यास मागें फिरण्याचा हुकूम सोडला. आलेल्या रस्त्यानें बाहेर पडावें हा त्याचा हेतू होता पण मागें फिरूनही कांहींच निष्पन्न झालें नाहीं. कारण त्या खिंडीचेंही तोंड मोठमोठ्या झाडांनीं बंद करून टाकण्यांत आलें होतें, ह्या बाजूसही पर्वतावर रजपूतांचें सैन्य हारबंद उभें होतें.

औरंजेबानें विचार केला कीं, जर आपणास बाहेर पडवलें नाहीं तर ह्याच ठिकाणीं
अन्नपाण्यावांचून तडफडून मरावें लागेल ह्यासाठीं पुनः जोराचा प्रयत्न करून पहावा.
त्याप्रमाणें त्यानें सेनापतीस बोलावून नेटाचा प्रयत्न करण्यास हुकूम केला; ह्यावेळीं
मात्र थोडासा परिणाम झाला. कारण रस्ते साफ करणारी तुकडीही त्यांच्या मद॰
तीस होती; त्यामुळें त्यांनीं थोडीशी झाडें बाजूस ढकललीं. पण पुनः रजपूतांनीं
दगडांचा वर्षाव सुरू केला, त्याबरोबर तोही प्रयत्न व्यर्थ जाऊन लोक मागें सरकले.

दुसरें एक भयंकर संकट उद्भवलें. समोरील पर्वतावर जी थोडी सपाट जागा
होती, त्या जागीं राणा राजसिंहानें आपली छावणी ठोकिली होती. त्यानें आपल्या
तोफा डागण्यास सुरवात केली. तोफेचे गोळे सैन्यांत पडतांच मोंगल सैन्य पटापट
मरणोन्मुख होऊन जमिनीवर पडूं लागलें. सैन्य पिछेहाट करूं लागलें. औरंगजेबानें
आपल्या डोक्यावरील हिरेजडित मुगुट काढून फेकून दिला. व आक्रोश करूं लागला.
दिल्लीचा पादशहा व दिल्लीचें सैन्य रजपुतांनीं पिंजऱ्यांत कोंडून टाकिलें होतें त्या
पिंजऱ्यामधून मुक्त होणें फारच मुष्किलीचें भासूं लागलें. सांपळ्यांत सांपडलेल्या सिं-
ह्याप्रमाणें औरंगजेब भ्रमिष्ट झाला.

इकडे उदेपुरी बेगम व झेबउननिसा यांच्या स्वाऱ्या चंचलकुमारिकेच्या महालीं
येऊन दाखल झाल्या. चंचलकुमारिकेनें त्यांस निरनिराळीं आसनें देऊन त्यांचा योग्य
मानमरातब राखिला व सभ्यपणास अनुसरून आपण उभी राहिली. आपणास भिऊन-
ही आपला मान ठेवीत आहे असें जाणून उदेपुरी गर्विष्ठपणानें ह्मणाली,—

'आपण मोंगलांच्या हातून प्राण जाण्याची का इच्छा करितां? यावर चंचल
हंसून ह्मणाली, 'आह्मीं त्यांच्याकडे मरण मागीत नाहीं, पण उलट त्यांच्या मनांत
असें होतें कीं, आह्मी ह्या वस्तूचा रजपूतांस स्वाद चाखावयास लावूं. पण त्यांस मा-
हीत नव्हतें कीं, मुसलमानांच्या हातचं दान रजपुतांस घेणें योग्य नाहीं.'

उदेपुरी०—उदेपुरच्या–शेतकऱ्यांनीं एकामागून एकानें मुसलमानांच्या हातचें
दान घेतलें आहे. सुलतान अल्लाउद्दीनाची गोष्ट जरी सोडली तरी मोंगल बादशहा
अकबराच्या हातून, तसेंच त्याच्या मुलां नातवांच्या हातून, राणा राजसिंहाच्या पूर्वजांनीं
हेंच दान–मृत्यू–स्वीकारिलें आहे. तें कसं विसरतां?

चंचलः—बेगमसाहेब, आपण चुकतां आहां; तें त्यानीं दान म्हणून कबूल केलेलें
नव्हतें पण देणं म्हणून कबूल केलेलें होतं. अकबर बादशहाचं कर्ज प्रतापसिंहानं फेडलं.
आपल्या सासऱ्याचं जें कर्ज आमच्याकडे आहे तें आतां आम्ही फेडीत आहों. ह्या
त्याचा पहिला हप्ता आहे तो हप्ता भरून पावती घेण्यासाठींच आपणांस इथं बोला-
वून आणिलं आहे.

झेब—पण तुम्हीं अद्याप बादशहाचा पराक्रम पाहिला आहे कोठें ? अजून कुठंच कांहीं ठिकाणा नाहीं तों तुम्हीं आकाशास ठिगळ मारावयास तयार झालां.

चंचल—आम्हीं आकाशास ठिगळ मारतों कीं काय करतों हें आपल्या पित्याच्या नजरेस आलेलेंच आहे. आपण व बेगमसाहेब माझ्या दासी झालां आहां ह्यावरून नाहीं का आपल्या लक्षांत येत ?

उदेपु०—काय अलमगीर बादशहाची बेगम तुझी दासी ?

चंच०—असं तर खरंच.

झेब०—ह्या गोष्टीची तुम्हांस पक्की आठवण राहील ना ? आपणांस आपले शब्द थोड्क्याच वेळानं परत घ्यावयास मी भाग पाडीन.

चंचल०—ह्या सर्व स्वप्नसृष्टींतील गोष्टी आहेत.

उदे०—बरं ! बरं ! मी पाहीन तुमच्या कशा गमज्या चालतात त्या !

चंच०—अहो पुढें काय पहाणार ! पण आतांच औरंगजेब सांपळ्यांत सांपडला आहे तें पहा. उदईक तह करण्याची जर त्यास बुद्धि झाली नाहीं तर तहानेंनें व भुकेनें त्यास उपाशींच मरावें लागेल.

हें ऐकून दोघीही स्तब्ध झाल्या. त्यांच्या मुखांतून शब्द बाहेर पडेना. आपल्या स्थितीचें स्वरूप त्यांस कळून आलें. दोघींच्याही नेत्रांतून अश्रूश्राव होऊं लागला. आपण दुनयेच्या बादशहाची बेगम व मुलगी असून आपल्या नशीबीं दासीपणा यावा हा किती तरी अपमानास्पद प्रकार आहे बरें ! असें त्यांस वाटूं लागलें. बादशाही ऐश्वर्यामुळें इतरांस तुच्छ मानणाऱ्या त्या मानी स्त्रियांस हें दुःख असह्य झालें. ह्या वेळीं उदेपुरीस आपल्या पूर्ववृत्ताचें स्मरण झालें. आपण पूर्वीं दासी म्हणून विकलें गेलेली होतें पण परमेश्वरानें त्या स्थितीतून आपली मुक्तता करवून आपणांस सर्व जगाच्या बादशहाची आवडती बेगम केलें; पण तीही स्थिति पालटून पुनः आपण पूर्व स्थितीस पोहोंचलों हें दुःख तीस फारच मानवूं लागलें. तिनें चंचलकुमारीस म्हटलें, ‘तुम्हीं किती मोहरा घेऊन माझी मुक्तता कराल ?’

चंचल—जर बादशहा सर्व हिंदुस्थानामधील एकंदर मशीदी जुम्मामशीदीसुद्धां मोडून टाकील, आपलें सिंहासन इकडे पाठवून देईल आणि प्रत्येक वर्षीं आम्हांला खंडणी देण्याचें कबूल करील तरच मी तुम्हांस सोडीन एरव्हीं आशा करूं नका.’ ह्या बोलण्याचा उदेपुरीस फारच क्रोध आला. ती उठून जाऊं लागली, पण चंचलेनें तीस अटकाव केला. ‘खबरदार आपण आमच्या कैदी आहां. माझ्या हुकमावांचून येथून कोठेंही जाऊं नका.’

प्रकरण २८ वें समाप्त.

प्रकरण २९ वें.

शत्रूवर केलेली दया.

महाराणा राजसिंह व जयसिंह पर्वतावरील आपल्या छावणीमध्यें बसून मोगलांच्या हालचालीचें निरिक्षण करीत होते. भूकेनें व तहानेनें व्याकूळ झालेलें मोंगल सैन्य पर्वतावर चढण्याचा प्रयत्न करीत होतें पण हें चढण्याचें काम त्यांच्यानें होणें महामुष्किल असें त्यांच्या नजरेस आलें. बादशहाच्या लष्करामध्यें हलकल्लोळ माजून राहिला होता. ही स्थिती पाहून त्या दयार्द्र अंतःकरणाच्या राण्यास वाईट वाटलें, तो ह्मणाला, ' जयसिंह ! कसा झाला तरी तो मानी बादशहा आहे. आज त्याचें सर्व हिंदुस्थानावर स्वामित्व आहे. त्याची व त्याच्या बेगमांची ही भयंकर स्थिति पाहून मला फारच वाईट वाटतें.'

जय.—मला तर असें वाटतें कीं, हीं सर्व मनुष्यें, हात्ती, घोडे, उंट वगैरे ह्या खिंडीत भूकेनें व तहानेनें मेल्यावर त्यांची शवें कुजून जी दुर्गंधी सुटेल तिनें उद्देपुरची खराबी होईल. ह्या लोकांस भुकेनें मारणें हें मला बरें दिसत नाहीं.

रा.—होय मलाही असेंच वाटतें. लढाईमध्यें हजारों माणसें मारावयास मुळींच संकोच वाटत नाहीं, पण भूकेवांचून मारणें हें अत्यंत निंद्य प्रकारचें कर्म आहे मलाही मोंगलांवर दया येत आहे. मग आपण यास कोणता उपाय करावा.

ज.— महाराज, मी आपणांस कोणता सल्ला देऊं. मला क्षुद्र मनुष्याला यांत काय समजतें. पण माझ्या अल्प समजुतीस असें वाटतें कीं सल्ला-तह करण्याचा हाच वेळ आहे. जठराग्निचा दाह होत आहे अशा वेळीं मोंगल बादशहा जितका नरम असून तह करण्यास तयार होईल तितका दुसऱ्या वेळीं होणार नाहीं; हें लक्षांत घ्यावें, मला वाटतें कीं, आपण प्रधान, सेनापती वगैरे अधिकाऱ्यांस बोलावून त्यांची काय इच्छा आहे तें विचारल्यास बरें होईल.

राज.--मलाही असेंच वाटतें. त्या लोकांस उपाशीं मारावें अशी माझीही इच्छा नाहीं. भुकेलेल्यास अन्न द्यावें असें आपणा आर्यांचें ब्रिद आहे. त्याप्रमाणें शत्रूस अन्न अन्न करून मारूं नये, पण त्याच्या बरोबर समोर लढून त्यांचा प्राण घ्यावा हा आपला रजपुतांचा धर्म आहे.

सायंकाळीं त्याच ठिकाणीं सभा भरविण्यांत आली. त्या सभेंत प्रधान, सेनापती वगैरे मोठमोठे अधिकारी होते. प्रथम राजसिंहानें त्यांस आपले विचार सांगितले व यावर कोणास कांहीं बोलावयाचें असल्यास बोलावें ह्मणून हूकूम सोडला. कित्येक ह्मणूं लागले "हरकत नाहीं. मोंगलांस आहेत त्याचठिकाणीं कुजूं देणें योग्य आहे. आपण

औरंगजेबाच्या शहाजाद्यास येथें आणून त्याच्या हातून त्यांचा अंतःविधी करूं. पण मोंगलांकडून आजपर्यंत जो रजपुतांवर जुलूम झालेला आहे त्याचें उसनें फेडूं"

राज.—उसनें फेडण्याची वृत्ती होणें साहजिक आहे, पण औरंजेबाबरोबरची फौज मेल्यानें मोंगलांचा ह्या हिंदुस्थानामधून निःपात होत आहे असें नाहीं. औरंगजेबानंतर शहाआलम गादीवर बसेल त्याच्या जवळ महाराष्ट्रामध्यें वाखाणलेलें सैन्य असून तो ह्या पर्वताच्या पलीकडील बाजूस तयारच आहे. ह्याशिवाय दुसऱ्याही दोन बाजू मुसलमानी सैन्यानें अडविल्या आहेत. आपल्या थोड्याशा सैन्यानें ह्या संबंधसेनेचा नाश होईल असें सांगतां येत नाहीं. असें जर आहे तर आज नाहीं उद्यां तह करणें भागच आहे. तह करण्यास आज जशी सुसंधी आहे तशी यापुढें मिळणार नाहीं. औरंगजेबाकडून आपण आपल्या मनास वाटतील त्या शर्तीं दाखल करून तह करूं. आजच्यासारखा समय केव्हां येईल याची वाट पहात बसण्यापेक्षां ह्याच संधींत आपला कार्यभाग उरकला पाहिजे.

दयाळशहाः—अशी संधी न मिळाली तरी हरकत नाहीं. पण संबध हिंदु लोकांस कांट्याप्रमाणें सलणारा हा दुष्ट औरंगजेब आहे, याचा नाश करून आपण पृथ्वीचा पुनरुद्धार करूं. ह्याकामीं जेवढें पुण्य आहे तेवढें दुसऱ्या कशांतही नाहीं. महाराज! आपण आमच्या विरुद्ध जाऊं नका.

राज०—आपण जर कांट्यांचीच गोष्ट बोलत असाल तर सबंध मोंगल बादशाहीच कांटारूप आहे. औरंगजेबाहून अती नराधम असा तुह्मांस कोण आठवतो? खुषरूच्या हातून आपलें किती अमंगल झालें आहे? तसें औरंगजेबाच्या हातून झालें आहे काय? शाहआलम औरंगजेबाहूनही जुलूम करणार नाहीं असें कोण कबूल करतो? ह्याबद्दल तुमची खात्री आहे काय? ज्याप्रमाणें आपण इच्छा करीत आहों त्याप्रमाणें मोंगलसेनाही आपल्या चारी लष्करांचा पराभव होईल हें जाणून आहे पण आपणच विचार करा. ही आपली आशा संपूर्ण करण्यास आपणास किती रजपूतांचे बळी दिले पाहिजेत? आपलें सैन्य किती कमी होईल? व शेवटीं किती शिल्लक राहील? पहिल्यानें आपली संख्या थोडी, मुसलमानांची जास्त; तेव्हां कमी झालेल्या संख्येनें नामोशी स्वीकारण्यांपेक्षां तह करावा हेंच मला योग्य दिसतें.

दया०—महाराज सबंध राजपुताना एक झाल्यास मोंगलांस दर्यापार करण्यास कितीसा वेळ लागेल?

राज०—ही गोष्ट खरी आहे, पण असें कधीं झालें आहे काय? ही आशा कोणत्या आधारावर ठेवावी?

दया०—पण सल्ला केल्यावरही, औरंगजेब तहाप्रमाणें चालेलच असें मला वाटत नाहीं; तो धडधडीत खोटें बोलणारा असत्यवादी आहे. सुटका होतांच तहाच्या करारनाम्याचे तुकडे उडवून तो आपल्या मूळस्वभावावर जाईल.

राज०—आपण ह्या बाजूनें विचार केला तर तह कधींच होणार नाही.

शेवटीं बराच वेळ भवति न भवति होऊन तह करण्याचें नक्की झालें. पण तह करण्यासाठीं त्यांच्याकडून दूत यावयास पाहिजे होता तो आला नसतां आपण तह करण्यास तयार होणें कमीपणा आणणारें आहे असें दिसून येऊं लागलें; त्यावर असेंही प्रत्युत्तर मिळालें कीं, त्यांस ज्या सांपळ्यामध्यें कोंडून ठेवण्यांत आलें आहे त्यांतून मुंगीसही बाहेर पडण्यास मार्ग नाहीं मग दूत येईल कसा? अखेरीस तहाच्या शर्तींचा करारनामा तयार करण्यांत आला. त्यांतील मतलब असा होता कीं, बादशहानें आपलें सैन्य घेऊन मेवाडची हद्द ओलांडून चालतें व्हावें; मेवाडामध्यें होणाऱ्या गोहत्येचा तसेंच होत असलेल्या देवालयांच्या नाशाचा अटकाव करावा, जिझिया कराची मागणी करूं नये. ह्या शर्ती जर कबूल करण्यांत येतील तर राजसिंहानें रस्ता मोकळा करून द्यावा. करारनाम्यावर सही होऊन येतांच उदेपुरी व झेबउन-निसा यांस स्वाधीन करण्यांत येईल. ह्याप्रमाणें करारनामा तयार करून तो जयसिंहाच्या स्वाधीन करण्यांत आला. त्यानें कोणत्यातरी युक्तीनें त्या खिंडींत दाखल होऊन करारनाम्यावर सही आणावी असें ठरलें व सभा बरखास्त झाली.

प्रकरण २९ वें समाप्त.

प्रकरण ३० वें.

सांपळ्यांतून सिंहाची मुक्तता.

बादशहानें तहाच्या अटी कबूल केल्या. त्यानें आपल्या मुनशीकडून तहाचा करारनामा तयार करविला आणि त्याच्यावर आपली मोहोर केली, आणि आपल्या हातानें 'मंजूर' असे शब्द लिहिले. जयसिंहानें तो करारनामा आणतांच बादशहाची मुक्तता करण्याचा राजसिंहानें हुकूम सोडला. त्यांनीं हत्तीच्या मदतीनें तीं झाडें बाजूस केलीं व मोंगलांचा मार्ग मोकळा करून दिला. बाहेर पडतांच त्यांची खाण्याची तयारीही करून ठेविली होती. मोठमोठ्या हत्तींवरून खाण्यापिण्याच्या वस्तूंची रवानगी केली. उदेपुरी व झेबउन-निसा यांस पाठविण्याबद्दल चंचलकुमारिकेस निरोप गेला. त्यांस निरोप देतेवेळी, चंचल ह्मणाली; "बेगमसाहेब, तुमच्यावर जें कांहीं संकट आलें होतें त्यांतून तुमची मुक्तता राण्यांनीं मोठ्या उदार मनानें केली आहे. मी कोण आहे तें आपल्याला माहित आहेना? अहो जिनें बादशहाच्या तसबिरीवर लाथ

मारून त्याच्या नाकाचा चुराडा केला होता तीच मी चंचलकुमारी आहें. आतां बादशहास ह्मणावें, रजपूत बालांचा अपमान करण्याची इच्छा करूं नकोस नाहींतर त्या फक्त चित्रावरच लाथ मारून स्तब्ध बसावयाच्या नाहींत. "

हें ऐकतांच उदेपुरी निस्तब्ध झाली व मान खालीं घालून हत्तीवर बसून चालती झाली.

बेगम, कन्या आणि खाणें मिळतांच बादशहा त्या खिंडीजवळून चालता झाला व उदयसागरच्या किनाऱ्याजवळ पुनः छावणी मारून बसला. रात्र त्याच ठिकाणीं पुरी करण्याचा त्याचा विचार झाला. शिपाई वगैरे खाण्यापिण्यामध्यें गर्क झाले. जेवण झाल्यावर गाणेंबजावणें, गप्पासप्पा सुरू झाल्या. एक मुसलमान ह्मणतो; 'भाई हिंदूच्या राज्यामध्यें आलें पण आपणांस एकादशीचा उपास घडला.' तें ऐकून एक मोंगलाणी ह्मणाली; 'जिवंत राहिलां ह्मणून मिळविली, नाहींतर आपण मरतां तर आह्मांलाही एकादशीच करणें भाग पडलें असतें.' एक गाणारीण कित्येक फक्कडांस गायनाचा स्वाद देत होती पण गातांगातां तीं ताल चुकली तें पाहून एकजण ह्मणाला; ' बीबीजान असें कसें झालें ? ताल चुकला कशा ?' गाणारी ह्मणाली; 'आपली बहादुरी पाहून ' उदेपुरीस हरण केलें तें ऐकून सर्व दिलगीर झाले होते. खेरखां नांवाचा एक शिपाई रावणानें सीतेचें हरण केलें होतें त्या कथेशीं ह्या बाबतीचा मुकाबला करीत होता. कोणी कोणी त्यास जबाब देत होते कीं, 'अरे, बादशहाबरोबर इतकें माकडांचें लष्कर आलेलें आहे मग सीतेची सुटका झाल्याशिवाय राहील का ? ' ह्याप्रमाणें अनेक प्रकारच्या गप्पा चालल्या होत्या. बादशहा उदेपुरीच्या तंबूत गेल्यावर त्यास उदेपुरीनें तिखट मीठ लावून सर्व हकीकत सांगितली. चंचल कुमारिकेचे शेवटचे शब्दही त्याच्या कानावर घातले. ते ऐकतांच बादशहा तप्त झाला. त्यानें शाहाजादा अकबराच्या मुक्ततेस दिलेरखानाला पाठविलें. व दुसऱ्या दिवशीं दरबार भरविला त्यांत त्यानें रजपूतांबरोबर झालेला तहनामा फाडून टाकिला. आणि जोंपर्यंत प्राण आहे तोंपर्यंत लढून चंचल कुमारीस मिळविण्याचा आपला निश्चय जाहीर केला. तहामध्यें ज्या अटी कबूल केल्या होत्या त्या मुळींच मान्य करावयाच्या नाहींत असे उद्गार काढीले व लढाईचीं तयारी केली.

इकडे दायसुरीच्या रस्त्यानें मारवाडा मधून उदेपुरास दिलेरखानाचें लष्कर चाल करीत आहे असें हेरानें येऊन सांगतांच राजसिंहानें बादशहाकडे आपला दूत पाठविला. व विचारलें, ' एक वेळ तह झाल्यावर ह्याप्रमाणें लढण्याचें कारण काय ? ' औरंगजेबानें निरोप पाठविला कीं, 'तुमच्या सारख्या यःकश्चित राजाबरोबर तह करणें हें बादशहास योग्य आहे का ? जोंपर्यंत चंचलकुमारी आमच्या स्वाधीन होणार नाहीं तोंपर्यंत आपणांस क्षमा केली जाणार नाहीं.' हें ऐकून राणा खडखड हंसला आणि ह्मणाला; ' अद्याप मी जिवंतच आहे, कांहीं काळजी करूं नका.'

रूपनगरच्या राजकुमारीचें हरण हें बादशहास शल्याप्रमाणें सलत होतें. त्यानें राजसिंहाबरोबर झालेला तह तोडल्याचें त्यास कळविल्यावर रूपनगरच्या विक्रमसिंहाकडे एक हुकूमनामा पाठविला त्यांत लिहिलें कीं, 'तुमची कन्या अद्याप आमच्याकडे आली नाहीं; करितां तिला तावडतोब पोहोंचती करावी नाहींतर रूपनगर अस्तित्वांत राहाणार नाहीं.' औरंगजेबानें विचार केला कीं, बापानें हट्ट घेतल्यावर मुलगी तावडतोब ठिकाणावर येईल. बादशाही हुकूम मिळतांच विक्रमसिंहानें 'दोन हजार स्वार घेऊन आपल्या सेवेस हजर होत आहे असा निरोप पाठविला.'

त्यावरून औरंगजेब म्हणूं लागला कीं, 'हा ससैन्य कशास येत असावा बरें? बहुतकरून त्याचा मतलब माझ्या साह्यास येण्याचा असावा असें दिसतें.'

प्रकरण ३० वें समाप्त.

प्रकरण ३१ वें.

मध्यंतरीं आलेलें विघ्न.

ज्या दिवशीं गुप्त वीरसंघाच्या महाराणी आपल्या बरोबरच्या पंचवीसहजार स्वारांनिशीं जंगलामध्यें राहूटी देऊन विश्रांति घेण्यासाठीं थांबल्या होत्या; त्याचवेळीं चार स्वार भरधांव घोडे फेंकीत आल्याचें आपण पाहिलेंच आहे. सुखासनीं विराजमान होऊन त्या विश्रांति घेतात न घेतात, तोंच पहारेकऱ्यानें चार स्वार आल्याची वर्दी दिल्यामुळें 'राणीसाहेब' फारच कंटाळल्या. तरीही त्यांची मुलाखत घेणें अवश्य आहे, असा विचार करून त्या बैठकीच्या जागीं आल्या. त्यापूर्वी त्यांनीं प्रतापास बोलावणें पाठविलें होतें. स्वारांनीं येऊन मुजरा केला व त्यांपैकीं एकानें एक खलिता काढून राणीसाहेबांच्या हातीं दिला. खलिता वाचून पाहतांच त्यांच्या चेहऱ्यावर निरनिराळे तरंग उद्भवूं लागले. क्षणांत आश्चर्य, क्षणांत खेद, क्षणांत भीती अशाप्रकारें त्यांचा चेहरा बदलूं लागला. पत्र वाचून होतांक्षणींच त्यांनीं एक उसासा टाकला व त्या मान खालीं घालून स्तब्ध बसल्या. त्यांच्या मुखांतून एक अक्षरही बाहेर पडेना. ही त्यांची स्थिति पाहून त्या स्वारांपैकीं एक स्वार धैर्य धरून म्हणाला, 'सरकार! ह्या गोष्टीचा बंदोबस्त करणें तो लवकरच केला पाहिजे. आपल्या वीरांनीं त्यांच्याबरोबर लढण्याची शिकस्त केली, पण जिथें घरच फुटलें तिथें इलाज कोणता? परमहंसजी व तपस्विनी माता ह्यांस जरी त्यांनीं कैद केलें आहे, तरी त्यांच्याहातून त्यांचें कांहींच वाईट व्हावयाचें नाहीं. कारण ते त्यांस लवकरच सोडून देतील.'

महाराणी०—तुम्हांला हा निव्वळ भ्रम आहे. ते त्यांस सोडणार तर नाहींतच पण उलट तावडतोब जिवें मारतील. आमच्या सर्व आशा, उत्साह, व वीरश्री हीं त्यांच्या-

वरच अवलंबून आहेत. गुरुवर्य परमहंस व माता तपस्विनी ह्यांच्या उत्कट देशाभिमानानेंच प्रेरित होऊन आज हा संघ जमा झालेला दिसत आहे, एरव्हीं आशा करणें व्यर्थ होय! पण कायरे सुजनसिंग! तुम्हीं पांचशें लोक इतके नामर्द कसे झालां. तुमच्यानें त्यांचें संरक्षण करवलें नाहीं?

सुज०—सरकार आम्हीं सर्व त्या नोडग्यांवर लांडग्यांसारखे तुटून पडलों. पण वीरसेन सामील होऊन त्यानें त्यांस भुयारांतील सर्व चोरवाटा दाखविल्यामुळें आमचा नाइलाज झाला. प्रथम त्यांनीं आपल्या हत्यारांच्या कोठारावर हल्ला करून तें कोठार आपल्या स्वाधीन केलें. नंतर दारूखान्यावर मोर्चा फिरविला तिथें हीच स्थिति म्हणून आमचा नाइलाज झाला. एरव्हीं सरकार असा प्रसंग कधींहीं न येता.

ही हकीकत ऐकून राणीसाहेबांची मुखचर्या खदिरांगाराप्रमाणें तप्त दिसूं लागली. त्यांच्या नेत्रांतून प्रखरअग्नि प्रगट होतो कीं काय असें भासूं लागलें. चेहऱ्यावरील तो विक्राळ देखावा पाहून त्या स्वारांची गाळण झाली. त्यांचीं शरीरें भीतीनें थर थर कांपूं लागलीं. ह्याप्रमाणें थोडा वेळ गेल्यानंतर राणीसाहेब आवेशानें म्हणाल्या, "आमच्या संघामध्यें फितूर! आणि तो फितूर होणारा सरदार वीरसेन! आं! अरे कुलकलंका! कशाला रजपुताचें नांव सांगतोस! मातृभूमीबरोबर हरामखोरी करणारास शिक्षाही भयंकरच झाली पाहिजे! नीच, कपटी व स्वार्थी नराधमांची उत्पत्ति आमच्या ह्या राजस्थानांत होऊं लागली, हें ऐकूनच माझ्या अंगाचा तिळपापड उडाला आहे. अरे नराधमा! माझ्या तडाक्यांत जर सांपडला असतास तर तुझे राई राईएवढे तुकडे करून ते क्रूर जनावरांकडून खावविलें असतें. हाय! हाय! मातृभूमी अद्यापही तुझ्या नशिबांत पारतंत्र्य आहेचना? हे तुझे पुत्रच जर परकियांशीं संलग्न होऊन घरभेदीपणाचीं कामें करूं लागले, तर तुझी सुटका कशी होणार! माते अशा पुत्रांस तूं प्रसवतेस तरी कशाला? वा राजस्थाना! तुझ्या पोटीं हिऱ्यासारखीं रत्नें पैदा झालेलीं होतीं. राणा संग! हंम्मीर, प्रतापसिंग, हीं तुझींच अपत्येंना आणि त्याच तुझ्या पोटीं वीरसेन सारख्या गारगोट्या निर्माण व्हाव्याना! हा कशाचा महिमा बरें! कालाचाच असला पाहिजे! रजपूतांच्या भाग्यसूर्यास राहूनें ग्रासिलें आहे. तेव्हां हीं अशीं रत्नें निर्माण होणारच! इतक्या संभाषणानें महाराणीसाहेब गलित झाल्या, त्यांची बुद्धि नाहींशी होऊं लागली, त्या बसल्या जागेवरच बेशुद्ध झाल्या. अशा वेळीं काय करावें ह्याची काळजी त्या स्वारांसच पडली. त्यांनीं ताबडतोब बाहेर जाऊन प्रतापास बोलावून आणिलें. प्रताप आल्यानंतर त्यानें पाणी वगैरे डोळ्यांस लावून त्यांस सावध करण्याचा प्रयत्न केला. कित्येक दासी वारा घालूं लागल्या. कित्येक वैद्यास बोलवावयास गेल्या. ताबडतोब वैद्यांची स्वारी आली. त्यांनीं कसलेंसें औषध हुंगण्यास दिलें, त्याबरोबर राणीसाहेबांनीं डोळे उघडले. डोळे उघडतांच त्यांस स्वस्थ पडून राहण्याचा इशारा देऊन वैद्य चालते झाले. प्रतापानें दासींच्या हातून विंझणा घेतला व त्यांस

आंत जावयास सांगितलें. आतां त्या ठिकाणीं प्रताप व राणीसाहेब हीं दोघेंच होतीं. मध्यंतरीं थोडा वेळ गेल्यानंतर प्रताप ह्मणालाः—'एकाएकीं अशी तब्यत नादुरूस्त होण्याचें कारण?' राणीसाहेबांनीं मुळींच संभाषण केलें नाहीं. पण त्यांनीं पत्राकडे बोट केलें. प्रतापानें पत्र उचललें व उघडून वाचूं लागला. पत्र वाचतांच त्याचीही चर्या चमत्कारिक झाली. तो आवेशानें ह्मणाला, ' कांहीं हरकत नाहीं. आम्हीं अद्याप जिवंत आहों ! त्या देशद्रोह्याचा समाचार घेण्याची आमच्या आंगीं अद्याप शक्ति आहे. आपण मुळींच चिंता करूं नये. मी थोड्याशा लोकांनिशीं जाऊन त्यांचें पारिपत्य करीन आणि पूज्य परमहंस व माता तपस्विनी यांस सोडवून आणीन आपण बेफिकिर असावें.'

' पण आपण कोणत्या कार्यास जात आहों याचें आपणास भान आहे का ? शिवाय वास्तव्यही भर जंगलामध्यें ! अशा वेळेला आपण जायचं ह्मणजे कठीणच !'

' आपल्या संरक्षणाची नीट व्यवस्था करूनच मी जाईन. माझा अजमास आहे कीं, मी त्यांचें शासन करून प्रातःकाळपर्यंत येथें हजरच आहे असें समजा. आतां विलंब करून उपयोगी नाहीं. बरें तर मी रजा घेतों.'

" पहा प्रताप, मी आपल्या जाण्यासंबधानें विशेष आढेवेढे घेत नाहीं. कारण आपल्या लक्षांत असेलच माझा व आपला विवाह होण्यास मी कोणत्या कुळांत उत्पन्न झालें आहे,ह्या माहितीचा विशेष उपयोग होणारा आहे. ही माहिती परमहंसजीस व माता तपस्विनीस पूर्णपणें आहे. त्यांनीं ज्यावेळीं माझी ह्या राज्ञीपदावर योजना केली, त्यावेळीं इच्छित कार्य सफल होतांच तुझ्या पित्याची, मातेची व तुझी गांठ घालून देईन असें आश्वासन दिलें आहे, तें आश्वासन परमहंसजी व माता तपस्विनी यांच्याशिवाय पूर्ण होणें नाहीं. ह्मणून प्रताप-कसेंही करा, पण त्यांस सुरक्षित परत आणा."

' आपली इच्छा हेंच माझें सर्वस्व, आपण बेफिकीर असा. येतों आतां,' असें बोलून प्रताप दहाहजार स्वार बरोबर घेऊन चालता झाला.

प्रकरण ३१ वें समाप्त.

प्रकरण ३२ वें.

राजसिंहास मदत.

युद्धनीति व राजनीति विशारद राणा राजसिंहाप्रमाणें त्याकाळीं तरी कोणीही चाकबगार नव्हता. जोंपर्यंत मोंगल सैन्य आपली छावणी उचलून चालतें झालें नाहीं तोंपर्यंत आपली छावणी उठविणाऱ्यापैकीं तो मूर्ख नव्हता. त्यानें आपलें सर्व सैन्य पूर्वींच्याच जागीं कायम केलें होतें. इतक्यांत त्यास बातमी मिळाली कीं, विक्रमसिंह

दान हजार स्वार घेऊन इकडे येण्यास निघाला आहे असें ऐकतांच त्यानें लढाईची तयारी केली.

प्रथम एक स्वार दूत म्हणून विक्रमसिंहाकडून त्याच्याकडे आला. त्यानें विक्रमसिंहाची इच्छा आपली भेट घ्यावयाची आहे असें कळविलें. त्यावर राजसिंह ह्मणाला; 'जर छावणीमध्यें भेटण्याची इच्छा असेल तर त्यांस सांगा कीं, आपण एकटेच येऊन भेटा. लष्कर बरोबर घेऊन येणें असेल तर छावणीच्या बाहेरच उभे राहा, मीही आपलें सैन्य घेऊन आपल्या भेटीस येतो.'

विक्रमसिंहानें छावणीच्या आंत येऊन भेटण्याची इच्छा दर्शविली. विक्रमसिंह येतांच राण्यानें त्यास सन्मान देऊन आसनावर बसविलें. विक्रमसिंहानें राण्यास नजराणा केला. कारण उदेपूरचा राणा रजपूत कुळांत मुख्य गणिला जात होता. पण त्यानें नजराणा न घेतां सांगितलें कीं, 'हा आपला नजराणा बादशहानेंच घेणें योग्य आहे.'

विक्रम०—आजपर्यंत असा वेळ होता, पण ह्यापुढें जोंपर्यंत महाराणा राजसिंहाच्या शरिरांत प्राण आहे तोंपर्यंत कोणाही रजपूतास मोंगलांनां नजराणा देणें भाग पडणार नाहीं. महाराज! मला क्षमा करा. मी पत्र लिहिण्यांत चुकी केली आहे. आपण एकट्यानेंच मोंगलांस जें शासन केलें आहे तें पाहून मला शरम वाटूं लागली आहे. सर्व राजपुताना जर आपल्या निशाणाखालीं लढण्यास सिद्ध होईल तर मोंगल बादशाही केव्हांच नामशेष होईल व आमच्या पांढऱ्या केंसास बट्टा लावण्याचा प्रसंग आमच्यावर येणार नाहीं. मी फक्त आपणांस नजराणा द्यावा ह्या उद्देशानेंच आलों नाहीं, पण माझ्या पत्रांतील शेवटचीं वाक्यें आपल्या लक्षांत असतीलच तीं खरीं करण्याकरितांच मी माझे हे दोनहजार स्वार; दुसरी माझी स्वतःची ही तरवार; आपणांस अर्पण करावयासच आलों आहे. ह्या वृद्ध हस्तामध्यें जें थोडेंसें बळ शिल्लक आहे त्याचा उपयोग आपण जें कार्य सांगाल त्याकडे करावा अशी इच्छा आहे.

हे विक्रमसिंहाचे शब्द ऐकून राजसिंहास फारच आनंद झाला. तो म्हणाला, 'आज आपण जें बोलतां तें 'सोळंखी' ह्या कुळास योग्य असेंच आहे. मोंगलांनीं तह मोडला आहे व ते शहाजादा अकबरास सोडविण्यास जात आहेत, ते जर त्या ठिकाणीं पोहोंचले तर कुमार जयसिंहावर मोठें संकट उद्भवेल. मी गोपीनाथ राठोडास त्याच्या मदतीकरितां पाठवीत होतों; पण त्याच्याजवळ सैन्य फारच थोडें आहे, ह्मणून आपलें सैन्य तिकडे पाठवावें असें मला वाटतें. आपण तिकडे जाऊन दिल्हेरखानाच्या लष्कराची वाताहात करावी अशी माझी इच्छा आहे.'

विक्रमसिंह खूष झाला. 'आपली आज्ञा सिरसा मान्य आहे' असें ह्मणून जाण्याची तयारी करूं लागला, इतक्यांत बहादूर प्रताप त्या ठिकाणीं येऊन दाखल झाल्याची

वर्दी येऊन पोहोंचली.तावडतोड त्यास आंत आणविले.महाराण्यास प्रणाम करून प्रतापानें जवळच बसलेल्या आपल्या काकाकडे दृष्टी वळविली. तो क्षणभर गोंधळल्यासारखा झाला. आपले काका येथें कसे आले हें त्यास उमगेना, पूर्वीपासून जो पुरुष विरुद्ध तो ह्या वेळीं ह्या ठिकाणीं हजर असलेला पाहून त्यास पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. विक्रमसिंहानें त्याची ही गोंधळलेली स्थिति पाहून त्यास झटलें. 'बाळ प्रताप ! ये. ह्या अभिमानशून्य काकास कडकडून आलिंगन दे. तो पूर्वीचा तुझा स्वाभिमान्-शून्य काका मृत होऊन त्या जागीं मायभूमीच्या उपयोगीं पडण्यासाठीं अवतार घेतलेला असा नवा काका उभा आहे त्यास भेट.' हे शब्द ऐकतांच सर्व मजकूर प्रतापाच्या लक्षांत आला. तो धांवत जाऊन आपल्या काकांच्या चरणीं लागला व त्यांस त्यानें प्रेमानें आलिंगन दिलें. व ह्मणालाः—'काका ! काका ! शेवटीं आपण सत्यपक्षाला मिळाला हें पाहून माझें हृदय आनंदातिशयानें भरून आलें आहे. ईश्वरानें खैर केली. आतां मला कशाचीही काळजी उरली नाहीं.' शेवटीं राण्याकडे वळून तो ह्मणाला; 'महाराणा राजसिंहाच्या चरणीं अर्पण करण्यासाठीं पंचवीस हजार स्वारानिशीं आमच्या गुप्तवीर संघाच्या राणीसाहेब हजर झाल्या आहेत, महाराज आज्ञा द्या.'

राजसिंह—' कुमारप्रताप ! आपल्यासारखे मोहरे आमच्या मदतीस असल्यास ईश्वरकृपेनें आपला खास जयच आहे. बोलावा त्यांनां आंत.' तावडतोब मुख बुरख्यानें आच्छादन केलेल्या अशा राणीसाहेब येऊन उभ्या राहिल्या. त्यांस योग्य आसनावर बसविल्यानंतर राणा राजसिंह ह्मणाला—' राणीसाहेब, आपण जी ही आपल्या मायभूमीस मोंगलांच्या जुलमापासून परावृत्त करण्याची कामगिरी पत्करिली आहे तीबद्दल मला आपला फारच अभिमान वाटत आहे. आह्मीं पुरुष असून त्यांच्यानें ज्या बाबतींमध्यें धैर्य धरवत नाहीं; त्या बाबतींत आपण अग्रगण्य स्विकारून बोलत न राहतां कृतीचें स्वरूप अमलांत आणावें ही मोठी अभिमान उत्पन्न करण्यासाठीं गोष्ट आहे. आमच्या मानभावी, मोंगलांचे मिंधे, निव्वळ दास्यत्व स्वीकारून गुलामाप्रमाणें राबणाऱ्या, आपल्या भगिनी, कन्या यांस मोंगलांस अर्पण करणाऱ्या रजपूत कुलांतील पुरुषांस चांगला धडा घेण्यासारखी ही गोष्ट नाहीं काय ?'

राणी०—महाराज ! आपल्या कृतीचें स्वरूप अवर्णनीय आहे. आमचे वीर आपल्या देशाभिमानाच्या आवेशाच्या पासंगासही पुरणार नाहींत. आपल्या मायदेशाबद्दलचें जें कर्तव्य तेंच आह्मीं करीत आहों. मग तो पुरुष असो अगर स्त्री असो त्यांनीं एकसारखेंच आपल्या देशाच्या उपयोगीं पडलें पाहिजे.

राज.—धन्य आहे आपली ! प्रताप, आतां आपण आपल्या स्वारांपैकीं दोन हजार स्वार घेऊन विक्रमसिंहाबरोबर जावें व दिल्हेरखानाचा फडशा पाडावा ही आपणांस कामगिरी दिली आहे.

' आज्ञा ' ह्मणून विक्रमसिंह व प्रताप कार्य सिद्धयर्थ चालते झाले.

प्रकरण ३२ वें समाप्त.

प्रकरण ३३ वें.

असत्यवादी बादशहाचा पराजय.

गोपीनाथ राठोड, विक्रमसिंह सोळंकी व प्रतापसिंह मिळून तिघेजण दिल्हेरखानाबरोबर टक्कर देण्यास चालते झाले. ज्या रस्त्यानें हा मोंगल सेनापती येणार होता, त्या रस्त्यावरील निरनिराळ्या तीन जागीं, ते छपून राहिले. विक्रमसिंह व प्रताप यांच्याजवळ स्वार होते ह्मणून ते उंच जागीं चढून छपून बसले. ही जागा समोरील मार्गाच्या साधारण बाजूसच होती ती, वरून तावडतोब खालीं येतां यावें अशा प्रकारच्या सोईची होती. जवळच दुसऱ्या एका झाडीमध्यें प्रतापसिंह व विरुद्ध बाजूस गोपीनाथ राठोड यानीं आपल्या पायदळास छपविलें.

अकबराची जी दुर्दशा झाली ती दिल्हेरखानास माहीत होती, ह्मणूनच तो खबरदारीनें चालला होता. पुढें कोठें रजपूत छपून बसले आहेत कीं काय हें पाहण्यास तो वेळोवेळीं आपले हेर पाठवीत असे, त्यामुळें विक्रमसिंह छपून बसल्याबद्दल त्यास बातमी मिळाली. त्यास पळवून लावण्यास त्यानें आपले घोडेस्वार पाठविले. विक्रमसिंह दुसऱ्या बाबतीमध्यें मंद बुद्धि होता पण लढाईच्या कामीं अनुभविक योद्धा होता. त्यानें मोंगलांबरोबर थोडी झपाझपी करून आपल्या सैन्यास मागें हटण्याचा हुकूम फर्माविला. मागें परतून दिल्हेरखानास फसवावें व त्याचें माथें उडवावें असा त्याचा विचार होता.

दिल्हेर प्रतापसिंहास सोडून पुढें गेला. प्रताप छपून बसलेला त्याच्या नजरेस पडला नाहीं. त्याचें सैन्य इतकें निवांत बसलें होतें कीं, त्यांनीं जरासुद्धां हालचाल केली नाहीं. घोड्यांचें खिखाळणेंही ऐकूं आलें नाहीं. त्यामुळें, असलेल्या स्वारांस आपण धुडकाविलें आतां कोणीही प्रतिस्पर्धी उरला नाहीं असें अनुमान करून दिल्हेरखान बेफिकीर पुढें चालला.

गोपीनाथ राठोड ज्या ठिकाणीं दडून बसला होता त्या ठिकाणीं दिल्हेरखान आला. तो मार्ग जरा अडचणीचा होता. दर्शनीय भाग पुढें येतांच गोपीनाथ राठोडानें सामना दिला. लढाईस सुरवात झाली. मोंगल वीर पटापट मरूं लागले. ह्याच वेळीं प्रतापसिंहानें तुटून पडण्याची खबरदारी घेतली. विक्रमसिंहानें मागून हल्ला चढविला. ह्याप्रमाणें तिन्हीं बाजूनें दिल्हेरखानाचें लष्कर वेढलें गेलें. मोंगल सेनेचा टिकाव लागेना. तिनें पलायन करण्याचा बेत केला. पण अनोळखी–रस्त्याचे माहितगार नसल्यामुळें, त्यांस शेवटीं मरणच पतकरावें लागलें.

मात्र गोपीनाथ राठोडाबरोबर लढणाऱ्या मोंगलांनीं अद्याप टिकाव धरला होता. पण त्यांचाही कोठवर टिकाव लागणार ! ते एकामागून एक खालीं पडूं लागले.

शेवटीं लढाईचा परिणाम रजपूतांच्या फायद्यामध्यें होऊन, मुसलमानांचा नायनाट झाला. व रजपूत सैन्य परत छावणींत आलें. लढाईचा परिणाम पाहून राजसिंहास अत्यानंद झाला. इतक्यांत हेरानें खबर आणिली कीं, लढाईचा परिणाम पाहून औरंगजेबाच्या अंगाचा तिळपापड झाला आहे. व त्यानें उदईक सकाळीं छावणी उठवून परत दिल्लीस प्रयाण करण्याचें ठरविलें आहे. ही बातमी मिळतांच, राजसिंहानें उदईक सकाळीं छावणी उठविण्याची सूचना पाठविली. प्रत्येकानें पहिल्या तोफे बरोबर उठून तयारींत असावें पण मोंगल लष्कर निघून गेल्या शिवाय खालीं उतरूं नये अशी ताकीद देवविली.

थोडा वेळ विश्रांति घेतल्या नंतर विक्रमसिंह राजसिंहास ह्मणाला, 'राणाजी आतां माझ्या मनाचें समाधान झालें. मला एकुलती एक मुलगी आहे. ती मी आपणांस अत्यानंदानें अर्पण करीत आहे तिचा आपण स्विकार करावा.'

राज०—उदेपुरीं गेल्यावांचून ह्या गोष्टीचा निकाल व्हावयाचा नाहीं.

उदईक छायणी उठवून उदेपुरी प्रयाण करावयाचें, ह्या विचारानेंच मन भ्रमित झाल्यामुळें कित्येक मंडळीस स्वस्थ झोंप सुद्धां लागली नाहीं.

प्रकरण ३३ वें समाप्त.

प्रकरण ३४ वें.

चिंतेचें निर्मूलन.

पहांटेचे पांच वाजण्याचा सुमार. लढाईमध्यें त्रस्त झालेले लोक किंचित् विश्रांतिसुखाचा आस्वाद घेत आहेत तोंच छावणी उठविण्याबद्दलची तोफ ऐकून, जो तो प्रातर्विधि आटोपण्याच्या तयारीस लागला. कित्येकांनीं घाईघाईनें आपआपलें अस्ताव्यस्त असलेलें सामान गुंडाळून ठेवण्याची तयारी चालविली. व्यसनी माणसें अफूचें सेवन करूं लागलीं. त्यावेळीं राजस्थानामध्यें कुसुंबा पिण्याची चाल बरीच बळावत चालली होती, तिचाही कित्येक स्वाद घेऊं लागले. तोफेचा आवाज कांनीं पडल्यापासून फक्त अर्धा तासाची अवधी असे, तितक्या वेळेमध्यें प्रत्येकाची तयारी झालीच पाहिजे असा राजसिंहाचा नियम असे. तो नियम कोणाच्यानेंही मोडवत नसे. नियम मोडणारा शिपाई असो, किंवा एखादा मोठा अधिकारी असो, त्यास शिक्षाही व्हावयाचीच! अशा नियमबद्ध पद्धतीमुळें प्रत्येक काम वेळचेवेळीं होण्यास अडथळा येत नसे. लढाईमध्यें वागावयाचे नियम फार कडक असत. कोणत्याही रजपूत सैनिकानें स्त्रियांस बरोबर नेतां नये. हा ह्या नियमांपैकीं एक नियम होता. लढाईमध्यें पाडाव झालेल्या कैद्यांस फारच ममतेनें वागविण्यांत येत असे. जखमी, मग तो

कोणीही असो त्याची शुश्रुषा उत्तमप्रकारें करण्यांत येत असे. कारणपरत्वें शत्रूस लुटण्याची वेळ आल्यास जी लूट मिळेल तिचा एक चतुर्थांश सरकार जमा करून बाकीची ज्यानें ती लुटली असेल त्यास घेण्याची मुभा असे. स्त्रिया, वृद्ध व बालकें यांनां यत्किंचितही दुःख न देण्याची सक्त ताकीद असे. ह्याप्रकारचे नियम पाळ-ल्यामुळेंच राजसिंहास यश येत होतें.

शाहाजादा अकबराच्या मदतीस जाणाऱ्या सैन्याची मध्यंतरींच वाताहात उडाली. दिल्हेरखान पराभूत पावला. गोपिनाथ राठोड, विक्रमसिंह सोळंकी, बहादूर प्रताप यांच्या अजब युद्धकौशल्यानें दिल्हेरखानास रणांगण सोडणें भाग पडलें. शत्रूचा जोर अधिक वाढला. त्यास जिकडून तिकडून साह्य मिळूं लागलें. असें नजरेस येतांच औरंगजेबाचीं गात्रें ढिलीं पडलीं. अवघ्या चार पांच हजार सैन्यानें आपल्या अवाढव्य फौजेचा पराभव करावा हें त्यास लज्जास्पद वाटूं लागले, त्या धूर्त बादशहानें पूर्णपणें विचार करून पाहिला तों त्यास असें वाटूं लागलें कीं, आपण आतां येथून कूच करावें हेंच श्रेयस्कर आहे. पावसाळ्याच्या दिवसास सुरवात होण्याची संधि अशा वेळेला ह्या राजस्थानाच्या डोंगराळ प्रदेशांत आपलें कांहींही वळावयाचें नाहीं, असें त्यास वाटूं लागले. मागील प्रसंगाची आठवण झाल्याबरोबर त्याच्या शरीरावर रोमांच उभे रहात, अशा प्रकारचा प्रसंग खुद्द आपल्यालाच सहन करून घ्यावा लागला, ह्या गोष्टीचें त्यास भारीच वैषम्य वाटे. 'राजसिंहानें बादशहास कोंडलें' हे शब्द त्यास कसेसेच वाटूं लागले. मी सबंध भारताचा सम्राट ह्मणवितो व मला ह्या राजसिंहासारख्या साधारणशा संस्थानिकानें कोंडून मेटाकुटीस आणावें ही किती लज्जास्पद गोष्ट आहे बरें ! ह्याचें उट्टे पुढें कधीं तरी काढण्याचा त्यानें संकेत केला व आपली छावणी उठविण्याचा हुकूम केला. बादशहाची छावणी ह्मणजे अजस्र प्रकरण ती उठतां उठतां पूर्ण चार तास खोळंबा झाला.

बादशाही मोंगली सैन्य ऐषआरामाचे मूर्तिमंत पुतळेच बनलें होतें. त्यांचें केंस विंचरणें, जामाजिमा करणें ह्यामध्येंच सरासरी दोन तास जावयाचे ! बरोबर बहुते-कांच्या बेगमा दासदासी इत्यादि लटांबर, व बाजारबुणगें असल्यामुळें तांतडीच्या कार्यास अपजय हा ठरलेलाच अशा प्रकारची उभय सैन्यांची स्थिति होती. बादशहाचें लष्कर कूच करून जाईपर्यंत राणा राजसिंहानें आपली छावणी तशीच कायम ठेविली होती. लष्कर कूच करून गेलें असें कळतांच, त्यानेंही आपली राहुटी हाल-विली. दिल्हेरखानाचा पराभव करण्यामध्यें गोपिनाथ राठोड, विक्रमसिंह, प्रताप यांनीं जें युद्धकौशल्य दाखविलें त्याबद्दल त्यानें त्यांचा गौरव केला. आपत्तींतून मुक्त होतांच, कार्यकर्त्या पुरुषाचें चित्तसमाधान पावत असतें त्याप्रमाणें उदेपुरीं पोहोंचल्या-नंतर राण्यास समाधान वाटलें. विजयमदाने धुंद झालेले ते रजपूत वीर शहरांत

प्रवेश करितांच त्यांच्या स्वागतार्थ नगरवासी जनांनीं जी उत्सुकता दाखविली ती पाहून त्यांच्या श्रमाचा परिहार झाला. आज आपण आपलें कर्तव्य केलें ह्या भावनेनें त्यांनां उन्मादवायू झाला आहे, असें वरवर पाहणारांस वाटत होतें. जिकडे तिकडे 'महाराणा राजसिंहजींकी जय' 'जय एकलिंगजी' हेच ध्वनी घुमत होते. ह्या वेळेच्या पूर्वी थोडा वेळ एका प्रशांत अशा महालामध्यें, दोघी नवयौवना विचार-सागरांत गुंग झालेल्या अशा दृष्टीस पडत आहेत, तिकडे आपण जरा नजर करूं. ह्या दोन स्त्रियांपैकीं एक एका कोचावर बसलेली असून, तिनें आपला डावा हात गालास टेंकिलेला आहे. चिंताक्रांत मुद्रेनें ती आसपास न्याहाळित आहे. क्षणांत दूरवर दृष्टी देई व क्षणांत दिवाणखान्यांतील तसबिरीकडे पाही, अशी तिची चंचलवृत्ति दिसत असे. दुसरी तिच्या सर्व चेष्टा एकाग्रतेनें पहात असून न पाहिल्यासारखें करीत असे. शेवटीं पहिली स्त्री कंटाळून दुसरीस म्हणाली. 'गडे! त्या बातमीनं माझं चित्त मुळींच ठिकाणावर नाहीं. एक वेळ पिंजऱ्यांत सांपडलेला सिंह सोडून देऊन महाराण्यांनीं मोठीच चुकी केली आहे. आतां परिणाम काय होतो तिकडे माझं सर्व लक्ष लागून राहिलं आहे.'

'बाईसाहेब आपण मुळींच चिंता करूं नये. कसाही शत्रू असला तरी राण्यापुढें त्याचें कांहींच वळणार नाहीं. खऱ्या स्वदेशाभिमानापुढें भाडोत्री आवसान केव्हांच फिकं पडतं.'

'मला तरी बाई मोठा चमत्कार वाटतो मेल्यांचा! मेल्यांस वचनाची मुळींच कशी ती किंमतच वाटत नाहीं. एक वेळ तह केला असें सांगून नंतर आपलें काम होतांच मी तह केलाच नाहीं, असं म्हणणं चमत्कारिकच नव्हे कां?'

'अहो त्या मेल्या लांडग्यांना वचनाची किंमतच कुठें आहे! कपटाचरणांत ज्यांचा सर्व जन्म गेला त्यांनीं असं वर्तन केलें तर त्यांत चमत्कार कसला?'

ह्या स्त्रिया कोण आहेत, हें वाचकांस सांगण्याची जरूरीच नाहीं. चंचलकुमारी व निर्मला यांस जेव्हां लढाईचें पारडें उलटलें, औरंगजेब पुनः लढाई करावयास तयार झाला असें समजलें, त्याबरोबरच त्यांस झालेला आनंद पार मावळून गेला. राजकन्येनें श्रीएकलिंगास परोपरीनें विनविलें, व ह्या उलटलेल्या प्रकरणांत त्यांस साह्य करण्याबद्दल विनंती केली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या वरील संभाषणांत गढून गेल्या आहेत, इतक्यांत एक दूत आला. त्यानें, राणा विक्रमसिंह, बहादूर प्रताप, गुप्तवीर संघाच्या महाराणी ही मंडळी ससैन्य मदतीस आल्याचें सांगितलें. शिवाय, राणा विक्रमसिंह, वीर प्रताप, व गोपीनाथ राठोड यांनीं दिल्हेरखानाच्या सैन्याचा मोड केल्याबद्दल आणि बादशहाचें दिल्लीस प्रयाण व राजसिंहाचें आगमन ही हकीकत सांगतांच चंचलकुमारीस अत्यानंद

झाला. ती तावडतोब उठून पंचारतीची तयारी करूं लागली. पंचारतीची तयारी करितां करितां चंचल निर्मलेस म्हणाली. 'निर्मले! आतांवरिक् माझं भाग्य उदयास आलं आहे असं दिसतं. बावांनां श्री एकलिंगजीनं सुबुद्धि देऊन इकडच्या मदतीस पाठविलें हेंच किति तरी झालं. नाहीं तर ह्या लढाईचा शेवट जरी चांगला झाला असता तरी माझं मन सुप्रसन्न झालं नसतं. ज्या वडिलांनीं आपणांस जन्म दिला, लहानाची मोठी केली व हरएक प्रकारचे लाड पुरविले, त्यांच्या विरुद्ध वागणं, त्यांचा शाप घेणं हें कोणत्या सुकन्येस श्रेयस्कर वाटलं असतं बरं!'

निर्मला:—पण बाईसाहेब! वडलांनींसुद्धां आपल्या कुळधर्माचा विचार करूनच वागावयास हवं होतं! आपला जन्म ज्या कुळांत झाला आहे त्या कुळाप्रमाणें वर्तन करावयास नकोका?

चंचल:--अग हो, तूं म्हणतेस तें सर्व खरं. पण जर आंगीं शक्तीच नसली तर प्रसंग पाहून त्याप्रमाणं वागलं पाहिजे. बाबांनीं नाइलाजास्तवच मला दिल्लीस पाठविण्याचं ठरविलं होतं. जर औरंगजेबाबरोबर लढण्याचं सामर्थ्य त्यांच्या आंगीं असतं तर त्यांनीं असा प्रसंग कधींही येऊं दिला नसता. आणि तसं झालं म्हणूनच हा सर्व पुढील प्रकार घडून राजस्थानांतील रजपुतांचें पाणी कसं असतं तें औरंगजेबास प्रत्यक्ष पहावयास मिळालं.

निर्मला:--एवढं मात्र खरं कीं, हा प्रकार घडल्यामुळेंच राण्यांनीं समशेर मोकळी केली; नाहीं तर जसे आजपर्यंत रजपूत स्वस्थ घोरत पडले होते ते तसेच पडते, आणि त्यांचे डोकें कधींही वर झालें नसतें.

चंचल:--ह्या सर्व गोष्टी सुरळीतपणें शेवटास जाण्यास माझा दादा-प्रताप कारणीभूत झाला आहे. अहाहा! कायग बाई त्याची ती तेजःपुंज मूर्ति! स्वाभिमानयुक्त अंतःकरण! देशाविषयींचं प्रेम! स्वजनांविषयीं कळकळ! आपल्या कुळाचा अभिमान! ह्या गोष्टी पाहिल्या म्हणजे मला तर बाई गहिंवरच येतो. माझा पाठिराखा भाऊ बहिणीच्या लज्जेचं संरक्षण करणारा होता, म्हणूनच बाई आजचा हा सुदिन उगवतो आहे. आतां पुढेंही आपल्या बहिणीचा तो पाठिराखा रहावा अशीच माझी ईश्वराजवळ प्रार्थना आहे.

इतक्यांत प्रतापाचें आगमन होतें व तो म्हणतो, ताई, संशयास जागाच ठेवूं नको. हा प्रताप आपल्या बहिणीचें संरक्षण करण्यास प्राण आहे तोंपर्यंत कांकूं करणार नाहीं. समजलीस.

प्रतापाचें एकाएकीं आगमन झालेलें पहातांच चंचल व निर्मला विस्मय पावल्या. चंचल म्हणाली:--काय तरी बाई चमत्कार! असं एकाएकीं आल्यानं आम्हीं किती दचकलों पण! भाऊराया! एकटाचसा! बाबा कुठं आहेत आणखी--

'आणखी कोण ? महाराणे वाटतं ! तरीच म्हटलें इथें आल्याबरोबर जेव्हां पंचारतीचा थाट दृष्टीस पडला तेव्हां ही तयारी कशी झाली ? यांस बातमी दिली तरी कोणी ? आणि कोणासाठीं ? ह्या गोष्टीचा विचार करितां करितां माझा मेंदू श्रमला. त्यास हें कोडें उकलेना. आतांबरीक उलगडा झाला. ही सर्व तयारी राण्यासाठींच एकूण ! आम्ही कांहींच श्रम केले नाहींतना ?'

'अरे पण असं काय कारतोस ? तूं श्रम केले नाहींस असं म्हणतं कोण ! उलट तुझ्या श्रमाचंच हें फल आहे असं मी म्हणतें आहें.'

'आपणाला कांहीं डोळ्याला पाणी लावायला कोणीं सांगितलं पाहिजे असं नाहीं आपण त्यांत तरबेजच आहां !'

'आतां बाई शर्थ झाली ! थट्टा तरी किती करावी माणसानं !'

'बरें बुआ थट्टा तर थट्टा ! पण ताई खरंच सांग, आतां तरी तुझ्या मनोदया- प्रमाणें झालें ना ?

'तुझ्यासारखे भाऊ असल्यावर मनाजोगें न व्हायला काय झालं !'

इतक्यांत विक्रमसिंहाची स्वारी आली व ते म्हणाले. 'आणखी आम्हीं म्हणजे कोणीच नाहीं का ? भावानें मनासारखें करावें आणखी आम्हीं मात्र विरुद्ध, असंचना चंचले !'

'अगबाई ! बाबा ! काय बोलतां हें ! आपल्या पुण्यप्रतापानेंच हा दिवस उगवला आहे. आपला अशिर्वाद असावा हेंच माझं आपणांपाशीं मागणं आहे. असें म्हणून ती विक्रमसिंहाच्या पायां पडली. तिला विक्रमसिंहानें उठविलें. इतक्यांत राजसिंह, जयसिंह, दुर्गादास वगैरे मंडळी एकामागून एक आंत आली. चंचलेस उठवितां उठवितां विक्रमसिंह म्हणाले. 'बाळे ! ह्या अभाग्याच्या अशिर्वादाची तुला यत्किंचि- तही जरूरी नाहीं. ह्या स्वाभिमानशून्य हृदयाच्या माणसाच्या अशिर्वादाचें कसलें फळ मिळणार ? मी राण्यास पत्र पाठविलें. तेव्हांच मला असें वाटलें कीं मी हें गैर करीत आहे. त्यावेळीं राजसिंहांच्या आंगच्या शौर्याची मला कल्पनाच नव्हती. बाळे ! तुझा इच्छितवर ह्या सर्व राजस्थानाचें गौरव आहे. त्याच्यासह सुखानें अखंड राज्य करा. हाच माझा तुला आशिर्वाद आहे.' नंतर चंचलेनें सर्वत्रांस पंचारतीनें ओंवाळलें. राजसिंहास ओंवाळतेवेळीं चंचलेनें जें दृष्टीवैक्षम्य दाखविलें तें पाहून राजसिंहास धन्यता वाटली.

प्रकरण ३४ वें समाप्त.

प्रकरण ३९ वें.

गुप्त वार्तेचा परिस्फोट.

आजचा दिवस राजस्थानच्यां इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नोंदून ठेविण्यासारखा उगवलेला होता. राजस्थानवासी प्रत्येक रजपूताच्या मुखावर एक प्रकारचें विलक्षण तेज दृष्टोत्पत्तीस येत होतें.

अशा वेळीं आपण दुसऱ्या एका महालाकडे नजर फेंकू या. तिकडे काय चाललें आहे तेंही आपण अवश्य पाहिलें पाहिजे. सहस्त्ररश्मी अस्तास जाण्याच्या तयारींत आहे, अशा वेळीं उदेपुरच्या महाराण्याच्या एका महालामधील, एका खिडकीजवळ एक रमणी वनश्रीचा देखावा पहात उभी राहिलेली दृष्टीस पडत आहे. समोर आरवली पर्वतांची रांग असून तीवरील निरनिराळ्या वनस्पतींचें सौंदर्य पाहून कोण आश्चर्य पावणार नाहीं बरें ! आमची सुंदरी तें सृष्टीनिर्मित सौंदर्य पाहण्यात गर्क झाल्यास नवल नाहीं ! ईश्वरानें प्रत्येक वस्तु अशा प्रकारची निर्माण केलेली आहे कीं, तिचें सूक्ष्मरित्या अवलोकन करणारांस त्यांत कांहींना कांहीं तरी चमत्कार वाटल्यावांचून राहणार नाहीं. त्याची मती गुंग झाल्यास नवल नाहीं ! सपाट प्रदेशापासून एकापेक्षां एक उंचच उंच अशी ती पर्वतश्रेणी ! जागोजाग तुटलेले कडे ! ती वरील ते नानाप्रकारचे वृक्ष ! त्या तशा निर्जन प्रदेशामधून वाहणारा एखादा झरा ! त्या झऱ्याच्या योगानें एखाद्या खोल जागीं पाणी सांठून निर्माण झालेलें तळें ! त्या तळ्यामध्यें आनंदानें रममाण करणारे हंसक्रौंच इत्यादिक पक्षी ! आंत फुललेलीं निरनिराळ्या रंगाचीं कमलें ! इत्यादि सृष्टीसौंदर्य पाहून कोणता मानवप्राणी त्या ईश्वराचें अस्तित्व मानणार नाहीं बरें ! मनुष्याच्या मनास क्षणभर आनंद देणाऱ्या ह्या वस्तू आपोआप कशा निर्माण झाल्या असाव्या व ह्यांत कोणतें गूढ आहे ? हें तज्ञच सांगूं शकेल. असो. असें तें सृष्टीसौंदर्य उपभोगित ती रमणी लीन झाली आहे. तिला आपल्या देहाचेंहि भान राहिलें नाहीं. आपल्या मागून दोन मनुष्यें येऊन आपली हालचाल पहात आहेत हें तिला मुळींच आवगत झालें नाहीं. मागाऊन येणाऱ्या व्यक्तिनींही तिच्या त्या लीन झालेल्या वृत्तींत मुळींच अडथळा आणिला नाहीं. तीं दोघें एकमेकांकडे पाहून कांहीं खुणा करूं लागलीं व तेथील जवळच्याच एका आसनावर बसलीं. ह्याप्रमाणें थोडावेळ निघून गेल्यानंतर ती सृष्टीसौंदर्याचें प्राशन करण्यांत मग्न झालेली सुंदरी आपल्याशींच म्हणाली. '' येथपर्यंत तर मजल आलीच. ह्या वनश्रीचें अवलोकन करतां करतां माझी तंद्रीही लागून जायचा वेळ आला पण मनाची तृप्ती अशी मुळींच होत नाहीं. बरें पण बाबा अद्याप कां बरं आले नाहींत ? माता तपस्विनीनेंही ह्या वेळीं येऊन तुझ्या मातापितरांची हकीकत सांगून त्यांची

व तुझी भेट करून देतें असें अश्वासन दिलें होतें असं असून असं कां ?' असें म्हणून ती मागें वळली व पहाते तो परमहंस व माता तपस्विनी बसलेलीं तिच्या दृष्टीस पडलीं त्या बरोबर तिला आश्चर्य वाटलें व थोडी लज्जाही उत्पन्न झाली. तिच्या तोंडून शब्दही निघेना. असें पाहून परमहंस म्हणाले, 'मुली ये. अशी जवळ ये. तूं आपल्या पित्यास व मातेस भेटण्यास इतकी उत्सुक झाली असशील असें मला वाटलें नव्हतें. पण आजच्या तुझ्या आत्मगत संभाषणावरून तूं त्यांची भेट घेण्यास रात्रंदिवस उत्सुक झालेली आहेस असें दिसतें.'

'पिताजी ! माझा फुरसतीचा वेळ, बहुत करून ह्याच विचारामध्यें जात असतो. मीं जरी वर वर आनंदी दिसतें तरी माझें अंतरंग ह्याच विचारांत रममाण झालेलें असतें. आपण वचन दिल्यादिवासापासून मला आजचा दिवस केंव्हां एकदां येईल असें वाटत होतें. अहाहा ! माते ! माते ! तुझ्या प्रेमास तहानेली ही बालिका एकवेळ आत्मार्पण करावयास धजली होती. पण तपस्विनी मातेनें त्या दिवशीं मला आत्मघातापासून परावृत्त केलें. त्या दिवसापासून मी बाबांची व आईची आठवण काढीत असतें. बाबा ! मी आपणास आजपर्यंत पितृवतच मानलें आहे ! माताजी ! मी तुम्हांस मातेप्रमाणेंच मानलें आहे. आपण जी कोणी माझी माता-पितरें आहेत ती दाखवून देणार आहां; तीं जन्मदाती असून आपण माझी धर्माचीं मातापितरें अहा. मला एकवेळ त्यांस भेटवा. माझ्यानें आतां जास्त वेळ दवडवणार नाहीं.'

हावेळपर्यंत तपस्विनी स्वस्थच बसली होती. तिला यापुढें स्वस्थ बसवेना. ती तिच्या जवळ आली व तीस हृदयाशीं कवटाळून गहिंवरून म्हणाली. 'मुली, हीच तुझी अभागी माता ! ये. जवळ ये ! अशी दूर होऊं नको मला आलिंगन देऊन पोटभर सुख घेऊं दे ! आजवर ह्या चांडळणीनं तुझा अंत पाहिला. हृदयावर धोंड घेऊन, तुला गोंधळांत ठेविली. ह्याबद्दल मला पश्चात्ताप होत आहे. बाळे ! आज मी कृत कृत्य झालें.'

'काय ? तुम्हींच माझ्या आई ! मग आई आजवर कसं बरं ह्या अभागिनिला 'मी तुझी आई' असं सांगतलंस नाहीं ? माते ! अहाहा ! माते ! धन्य धन्य मी ! देवा ! इच्छित पूर्ण केलेंस. बरं पण आई ! बाबा कुठें आहेत?' असें म्हणून ती परमहंसजीकडे आश्चर्ययुक्तरित्या पाहूं लागली. ह्यापुढें तिला संशयांत ठेवणें वाईट हें जाणून परमहंसजी पुढें झाले व म्हणाले. 'ये ये बाळ ! हा तुझा अभागी पिता.' 'बाबा ! बाबा !' असें म्हणत तिनें परमहंसजीस कवटाळलें.' 'बाबा ! बाबा ! आई ! तुम्हीं माझा किती अंत पाहिलात हा ! आज इतकीं वर्षें तुमच्या सहवासास असून मी किती मूर्ख कीं मला उमज पडला नाहीं ! आपलें निर्हेतुक प्रेम, ममता, हीं खऱ्या आई-

बापांस शोभण्यासारखींच होतीं; तरींही मला समजूं नये हें माझें दुर्भाग्यच होय. बाबा ! आई ! आतां मला मात्र अंतर देऊं नका.'

तपस्वी०—नाहीं हा बाळ आतां तुला अंतर देणार! असें म्हणून पुनः आलिंगिते. इतक्यांत प्रतापाची स्वारी येते तो हा प्रकार पाहून दंग होतो. त्यास जास्त वेळ आश्चर्यांत ठेवूं नये म्हणून राणीसाहेब म्हणाल्या. 'प्रतापसिंहजी आपण यांस ओळखलं का ?'

'म्हणंजे याचा अर्थ काय ? गुरुवर्य परमहंस व माता तपस्विनी यांस कोण वरें ओळखणार नाहीं ?'

परम०—-बेटा ! आतां तो मी पूर्वीचा परमहंस नव्हे. आजपासून मी वीरपूरचा ठाकूर चामुंडराय, तपस्विनी ही माझी पत्नी व महाराणी ही माझी मुलगी चंपककलिका होय. समजलास.

'महाराज मग इतके दिवस हें गुप्त ठेवण्याचें कारण ?'

'तसेंच कारण होतें म्हणून तें मी गुप्त ठेविलें होतें. औरंगजेबाचा सेनापती जयसिंग यानें आमच्या वीरपुरावर हल्ला करून आम्हांस देशोधडीस लावलें. माझ्या पत्नीची व मुलीची ताटातूट केली. त्या गोष्टीबद्दल, योग्य संधी येतांच–सूड घेण्याचा मी कृतसंकल्प केला. संकल्पा प्रमाणें कार्यास सुरवात केली त्याच वेळीं अकस्मात माझी व ह्या कन्येची भेट झाली. जरी तिला लहान असल्यामुळें मला ओळखतां आलें नाहीं तरी मी तीस ओळखलें. व आपल्याजवळच ठेवून तिचें संरक्षण केलें. पुढें कांहीं कालानें तशाच एका चमत्कारिक प्रकारानें माझ्या पत्नीचीही गांठ पडली. पण त्या वेळेपासून आम्हीं ह्या मुलीस आपली ओळख न देतां तिच्याच हातून देशकार्य तडीस नेण्याचा निश्चय केला. कारण स्त्रीचें धैर्य नजरेस पडतांच पुरुषास भिरुत्व बाळगण्यामध्यें लज्जा उत्पन्न होत असते. ह्या तत्वानुसार तिची राज्ञीपदावर योजना केली. पुढें काय झालें तें सर्व तुला विदित आहे. परवाच्या दिवशीं आम्हीं मोंगलांचे बंदिवान झालों ! त्या वेळीं आमची ही आशा, जागचे जागींच जिराली, आतांमात्र आपल्या मुलीचें दर्शन होत नाहीं; सर्व इच्छा मनांतल्यामनांतच नाश पावतात कीं काय ? असें आम्हांस वाटलें पण तुझ्या आगमनानें–तूं जो पराक्रम करून आम्हांस सोडवून आणलेंस त्या योगानें आमची आशा पुनः प्रज्वलीत झाली. बाळा ! तूं धन्य आहेस! आईबापाच्या पोटीं तुझ्याचसारखीं रत्नें निर्माण व्हावी अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

प्रकरण ३५ वें समाप्त.

प्रकरण ३६ वें.

इष्टलाभ.

आज उदेपुरामध्यें जिकडे तिकडे आनंदप्रदर्शित झाला होता. प्रत्येकाच्या मुखावर आनंद व्यापून वृत्ति उल्हासयुक्त झालेली दिसत होती. आज एखाद्या महापर्वणीप्रमाणें नागरिक आबालवृद्धजन उत्तमोत्तम आभरणें वगैरे लेऊन मिष्टान्नावर खूप तडाका मारीत होते. कित्येक व्यसनीं रजपूत कुसुंबा पिऊन, कित्येक अफूचें सेवन करून आपल्याच धुंदीमध्यें गर्क झालेले होते.

राजवाड्यामध्यें तर विलक्षणच थाट दृष्टीस पडत होता. दरबार दिवाणखान्यामध्यें रजपूत योद्धयांच्या झुंडीच्या झुंडी प्रवेश करीत होत्या. आज लढाईमध्यें कामास आलेल्या, रजपूतांच्या कुटुंबाचा व जखमी झालेल्या योद्धयांचा परामर्श घेण्यासाठीं,व ज्यांनीं उत्कृष्ट कामगिरी केली होती त्याचा गौरव करण्यासाठीं खास दरबार भरणार होता. वेळ होतांच दरबारचा दिवाणखाना गच्च भरला. दरबारामध्यें, सरदार, दरकदार, मानकरी, मांडलीक, राजेरजवाडे, प्रताप, परमहंस, तपस्विनी, विक्रमसिंह वगैरे मंडळी आपआपल्या आसनांवर विराजमान झाली होती. मध्यभागीं राजसिंहाचें सिंहासन ठेविलें होतें तें फक्त रिकामें होतें.बाजूस चिकाच्या पडद्याच्या आंत,चंपककलिका-महाराणी, चंचलकुमारी, निर्मला वगैरे राजस्त्रिया बसल्या होत्या. थोडक्याच वेळांत राजसिंहाची स्वारी दाखल झाली त्याबरोबर सर्वत्रांनीं उठून त्यांचें स्वागत केलें. आसनावर विराजमान होतांच, राजसिंह ह्मणालेः—

वीरहो ! आजचा हा आनंददायक प्रसंग इतक्या लवकर येईल असें मला वाटत नव्हतें. पण ईश्वराच्या कृपेनें तो प्रसंग आला आहे. ह्या प्रसंगानें आज आपल्या राजस्थानाचें मुख उज्वल झालें आहे. तो प्रसंग येण्यास कारणीभूत कोण म्हणाल तर आंतील पडद्यामध्यें बसलेल्या गुप्तवीर संघाच्या महाराणी, वीरपुरचे राणे चामुंडराय यांच्या कन्या चंपककलिका ते समोर बसलेले परमहंस ऊर्फ चामुंडराय व त्यांच्या पत्नी त्या तपस्विनी यांच्या खटपटीनें ! अगाध देशसेवेच्या व्रतानें ! स्वाभिमानयुक्त अंतःकरणानें ! आलेला आहे. वीरप्रताप सोळंखी यांच्यासारखे देशाभिमानी ! कुळास निष्कलंक राखणारे वीर ! विक्रमसिंहाप्रमाणें सामर्थ्यावांचून बडबड करणाराकडे ढुंकून न पाहणारे व सामर्थ्य प्राप्त होतांच कृति पाहून मदत करणारे साह्यकर्ते ! मिळाले म्हणूनच आपणांस औरंगजेबासारख्या भयानक शत्रूबरोबर टिकाव धरवला, नाहींतर आज आपण ही स्थिति पाहिली असती कीं नाहीं ह्याबद्दल संशयच होता. आज आम्हांस आपल्या देशास मुकावें लागलें असतें. मोंगलांचा ताप असह्य झाला असता. करितां

सर्वत्रांनीं वीर चामुंडरायांचे आभार मानणें अवश्य आहे. 'परमहंस ऊर्फ चामुंडरायकी जय' ह्मणून एकच ध्वनी उठला. जरा शांतता होतांच पुनः राजसिंह ह्मणाले, वीर चामुंडराय यांजवर औरंगजेबाचा सेनापती जयसिंग अंबराधिपती यानें चढाई करून त्यांचा सर्व नाश केला होता. त्या लढाईमध्यें त्या तिघांचीही चुकामुक झाली. शेवटीं अकल्पित योगानें पिता, माता, व कन्या यांची गांठ पडली. त्यावेळेपासून त्यांनीं आपणांवर मोंगलांनीं जो जुलूम केला आहे त्याचें उसनें फेडण्यास गुप्त-वीर संघाची स्थापना करून हजारों सैनिक तयार केले! तेच आज आपल्या देशाच्या उपयोगी पडले आहेत. त्यांचा गौरव करणें अवश्य आहे. तेंच काम मी प्रथम हातीं धरतों.' असें म्हणून त्यानें सर्व वीरांस बहुमोल पोषाख अर्पण केले. नंतर त्यानें मृतांच्या आप्तांस व जखमी झालेल्यांस मदत करण्यात बराच वेळ खर्च केला. नंतर विक्रमसिंह उठून उभे राहिले. ते म्हणाले. 'वीरहो! मी एक अभिमानाचा परित्याग केलेला, ऐषआरामांत लोळत पडलेला प्राणी होतों. मोंगलांची हांजी हांजी करून आपलें ऐश्वर्य सांभाळण्याकडे माझा कल होता. आपल्या रजपूतांचें पाणी नाहिंसें झालें आहे! आपण त्यांचे मिंधे बनलो गेलों आहों! त्यांच्या तंत्रानें जर आपण न वागलों तर आपलें पुढें कसें काय होईल हीच मला चिंता वाटत असे! त्या चिंतेचा महाराणाजीनें परिहार केला आहे! त्यांनीं माझ्या मुलीस मोंगलांच्या हातून सोडविली व माझ्या पुतण्याचेंही मी न ऐकून आपल्या कुळास काळिमा लावण्यास तयार झालों होतों त्या आपमानास्पद स्थितींतून महाराण्यांनीं पुढाकार घेऊन मला मुक्त केल्यामुळें आज मी त्यांस माझी कन्या चंचलकुमारी अर्पण करीत आहे तिचा त्यांनीं स्वीकार करावा.' 'जयमहाराणाजी की जय' म्हणून लोकसमूह गर्जना करूं लागला. नंतर परमहंस उठून म्हणाले, 'वीरहो! आज माझें कर्तव्य संपलें. मी जें व्रत घेतलें होतें त्याची संपूर्ण सांगता झाली. माझ्या गुप्तवीर संघाची माळ मी आज-पासून महाराणा राजसिंहाच्या गळ्यांत घालीत आहे. खेरीज माझी मुलगी चंपककालिका जर विक्रमसिंह अनुमती देतील तर वीर प्रतापास द्यावी असा माझा मानस आहे. विक्रमसिंह आम्हांस पदरीं घेतील व पावन करितील अशी मला आशा आहे.' विक्रम-सिंहाची अनुमती मिळाली. शेवटीं महाराणा राजसिंह उठून म्हणाले, 'वीरहो! सर्व-त्रांच्या मनाप्रमाणें योग जुळून आले आहेत. आतां फक्त एकच वीराचा सन्मान करणें राहिलें आहे ते वीर हे आपले 'जयसिंह' यांच्या मर्दुमकेची आपणास माहिती आहे. त्यांचें धैर्य अवर्णनीय आहे. नीच धंद्यामधून अकल्पित योगानें निघून आज ते माझे सेनापती झाले आहेत व त्यांनीं मला संतोषित केलें आहे. त्यांस विक्रम-सिंहाची अनुमती असल्यास त्यांनीं पोटच्या मुलीप्रमाणें पाळलेली आपल्या सरदा-राची मुलगी निर्मला अर्पण करावी अशी माझी इच्छा आहे.'

विक्रमसिंह०—सर्वांच्या मनाप्रमाणें सगळ्या गोष्टी घडून आल्या आहेत. आतां माझाही वृद्धापकाळ झाला आहे तेव्हां लवकरच सुमुहूर्तानें वीर प्रतापास रूपनगरच्या गादीवर बसवावें अशी माझी इच्छा आहे. ईश्वर सर्वत्रांस सुखी ठेवो.

राज०—तथास्तु.

दरबारचें काम संपलें व रजपूत सैनिक, ' महाराणाजीकी जय ' म्हणून गर्जना करीत घरोघर चालते झाले. रणोत्सवाची पूर्तता झाली. आतां मदनोत्सवाची तयारी करण्यास जो तो उत्सुक दिसूं लागला.

प्रकरण ३६ वें समाप्त.

प्रकरण ३७ वें.

शेवटचे दोन शब्द.

विवाहकार्यें उरकलीं. ह्या लढाईपासून राजस्थानामध्यें राजसिंहाचें वजन वाढलें. राजसिंहास ज्याप्रमाणें आपल्या कुळांतील श्रेष्ठ कुळांचा माननीय पुरुष म्हणून मानीत असत, त्याप्रमाणें त्याच्या आंगीं त्याच्या पूर्वजांच्या आंगीं असलेलें शौर्य वास करीत आहे, असें दृष्टोत्पत्तीस येतांच त्यास अतिशय मान मिळूं लागला. त्याचा परिणाम पुढें जी औरंगजेबानें चाल केली त्यावेळीं दिसून आला.

पुनः औरंगजेबानें राजसिंहावर चढाई केली. आजीमशहाच्या लष्करावरोबर बादशाही लष्करानें कूच केलें त्या वेळीं, प्रख्यात मारवाडी वीर दुर्गादास ह्यास साह्यास घेऊन राजसिंहानें औरंगजेबावर हल्ला केला. त्याही वेळीं बादशहा पराजय पावला. ह्यावेळीं रजपूतांनीं त्याचें सर्वस्व लुटून घेतलें.

औरंगजेब व आजीमशहा जे पळाले ते चितोड राजधानींत गेले, पण त्या ठिकाणींही त्यांस सुखानें बसूं दिलें नाहीं. सावळदास ह्या नांवाच्या एका रजपूत सेनापतीनें चितोड आणि अजमीर यांच्या दरम्यान छावणी ठोकली, त्यामुळें खुराकी बंद झाली, म्हणून रोहीलखानाजवळ बाराहजार स्वार देऊन सावळदासाबरोबर लढण्याचा हुकूम केला आणि बादशहा अजमीरास पळाला. त्यानंतर त्यानें कधींही उदेपुरावर स्वारी केली नाहीं.

इकडे सावळदासानें, रोहीलखानाला बराच हात दाखविला. तोही हार पावून अजमीरास पळाला. दुसऱ्या बाजूनें राजसिंहाचा दुसरा पुत्र कुमार भीमसिंग यानें गुजराथच्या सरहद्दीवरील मोंगली मुलखांत जाऊन, तेथील शहरें लुटलीं आणि शेवटीं राजधानीही लुटली, व तेथील मुसलमान अधिकारी यांस हुसकून दिलें, आणि

सौराष्ट्रापर्यंतचा मुलूख आपल्या कबजांत आणिला. लुटीपासून प्रजेस फार त्रास पोहोंचत असतो हें जाणून राजसिंहानें त्यास परत बोलाविलें. दयेच्या स्वभावामुळें राज्यविस्तार करितां आला नाहीं, हेंच तत्व राजसिंहाच्या वेळच्या परिस्थितीला जोडण्यास हरकत नाहीं.

पण राजसिंहाचा मंत्री दयाळशहा, इतका दयाशील नव्हता. तो मोठा धीरवीर आणि तरतरीत सरदार होता. तो एकसारखा भराऱ्या मारीत होता. त्यानें बहुतेक माळवा काबीज केला होता. त्यानें, सारंगपूर, देवास, सरोज, मांडू, उज्जनी आणि चंदेरी हीं मुसलमानांनीं दाट वसलेलीं शहरें लुटलीं व तेथील रक्षक कापून टाकले. औरंगजेबानें हिंदुधर्मियांवर फारच जुलूम चालविला होता त्याचें उट्टें फेडण्यासाठीं त्यानें काजी, मुफती यांस पकडून त्यांचीं डोकीं उडविलीं, व कुराण पाहतांच विहिरीमध्यें टाकण्याचा सपाटा चालविला होता. दयाळशहाच्या विलक्षण शौर्याला एकंदर म्लेंच्छ लोक इतके भीत असत कीं, ते त्याचें नांव ऐकतांच, आपल्या बायका व मुलें बेलाशक टाकून देऊन, जीव वांचविण्यासाठीं पळून जात किंवा लपत फिरत.

दयाळशहानें कुमार जयसिंहाच्या लष्करामध्यें आपलें लष्कर दाखल केलें. शाहाजादा आजीमनें त्यांजबरोबर टक्कर दिली तींत अजीम पराजय पावला. व तो रणक्षेत्र सोडून चालता झाला.

राजपुत्र भीमसिंग यानें पुढें सिसोदिय व राठोड या दोन्ही कुटुंबांच्या वतीची म्हणून अकबर व तैबरखान यांच्याशीं लढाई केली व तींत त्यांचा अगदीं मोड करून टाकला. त्यावेळचें लढाईचें वर्णन भाटांनीं आपल्या ग्रंथांत केलें आहे. ती विलक्षण हकीकत अशी:--

एका रजपूत सरदारानें ५०० उंटांवर मशाली बांधून, रात्रीच्या वेळीं ते उंट मोकळेच मोंगलांच्या गोटांत सोडले. तेव्हां हा काय चमत्कार आहे, म्हणून गोटांतले सर्व लोक त्या उंटाकडे बघत उभे राहिले असून, ते काय अनर्थ करतील ह्याची त्यांना काळजी वाटत होती. तसेंच, कित्येक त्यांच्या मागें लागले; ह्यामुळें ते धूम शत्रूंच्या सगळ्या गोटांत धांवत अस्ताव्यस्त फिरूं लागले. तेव्हां गोटांत एकच गोंधळ होऊन गेला. ही संधी पाहून रजपुतांनीं एकदम त्यांचेवर हल्ला केला; आणि त्यांची कापाकाप चालवून त्यांस पळवून लाविलें.

ह्याप्रमाणें लढाईची एकसारखी चार वर्षें धुमश्चक्री चाललेली होती. शेवटीं दक्षिणेंत संभाजीची गडबड बरीच वाढली आहे तेव्हां दोघांबरोबर सामना देणें हें दुरापास्त होणार म्हणून औरंगजेबाचा रजपुतांबरोबर तह करण्याचा ठाम निश्चय झाला. पण तह करण्याची इच्छा आपण प्रगट केली असतां आपल्या इभ्रतीस साजेसें होणार नाहीं म्हणून त्यानें आपल्या कपटी स्वभावास अनुसरून, राण्याकडूनच त्याचें

सूतोवाच् होण्याची युक्ती काढिली. व दिल्हेरखानाबरोबर मसलत करून एका रजपूत सरदारास राण्याकडे पाठविलें. त्यानें युक्तीप्रयुक्तीनें लढाईचा विषय काढून बादशहाबरोबर सल्ला करून देण्याची हमी पत्करली. व राण्याचा चुलता शूरसिंग, सरदार पद्मसिंग, आणि बादशहाकडचा एक नरहर भट्ट यांच्या सहीचें एक पत्रक बादशहाकडे पाठविण्यांत आलें. त्या पत्रकांतील अटी अशा होत्याः—

१ चितोड आणि त्याचे भोंवतालचा प्रदेश जो मूळ रजपुतांनीं वसाविला, तो सर्व आमचा आह्मांस देण्यांत यावा.

२ हिंदूचीं देवालयें आणि इतर पवित्र जागा, ज्यांचेमध्यें मुसलमानांनीं दांडगाईनें मशिदी बांधल्या व जागांचा उच्छेद केला, त्यांविषयीं आतां आमचें कांहीं बोलणें नाहीं; परंतु यापुढें असा प्रकार कोठेंही होऊं देऊं नये. अशा दांडगेपणाचा अगदीं मोड झाला पाहिजे.

३ राण्याकडून यापूर्वीं बादशहाला जी मदत आणि साह्य देण्याचें ठरलें आहे त्याप्रमाणें साह्य मिळेल. पण जास्त प्रकारचे हुकूम मात्र होऊं नयेत.

४ मयत राजा जसवंतसिंग याचे मुलगे हे आपण होऊन आपल्या राज्याचा कारभार पाहण्यासारखे झाल्याबरोबर त्यांचें राज्य (मारवाड) त्यांच्या स्वाधीन होईल, अशी आह्मांस आशा आहे.

येणेंप्रमाणें तहाचीं कलमें वाचून बादशहानें आपला पंजा व बाजूस 'मंजुरी' हीं अक्षरें लिहून कपटविरहित असा, रजपुतांबरोबर आपल्या आयुष्यामध्यें पहिलाच तह केला व येथेंच लढाई संपली.

* * *

पृथ्वीच्या इतिहासामध्यें, औरंगजेबाची बरोबरी युरोपखंडांतील स्पेन देशाच्या दुसऱ्या फिलीप राजाबरोबर करितां येईल. दोघांच्याही स्वभावांत साम्य होतें. ते दोघेही कपटी, क्रूर, दांभिक, धर्मवेडे, मेहनती व युद्धकला विशारद होते. फिलीपला इंग्रजांनीं तसेंच वलंद्यांनीं, औरंगजेबाला रजपूतांनीं तसेंच मराठ्यांनीं खालीं पहावयास लाविलें. श्री छत्रपती शिवाजीमहाराज व त्यावेळची इंग्लंडची राणी इलिझाबेथ ह्या दोघांची बरोबरी करावयास हरकत नाहीं. वलंद्यांचा राजा विलियम व राणा राजसिंह यांच्यामध्यें विशेष साम्य होतें. यूरोपखंडाच्या इतिहासामध्यें विलियम यास देशहितैषी, धर्मात्मा, तसेंच वीरपुरुष म्हणून झटलें आहे. पण आपल्या देशाचा इतिहास पाहिजे तसा प्रकाशांत नाहीं म्हणून राजसिंहास कोणी ओळखूंसुद्धां शकत नाहीं.

इतिहासाचीं साधनें जितकीं उपलब्ध होतील तितकीं शोधून प्रसिद्ध करण्याचा कांहीं विद्वान् सद्गृहस्थांनीं उपक्रम चालविला आहे; त्याबद्दल इतिहासभक्तांनीं त्यांचे

आभार मानणें हें त्यांचें कर्तव्य आहे. खरा व संपूर्ण माहितीनें युक्त अशा इतिहासाची आमच्या देशास अत्यंत जरूरी आहे. एकतर्फी विवेचनानें भरलेल्या इतिहासाच्या संस्कारानें वाचकांच्या मनावर तादृशहि परिणाम होणें शक्य नाहीं. राष्ट्राचा इतिहास, त्याच राष्ट्रांतील निःपक्षपाती सद्गृहस्थांकडून लिहिला गेला पाहिजे. एरव्हीं भावी आशांचें बीजारोपण कधींही होणें शक्य नाहीं. असो.

येथपर्यंत राजसिंहाच्या इतिहासाचें कांहीं काल्पनिक प्रसंग घेऊन चित्र रेखाटलें आहे. त्यावरून रजपुतांच्या आंगीं राजकीय गुणामध्यें कितपत श्रेष्ठता होती त्याचें थोडेंबहुत तरी अनुमान करितां येईल. मुसलमानांनीं कित्येक शतकें भरतखंडावर राज्य केलें. त्यांच्यापैकीं कांहीं पुरुषांनीं हिंदु राजांपेक्षांही राजकीय प्रकरणामध्यें श्रेष्ठता संपादन केलेली स्पष्ट दिसून येत आहे. कित्येक ठिकाणीं मोंगलांचें श्रेष्ठत्व दिसून येत आहे तर कित्येक ठिकाणीं हिंदु राजांचें श्रेष्ठत्व दिसून येत आहे. पडतीचा प्रारंभ झाल्यास ' विनाशकाले विपरीत बुद्धि ' सुचत असते; त्याचप्रमाणें औरंगजेबाच्या अमदानींत प्रकार घडून आला आहे. धर्मवेडानें प्रजा त्रस्त पावल्यामुळेंच, राजसिंह व शिवाजी यांसारखीं रत्नें राजस्थान व महाराष्ट्र ह्या ठिकाणीं ईश्वरइच्छेनें निर्माण झालीं. न्याय, धर्म व नीति ह्यांवरच कोणतेंही राज्य अवलंबून असतें. जो राजा धार्मिक प्रजाहितैषी, न्यायी, नीतिवान्, पुत्राप्रमाणें प्रजेचें संरक्षण करणारा, धार्मिक कृत्यांत हात न घालणारा असा असतो त्याचीच कीर्ति दिगंत पसरत असते, त्या राज्यास रामराज्य असें म्हणतात. राजसिंह व शिवाजी यांचा इतिहास ह्याच गोष्टीची साक्ष देत आहे.